# आनंददायी शनिवार

## कृतिपुस्तिका

इयत्ता पहिली ते आठवी



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# आनंददायी शनिवार

## कृतिपुस्तिका



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## आनंददायी शनिवार कृतिपुस्तिका

- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन.
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. आय. ए. कुंदन (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **संकल्पना व मार्गदर्शन** : **मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **मा. प्रदिपकुमार डांगे (भा.प्र.से.)**
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- **संपादक** : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **डॉ. शोभा खंदारे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. कमलादेवी आवटे**
  उपसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी सहसंपादक** : **श्रीम. संध्या गायकवाड**
  साहाय्यक संचालक, व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादन साहाय्य** : **श्रीम. दिपाली जोगदंड**
  अधिव्याख्याता, व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  : **डॉ. सतिश सातपुते**
  विषय सहायक, व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रथम आवृत्ती** : जुलै २०२४
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.
- सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

## शुभेच्छा संदेश

शालेय शिक्षणात 'आनंददायी अध्ययनाचे' महत्त्वाचे उद्दिष्ट राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मध्ये अधोरेखित केलेले आहे. त्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्यामार्फत दि. १४ मार्च, २०२४ रोजी शासन परिपत्रक प्रसारित करण्यात आले आहे. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणातून शिक्षण मिळावे, नवीन प्रत्यक्ष कृतीच्या अनुभवाद्वारे शिक्षणाची पूर्वतयारी व्हावी या उद्देशाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात २०२४–२५ या शैक्षणिक वर्षापासून 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

शालेय विद्यार्थ्यांना 'आनंददायी शिक्षण' देणे आणि ताणतणावमुक्त अध्ययन अनुभव देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'आनंददायी शनिवार' हा एक आकर्षक व सर्व विद्यार्थी आनंदाने व उत्साहाने उपक्रमात सहभागी होतील असा आनंददायक उपक्रम आहे. ही संकल्पना इयत्ता पहिली ते आठवीच्या अभ्यासक्रमामध्ये नवीन विषयाची भर घालण्यासाठी नसून नियमित अभ्यासक्रमाशी संलग्न अनेक आनंददायी कृतीपूर्ण उपक्रम एकात्मिक शिक्षण पद्धतीने द्यावयाची आहे. 'आनंददायी शनिवार' उपक्रमातून २१ व्या शतकातील विविध जीवनकौशल्ये आत्मसात करण्याबरोबरच भविष्यकाळात व्यवसाय क्षेत्र निवडीसाठी मदत होणार आहे.

'आनंददायी शनिवार' या उपक्रमासाठी राज्यातील सर्व शासनमान्य शाळांमध्ये अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक कृतिपुस्तिका तयार करण्यात आली असून, त्याद्वारे हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

'आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत शाळेने घ्यावयाचे उपक्रम जसे क्षेत्रभेटी, प्रात्यक्षिकासह व्याख्याने, व्यावसायिक माहिती, क्रीडाकौशल्य, कलाकौशल्य, मुलाखत यांसारख्या उपक्रमांबाबत माहिती देण्यात आलेली आहे. प्रत्येक उपक्रमाचे सर्व पैलू, जसे उपक्रमातून विकसित होऊ शकणारी कौशल्ये, कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आलेली आहे. उपक्रमाची अंमलबजावणी करीत असताना त्यामध्ये मुक्तपणे बदल करण्याचे स्वातंत्र्य शिक्षकांना देण्यात आले आहे. यासाठी शक्य तेवढ्या लवचिकपणे शिक्षकांनी त्याची मांडणी करावी व यशस्वीपणे या उपक्रमाची अंमलबजावणी करावी.

'आनंददायी शनिवार' हा उपक्रम सर्व शासनमान्य शाळांमध्ये राबविण्यासाठी सर्व शिक्षकांना शुभेच्छा!

**मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.)**
**आयुक्त (शिक्षण),**
महाराष्ट्र राज्य, पुणे.

# प्रस्तावना

आपल्या राष्ट्राची भावी पिढी गतिमान बनविण्यासाठी समावेशक आणि बहुउद्‌देशीय समाज निर्मितीसाठी मोलाचे योगदान देतील असे कार्यमग्न, उत्पादक व योगदान देणाऱ्या नागरिकांची निर्मिती करणे, हे महत्त्वाचे उद्‌दिष्ट राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये नमूद केले आहे. २१व्या शतकातील कौशल्ये, व्यावहारिक कौशल्ये, चांगल्या सवयी, लोकशाही मूल्य संपादन करून एक सुजाण नागरिक घडवण्यासाठी शालेय शिक्षणात 'आनंददायी शनिवार' या उपक्रमाची आखणी करण्यात आलेली आहे.

'आनंददायी शनिवार' या उपक्रमातून अभ्यासक्रम व अभ्यासपूरक उपक्रम तसेच व्यावसायिक व शैक्षणिक प्रवाह यातील विभाजन दूर करून आनंददायी वातावरणात विद्यार्थी घडणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये अनेक कौशल्यांची निर्मिती या उपक्रमातून साध्य होणार आहे. इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या उपक्रमांतून कृतींद्‌वारे, प्रात्यक्षिकांद्‌वारे अध्ययन अनुभव उपलब्ध केले जाणार आहेत. यासाठी वर्गातील व वर्गाबाहेरील आनंददायी उपक्रमांचे वार्षिक नियोजन करायचे आहे. या उपक्रमातून सर्वसमावेशक शिक्षणाची उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी स्तरनिहाय अनुभव देण्याचे मार्गदर्शन या कृतिपुस्तिकेतून करण्यात आलेले आहे. यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये नमूद करण्यात आलेल्या शैक्षणिक स्तरानुसार उपक्रमांची रचना करण्यात आलेली आहे. याअंतर्गत इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचा अनुभव देण्यासाठी 'दहा दिवस दप्तराविना' या उपक्रमाची अनिवार्यपणे अंमलबजावणी करायची आहे.

स्थानिक परिस्थितीनुसार विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांना विविध अध्ययन अनुभव देणे, अध्ययनाची गोडी निर्माण करणे, गळतीचे प्रमाण कमी करणे, चांगल्या सवयींची निर्मिती करण्यासाठी सर्व शिक्षकांनी यात स्वतः सहभाग घेणे आवश्यक आहे. यासाठी सर्व विषयशिक्षक, मुख्याध्यापक यांनी एकत्रित येऊन पालकांच्या सहभागासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. हे उपक्रम अभ्यासक्रमाशी पूरक असल्याने उपक्रमांची रचना करताना, उपक्रम राबवित असताना शिक्षकांच्या सर्जनशीलतेलाही वाव मिळणार आहे.

'आनंददायी शनिवार'च्या माध्यमातून अभ्यासक्रमातून साध्य करायच्या अध्ययन निष्पत्तींसाठी कृतीपूर्ण उपक्रमांचे सूक्ष्म नियोजन करून आनंददायी उपक्रमांची शालेय स्तरावर इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी अंमलबजावणी करायची आहे. यासाठी अनेक उपक्रम नमुनादाखल या पुस्तिकेतून देण्यात आलेले आहेत. याची अंमलबजावणी करून शालेय जीवन आनंददायी करण्यासाठी शुभेच्छा!

**राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
**संचालक,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे

## स्तर १ ते ३ : इयत्ता पहिली ते आठवी

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | स्तर | इयत्ता | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | स्तर १ | पहिली ते दुसरी | १७ ते ७२ |
| २) | स्तर २ | तिसरी ते पाचवी | ७३ ते १३४ |
| ३) | स्तर ३ | सहावी ते आठवी | १३५ ते २५३ |

# आनंददायी शनिवार

**प्रस्तावना :**

"The joy of learning is as indispensable in study as breathing is to running. Where it is lacking there are no real students, but only poor caricature of apprentices who, at the end of their apprentices, will not even have a trade." असे आनंददायी अध्ययनाचे महत्त्व अधोरेखित करणारे विचार फ्रेंच तत्त्वज्ञ सायमन वेल यांनी मांडलेले आहेत. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना अपेक्षित असलेल्या शैक्षणिक पद्धतीनुसार विद्यार्थ्यांचा विकास हा कृतियुक्त पद्धतीने व्हावयास हवा. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मधील भाग १ मध्ये शालेय शिक्षण यात विद्यार्थ्यांचे शिकणे हे सर्वांगीण, एकात्मिक आनंददायक आणि रंजक असले पाहिजे असे नमूद करण्यात आले आहे. यानुसार विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात आनंददायी कृती असण्याची गरज प्रकर्षाने नमूद करण्यात आलेली आहे. यासाठी सर्व स्तरांवर प्रात्यक्षिक शिक्षण, कला, खेळ, कथाकथन आधारित अध्यापन यांचा समावेश करण्यासाठी सुचविण्यात आले आहे. म्हणून 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम शासनमान्य सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीसाठी राबवण्यात येणार आहे.

सध्याच्या काळात लहानवयातही विद्यार्थ्यांना ताणतणाव, उदासीनता, नैराश्य या मानसिक विकारांना सामोरे जावे लागत आहे. म्हणून आनंददायी शनिवार या उपक्रमातून अभ्यासक्रमाशी जोडण्यात आलेल्या विविध आनंददायी कृतीतून विद्यार्थ्यांच्या तर्कसंगत विचार, सहानुभूती, सहकार्यवृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, जिज्ञासूवृत्ती, उद्योजकता यांसारख्या क्षमतांचा विकास होणार आहे. प्रत्येक शालेय शनिवारी हा उपक्रम राबविणे आवश्यक असून याच्या परिणामकारक अंमलबजावणीमुळे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन उपस्थितीमध्ये देखील खूप वाढ होईल. गळती व अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

आनंददायी शनिवार हा उपक्रम राबविण्यासाठी शाळेतील अंमलबजावणीसाठी प्रत्येक आवश्यक घटक शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, समाज व विद्यार्थी या सर्वांनी एकत्रित कार्य करणे आवश्यक आहे. यासाठी मुख्याध्यापक व शिक्षकांनी उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. हा उपक्रम अभ्यासक्रमाशी निगडित कृतींशी संबंधित असल्याने सर्व विषय शिक्षकांनी अभ्यासक्रमाशी सुसंगत अशा कृतींची निवड करून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या कृतिपुस्तिकेत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करता येऊ शकतील अशा विविध विषयांशी संबंधित मार्गदर्शक कृतींचा समावेश केलेला आहे, परंतु शिक्षक याशिवाय वेगळ्या नावीन्यपूर्ण कृतींचाही समावेश करू शकतात. याची मुभा शिक्षकांना देण्यात आलेली आहे.

**संकल्पना :**

१) आनंददायी शनिवार या उपक्रमातून आनंददायी अध्ययनातून विद्यार्थी गुणवत्तेमध्ये वाढ होईल. या

उपक्रमातून अभ्यासक्रमाशी निगडित खेळ, कला, व्यावसायिक शिक्षण, कृतीद्वारे शिक्षण, क्षेत्रभेटी, इत्यादींवर भर देण्यात आलेला आहे.

२) ‘आनंददायी शनिवार’ या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शाळेतील प्रत्येक विषयशिक्षकांनी एकत्रित येऊन इयत्ता पहिली ते दुसरी, इयत्ता तिसरी ते पाचवी, इयत्ता सहावी ते आठवी या शैक्षणिक स्तरानुसार नियोजन व अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. (परिस्थितीनुसार यात लवचिकता असू शकेल.)

३) आनंददायी शनिवार उपक्रमात आनंददायी विविध कृतींचा समावेश आहे. विद्यार्थी सर्व कृती आनंदाने करतात. प्रत्यक्ष कृती मधून शिक्षणातील कौशल्य प्राप्ती, अध्ययन निष्पत्ती साध्य होणार आहे.

४) विशेष गरजा असलेल्या मुलाचा समावेश करण्यासाठी त्याला पालक, विशेष शिक्षक, विद्यार्थी यांचे साहाय्य प्रदान केले जाणार आहे.

५) या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मधील ‘आवश्यक विषय, कौशल्ये आणि क्षमतेचे अभ्यासक्रमिक एकात्मीकरण’ या घटकातील इयत्ता सहावी ते आठवी दरम्यान विद्यार्थ्यांना ‘व्यावसायिक कलांचा’ प्रत्यक्ष अनुभव मिळण्यासाठी ‘दहा दिवस दप्तराविना’ या उपक्रमाचा समावेश करण्यात आलेला आहे.

६) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० मधील टास्क क्र. ९२ अंतर्गत इयत्ता पहिली ते बारावीसाठी अभ्यासक्रमाशी निगडित आनंददायी कृतींची निर्मिती करण्यास सूचित करण्यात आलेले आहे. याअंतर्गत या उपक्रमाचे आयोजन करायचे आहे.

### आनंददायी उपक्रमाची उद्दिष्टे :

१) विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम राखणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व भावनिक कौशल्य विकसित करणे.

३) शालेय स्तरावर ताणतणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे.

४) विद्यार्थ्यांमध्ये संभाषण कौशल्य विकसित करणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे व नैराश्यावर मात करण्याची क्षमता विकसित करणे.

६) विद्यार्थ्यांची शिक्षणात अभिरुची वाढविणे.

७) विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता संवर्धनासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.

८) विद्यार्थ्यांचे गळती व अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी करणे.

९) विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी, सहकार्यवृत्ती व नेतृत्व गुण यांचा विकास करणे.

१०) विद्यार्थ्यांना विविध व्यवसाय व उद्योगांबाबत माहिती देणे.

११) विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्यांचा विकास करणे.

१२) विद्यार्थ्यांना श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व पटवून देणे.

१३) कृषीविषयक आवड व आदर निर्माण करणे. कृषीतील नावीन्यपूर्ण प्रयोगांची माहिती देणे.

१४) लोकसेवा अधिनियमबाबत जागृती निर्माण करणे.

१५) विद्यार्थ्यांची शिकण्याची तयारी खेळीमेळीच्या वातावरणातून करणे.

१६) कृतिशील अध्ययनातून क्षमतापूर्ण सक्षम उत्पादक गट तयार करणे.

१७) विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी आनंददायी वातावरण उपलब्ध करून देणे.

१८) विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करणे.

## आनंददायी शनिवार कार्यपद्धती :

या वर्षी सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रापासून 'आनंददायी शनिवार' उपक्रम २०२४-२५ या वर्षापासून राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम शासनमान्य सर्व शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी असणार आहे. या उपक्रमासाठी सर्व विषयशिक्षकांनी एकत्रित कार्य करायचे आहे. आपल्या विषयांतर्गत येणाऱ्या उपक्रमांची निवड या कृतिपुस्तिका संचयिकेतून किंवा खाली निश्चित करण्यात आलेल्या आराखड्याप्रमाणे स्वतः निर्मिती करायची आहे. यासाठी उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यपद्धतीचा आराखडा पुढीलप्रमाणे आहे.

१) उपक्रमाचे नाव

२) पूर्वनियोजन

३) विकसित होणारे कौशल्य

४) आवश्यक साधनसामग्री

५) अंमलबजावणी दरम्यानच्या कृती

- शिक्षक कृती
- विद्यार्थी कृती

६) संदर्भ

'आनंददायी शनिवार' उपक्रमाच्या अपेक्षित उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार उपक्रम अंमलबजावणीसाठी शैक्षणिक स्तरनिहाय उपक्रमांची मांडणी करण्यात आली आहे. (इयत्ता पहिली व दुसरी, इयत्ता तिसरी ते पाचवी, इयत्ता सहावी ते आठवी) यासाठीचा स्तर किंवा इयत्तानिहाय शाळेतील शिक्षकांनी एकत्र येऊन वर्गातील किंवा वर्गाबाहेरील कृती कराव्यात, त्यात खालील बाबींचा समावेश करता येईल.

१) क्षेत्रभेट

२) प्रात्यक्षिक/कृतीसह व्याख्याने

३) व्यावसायिक माहिती

४) स्वनिर्मिती

५) सर्वेक्षण

६) कलाकौशल्य

७) क्रीडाकौशल्य

८) मुलाखत

९) बौद्धिक खेळ

१०) गटांमधील नावीन्यपूर्ण कृती

शिक्षकांची सर्जनशीलता व कल्पकतेनुसार या यादीत भर पडू शकते.

**१) क्षेत्रभेट व शैक्षणिक सहल :** या उपक्रमातील भेटी आनंददायी कृती आहेत. या भेटीच्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये संकल्पनेचे आकलन तसेच सामाजिक आणि पर्यावरणीय संवेदनशीलता विकसित करण्याच्या दृष्टीने नियोजन आणि आयोजन करणे आवश्यक आहे. शाळांनी काही आनंददायी उपक्रम निश्चित करून त्याची सांगड सर्व विषयांशी घातली पाहिजे. यातून सर्व विषयांच्या अध्ययन निष्पत्तींची पूर्तता होणे अपेक्षित आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध कारखाने, किल्ले, वस्तुसंग्रह, वृद्धाश्रम, प्राणिसंग्रहालय, बागबगीचे, सेवा कार्यालये, गावातील शाळा, मंदिरे, ऐतिहासिक स्थळ इत्यादी ठिकाणी भेटीचे नियोजन करता येऊ शकते, परंतु या उपक्रमाचे आयोजन करण्यापूर्वी नेमकी कोणती कौशल्ये, तसेच अध्ययन निष्पत्ती अपेक्षित आहे याची आखणी करून संबंधित उपक्रमाची पूर्वतयारी करावी.

**२) प्रात्यक्षिक, कृतीसह व्याख्याने :** प्रात्यक्षिक व कृतीसह व्याख्याने उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शोधकवृत्ती, समस्या निराकरण क्षमता नवनिर्मिती, चर्चा करणे, चिकित्सक विचार करणे, वर्गीकरण करणे, विश्लेषण करणे, कारणमीमांसा करणे, निष्कर्ष काढणे इत्यादी क्षमतांना प्रात्यक्षिकांद्वारे वाव देता येईल. यासाठी उपलब्ध संसाधने, इच्छुक पालक, समाजातील शिक्षणक्षेत्रात कार्य करण्यास इच्छुक व्यक्तींचे सहकार्यदेखील घेता येऊ शकते.

**३) व्यावसायिक माहिती :** मूलभूत गरजेनुसार स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार त्या त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या व्यवसायिकांची माहिती विद्यार्थ्यांना देणे गरजेचे आहे. बदलत्या जीवनमानानुसार व्यवसायात अनेक बदल होत आहेत, नवनवीन व्यवसाय उदयास येत आहेत. याची ओळख तसेच

माहिती विद्यार्थ्यांना करून देणे अपेक्षित आहे. तसेच आरोग्य व पोषण या संदर्भात संबंधित आहारतज्ज्ञ, पोषणतज्ज्ञ तसेच अनेक व्यवसाय त्यासाठी आवश्यक क्षमता, शिक्षण, उपलब्ध संधी ही माहिती व्यावसायिक माहिती उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देता येऊ शकते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० अन्वये इयत्ता सहावी ते आठवीदरम्यान प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी 'दहा दिवस दप्तराविना' हा उपक्रम अनिवार्यपणे राबवायचा आहे. या विषयांतर्गत या उपक्रमाचे नियोजन करता येऊ शकते.

४) **स्वनिर्मिती :** विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला प्रेरणा देऊन हस्तकलेला वाव देण्यासाठी विविध प्रकारांचा समावेश यामध्ये घेता येईल. या उपक्रमातून परिसरातील समस्यांसंदर्भात जाणीव निर्माण करून ती निवारण करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून प्रतिकृती तयार करून स्वनिर्मितीचा आनंद विद्यार्थ्यांना देता येईल. यात मातीकाम (पर्यावरणपूरक मूर्ती, खेळणी, कलाकुसरीच्या वस्तू), कागदकाम, ठसेकाम, चिकटकाम या उपक्रमांचा समावेश करता येऊ शकतो. यानंतर या वस्तूंचे प्रदर्शन भरवून विद्यार्थ्यांना सादरीकरणाची संधी देता येऊ शकते.

५) **सर्वेक्षण :** सर्वेक्षणामुळे विद्यार्थ्यांना एखाद्या विषयाची माहिती शोधणे, संकलित करणे, प्रश्नावली तयार करणे, अर्थपूर्ण निष्कर्ष काढणे, माहितीचे उपयोजन करणे इत्यादी गोष्टी सहज शिकता येऊ शकतात. सर्वेक्षणामध्ये विद्यार्थी व्यक्तींची मुलाखत घेऊन माहितीचे विश्लेषण करतील. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संप्रेषण कौशल्य, प्रश्न तयार करण्याचे कौशल्य, प्रश्न विचारण्याचे कौशल्य, नोंदणी संकलन करणे आणि अहवाल तयार करणे इत्यादी कौशल्य विकसित होतील. या उपक्रमांतर्गत व्यावसायिक भेट, कार्यालय भेट इ. भेटीचे नियोजन करता येऊ शकते.

६) **नैसर्गिक शोध/नेचर वॉक :** या उपक्रमातून नैसर्गिक अध्ययनातून निसर्गाबाबतची, निसर्गातील समस्या याबाबत माहिती घेण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देता येईल. यात वने, तलाव, नद्या, ओढे, डोंगर भ्रमंती यांद्वारे निसर्गाचे निरीक्षण करता येईल व भौगोलिक परिस्थितीचा, विविधतेचा अनुभव विद्यार्थ्यांना देता येईल. उपलब्ध झाडे, कीटक, पशु–पक्षी यांच्या निरीक्षणाद्वारे विविध ठिकाणी असणाऱ्या जैवविविधतेचे निरीक्षण करता येऊ शकते.

७) **कलाकौशल्य :** विद्यार्थ्यांना विविध मार्गांनी मिळणारी कौतुकाची थाप किवा जे प्रोत्साहान दिले जाते त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यक्त व्हावेसे वाटते. विद्यार्थ्यांनी केलेले नावीन्यपूर्ण शोध यातून व्यवसाय निर्मिती होऊ शकते. म्हणून विद्यार्थ्यांना नृत्य, नाट्य, संगीत हस्तकला, शिल्पकला, चित्रकला यांचा आविष्कार घडण्यासाठी प्रत्यक्ष अनुभव देणे आवश्यक आहे.

८) **क्रीडाकौशल्य :** विद्यार्थ्यांमध्ये सहकार्यवृत्ती, खिलाडूवृत्ती, शारीरिक विकास, मानसिक विकास यांना वाव मिळण्याच्या उद्देशाने विविध खेळांचे, योगाच्या प्रकारांचे आयोजन शाळेमध्ये किंवा शाळेबाहेर

करणे गरजेचे आहे. खेळादरम्यान सुरक्षितता, खेळांचे नियम याबाबत माहिती देऊन उपक्रमातील खेळांचे आयोजन करावे. खेळ आनंददायी व सर्वसमावेशक असे ठेवावे. तसेच उपक्रमांमध्ये स्थानिक, पारंपरिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळांचा समावेश उपलब्ध परिस्थितीनुसार करता येऊ शकतो.

९) **मुलाखत :** मुलाखतीचा उद्‌देश विद्यार्थ्यांनी प्रश्ननिर्मिती करून माहिती मिळवणे हे कौशल्य विकसित करणे आहे. मुलाखतीचा विषय लक्षात घेऊन सहज आणि सोपे प्रश्न विचारण्यासाठी प्रश्ननिर्मिती कौशल्य विकसित करण्यासाठी शिक्षकांनी साहाय्य करावे. मुलाखत उपक्रमासाठी परिसरातील व्यावसायिक, कलाकार, प्रसिद्ध व्यक्ती या व्यक्ती उपलब्ध होण्यासाठी आधीच नियोजन करून हा उपक्रम राबविता येऊ शकतो.

१०) **बौद्‌धिक खेळ :** हे उपक्रम दैनंदिन अध्यापनात उत्साहपूर्ण, आनंददायी वातावरण निर्मितीसाठी उपयुक्त आहेत. सर्वसाधारणपणे असे निदर्शनास येते, की जसजसा विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर वाढत जातो तसा विषयांचा आशय वाढत असल्यामुळे मुलांचे खेळण्याचे प्रमाण कमी होते. या उपक्रमांतर्गत सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी विविध सोप्या अशा मनोरंजक खेळांचे आयोजन करून बौद्‌धिक विकास साधला जाऊ शकतो.

### वार्षिक कार्ययोजना विकसन :

'आनंददायी शनिवार' या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शालेय स्तरावर वार्षिक नियोजन आराखडा वर्गाबाहेरील व वर्गातील उपक्रमांसाठी शिक्षकांनी तयार करावा. आराखडा तयार करत असताना खाली दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा विचार करणे गरजेचे आहे.

१) शैक्षणिक वर्षांमध्ये 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम दर शनिवारी घेणे आवश्यक आहे.

२) सर्व शिक्षकांनी एकत्र सहभागी होऊन 'आनंददायी शनिवार' उपक्रमाचे वार्षिक, मासिक, साप्ताहिक कार्य नियोजन तयार करावे.

३) गरजेनुसार वर्गातील आणि वर्गाबाहेरील उपक्रम एकत्रितपणे घ्यावेत.

४) विशिष्ट उद्‌दिष्टांच्या पूर्तीसाठी निश्चित केलेल्या उपक्रमांपैकी कोणताही एक उपक्रम शिक्षकांनी राबवणे आवश्यक आहे.

५) उपक्रमाची जबाबदारी सोपवताना शिक्षकांनी उपक्रमाद्‌वारे अध्ययन निष्पत्ती, अपेक्षित कौशल्ये साध्य झाल्याची खात्री करावी.

६) विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसह (आवश्यक साहाय्य उपलब्ध करून) सर्व विद्यार्थ्यांचा उपक्रमात समावेश करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे.

७) उपक्रम सर्जनशीलतेने आनंददायी करण्यासाठी विविध संदर्भांचा वापर करावा.

## १. उपक्रमाची पूर्वतयारी :

उपक्रमाची पूर्वतयारी करत असताना विद्यार्थ्यांमध्ये कोणत्या अध्ययन निष्पत्ती किंवा कौशल्ये निवडीसाठी उपक्रम घ्यायचा आहे हे शिक्षकांनी निश्चित करावे. उपक्रम एकत्रित घ्यायचा असेल तर सर्व विषय शिक्षकांनी एकत्रित येऊन नियोजन करावे (उदा. क्षेत्रभेट). यासाठी उपक्रम निश्चित करून त्याबाबत उपलब्ध संदर्भ साहित्याचा अभ्यास करावा. त्यानंतर कृतीसाठी आवश्यक साहित्य, अंमलबजावणी दरम्यान उपक्रमातून विकसित होणाऱ्या कौशल्यांसाठी आवश्यक कृती यांचे नियोजन करावे. उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी होण्यासाठी सूक्ष्म नियोजन करणे आवश्यक आहे.

## उपक्रमोत्तर कृती :

उपक्रमाची अंमलबजावणी केल्यानंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने सर्वंकष अहवाल तयार करावा. सदर उपक्रमाबाबत वार्षिक नियोजनाबाबतचा नमुना आराखडा खालीलप्रमाणे दिला आहे. प्रत्यक्ष नियोजन करत असताना स्थानिक परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल करता येईल.

### इयत्ता पहिली ते आठवी

| अ. क्र. | महिना | आठवडा | उपक्रमाचे नाव | पूर्व नियोजन | विकसित होणारी कौशल्ये | आवश्यक साहित्य | अंमल-बजावणी दरम्यान शिक्षक कृती | अंमल-बजावणी दरम्यान विद्यार्थी कृती | सदर कृती इतरांनी राबविण्या-साठी मार्गदर्शक संदर्भ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | | | | |
| २. | | | | | | | | | |
| ३. | | | | | | | | | |
| ४. | | | | | | | | | |
| ५. | | | | | | | | | |
| ६. | | | | | | | | | |
| ७. | | | | | | | | | |
| ८. | | | | | | | | | |
| ९. | | | | | | | | | |
| १०. | | | | | | | | | |

## आनंददायी शनिवार उपक्रमासाठी मार्गदर्शक विषयसूची :

आनंददायी शनिवार हा उपक्रम राबवण्यासाठी खालील विषयसूचीअंतर्गत विविध कृतींचा शिक्षकांनी

समावेश करावा.

१) प्राणायाम/योग/ध्यानधारणा/मुक्त हालचाली.

२) आपत्ती व्यवस्थापनाची मूलतत्त्वे व व्यावहारिक प्रशिक्षण.

३) दैनंदिन जीवनातील आर्थिक साक्षरता व वित्तीय व्यवस्थापन, व्यावहारिक कौशल्ये, जीवनकौशल्ये.

४) स्वतःच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी उपाययोजना, स्वसंरक्षण, आरोग्यदायी जीवनशैली

५) रस्ते सुरक्षा

६) समस्या निराकरणाची तंत्रे

७) कलाकृती, खेळ यांवर आधारित उपक्रम

८) Mindfulness वर आधारित कृती

९) नातेसंबंध हाताळण्याचे कौशल्य

१०) सामाजिक बांधिलकीसाठी समाजसेवा, श्रमदान

११) निरनिराळ्या व्यवसायांची प्राथमिक माहिती.

१२) कृषी पर्यटन

१३) जैव तंत्रज्ञान

१४) विविध प्रयोग, प्रकल्प

१५) लोकशाही मूल्ये, २१ व्या शतकातील कौशल्ये

१६) माहिती तंत्रज्ञान

१७) भाषाकौशल्य विकसन

१८) पर्यावरण संरक्षण

वरील विषयसूची व्यतिरिक्त इतर नावीन्यपूर्ण विषयांचा समावेश करण्याची मुभा शाळांना राहील.

## १) आनंददायी शनिवार उपक्रमाची वैशिष्ट्ये :

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० च्या टास्क क्र. ९२ मध्ये नमूद सूचनेनुसार इयत्ता पहिली ते आठवीसाठी 'आनंददायी शनिवार' उपक्रम शाळेत राबविण्यात येत आहे.

२) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनासाठी 'आनंददायी शनिवार' उपक्रमातील कृतींचा समावेश केलेला आहे.

३) 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत शिक्षणाची गोडी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यासाठी, विद्यार्थी शाळेत टिकण्यासाठी व शिकण्यासाठी आनंददायी उपक्रमांचे शनिवारी आयोजन करायचे आहे.

४) अभ्यासक्रमाशी निगडित उपक्रमांचा यात समावेश करण्यात आलेला आहे.

५) सर्व विषयशिक्षक, पालक, मुख्याध्यापक, विद्यार्थी यांना आवश्यकतेनुसार उपक्रमातील पूर्वनियोजन, अंमलबजावणी या सर्व स्तरांवर सहभागी व्हायचे आहे.

६) या उपक्रमात इयत्ता सहावी ते आठवीसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये मार्गदर्शित 'दहा दिवस दप्तराविना' या उपक्रमाचा समावेश करण्यात आलेला आहे.

७) इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाशी निगडित अध्ययन कौशल्ये अध्ययन निष्पत्ती साध्य होण्यासाठी आनंददायी कृतींचा समावेश करायचा आहे.

### २) उपक्रमाची अंमलबजावणी :

'आनंददायी शनिवार' या उपक्रमाची शाळा स्तरावर यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सूत्रबद्ध नियोजन करणे आवश्यक आहे. तसेच या उपक्रमात सहभागी घटकांना त्यांनी पार पाडावयाच्या भूमिका, त्यासाठीचा उपलब्ध कालावधी, आवश्यक संसाधने, मूल्यमापन, दिव्यांग विद्यार्थ्यांची विशेष दखल इ. बाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे.

'आनंददायी शनिवार' हा उपक्रम शासनमान्य सर्व शाळामध्ये इयत्ता पहिली ते आठवी या इयत्तांसाठी राबविल्यास विद्यार्थ्यांची शिक्षणाची अभिरुची वाढीस लागेल. त्याचा निश्चितच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर चांगला परिणाम होईल. तसेच विद्यार्थ्यांच्या गळती व अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी होईल, विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य जपले जाऊन त्यांचे उत्तम अध्ययन व्हावे या हेतूने इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्तन व जबाबदारी बाबत जागरूकता निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी, सहकार्यवृत्ती, नेतृत्व गुणांचा विकास व्हावा, या हेतूने शासनमान्य सर्व शाळांमध्ये या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातील प्रत्येक शनिवार हा 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

### वार्षिक कार्यनियोजन अंमलबजावणी :

एखाद्या उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करून अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी त्यातील वेगवेगळ्या घटकांची जबाबदारी निश्चित असावी लागते. त्यासाठी यात खालील घटकांचा समावेश असावा.

१) शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य.

२) सर्व विषयशिक्षक.

३) इयत्ता पहिली ते आठवीत शिकणारे सर्व विद्यार्थी.

४) शाळेचे माजी विद्यार्थी व शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक.

५) समाजातील विविध घटकांचा व्यापक सहभाग.

## १) शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांची भूमिका आणि जबाबदारी :

'आनंददायी शनिवार' हा उपक्रम राबविताना मुख्याध्यापकांनी शाळेतील भौतिक सुविधा आणि संसाधने उपलब्ध करून द्यावीत.

- सदर कार्ययोजनेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संबंधित विषयांच्या शिक्षकांना मार्गदर्शन करावे व प्रोत्साहन द्यावे.
- उपक्रमातील विविध कृतींसाठी आवश्यकतेनुसार भौतिक व आर्थिक संसाधनांची उपलब्धता करून द्यावी.
- वेळोवेळी समाजातील विविध घटकांकडून सूचना व अभिप्राय घेऊन त्यानुसार उपक्रमाच्या अंमलबजावणीत योग्य तो बदल करावा.
- उपक्रमासाठी अनुकूल व सकारात्मक वातावरण निर्मिती करावी.

## २) संबंधित विषयांच्या शिक्षकांची भूमिका आणि जबाबदारी :

शाळेतील सर्व शिक्षकांनी उपक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे. हा उपक्रम शाळेत राबविण्याची जबाबदारी मुख्याध्यापक/प्राचार्य व सर्व विषय शिक्षक यांची राहील.

शिक्षक त्यांच्या विषयाशी संबंधित यात दिलेल्या उपक्रमाव्यतिरिक्त इतर नावीन्यपूर्ण उपक्रमदेखील सुचवू शकतात व ते राबवू शकतात. भाषा, गणित व विज्ञान, समाजशास्त्र, शारीरिक शिक्षण, कला, संगीत व व्यवसाय शिक्षण/कार्यानुभव विषयांच्या सर्वच शिक्षकांनी या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन परिस्थितीनुसार उपक्रमांचे नियोजन करावे. शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, अध्ययन साहित्याची उपलब्धता, समुपदेशन व मार्गदर्शन सत्र यांचे आयोजन, पारदर्शक मूल्यमापन, प्रगतीचा नियमित अभिप्राय इत्यादी बाबतीत मदत करतील. तसेच नियोजित कृतीची अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी वेळापत्रक तयार करतील. उपक्रमाच्या प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थ्यांचा आनंद व सुरक्षितता या विशिष्ट बाबींच्या अधीन राहून शिक्षकांनी खालील जबाबदाऱ्या पार पाडणे अपेक्षित आहे :

- विद्यार्थ्यांना व पालकांना 'आनंददायी शनिवार' या उपक्रमाचे महत्त्व समजावून सांगावे.
- मार्गदर्शक तत्त्वांनुसार दिलेल्या उपक्रमासाठी सूक्ष्म नियोजन करावे.
- आवश्यक साहित्य व साधने उपलब्ध करून द्यावीत.
- तज्ज्ञ संस्था आणि समाज यांच्यामध्ये दुवा निर्माण करावा.
- दैनंदिन जीवनातील परिस्थितीशी सहसंबंध असलेल्या उपक्रमाचे आयोजन करावे.
- उपक्रमाशी संबंधित संकल्पनांचे महत्त्व व आवश्यकता स्पष्ट करावी.

- उपक्रमाची अंमलबजावणी करताना विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करावे.
- विद्यार्थ्यांना प्रत्येक उपक्रमात सहभागी करून घेऊन त्यांचे निरीक्षण व मूल्यमापन करावे.
- विद्यार्थी व प्रशासनाला वेळोवेळी अभिप्राय द्यावेत.
- उद्दिष्ट प्राप्तीचे मूल्यमापन करावे.

## ३) इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची भूमिका आणि जबाबदारी :

विद्यार्थी हे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या केंद्रस्थानी असतात. त्यामुळे या उपक्रमात त्यांचा प्रत्यक्ष आणि सक्रिय सहभाग आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये अनुभवाधारित अध्ययन यावर भर देण्यात आलेला आहे. शिकण्याच्या प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांचा समावेश करून घेणे व वर्गातील आणि वर्गाबाहेरील कौशल्यांवर आधारित शिकण्यासाठीचे वातावरण निर्माण करून आनंददायी पद्धतीने अध्ययनास संधी उपलब्ध करून देणे यावर भर देण्यात आलेला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना जीवनकौशल्ये, लोकशाही मूल्ये २१ व्या शतकातील विविध व्यावसायिक कौशल्यांचे आकलनही होईल. यासाठी विद्यार्थ्यांनी खालील गोष्टींचे पालन करावे.

- विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा.
- साधनांचा काळजीपूर्वक उपयोग करावा. (उदा. टेबल, हातोडी, वायर, कटर)
- नैसर्गिक घटनांवर आधारित माहिती घ्यावी.
- जीवनकौशल्य, लोकशाही मूल्ये, अध्ययन निष्पत्तीसाठी प्रयत्न करावे.
- विशिष्ट व्यवसायातील व्यावसायिक कौशल्यांवर लक्ष केंद्रित करावे.
- विद्यार्थ्यांनी कुतूहल निर्माण करणाऱ्या साहित्य व साधनांचा वापर करावा.
- स्थानिक कारागिरांशी संवाद साधावा व उपक्रमासंबधी आवश्यक माहिती काळजीपूर्वक घ्यावी.

## ४) पालकांची भूमिका आणि जबाबदारी :

'आनंददायी शनिवार' या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी पालक हा महत्त्वाचा घटक आहे.

या उपक्रमात पालकांच्या निरंतर व सक्रिय सहभागाने खालील गोष्टी कराव्यात :

- 'आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत विविध कृती करण्यासाठी पाल्यास प्रोत्साहित करावे.
- पाल्यामध्ये श्रमप्रतिष्ठेबाबत योग्य दृष्टिकोन विकसित करावा.
- पालक-शिक्षक संघ, शाळा व्यवस्थापन समिती, शाळा व्यवस्थापन व विकास समितीच्या माध्यमातून शाळा प्रशासन आणि व्यवस्थापनाला मदत करावी.
- आवश्यकतेनुसार योग्य वेळी मदतीसाठी स्वतः सहभागी व्हावे.

- दिव्यांग मुलांच्या पालकांनी (CWSN) कृतीमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांच्या पाल्यांना प्रेरणा द्यावी व मदत करावी.

### ५) समुदायाची भूमिका आणि जबाबदारी :

'आनंददायी शनिवार' या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी समुदायाचा पाठिंबा आणि सहभाग ही प्रमुख गरजांपैकी एक गरज आहे.

- कामाच्या विशिष्ट क्षेत्रात कृती आधारित सादरीकरण आणि प्रात्यक्षिक यांच्याद्वारे माहिती द्यावी.
- गावातील जत्रा, मेळावा, बाजार इत्यादींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधावा.
- आवश्यकतेनुसार भौतिक आणि मनुष्यबळ संसाधनांच्या स्वरूपात मदत उपलब्ध करून द्यावी.

## आवश्यक संसाधने :

'आनंददायी शनिवार'या उपक्रमात नियोजित वर्गातील आणि वर्गाबाहेरील कृतीच्या अंमलबजावणीसाठी सर्वसाधारण, तसेच उपक्रमाशी निगडित संसाधने आवश्यक आहेत. उदा., शाळेच्या परिसरामध्ये विकसित केलेल्या व्यावसायिक कौशल्य प्रयोगशाळांचा उपयोग इयत्ता पहिली ते आठवी या स्तरांवर व्यावसायिक शिक्षण घटकांच्या अध्ययनासाठी केला जाऊ शकतो.

### अ) सर्वसाधारण संसाधने :

सर्वसाधारण संसाधनात खालील संसाधनांचा समावेश होतो.

- भौतिक संसाधने : आवश्यक जागा, संबंधित विषय प्रयोगशाळा, व्यावसायिक प्रयोगशाळा, खेळाचे मैदान, बाग, संगणक/लॅपटॉप, स्पीकर, पोर्टेबल माइक, प्रोजेक्टर, व्हिडिओ, बॅनर, पोस्टर्स, मॉडेल, चार्ट, प्रश्नावली, प्रथमोपचार पेटी, इतर उपकरणे आणि गॅझेट्स इत्यादी खेळांचे साहित्य.
- आर्थिक संसाधने : उपक्रमांसाठी लागणारी साधने, वाहतूक व इतर व्यवस्था यासाठी निधी.
- मनुष्यबळ संसाधने : स्थानिक कारागीर, कलाकार आणि कुशल तज्ज्ञ व्यक्ती, प्रसिद्ध व्यक्ती इ.

### आ) कृतीसाठी लागणारी संसाधने :

कृतीच्या अंमलबजावणीसाठी उपक्रमानुसार विशिष्ट संसाधनांची उपलब्धता करून देणे, या आवश्यक संसाधनांपैकी प्रत्येकाचा तपशील उदाहरणादाखल कृतीसह दिलेला आहे.

## वेळेचे नियोजन :

- या उपक्रमासाठी दर शनिवारी नियोजन करावयाचे आहे.
- या उपक्रमासाठी दर शनिवारचे नियोजन शालेय स्तरावर स्थानिक परिस्थितीनुसार करावे.

## विद्यार्थ्यांचे मूल्यमापन :

- विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांतून आनंदप्राप्ती हे या उपक्रमाचे अंतिम ध्येय आहे.
- या उपक्रमादरम्यान शिक्षक विद्यार्थ्यांची शिकण्याची आवड आणि उपक्रमातून विकसित होणारी कौशल्ये क्षमता पाहतील.
- विद्यार्थ्यांना कोणतेही गुण किंवा श्रेणी दिली जाणार नसली, तरी शिक्षक विद्यार्थ्यांच्या अध्ययनात सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी अभिप्राय देऊन अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी आकारिक मूल्यमापन करू शकतात, स्वयंअध्ययनाला चालना देण्यासाठी स्वयंमूल्यमापनाला प्रोत्साहन द्यावे.

## दिव्यांग किंवा विशेष गरजा असलेल्या (CWSN) मुलांचा सहभाग :

- आपल्या शाळेत विशेष गरजा असलेल्या मुलांची (CWSN) पटनोंदणी केली जाते. या मुलांची काळजी घेण्यासाठी साधारणपणे विशेष शिक्षकांची नियुक्ती केली जाते. प्रत्येक केंद्रात विशेष शिक्षक, विशेष गरजा असणाऱ्या मुलांना शैक्षणिक प्रक्रियेत साहाय्य करण्यासाठी उपलब्ध आहेत.
- 'आनंददायी शनिवार' या उपक्रमामध्ये, विशेष शिक्षक या मुलांसोबत असतील आणि उपक्रमांशी संबंधित सर्व संकल्पना समजावून सांगतील, यामुळे विद्यार्थ्यांना संबंधित उपक्रम समजण्यास व पूर्ण करण्यास मदत होईल.
- शाळेसाठी विशेष शिक्षक उपलब्ध नसल्यास या मुलांच्या पालकांनी त्यांच्या मुलांसोबत यावे, विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी प्रशिक्षित शिक्षकदेखील या उपक्रमांमध्ये सहभागी होऊ शकतात. या शिक्षकांनी मुख्याध्यापक/पर्यवेक्षक/साधनव्यक्तीच्या मदतीने चांगले नियोजन करून मुलांना प्रत्येक उपक्रमासाठी मानसिकदृष्टा तयार करावे.

## उपक्रमाची अंमलबजावणी करताना लक्षात ठेवावयाच्या गोष्टी :

ही कृतिपुस्तिका शिक्षकांना शालेय स्तरावर 'आनंददायी शनिवार' उपक्रम राबवता येण्यास मदत व्हावी म्हणून तयार केली आहे. उपक्रमाचे नियोजन विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी, भौगोलिक परिस्थितीनुसार व शाळेत प्रवेशित बालकांच्या परिस्थितीनुसार बदलू शकते म्हणूनच, शिक्षकांना त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी उपक्रम राबवताना, योग्य असा बदल करण्यासाठी पुरेसा वाव देण्यात आला आहे.

## लक्षात ठेवावयाच्या गोष्टी :

१) उपक्रमासाठी आवश्यक साहित्याची यादी करावी.

२) उपक्रम आराखडा योजनेच्या स्वरूपात सादर केला असला तरीही, शिक्षकांनी स्वतःचा एक आराखडा तयार केला पाहिजे. त्यामध्ये किरकोळ तपशील आणि आवश्यक असल्यास काही बदल समाविष्ट करावेत.

३) शिक्षकांनी स्थानिक परिस्थितीनुसार वेळेचे नियोजन करावे.

४) काही उपक्रमांसाठी विद्यार्थ्यांकडून पूर्वतयारी करून घ्यावी.

५) वर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्व उपक्रमांत सहभागी करून घेण्याची काळजी शिक्षकांनी घ्यावी.

६) काही उपक्रमांमध्ये (क्षेत्रभेट, मुलाखत) प्रश्नांद्वारे विद्यार्थ्यांनी माहितीची नोंद घेणे अपेक्षित आहे. शक्य असेल तर खालील नमुन्यानुसार विद्यार्थ्यांना प्रश्नावली उपलब्ध करून द्यावी. (उदाहरणादाखल नमुना दिला आहे.)

**प्रश्नावली**

**शाळेचे नाव :** ....................................................................................................

**उपक्रमाचे नाव : आजोबांची मुलाखत** **कृतीचे नाव :** ....................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ............................................................ **इयत्ता :** ........................

**प्रश्न १ :** तुमचे नाव काय आहे?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न २ :** तुमचा वाढदिवस कधी असतो?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न ३ :** तुमचे वय किती आहे?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न ४ :** लहानपणी तुमचा आवडता खेळ कोणता होता?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न ५ :** तुमच्या लहानपणी कोणता खाऊ मिळायचा?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न ६ :** लहानपणी तुम्हाला शाळेत जायला आवडत होते का?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न ७ :** तुमचे आवडते शिक्षक कोण होते?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न ८ :** तुमचा आवडता विषय कोणता होता?

**उत्तर :** ....................................................................................................

**उपक्रम नियोजनातील महत्त्वाचे मुद्दे :**

- **उपक्रमाचा प्रकार :** उपक्रम हा वर्गातील/वर्गाबाहेरील यानुसार उपक्रमाचा प्रकार निश्चित करावा.
- **कालावधी :** उपक्रमासाठी आवश्यक असणारा कालावधी स्थानिक परिस्थितीनुसार निश्चित करावा.
- **उपक्रमातून विकसित होणारी कौशल्ये :** प्रत्येक उपक्रम काही कौशल्ये शिकवतो ज्याचा या घटकामध्ये उल्लेख केला आहे. उपक्रमाच्या आयोजनानंतर विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणारी कौशल्य यांचा विचार करणे आवश्यक आहे.
- **अध्ययन निष्पत्ती :** उपक्रमाच्या आयोजनातून विद्यार्थ्याने संपादित करावयाच्या अपेक्षित बाबी अध्ययन निष्पत्ती स्वरूपात विद्यार्थ्यांना साध्य होतील असे नियोजन करावे.
- **आवश्यक साहित्य :** उपक्रम आयोजनाच्या पूर्वी उपक्रमासाठी आवश्यक साहित्याची यादी करावी व साहित्य उपलब्ध करून द्यावे.
- **उपक्रमाची गरज/पार्श्वभूमी :** सदर उपक्रमांचा समावेश का करण्यात आला आहे, हे समजण्यास मदत करण्यासाठी तसेच उपक्रम आयोजित करण्याची गरज व पार्श्वभूमी स्पष्ट असणे आवश्यक आहे.
- **उपक्रम कार्यपद्धती :** उपक्रमाचे आयोजन यशस्वीपणे करण्यासाठी त्याची कार्यपद्धती निश्चित करून त्याचे टप्पे, उपक्रम व उपलब्ध मनुष्यबळ याचे नियोजन करावे. स्थानिक परिस्थितीनुसार त्यामध्ये आवश्यक ते बदल करावेत.
- **मूल्यमापन :** संपूर्ण उपक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विचारल्या जाणाऱ्या प्रश्नातून निरीक्षणातून विद्यार्थ्यांचा सहभाग आकलनशक्ती, कौशल्य विकसन या बाबींचे मूल्यमापन आकारिक पद्धतीने करावे.
- **नोकरी-व्यवसायाच्या संधी :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार इयत्ता सहावीपासून सदर उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये करिअरच्या संधींबद्दल जागरूकता निर्माण करण्यास मदत होईल, त्या विद्यार्थ्यांनी विशिष्ट ठरावीक उपक्रमामध्ये स्वारस्य/क्षमता दर्शविल्यास, भविष्यात ते क्षेत्र निवडीसंदर्भात अधिक मार्गदर्शन करता येईल. यासाठी सदर उपक्रमातून उपलब्ध होणाऱ्या नोकऱ्या व व्यवसायाच्या संधी बाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून द्यावी.
- **समारोप :** उपक्रमाचा समारोप करण्यासाठी विद्यार्थ्यांना पुढील संधी व कौशल्याबाबत माहिती देण्यात यावी.

**सूचना :** सदर कृतिपुस्तिकेत कृतीशी संबंधित विविध व्हिडिओ संदर्भ म्हणून देण्यात आलेले आहेत. कोणत्याही संस्था, व्यक्ती, वस्तू यांची जाहिरात करण्याचा उद्देश यामागे नाही ही नोंद घ्यावी.

# स्तर १ : इयत्ता पहिली व दुसरी

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय (Theme) | उपक्रम | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | कृती व खेळांवर आधारित शिक्षण | खेळू मेंदू व्यायामाचे खेळ | १९ |
| | | बोलणारी फिंगर पपेट | २१ |
| | | मातकाम – रोली, गोली, पोली | २३ |
| | | आकारांची सजावट रंगीत बोळ्यांनी (चिकटकाम) | २४ |
| | | रिकाम्या खोक्यांपासून गाडी तयार करणे (कागदकाम व पुठ्ठाकाम) | २५ |
| २. | प्राणायाम/योग/ध्यानधारणा/श्वसनतंत्रे | पद्मासन | २७ |
| ३. | पर्यावरण संवर्धन | परिसर भेट/निसर्ग भेट | २८ |
| | | वेशभूषा स्पर्धा (Fancy dress competition) | २९ |
| ४. | सामाजिक बांधिलकी | चला आदर करू या | ३१ |
| | | झाडांची निगा ठेवू या व झाडांना पाणी देऊ या | ३४ |
| ५. | व्यक्तिमत्त्व विकास (माझे आरोग्य) | माझी दिनचर्या | ३७ |
| ६. | कृषीविषयक साक्षरता | क्षेत्रभेट – आठवडी बाजार/भाजी मंडईला भेट | ३९ |
| | | फळभाज्यांपासून विविध कलाकृती निर्मिती व सादरीकरण | ४० |
| ७. | आपत्ती व्यवस्थापनाची मूलतत्त्वे आणि व्यावहारिक प्रशिक्षण | प्रथमोपचार पेटी तयार करणे | ४२ |
| ८. | दैनंदिन जीवनातील वित्तीय व्यवस्थापन व्यावहारिक कौशल्ये | ओळख नाणी–नोटांची | ४३ |
| ९. | आरोग्य रक्षण करण्यासाठी उपाययोजना | कौन बनेगा स्मार्ट बॉय/गर्ल | ४४ |
| १०. | रस्ते सुरक्षा | रस्ते सुरक्षा– आपली सुरक्षा | ४५ |
| | | ट्रॅफिक दादा–सिग्नल दादा | ४५ |
| ११. | २१ व्या शतकातील कौशल्ये | रद्दीतून अध्ययन | ४७ |
| १२. | क्षेत्रभेट व यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती | किराणा दुकान भेट (परिसर ओळख) | ५० |
| | | परिसरातील शेताला भेट देणे (परिसर ओळख) | ५३ |
| | | कुटुंबातील व्यक्तींची मुलाखत | ५६ |
| १३. | सांविधानिक मूल्यांची रुजवणूक | वर्ग मंत्रिमंडळ स्थापना | ५९ |
| १४. | विविध व्यवसायांचा परिचय व मानसशास्त्रीय समुपदेशन | मी काय करतो/करते? | ६० |

| अ.क्र. | विषय (Theme) | उपक्रम | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १५. | कथाकथन | चित्ररूप गोष्टींचे कथन | ६२ |
| १६. | वाचनसंस्कृती | सामाईक वाचन | ६५ |
| १७. | संगणकाची ओळख | माझा अद्‌भुत मित्र | ६७ |
| | | संगणकावरील पेंट टूलची ओळख | ७० |
| १८. | लिंगसमभाव | घरकामात मदत | ७२ |


✦ ✦ ✦

## १) कृती व खेळांवर आधारित शिक्षण

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : खेळू मेंदूच्या व्यायामाचे खेळ**

**पूर्वनियोजित कृती :**

- वर्गातील सामूहिक कृती करण्यासाठी विद्यार्थी बैठक व्यवस्था करतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** कारककौशल्यांचा विकास, सूचनेप्रमाणे एकाच वेळी दोन्ही हातांनी वेगाने कृती करण्याचे कौशल्य.

**आवश्यक साहित्य :** उभे राहण्यासाठी चटई/बस्कर

**शिक्षक कृती :**

**खेळ क्रमांक : १**

- शिक्षक विद्यार्थ्यांना रांगेत उभे करतात.
- शिक्षक एका हाताने WINNER (VICTORY) आणि दुसऱ्या हाताने OK असे चिन्ह करून दाखवतात.
- पहिल्यांदा उजव्या हाताने OK चे चिन्ह आणि डाव्या हाताने WINNER चे चिन्ह दाखवतात.
- नंतर डाव्या हाताने OK आणि उजव्या हाताने WINNER चे चिन्ह दाखवतात.
- तयार आहात ......सुरू करू या...लेट्स स्टार्ट....
- OK....WINNER... OK....WINNER... OK....WINNER...
- अशा प्रकारे विद्यार्थ्यांकडून पाच वेळा सराव करून घेतात.
- प्रथमतः ज्या हाताने OK चे चिन्ह दाखवले आहे दुसऱ्या वेळेस त्या हाताने WINNER चे चिन्ह दाखवतात आणि प्रथमतः ज्या हाताने WINNER चे चिन्ह दाखवलेले आहे त्या हाताने OK चे चिन्ह दाखवतात.
- विद्यार्थ्यांकडून पुन्हा-पुन्हा कृती करून भरपूर सराव करून घेतात.
- याचबरोबर जोडी जोडीने सराव करायला सांगतात.
- सरावानंतर समोर येऊन गटाने सादरीकरण करायला सांगतात.

**खेळ क्रमांक : २**

शिक्षक विद्यार्थ्यांना रांगेत उभे करून कृतीचे निरीक्षण करायला सांगतात.

- उजव्या हाताचे १ बोट वर करून मोठयाने १ म्हणतात, त्याच वेळी डाव्या हाताच्या तर्जनीने उभे बोट दर्शवतात.

- आता डाव्या हाताची २ बोटे उभी करून २ म्हणतात आणि उजव्या हाताने दर्शवतात.
- त्यानंतर उजव्या हाताची ३ बोटे वर करून मोठ्याने ३ म्हणतात, त्याच वेळी डाव्या हाताच्या तर्जनीने ३ बोटे दर्शवतात.
- आता डाव्या हाताची ४ बोटे उभी करून ४ म्हणतात आणि उजव्या हाताने दर्शवितात.
- त्यानंतर उजव्या हाताची ५ बोटे वर करून मोठ्याने ५ म्हणतात, त्याच वेळी डाव्या हाताच्या तर्जनीने ५ बोटे दर्शवतात.
- अशा प्रकारे उजवा डावा असा उल्लेख न करता केवळ १ २ ३ ४ ५ असे मोठ्याने बोलून विद्यार्थ्यांना हळुवार कृती करायला सांगतात.
- पुढे सरावाचा वेग वाढवतात. गटाने सादरीकरण करायला सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

**खेळ क्रमांक १ :**

- विद्यार्थी रांगेत उभे राहतात.
- शिक्षकांच्या सूचनेनुसार विद्यार्थी एका हाताने WINNER आणि दुसऱ्या हाताने OK चे चिन्ह दाखवतील. उदा. उजव्या हाताने OK चे चिन्ह आणि डाव्या हाताने WINNER चे चिन्ह दाखवतात.
- त्यानंतर डाव्या हाताने OK आणि उजव्या हाताने WINNER चे चिन्ह दाखवतात.
- अशा प्रकारे पाच वेळा सराव करतात.
- प्रथमतः ज्या हाताने OK चे चिन्ह दाखवून दुसऱ्या वेळेस त्या हाताने WINNER चे चिन्ह दाखवतात आणि प्रथमतः ज्या हाताने WINNER चे चिन्ह दाखवले आहे त्या हाताने OK चे चिन्ह दाखवतात.
- सुरुवातीला जागेवर उभे राहून कृती करतात.
- शिक्षक सूचनेनंतर जोडीदारासह कृती करतात.
- गटाने सादरीकरण करतात.

**खेळ क्रमांक २ :**

- विद्यार्थी शिक्षकांच्या कृतींचे निरीक्षण करतात.
- शिक्षकांनी उच्चारलेल्या अंकानुसार उजव्या हाताने संख्येएवढी बोटे, डाव्या तर्जनीने दर्शक कृती, डाव्या हाताची बोटे आणि उजव्या हाताच्या तर्जनीने दर्शक अशी सुरुवातीला हळुवार आणि नंतर वेगाने कृती करतात.
- गटाने सादरीकरण करतात.

- मनोरंजनाबरोबर कृतीच्या सारखेपणावर भर देतात.

**संदर्भ साहित्य :**

खेळ क्र. १ साठी : https://youtu.be/2KB85neubK4?si=ovS33dXIVfBxRJUg

खेळ क्र. २ साठी : https://youtu.be/seqbaPGwvvo?si=TjcbkjivK4KQ9Lhf

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : बोलणारी फिंगर पपेट**

**पूर्वनियोजित कृती :**

- विद्यार्थ्यांना कार्डशिट, स्केचपेन अथवा रंगकामाचे साहित्य, कागद, डिंक इत्यादी वस्तू सोबत आणायला सांगतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** सर्जनशीलता, कलात्मक कौशल्य, संवाद कौशल्य, सांघिक कार्यकौशल्य.

**आवश्यक साहित्य :** कार्डशिट, स्केच पेन अथवा रंगकामाचे साहित्य, कागद, डिंक इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) कार्डशीट पेपरच्या मदतीने एका अर्ध गोलाकारपासून बोटावर बसेल असा कागदी शंकू तयार करून दाखवितात.

२) बोटावर शोभेल एवढ्या आकारात आवडत्या पशु/पक्षी/कार्टुनच्या चेहऱ्याचे चित्र काढतात.

३) काढलेला चेहरा चित्र योग्य रंगात रंगवितात.

४) रंगविलेल्या चेहऱ्याची बाह्य रेषा कात्रीच्या साहाय्याने कापून घेतात.

५) तयार झालेला चेहरा कागदी शंकूच्या वरच्या बाजूवर डिंकाच्या साहाय्याने चिकटवतात.

उपरोक्त सर्व कृती सर्व विद्यार्थ्यांना दिसेल या पद्धतीने दर्शवितात. फिंगर पपेट पूर्ण झाल्यावर शिक्षक बोटे उंचावून, नाचवून आणि आवाजात बदल करून सादरीकरण करतात.

उदा.

मुलांनो ......नमस्कार

मी कपडा कात्रीने करा करा कापतो ....

मशीनवर भराभरा शिवतो....

माणसांना घालायला देतो ......

सांगा बरं मी कोण.... ?

एकदम बरोबर ..मी आहे टेलर.

हा.. हा..हा ..हा... तुम्ही सारे खूप हुशार विद्यार्थी आहात.

चला पुन्हा भेटूया.... ओके....बाय–बाय....!

**किंवा**

हिरवा हिरवा माझा रंग,

चोच माझी लाल....

रोज म्हणतो मिठू मिठू,

पेरू मला द्याल....

रानात झाडावर राहतो,

झोके घेतो,

माझे नाव सांगाल.....???

मिठू मिठू मिठू मिठू... अगदी बरोबर..... मी आहे पोपट.

५) विद्यार्थ्यांना कार्डशीट, स्केच पेन, डिंक उपलब्ध करून देतात. त्यांना स्वतःच्या आवडीने आवडता पशु/पक्षी/कार्टूनचा चेहरा काढून तो रंगवायला सांगतात.

६) फिंगर पपेट तयार झाल्यावर एक एक विद्यार्थ्याला बोलवून बोट हवेत नाचवून, आवाज बदलून सादरीकरण करायला सांगतात.

७) वर्गातील ४–४ विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटाला एक विषय देतात. त्यावर सादरीकरण करायला सांगतात. उदाहरणार्थ : प्राण्यांची शाळा, पक्ष्यांची सहल.

**विद्यार्थी कृती :**

१) कार्डशीटच्या मदतीने बोटात घालता येईल या प्रकारे शंकू तयार करणे, आवडत्या पशु/पक्षी/कार्टूनचा चेहरा काढून स्केच पेन अथवा रंगाने रंगवणे, पपेट तयार करणे या सर्व कृतींचे निरीक्षण करतात.

२) विद्यार्थी शिक्षकांचे सादरीकरण पाहतात.

३) कागद, डिंकापासून स्वत:च्या बोटावर अंगठ्यावर बसेल असा शंकू तयार करतात. स्केच पेन/रंगाने कार्डशीटवर आवडत्या पशु/पक्षी/कार्टूनचा चेहरा काढून स्केच पेन अथवा रंगाने रंगवितात.

४) कार्डशीटच्या शंकूवर तयार केलेला पशु/पक्षी/कार्टूनचा चेहरा चिकटवून पपेट तयार करतात.

५) क्रमाने तयार केलेल्या फिंगर पपेटनुसार वैयक्तिकरीत्या सादरीकरण करतात.

६) शिक्षकांनी दिलेल्या विषयावर गटात विचार करून सामूहिकपणे सादरीकरण करतात.

७) इतर सर्व विद्यार्थी सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे निरीक्षण करतात आणि प्रोत्साहन देतात.

**संदर्भ साहित्य :**

- https://youtu.be//8eQSAALRJs8?si=p7ZUVXfbvfaO1-Rx

**उपक्रम क्रमांक : ३**

**उपक्रमाचे नाव : मातकाम – रोली, गोली, पोली**

**पूर्वनियोजित कृती :**

- माती चाळून भिजवून ठेवतात, विद्यार्थ्यांसोबत हात पुसण्यासाठी कापड, वस्तू तयार करताना आधार म्हणून पुठ्ठ्याचा तुकडा, पाणी घेण्यासाठी छोटे भांडे आणायला सांगतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** सर्जनशीलता, कारककौशल्य, सौंदर्यदृष्टी

**आवश्यक साहित्य :** ओली माती, पाण्यासाठी भांडे, जुने कापड, पुठ्ठ्याचा तुकडा

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक अगोदरच्या दिवशी माती चाळून घेतात. योग्य प्रमाणात पाणी घालून भिजवून ठेवतात.

२) दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांना गोलाकार बसवतात. पुठ्ठ्याचा तुकडा, पाणी भरलेले भांडे समोर ठेवायला सांगतात.

३) सर्वांना प्रमाणात मातीचा गोळा वाटप करतात. शिक्षक माती हाताळण्याच्या सूचना देऊन स्वतः मातीचा छोटा गोळा घेऊन रोली (मातीची वळी) तयार करून दाखवतात. या ओल्या मातीच्या वळीला 'रोली' म्हणावे असे सांगतात.

४) आणखी मातीचा एक छोटा गोळा घेऊन दोन्ही हातांच्या तळव्यांमध्ये अलगद फिरवून गोल आकार देतात. त्याला 'गोली' म्हणावे असे सांगतात.

५) आणखी मातीचा एक छोटा गोळा घेऊन दोन्ही हातांच्या तळव्यांमध्ये दाबून चपटा, गोल आकार तयार करून दाखवतात, त्या मातीच्या आकाराला 'पोली' म्हणावे असे सांगतात.

६) आपण आताच मातीपासून कोणकोणते आकार तयार केले? सांगा बरे असे विचारतात. विद्यार्थ्यांना मातीचे छोटे गोळे घेऊन रोली, गोली, पोली असे आकार तयार करायला सांगतात.

७) तयार झालेले आकार गुळगुळीत करण्यासाठी वापर पाण्याचा करून दाखवतात.

८) ५ गोळ्यांचे आकार जोडून फुलाचा आकार तयार करून दाखवतात. फुलाच्या मधोमध गोळीचा आकार जोडतात. फुलाचा देठ म्हणून रोली जोडतात. अशा पद्धतीने विद्यार्थ्यांच्या आवडीप्रमाणे पुठ्ठ्याच्या तुकड्यावर फूल तयार करायला सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी पुठ्ठ्याचा तुकडा आणि पाण्याच्या भांड्यासह गोलाकार बसतात. शिक्षकांनी मातीपासून तयार केलेल्या रोली, गोली, पोली या आकार आणि कृतीचे निरीक्षण करतात.

२) मातीचे आकार गुळगुळीत करण्यासाठी पाण्याचा वापर समजून घेतात.

३) मातीच्या दिलेल्या गोळ्यातून माती घेत रोली, गोली, पोली असे आकार तयार करतात.

४) रोली, गोली पोली या मातीच्या आकारांपासून पुठ्ठ्याच्या तुकड्यावर आवडते फूल तयार करतात. जुन्या कापडाच्या तुकड्याने मातीने भरलेले हात, भांडे, जागा स्वच्छ करतात.

**संदर्भ साहित्य :**

- https://youtu.be//JVo2WKY-gig

---

**उपक्रम क्रमांक :** ४

**उपक्रमाचे नाव : आकारांची सजावट रंगीत बोळ्यांनी (चिकटकाम)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक वर्गात विद्यार्थ्यांच्या बैठक व्यवस्थेचे नियोजन करतात. विद्यार्थ्यांना सोबत रंगीत कागद/घोटीव कागद, मोजपट्टी, जुने कापड आणायला सांगतात. केवळ काळ्या रंगात बाह्यरेषा असलेली चित्रे जमा करून ठेवतात. चित्र वाटप, परिसर स्वच्छता आणि चित्र प्रदर्शित करण्याचे नियोजन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** सर्जनशीलता, नवनिर्मिती, संघभावना

**आवश्यक साहित्य :** रंगीत कागद/घोटीव कागद, मोजपट्टी, जुने कापड, केवळ काळ्या रंगात बाह्यरेषा असलेली चित्रे इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक ४-४ विद्यार्थ्यांचे गट तयार करतात.

२) प्रत्येक गटाला स्वतंत्र गोलाकार आकारात बसवतात. विद्यार्थ्यांनी चित्र सजावट कामाचे आपापसात वाटप करण्याला सुचवतात. प्रत्येक गटाला काळ्या रंगात बाह्यरेषा असलेले चित्र वाटप करतात.

३) विद्यार्थ्यांनी आणलेल्या रंगीत कागद अथवा घोटीव कागदाचे लहान लहान गोल बोळे करायला सांगतात. गटातील काही विद्यार्थ्यांना चित्राच्या बाह्यरेषेच्या आत डिंकाने रंगीत बोळे चिकटवायला सांगतात. पूर्ण झालेली चित्रे प्रदर्शित करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांनी सुचवल्याप्रमाणे गटागटाने गोलाकार आकारात बसतात. बोळे तयार करणे, बोळे रिकाम्या आकारात चिकटवणे अशी कामे आपापसात वाटून घेतात.

२) पुरवलेल्या केवळ काळ्या रंगात बाह्यरेषा असलेल्या रिकाम्या चित्रात रंगीत बोळे डिंकाने त्यांच्या आवडीप्रमाणे चिकटवून सजावट करतात.

३) तयार झालेली चित्रे प्रदर्शित करण्यासाठी शिक्षकांना मदत करतात.

**उपक्रम क्रमांक : ५**

**उपक्रमाचे नाव : रिकाम्या खोक्यांपासून गाडी तयार करणे. (कागदकाम व पुठ्ठाकाम)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना सोबत रिकामे खोके, रिकाम्या बाटल्यांची गोल झाकण चार, दोन पेनाच्या रिफिल्स किंवा दोन काड्या, डिंक, कात्री, रंगीत कागदाचे तुकडे, दोरा इत्यादी वस्तू आणायला सांगतात.
- विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करून ठेवतात.
- संबंधित व्हिडिओ तपासून ठेवतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** Creative Thinking, सर्जनशीलता, निरीक्षण,

**आवश्यक साहित्य :** रिकामे खोके, रिकाम्या बाटल्यांची चार गोल झाकणे, दोन पेनाच्या रिफिल्स किंवा दोन काड्या, डिंक, कात्री, रंगीत कागदाचे तुकडे, दोरा इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) विद्यार्थ्यांना गटाने बसवतात. गाड्यांची विविध चित्रे आणि पुठ्ठ्यापासून गाडी तयार करण्याचा व्हिडिओ दाखवतात.

२) त्याचे पुन्हा निरीक्षण करायला सांगतात. प्रथम गाडीच्या विविध भागांचे खोक्यावर रेखाटन करतात. आवश्यक भाग कात्री/कटरने कापून घेतात.

- एक आयताकृती लहान रिकामे खोके घेतात.
- आवश्यक तिथे खिडक्या, दरवाजे पेन्सिलने काढून घेतात. रंगीत कागद/रंगाने सजावट करतात.
- ज्या ठिकाणी चाके बसवायची आहेत, त्या बाजूला छिद्र पाडतात.
- चाके एकमेकांना जोडण्यासाठी पेनाची रिफिल किंवा दोन जाड काड्या घेतात. तळाच्या पुठ्ठ्यावर रिफिल आणि बुचाच्या साहाय्याने तयार केलेल्या चाकांना चिकटवून घेतात. तयार झालेली गाडी आवडत्या रंगाने आकर्षक रंगवतात.

३) विद्यार्थ्यांना गटागटात गाडी तयार करायला प्रोत्साहित करतात. सर्व गाड्या सपाट पृष्ठभागावर प्रदर्शित करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी गटाने बसतात. गाड्यांची विविध चित्रे आणि पुठ्ठ्यापासून गाडी तयार करण्याचा व्हिडिओ पाहतात.

२) प्रथम गाडीच्या विविध भागांचे खोक्यावर रेखाटन करतात. आवश्यक भाग कात्री/कटरने कापून घेतात.

- एक आयताकृती लहान रिकामे खोके घेतात.

- आवश्यक तिथे पेन्सिलने खिडक्या, दरवाजे काढून घेतात. रंगीत कागद/रंगानी सजावट करतात.
- ज्या ठिकाणी चाके बसवायची आहेत. त्या बाजूला छिद्र पाडतात.
- चाके एकमेकांना जोडण्यासाठी पेनाची रिफिल किंवा दोन जाड काड्या घेतात. तळाच्या पुठ्ठ्यावर रिफिल आणि बुचाच्या साहाय्याने तयार केलेल्या चाकांना चिकटवून घेतात. नंतर चारही उभ्या बाजू छत चिकटवतात.
- तयार झालेली गाडी आवडत्या रंगाने आकर्षक रंगवतात.
- सर्व गाड्या सपाट पृष्ठभागावर प्रदर्शित करतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/IdB4SQR6BKo?si=BK26n2AfRPO1gzhu

## २) प्राणायाम/योग/ध्यानधारणा/श्वसनाची तंत्रे

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **पद्मासन**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक पद्मासन संदर्भातील सर्व माहिती मिळवतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** शारीरिक लवचिकता, शारीरिक स्नायूंचा विकास, स्नायूंची बळकटी.

**आवश्यक साहित्य :** योगासन पट्टी

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक सर्वप्रथम विद्यार्थ्यांना पद्मासन या व्यायाम प्रकाराच्या कृती/पायऱ्या प्रत्यक्ष करून दाखवतात.

- जमिनीवरील योगासन पट्टीवर पाय सरळ समोर ठेवून ताठ बसतात.
- उजवा पाय जवळ घेऊन त्याचे पाऊल किंचित वर उचलून डाव्या मांडीवर पोटाजवळ ठेवतात.
- डावा पाय वाकवून त्याचे पाऊल थोडे वर उचलून, उजव्या पायावरून ओढून उजव्या मांडीवर पोटाजवळ ठेवतात.
- तळहात गुडघ्यांवर पालथे ठेवतात.
- पाठीचा कणा ताठ ठेवून दृष्टी नाकाच्या शेंड्याकडे ठेवतात किंवा डोळे मिटतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना पद्मासनाचे महत्त्व सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या सूचनेप्रमाणे पद्मासन या व्यायाम प्रकाराच्या कृती/पायऱ्या प्रत्यक्ष करून दाखवतात

- विद्यार्थी जमिनीवरील योगासन पट्टीवर पाय सरळ ठेवून ताठ बसतात.
- विद्यार्थी उजवा पाय जवळ घेऊन त्याचे पाऊल पकडून ते किंचित वर उचलून व डाव्या मांडीवर पोटाजवळ ठेवतात.
- विद्यार्थी डावा पाय वाकवून त्याचे पाऊल थोडे वर उचलून, उजव्या पायावरून ओढून उजव्या मांडीवर पोटाजवळ ठेवतात.
- तळहात गुडघ्यांवर पालथे ठेवतात.
- पाठीचा कणा ताठ ठेवून दृष्टी नाकाच्या शेंड्याकडे ठेवतात किंवा डोळे मिटतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/_YVICtA3EUY?si=8f9xeGKOWy9FW7Mj

2) www.youtube.com/@MinistryofAYUSHofficial

## ३) पर्यावरण संवर्धन

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : परिसर भेट/निसर्ग फेरी**

**पूर्वनियोजित कृती :**

- या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आजूबाजूच्या परिसरातील सजीव आणि निर्जिव घटक यांबाबत माहिती होण्यासाठी परिसर भेट/निसर्ग फेरी आयोजित करतात.
- या उपक्रमांतर्गत शिक्षक परिसरातील पाण्याचे स्रोत – नदी या ठिकाणी परिसर भेटीचे नियोजन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण क्षमता, चिकित्सक वृत्ती, संप्रेषण कौशल्य, वैज्ञानिक दृष्टिकोन इ.

**आवश्यक साहित्य :** भिंग, नकाशा, कीटकांचे फोटो व नावे असलेला तक्ता इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक आपल्या शाळेच्या परिसरातील नदी या ठिकाणी भेट देण्याचे नियोजन करतात आणि त्या ठिकाणी सर्वसाधारणपणे आढळणाऱ्या पक्षी, कीटक यांची माहिती संकलित करतात.

२) आवश्यकतेनुसार इतर शिक्षकांची मदत घेऊन इयत्ता पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांना परिसर भेट दरम्यान काय निरीक्षण करावयाचे याबाबत सविस्तर सूचना देतात.

३) नियोजनाप्रमाणे परिसराला भेट देऊन विद्यार्थ्यांना फळझाडे, फुलझाडे, वृक्ष, मातीचा रंग, कचरा, प्लॅस्टिकच्या वस्तू, प्राणी, पक्षी इत्यादीचे निरीक्षण करावयास सांगतात. सजीव आणि निर्जिव घटक यांची यादी करावयास सांगतात.

४) परिसराला भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांना परिसरात कोणकोणत्या वस्तू आढळून आल्या याबाबत प्रश्न विचारून व नंतर सजीव आणि निर्जिव घटकांचे वर्गीकरण करण्यास सांगतात. याबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधतात. विद्यार्थ्यांचे प्रतिसाद घेऊन त्याच्या नोंदी करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी परिसर भेट उपक्रमामध्ये सहभागी होतात.

२) विद्यार्थी परिसर भेटीदरम्यान विविध सजीव आणि निर्जीव वस्तूंचे काळजीपूर्वक निरीक्षण करतात.

३) गटामध्ये किंवा आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत परिसर भेटीदरम्यान त्यांना दिसलेले पाळीव प्राणी, पक्षी प्लॅस्टिकच्या वस्तू, फळझाडे, फुलझाडे या घटकांबाबत संवाद साधतात.

४) विद्यार्थी शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना प्रतिसाद देतात.

**संदर्भ साहित्य :**

१) पाळीव प्राणी, पक्षी, फळझाडे, फुलझाडे इत्यादींविषयी माहिती पुस्तिका.

**टीप :** वरील कृतीप्रमाणेच शिक्षक परिसर भेट उपक्रमांतर्गत आपल्या परिसरातील तलाव/पाणवठा/धरण या ठिकाणी परिसर भेट उपक्रमाचे आयोजन करू शकतील. किंवा स्थानिक परिस्थितीला अनुसरून परिसरातील उपलब्ध असणाऱ्या कोणत्याही एका ठिकाणी परिसर भेट/निसर्ग फेरीचे आयोजन करू शकतील.

---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : वेशभूषा स्पर्धा (Fancy dress competition)**

**पूर्वनियोजित कृती :**

- या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आजूबाजूच्या परिसरातील सजीव व निर्जीव घटक याबाबत माहिती होण्यासाठी वेशभूषा स्पर्धा (Fancy dress competition) आयोजित करतात. यासाठी पुढील थीम देतात.

  १) प्राणी – जंगली प्राणी, पाळीव प्राणी, कीटक, जलचर इत्यादी.

**विकसित होणारी कौशल्ये / फलनिष्पत्ती :** निरीक्षण, संवेदनशीलता, नेतृत्व गुण, संप्रेषण कौशल्य, सर्जनशीलता इत्यादी.

**आवश्यक साहित्य :** वेशभूषेसाठी आवश्यक साहित्य, सादरीकरणासाठी आवश्यक साहित्य.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक वेशभूषा स्पर्धा (Fancy dress competition) घेण्यासाठी नियोजन करतात.

२) आवश्यकतेनुसार इतर शिक्षकांची मदत घेऊन इयत्ता पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धेचे नियम आणि कार्यवाहीची पद्धत निश्चित करतात.

३) शिक्षक वेशभूषा स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांनी आपण निवडलेल्या प्राणी – जंगली प्राणी, पाळीव प्राणी, कीटक, जलचर या थीमवर आधारित वेशभूषा आणि त्यासंबंधी माहिती सादर करावयाच्या सूचना विद्यार्थ्यांना देतात.

४) मी कोण आहे? माझी उपयुक्तता काय? मी कोठे राहतो? माझे अन्न कोणते? माझे वैशिष्ट्य काय? या पाच प्रश्नांवर आधारित माहिती सादरीकरण करण्यासंबंधी सूचना देतात.

५) दिलेल्या सुचनेप्रमाणे विद्यार्थ्यांना घरी पूर्वतयारी करण्यास सांगून तयारीसाठी पुरेसा कालावधी देतात.

६) वेशभूषा सादरीकरण आणि ५ वाक्ये माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून शिक्षक मूल्यमापन करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी वेशभूषा (Fancy dress competition) स्पर्धेमध्ये दिलेल्या विषयानुसार सहभागी होतात.

२) विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेऊन माहिती सादरीकरण करतात.

**संदर्भ साहित्य :** इंटरनेट, वर्तमानपत्रामधील कात्रणे, माहिती पुस्तिका इत्यादी.

- वरील कृतीप्रमाणेच खालील विषयांवर वेशभूषा स्पर्धा आयोजित करता येऊ शकेल.

१) वनस्पती – औषधी वनस्पती, फळझाडे, फुलझाडे इत्यादी.

२) सूर्यमालेतील ग्रह, तारे इत्यादी.

## ४) सामाजिक बांधीलकी

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : चला आदर करू या.**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांच्या कुटुंबातील, परिसरातील व्यक्तींची माहिती घेतात.
- शिक्षक वेगवेगळ्या वयोगटातील व्यक्तींना शाळेतील उपक्रमाबाबत पूर्वकल्पना देतात व त्यांची शाळेच्या उपक्रमात सहभागी होण्याबाबत परवानगी घेतात. पालकांना याबाबत पूर्वकल्पना देतात.
- शिक्षक वर्गातील काही विद्यार्थ्यांकडून कुटुंबातील/परिसरातील मोठ्या व्यक्ती, लहान व्यक्ती यांची भूमिका साकार करण्याची तयारी करून घेतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** सुसंवाद कौशल्य, प्रश्न, जीवनकौशल्य, संवेदनशीलता.

**आवश्यक साहित्य :** –

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक आदराचे महत्त्व स्पष्ट करतात. (उदा., हात जोडून नमस्कार करणे, पाणी देणे, हस्तांदोलन करणे इत्यादी.)

२) शिक्षक विद्यार्थ्यांना आपल्यापेक्षा लहान व मोठ्या व्यक्तींना संबोधत असताना (हाक मारताना) आदर कसा व्यक्त केला जातो याबद्दल माहिती सांगतात. (उदा., दादा–ताई, काका–काकू, मामा–मामी, तात्या, छकुली, बाळा, छोटी ताई, छोटा दादा इत्यादी.)

३) शिक्षक घरातील, परिसरातील ओळखीच्या किंवा अनोळखी मोठ्या माणसांबरोबर आदराने कसे बोलावे, वागावे याबद्दल माहिती देतात.

४) शिक्षक छोट्या छोट्या कृतीतून व बोलण्यातून आदर कसा व्यक्त करावा याबाबत माहिती देतात व शिक्षक विद्यार्थ्यांना आपण इतरांना आदर दिला किंवा बोललो तर तेही आपल्याला आदर देतात, बोलतात या बाबी खालील प्रश्नांच्या आधारे प्रात्यक्षिक घेऊन सांगतात.

**प्रश्न :** १) दादा किंवा दीदी तुमचे नाव काय आहे?

२) काकू तुम्ही कोठे राहता?

३) मामा–मामी तुम्ही कधी आलात? पाणी घेतले का?

४) बाळा कसा आहेस तू?

५) छोटी ताई किंवा दादा शाळेत जात आहात ना!

६) काका–काकू किती दिवसांनी आलात तुम्ही?

५) शिक्षक विद्यार्थ्यांना दिलेल्या भूमिकेनुसार गटात अभिनय करायला सांगतात.

६) शिक्षक वेगवेगळ्या वयोगटातील उपलब्ध परिचित व्यक्तींना शाळेत बोलावून विद्यार्थ्यांना माहिती दिल्याप्रमाणे उपक्रमातील कृती करायला सांगतात व कृती करून घेतात.

७) भेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांना प्रश्नावलीत दिलेले प्रश्न विचारून वर्गात विद्यार्थ्यांशी चर्चा करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी छोट्या छोट्या कृतीतून व बोलण्यातून आदर कसा व्यक्त करावा याबाबत शिक्षकांनी दिलेल्या सूचनेबाबतचे निरीक्षण करतात व आवश्यक ती माहिती संकलित करतात.

२) विद्यार्थी विविध पात्रे घेऊन गटात छोटे अभिनय सादर करतात.

३) विद्यार्थी प्रात्यक्षिकात सहभागी होतात.

४) विद्यार्थी प्रात्यक्षिकानंतर होणाऱ्या चर्चेत सहभागी होतात.

५) विद्यार्थी घरातील, परिसरातील ओळखीचे किंवा अनोळखी मोठ्या माणसांबरोबर आदराने बोलतात.

**संदर्भ साहित्य :** ‘मजेत शिकूया’ पाठ्यपुस्तक

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................................

**उपक्रमाचे नाव : चला आदर करू या.**

**कृतीचे नाव :** ..............................................................

**विद्यार्थ्याचे नाव :** .............................................................. **इयत्ता :** .......................

**प्रश्न १ :** आदराने संबोधल्यानंतर (आवाज दिल्यानंतर) तुम्हाला कसे उत्तर मिळाले?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न २ :** तुमच्यापेक्षा लहान व्यक्ती तुमच्याशी आदराने बोलली तर तुम्हाला कसे वाटते?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न ३ :** तुमच्यापेक्षा मोठी व्यक्ती तुमच्याशी आदराने बोलली तर तुम्हाला कसे वाटते?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न ४ :** तुम्ही तुमच्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या व्यक्तींना कृतीतून आदर दिल्यानंतर (नमस्कार करणे) मोठी माणसे काय म्हणाली?

**उत्तर :** ..........................................................................................................

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : झाडांची निगा ठेवू या व झाडांना पाणी देऊ या.**

**पूर्वनियोजित कृती :**

१) शिक्षक परिसरात, शाळेत रोपे लावण्यायोग्य जागा निवडतात व जागेची निश्चित करतात. तसेच विद्यार्थ्यांना घरात, परिसरात रोपे कोठे लावता येतील याबाबत चर्चा करतात.

२) शिक्षक रोपे कशी लावावेत, झाडांची निगा कशी राखावी, झाडांची काळजी कशी घ्यावी याचे मार्गदर्शन करण्यासाठी अनुभवी शेतकरी किंवा कृषितज्ज्ञ यांची परवानगी घेऊन शाळेतील उपक्रमात सहभागी होण्याची व त्यांना विद्यार्थ्यांना माहिती देण्याबाबतचे नियोजन करतात.

३) शिक्षक नवीन रोपे लावण्यासाठी व असलेल्या झाडांची निगा राखण्यासाठी उपयुक्त साहित्यांची जमवाजमव करतात. गटात काम करताना इजा होणार नाही याची काळजी घेण्याबाबत सूचना देतात. शिक्षक विद्यार्थ्यांना रोपांची, झाडांची काळजी कशी घ्यावी, निगा कशी राखावी. हे खालील प्रश्नांच्या आधारे शेतकरी, कृषितज्ज्ञ यांना विचारण्यास सांगतात.

**प्रश्न :** १) रोपांची/झाडांची निगा कशी राखावी?

२) रोपे लावताना कोणती काळजी घ्यावी?

४) रोपे कशी तयार करावी? किती मोठी झाल्यानंतर ती जमिनीत लावावी?

३) रोपांना/झाडांना सुरक्षित ठेवण्यासाठी काय करावे?

५) झाडांची काळजी किंवा निगा कशी घेता येईल?

**विकसित होणारी कौशल्य :** सुसंवाद कौशल्ये, प्रश्न, जीवनकौशल्ये, सामाजिक बांधिलकी.

**आवश्यक साहित्य :** –

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक परिसरात, शाळेत रोपे लावण्यायोग्य निवडलेल्या जागेची पाहणी करतात.

२) शिक्षक रोपे कशी लावावीत, झाडांची निगा कशी राखावी, झाडांची काळजी कशी घ्यावी याचे मार्गदर्शन करण्यासाठी अनुभवी शेतकरी किंवा कृषितज्ज्ञ यांना बोलावून रोपे, झाडे लावण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्याबाबत सांगतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना दिलेल्या मार्गदर्शनानुसार रोपे लावण्यासंदर्भात विविध कामे देऊन गटात काळजी घेऊन कामे करण्यास सांगतात.

४) शिक्षक विद्यार्थ्यांकडून पूर्वनियोजनानुसार काही तयार केलेल्या प्रश्नांच्या आधारे अनुभवी शेतकरी किंवा कृषितज्ज्ञ यांच्याकडून माहिती घेण्यास सांगतात.

५) उपक्रम राबविल्यावर शिक्षक विद्यार्थ्यांना प्रश्नावलीत दिलेले प्रश्न विचारून विद्यार्थ्यांशी चर्चा करतात.

## विद्यार्थी कृती :

१) विद्यार्थी परिसरात, शाळेत रोपे लावण्यासाठी योग्य जागा निवडणे व निश्चित करणे याबाबत शिक्षकांशी चर्चा करतात.

२) विद्यार्थी रोपे, झाडे लावण्यासंदर्भात विविध कामे गटात काळजी घेऊन करतात.

३) विद्यार्थी रोपे कशी लावावीत, झाडांची निगा कशी राखावी, काळजी कशी घ्यावी याबाबत अनुभवी शेतकरी किंवा कृषितज्ज्ञ यांच्याकडून पूर्वनियोजनाप्रमाणे माहिती घेतात.

४) विद्यार्थी माहिती घेण्यासंदर्भात अनुभवी शेतकरी किंवा कृषितज्ज्ञ यांना प्रातिनिधिक प्रश्न विचारतात.

५) विद्यार्थी शिक्षकांसोबत होणाऱ्या चर्चेत सहभागी होतात.

## संदर्भ साहित्य :

1) https://youtu.be/QCGSyl_covv?si=xtkLL09Ey87M673l

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ....................................................................................................

**उपक्रमाचे नाव : झाडांची निगा ठेवू या व झाडांना पाणी देऊ या.**

**कृतीचे नाव :** ....................................................................

**विद्यार्थ्याचे नाव :** .................................................................... **इयत्ता :** ..........................

**प्रश्न १ :** तुम्ही रोपांची/झाडांची निगा कशी राखाल?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न २ :** रोपांना/झाडांना सुरक्षित ठेवण्यासाठी तुम्ही काय कराल?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न ३ :** रोपे लावताना तुम्ही कोणती काळजी घ्याल?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न ४ :** तुम्ही रोपे कशी तयार कराल?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न ५ :** झाडांचा पालापाचोळा यांचे काय कराल?

**उत्तर :** ....................................................................................................

## ५) व्यक्तिमत्त्व विकास (माझे आरोग्य)

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **माझी दिनचर्या**

**पूर्वनियोजित कृती :** विद्यार्थ्यांना विचारावयाच्या प्रश्नांची यादी करतात. जसे :

- तुम्ही सकाळी किती वाजता उठता?
- त्यानंतर तुम्ही काय-काय करता?
- घड्याळातील वेळ पाहून त्यावेळी तुम्ही काय करत असता ते सांगा?

  (उदा., सकाळी ९.०० वा., दुपारी २.०० वा. इत्यादी.)

  दिनचर्या दर्शविणारी चित्रे गोळा करतात. तक्ता तयार करतात. त्यापैकी काही चित्रे ही आदर्श दिनचर्येशी सुसंगत नसणारी देखील असावीत.


**सूर्योदयापूर्वी उठणे**


**प्रातर्विधी**


**दात घासणे**


**अंघोळ करणे**


**केस विंचरणे**


**जेवण करणे**


**स्वच्छ कपडे घालणे**


**शाळेत जाणे**


**मैदानावर खेळणे**


**अभ्यास करणे**


**घरची कामे करणे**


**झोपणे**

**विकसित होणारी कौशल्ये :** निरीक्षण, संभाषण, शारीरिक विकास, बौद्धिक विकास, व्यक्तिमत्त्व विकास.

**आवश्यक साहित्य :** दिनचर्याविषयक कार्ड्स किंवा तक्ते.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना चित्रतक्ता दाखवून त्याविषयी वरील नमुनात्मक प्रश्न विचारतात.

२) विद्यार्थ्यांच्या दिनचर्येविषयी प्रहरानुसार (सकाळ, दुपार, संध्याकाळ व रात्र) विचारतात.

३) घड्याळात वेळ दाखवून (उदा., सकाळी ९ वा.) या वेळी तुम्ही काय करता हे विचारतात.

४) आदर्श दिनचर्येविषयी विद्यार्थ्यांशी खालील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करतात.
उठण्याची वेळ, न्याहरीची वेळ, जेवणाची वेळ, खेळण्याची वेळ आणि झोपण्याची वेळ.

६) ज्या विद्यार्थ्यांची दिनचर्या आरोग्यदायी नाही त्यांच्याशी स्वतः संवाद साधून मार्गदर्शन करतात.

७) 'लवकर निजे लवकर उठे त्यासी आरोग्यसंपदा लाभे'
'Early to bed, Early to rise, makes you healthy, wealthy and wise' या सुभाषितावर चर्चा करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी किती वाजता उठतात हे सांगतात.

२) विद्यार्थी त्यांच्या दिनचर्येविषयी सांगतात. (सकाळी उठणे, दात घासणे ... इत्यादी.)

३) घड्याळात वेळ (स. ९.०० वा) पाहून यावेळी आम्ही काय करतो हे सांगतात. (न्याहरी करणे.)

४) आदर्श दिनचर्येविषयी चर्चेत सहभागी होतात.
(वेळेवर उठणे, वेळेवर झोपणे, वेळेवर जेवण करणे, आहारात भाज्यांचा समावेश करणे,....... इत्यादी)

५) दिनचर्या आदर्श असेल, तर शारीरिक विकास, मानसिक विकास आणि बौद्धिक विकास उत्तम होतो हे समजून घेतात.

**विद्यार्थी दिनचर्या दर्शविणाऱ्या चित्रांचे निरीक्षण करतात. शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात. जसे –**

१) चित्रात काय दिसत आहे?

२) तुम्ही किती वाजता उठता?

३) संध्याकाळी ६ वाजता तुम्ही काय करत असता?

**संदर्भ साहित्य :**

१) इयत्ता पहिली : खेळू करू शिकू पुस्तिका

| |
|---|
| **टीप :** सदर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी यासोबतच इतर व्यक्तिमत्त्वविषयक उपक्रमांचे आयोजन शिक्षक स्वतःच्या सर्जनशीलतेने करू शकतात. |

## ६) कृषीविषयक साक्षरता

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : क्षेत्रभेट – आठवडी बाजार/भाजी मंडईला भेट**

**पूर्वनियोजित कृती :**

- क्षेत्रभेट या उपक्रमांतर्गत शिक्षक परिसरातील आठवडी बाजार/भाजी मंडई या ठिकाणी क्षेत्रभेट नियोजन करतात.

  आठवडी बाजार/भाजी मंडई भेट – आठवडी बाजारामध्ये विक्रीसाठी ठेवलेल्या फळभाज्या, पालेभाज्या, विविध प्रकारची फळे, सुकामेवा, मासे, कडधान्ये, तेलबिया इत्यादींचे निरीक्षण करणे. त्यांची इंग्रजी आणि मराठी भाषेतील नावे शोधणे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** संप्रेषण कौशल्य, चिकित्सक वृत्ती, निरीक्षण, संवेदनशीलता इत्यादी.

**आवश्यक साहित्य :** वही, पेन, क्षेत्रभेट दरम्यान पाण्याची बाटली आणि इतर आवश्यक साहित्य इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक आपल्या परिसरातील आठवडी बाजार/भाजी मंडईला भेट देण्याचे नियोजन करतात.

२) आवश्यकतेनुसार इतर शिक्षकांची मदत घेऊन इयत्ता पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांना आठवडी बाजार/भाजी मंडईला भेटीदरम्यान काय निरीक्षण करावयाचे याबाबत सविस्तर सूचना देतात.

३) नियोजनाप्रमाणे आठवडी बाजार/भाजी मंडईला भेट देऊन विद्यार्थ्यांना आठवडी बाजारामध्ये विक्रीसाठी ठेवलेल्या फळभाज्या, पालेभाज्या, विविध प्रकारची फळे, दुग्धपदार्थ, तेलबिया, कडधान्ये इत्यादींचे निरीक्षण करावयास सांगतात.

४) भेटीदरम्यान शिक्षक विद्यार्थ्यांना खालील प्रश्न विचारतात.

- विद्यार्थ्यांना बाजारात कोणकोणत्या भाज्या, फळे, कडधान्ये विक्रीसाठी आहेत त्यांची नावे सांगा.
- आठवडी बाजारात विक्रीसाठी उपलब्ध भाज्यांचे वर्गीकरण फळभाज्या व पालेभाज्या यामध्ये करा.
- आठवडी बाजारामध्ये किंवा भाजी मंडईमध्ये विक्रीसाठी येणारा माल कोणत्या गावाहून किंवा कोणत्या ठिकाणाहून आणला जातो?
- आठवडी बाजार किंवा भाजी मंडईचा गावातील लोकांना काय उपयोग होतो ते सांगा.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी आठवडी बाजार क्षेत्रभेट उपक्रमामध्ये सहभागी होतात.

२) विद्यार्थी नियोजनाप्रमाणे आठवडी बाजार/भाजी मंडईला भेट देऊन आठवडी बाजारामध्ये विक्रीसाठी ठेवलेल्या फळभाज्या, पालेभाज्या, विविध प्रकारची फळे, दुग्धपदार्थ, तेलबिया, कडधान्ये इत्यादींचे निरीक्षण करतात.

३) गटामध्ये किंवा आपल्या मित्र–मैत्रिणींसोबत भेटीदरम्यान भाजी विक्रेत्यांशी संवाद साधतात.

४) विद्यार्थी शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना योग्य प्रतिसाद देतात.

**संदर्भ साहित्य :**

१) ग्रंथालयात उपलब्ध क्षेत्रभेटीवर आधारित माहिती पुस्तिका.

> **टीप :** वरील कृतीप्रमाणेच शिक्षक क्षेत्रभेट या उपक्रमांतर्गत आपल्या परिसरातील बगीचा, परिसरातील नर्सरी किंवा गावातील शेती या ठिकाणी भेट देऊन क्षेत्रभेट उपक्रम राबवू शकतात.

---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रम २ : फळभाज्यांपासून विविध कलाकृती निर्मिती व सादरीकरण.**

**पूर्वनियोजित कृती :**

- या उपक्रमात फळभाज्यांपासून विविध कलाकृती, आकार, ठसेकाम इत्यादी माध्यमातून तयार केलेल्या कलाकृतींचे सादरीकरण करण्यासाठी स्पर्धा आयोजित करणे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** कारककौशल्यांचा विकास, हस्त–नेत्र समन्वय, विविध फळभाज्या, पालेभाज्या यांची ओळख होणे.

**आवश्यक साहित्य :** कलाकृती सादर करण्यासाठी आवश्यक साहित्य.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक फळभाज्यांपासून विविध कलाकृतींचे सादरीकरण या स्पर्धेचे नियोजन करतात.

२) आवश्यकतेनुसार इतर शिक्षकांची मदत घेऊन इयत्ता पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धेचे निकष तयार करतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे सूचना देतात.

- फळभाज्याचा वापर करून आकर्षक कलाकृती (आकार, ठसेकाम, आकर्षक मांडणी) तयार करावयाची आहे.
- घरी पालकांच्या मदतीने या उपक्रमामध्ये काय सादरीकरण करायचे आहे, कोणते साहित्य वापरायचे आहे याची चर्चा करा.

- घरी ही कलाकृती तयार करून प्रदर्शनाच्या दिवशी सुस्थितीत शाळेत आणावी.
- प्रदर्शन दरम्यान कलाकृतीबाबत २ मिनिटात सादरीकरण/माहिती सांगायची असल्याने आवश्यक पूर्वतयारी करावी.

४) दिलेल्या सूचनेप्रमाणे विद्यार्थ्यांना घरी काम करण्यास सांगून पुरेसा कालावधी देतात. नियोजनानुसार विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृतींचे शाळेमध्ये प्रदर्शन भरवून मूल्यमापन करतात.

### विद्यार्थी कृती :

१) विद्यार्थी फळभाज्यांपासून विविध कलाकृती सादरीकरण स्पर्धेमध्ये सहभागी होतात.

२) विद्यार्थी त्यांनी तयार केलेल्या कलाकृतींबाबत थोडक्यात माहिती सांगतात.

### संदर्भ साहित्य :

१) इंटरनेट, माहिती पुस्तिका, वतर्मानपत्र कात्रणे इत्यादी.

## ७) आपत्ती व्यवस्थापनाची मूलतत्त्वे आणि व्यावहारिक प्रशिक्षण

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **प्रथमोपचार पेटी तयार करणे.**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक प्रथमोपचार पेटी, औषधे इत्यादींची माहिती करून देतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** प्रथमोपचार पेटीचा गरजेनुसार उपयोग, निरीक्षण कौशल्य.

**आवश्यक साहित्य :** बँडेज पट्ट्या, सुई, दोरा

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना प्रथमोपचार पेटीचे महत्त्व थोडक्यात सांगतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना प्रथमोपचार पेटी कोणत्या परिस्थितीत कशी हाताळावी हे विविध उदाहरणाद्वारे सांगतात.

३) शिक्षक प्रथमोपचार पेटीत कोणती औषधे असावीत याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करून यादी अंतिम करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांकडून प्रथमोपचार पेटीचे महत्त्व समजून घेतात.

२) विद्यार्थी शिक्षकांकडून प्रथमोपचार पेटी कोणत्या परिस्थितीत कशी हाताळावी हे समजून घेतात.

३) विद्यार्थी शिक्षकांच्या मदतीने प्रथमोपचार पेटीत औषधांची यादी बनवतात.

**संदर्भ साहित्य :**

१) प्रथमोपचार पेटी संदर्भीय दूरदर्शन (जम्मू) व्हिडिओ.

2) https://youtu.be/C1Kcw2BrcRQ

## ८) दैनंदिन जीवनातील वित्तीय व्यवस्थापन आणि व्यावहारिक कौशल्ये

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : ओळख नाणी-नोटांची**

**पूर्वनियोजन कृती :**

- शिक्षक विविध नाणी व नोटा यांचा संग्रह करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण कौशल्य, भारतीय चलन ओळखण्याचे कौशल्य, संख्याज्ञान

**आवश्यक साहित्य :** नाणी, नोटा

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक सर्वप्रथम विद्यार्थ्यांना नाणी व नोटा दाखवतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना भारतीय चलनाचे महत्त्व सांगतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना भारतीय चलनाद्वारे होणारा व्यवहार दाखवितात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांकडून दाखवलेल्या नाणी व नोटा पाहतात.

२) विद्यार्थी शिक्षकांकडून भारतीय चलनाचे महत्त्व समजून घेतात.

३) विद्यार्थी शिक्षकांकडून भारतीय चलनाचा व्यवहार समजून घेतात.

**संदर्भ साहित्य :**

१) संदर्भ व्हिडिओ https://youtube.com/shorts/QOJ99oNptTk?si=55Z5VlARwqt6dl2v

## ९) आरोग्य रक्षण करण्यासाठी उपाययोजना

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव : कौन बनेगा स्मार्ट बॉय/गर्ल**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक स्वच्छता कशी राखावी या विषयाची माहिती घेतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** वैयक्तिक स्वच्छता राखण्याचे कौशल्य.

**आवश्यक साहित्य :** तयार केलेला मुकुट, विजेता रिबीन

**शिक्षक कृती :**

१) सर्वप्रथम शिक्षक हे 'स्मार्ट बॉय व स्मार्ट गर्ल' हा उपक्रम शाळेत राबवित असताना विद्यार्थ्यांना हा उपक्रम आपल्या शाळेमध्ये कसा राबविला जाणार आहे, याविषयी सविस्तर मार्गदर्शन करतात.

२) त्यानंतर विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक नियम सांगतात. विजेत्या स्मार्ट बॉय व स्मार्ट गर्ल यांना बक्षीस स्वरूपात मुकुट व विजेता रिबीन बक्षीस म्हणून मिळणार असल्याचे विद्यार्थ्यांना सांगतात.

३) शिक्षक सर्वप्रथम विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व सांगतात. शिक्षक विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छतेचे फायदे सांगतात. शिक्षक विद्यार्थ्यांना अस्वच्छतेचे तोटे सांगतात.

४) शिक्षक विद्यार्थ्यांना वैयक्तिक विकासाचा एक मार्ग म्हणजे वैयक्तिक स्वच्छता हे सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) 'स्मार्ट बॉय व स्मार्ट गर्ल' या उपक्रमात विद्यार्थी हे शिक्षकांनी सांगितलेल्या नियमाप्रमाणे वैयक्तिक स्वच्छता, टापटीपपणा व इतर नियमांची स्पर्धात्मक अंमलबजावणी करून या उपक्रमामध्ये अतिशय आनंदाने सहभागी होतात व केवळ स्पर्धा म्हणून किंवा बक्षीस म्हणून सहभाग न नोंदवता प्रत्यक्ष त्यांच्यामध्ये वैयक्तिक स्वच्छतेबद्दल आवड निर्माण होऊन, प्रत्यक्ष कृतीमध्ये बदल होतो आणि स्वतः मध्ये देखील बदल करतात व इतरांना देखील प्रेरित करतात.

२) विद्यार्थी शिक्षकांकडून वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व व फायदे समजून घेतात. विद्यार्थ्यांना अस्वच्छतेचे तोटे समजतात.

३) विद्यार्थी शिक्षकांकडून वैयक्तिक विकासाचा एक मार्ग म्हणजे वैयक्तिक स्वच्छता हे समजून घेतात.

**संदर्भ साहित्य :**

१) व्हिडिओ. https://youtu.be/MJO7_E99X4E

2) Incredible India - 'Swacchta Hi Sewa' Film | Cleanliness Campaign

# १०) रस्ते सुरक्षा

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : रस्ते सुरक्षा–आपली सुरक्षा**

**पूर्वनियोजन कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांसाठी 'रस्ते सुरक्षा' ही ध्वनिचित्रफीत पाहण्यासाठी आयोजन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण कौशल्य.

**आवश्यक साधन सामग्री :** भ्रमणध्वनी/प्रोजेक्टर.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक सर्वप्रथम विद्यार्थ्यांना ध्वनिचित्रफीत पाहण्यासाठी बैठक व्यवस्था करतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षासंबंधीची माहिती सांगतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना ध्वनिचित्रफितीतील मतितार्थ सांगतात.

४) शिक्षक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या सूचनेनुसार कृती करतात.

२) विद्यार्थी शिक्षकांकडून रस्ते सुरक्षेसंबंधीची माहिती जाणून घेतात.

३) विद्यार्थी शिक्षकांकडून रस्ते सुरक्षेसंबंधीचा मतितार्थ जाणून घेतात.

४) विद्यार्थी शिक्षकांच्या प्रश्नांना उत्तरे देतात.

**संदर्भ साहित्य :**

१) संदर्भीय दूरदर्शन व्हिडिओ. https://youtu.be/U7BPQZOtAyE

---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : ट्रॅफिक दादा–सिग्नल दादा**

**पूर्वनियोजित कृती :**

- सर्वप्रथम शिक्षक कृतियुक्त ट्रॅफिक दादा–सिग्नल दादा यावर आधारित कृतियुक्त कविता गायन करतात.
- विद्यार्थ्यांकडून ट्रॅफिक दादा–सिग्नल दादा यावर कृतियुक्त गायन करून घेतात.
- विद्यार्थीदेखील वाहतुकीचे सगळे नियम समजून घेतात.

ट्रॅफिक दादा सांगा, सांगा, तुमची भाषा आम्हाला सांगा.
छोट्यांचा ऐकून एकच गलका, ट्रॅफिक दादा म्हणाले 'ऐका'
दिसता समोर लाल दिवा, गाडीला तुमच्या ब्रेक लावा.
खांबावर दिसता पिवळा दिवा इकडे तिकडे नीट लक्ष ठेवा.
हिरवा दिवा लागेल तेव्हा, गाडी तुमची पुढे चालवा.
लावाल वाहन 'नो पार्किंगला' होईल दंड नक्कीच तुम्हाला.
खूप धूर वाहन सोडता, दुरुस्ती करा वेळ न लावता.
पाळा नियम वाहतुकीचे संकट ना येई. 'ट्रॅफिक जॅम' चे
वेगावरती ठेवा नियंत्रण अपघाताला नको निमंत्रण,
ट्रॅफिक दादा सांगा, सांगा, तुमची भाषा आम्हाला सांगा.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** वाहतुकीच्या नियमांचे पालन, कृतियुक्त गायन, मनोरंजनातून शिक्षण.

**आवश्यक साहित्य :** साऊंड सिस्टीम, माईक, वेशभूषा साहित्य, वाहतुकीच्या नियमांचे फलक, लाल, पिवळा व हिरवा दिवादर्शक फलक.

**शिक्षक कृती :**

१) सर्वप्रथम शिक्षक कृतियुक्त ट्रॅफिक दादा-सिग्नल दादा यावर आधारित कृतियुक्त कविता गायन करतात.

२) विद्यार्थ्यांकडून ट्रॅफिक दादा-सिग्नल दादा यावर कृतियुक्त गायन करून घेतात.

३) लाल, पिवळा, हिरवा दिवा यांचे वाहतुकीमधील महत्त्व समजवतात.

४) वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्यासाठी सांगतात, तसेच वाहतुकीच्या नियमांचे प्रात्यक्षिक करून घेतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी कृतियुक्त ट्रॅफिक दादा-सिग्नल दादा यावर आधारित कृतियुक्त कविता गायन करतात.

२) विद्यार्थी ट्रॅफिक दादा यावर कृतियुक्त गायन करतात.

३) विद्यार्थी लाल, पिवळा, हिरवा दिवा यांचे वाहतुकीमधील महत्त्व समजून घेतात तसेच वाहतुकीच्या नियमांचे पालन करतात.

४) विद्यार्थी शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे वाहतुकीच्या नियमांच्या प्रात्यक्षिकाचा सराव करतात.

**संदर्भ साहित्य :**

१) संदर्भीय दूरदर्शन व्हिडिओ. https://youtu.be/U7BPQZOtAyE

## ११) २१ व्या शतकातील कौशल्ये

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **रद्दीतून अध्ययन**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील अशी विविध भाषेतील वर्तमानपत्रांचा संग्रह करण्यासाठी सूचना देतात. वेगवेगळ्या वर्तमानपत्रांची नावे सांगतात. उदा. लोकमत, एकमत, दैनिक सकाळ किंवा विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होणारी इतर कोणतीही वर्तमानपत्रे.
- शिक्षक विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रे कुठे मिळतात हे सांगतात. जसे – घर, शेजारी, ग्रंथालय, शाळा, किराणा दुकान इत्यादी.
- शिक्षकांच्या सूचनेप्रमाणे विद्यार्थी आदल्या दिवशी वर्तमानपत्रांची कात्रणे संग्रहित करून ठेवतात.
- शिक्षक वर्गातील विद्यार्थ्यांचे गट तयार करतात व त्या गटांना नावे देतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांकडून वर्तमानपत्राच्या आधारे पुढीलप्रमाणे विषयनिहाय कृती पूर्ण करण्यासाठी सूचना देतात आणि योग्य तेथे मार्गदर्शन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** सर्जनशीलता, चिकित्सक विचार, सहयोग संप्रेषण, आत्मविश्वास, करुणा.

**आवश्यक साहित्य :** जुन्या वर्तमानपत्रांची रद्दी, पेन्सिल, पेन, रंग, खडू, फेव्हिकॉल.

**शिक्षक कृती :** शिक्षक विद्यार्थ्यांकडून विषयनिहाय कृती पूर्ण करून घेतात.

**मराठी :**

उदा., : सांगितलेल्या अक्षरांना गोल करा.

१) सांगितलेल्या अक्षराखाली आडवी रेघ मारा.

२) सांगितलेल्या अक्षरावर तिरपी रेघ मारा.

३) सांगितलेली अक्षरे मोठ्याने वाचा.

४) आपल्या मित्रांनी वाचलेली अक्षरे लक्षपूर्वक ऐकून मोठ्याने सांगा.

५) दोन अक्षरी, तीन अक्षरी, चार अक्षरी शब्द शोधा व वाचा.

६) जाड ठशातील शब्द शोधून मोठ्याने वाचा.

७) तुमच्याकडील वर्तमानपत्राचे नाव काय आहे ते सांगा.

८) तुमच्याकडे असलेल्या वर्तमानपत्रात कोणकोणती चित्रे आहेत ते सांगा.
९) वर्तमानपत्रातील गोष्ट मोठ्याने वाचा.
१०) तुमच्या घरी कोणते वर्तमानपत्र येते?
११) तुम्हाला कोणते वर्तमानपत्र वाचायला आवडते?
१२) तुमच्या घरी वर्तमानपत्र कोण कोण वाचते?
१३) तुम्हाला माहीत असलेल्या वर्तमानपत्रांची नावे सांगा.
१४) आपल्या शाळेत कोणते वर्तमानपत्र येते?
१५) वर्तमानपत्रातील आवडलेले शब्द लिहा व मोठ्याने वाचा.
१६) आवडलेली बातमी घरी गेल्यावर आईला सांगा.

**गणित :**

१) वर्तमानपत्रातील जाड ठशातील शब्द मोजा.
२) जाड ठशातील शब्द मोजून किती ते सांगा.
३) तुम्हाला माहीत असलेल्या वर्तमानपत्रांची संख्या सांगा.
४) एका पानावरील चार अक्षरी/पाच अक्षरी शब्द मोजून किती आहेत ते सांगा.
५) वर्तमानपत्रात कोणकोणते आकार पाहिले ते सांगा.
६) तुमच्या घरात किती व्यक्ती वर्तमानपत्र नियमित वाचतात ते सांगा.
७) तुम्हाला आवडणाऱ्या वर्तमानपत्रांची संख्या सांगा.
८) आज तुम्ही किती बातम्या वाचल्या ते सांगा.

**इंग्रजी :**

१) इंग्रजी वर्तमानपत्राचे एक नाव सांगा.
२) इंग्रजी वर्तमानपत्रातील तुम्हाला माहीत असलेली मुळाक्षरे मोठ्याने वाचा.
३) इंग्रजी वर्तमानपत्रातील दोन अक्षरी, तीन अक्षरी शब्द वाचून सांगा.
४) वर्तमानपत्रातील तुम्हाला आवडलेले इंग्रजी शब्द घरी गेल्यावर तुमच्या पालकांना सांगा.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी दिलेल्या सूचनांचे पालन करतात. वर्तमानपत्राची रद्दी जमा करतात.
२) शिक्षकांनी सांगितलेल्या कृती पूर्ण करतात, तसेच शिकण्याचा व नवनिर्मितीचा आनंद घेतात.

## संदर्भ साहित्य :

१) रद्दी वर्तमानपत्र.

'अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन' प्रशिक्षण पुस्तिकेतील इयत्तानिहाय आव्हाने यादी.

**टीप :** शिक्षकांनी विद्‌यार्थ्यांकडून वरील कृतींसोबत इतर तत्सम प्रकारच्या पुढील नावीन्यपूर्ण कृती करून घ्याव्यात.

- वर्तमानपत्रातील प्राणी, पक्षी, फुले, फळे, वृक्ष यांची रंगीत चित्रे व खेळाडू, समाजसेवक, देशभक्त यांचे रंगीत फोटो संग्रहित करा.
- वर्तमानपत्रातील तुमच्या शाळेच्या बातम्यांचे संकलन करा.
- वर्तमानपत्रात आलेली चित्रे रंगवा.
- वर्तमानपत्रातील गोष्टी मोठ्याने वाचा आणि त्या गोष्टींच्या कात्रणांचा संग्रह करा.
- केसरी वर्तमानपत्र कोणी लिहिले?
- वर्तमानपत्रात तुम्हाला लिहायला आवडेल का?
- शिक्षकांच्या मदतीने रद्दी वर्तमानपत्रापासून टोप्या, कागदी फुले, कागदी चेंडू, कागदी पिशव्या इत्यादी तयार करा.
- वर्तमानपत्रातील तुम्हाला न समजलेल्या शब्दांची यादी तयार करा व त्यांचे अर्थ शिक्षकांकडून माहिती करून घ्या.

## १२) क्षेत्रभेट व यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : किराणा दुकान भेट (परिसर ओळख)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक परिसरातील किराणा दुकानाबाबत माहिती गोळा करतात.
- शिक्षक परिसरात उपलब्ध किराणा दुकानाला केव्हा, कुठे व कशी भेट द्यायची याचे नियोजन करतात. संबंधित व्यक्तींना व पालकांना याची पूर्वकल्पना देतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना शिस्तीचे पालन करण्याची सूचना देतात. विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घ्यावी याची सूचना देतात. उदा., पाण्याची बाटली ठेवणे, रांगेत चालणे इत्यादी सूचना.
- शिक्षक विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटी दरम्यान कोणत्या बाबींची माहिती घ्यावी किंवा निरीक्षण करावे याबाबत सविस्तर पूर्वसूचना देतात. खालील प्रश्नांच्या आधारे माहिती संकलित करण्यास सांगतात.

  **प्रश्न :** १) किराणा दुकानाचे नाव काय आहे?

  २) किराणा दुकान कोठे आहे.

  ३) दुकानाची वेळ काय आहे?

  ४) दुकानात विक्रीसाठी काय काय असते?

  ५) दुकानात कोणकोणत्या वस्तूवर छापील किंमत असते.

  ६) दुकानात कामगार किती आहेत?
- क्षेत्रभेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांसोबत कशा प्रकारे (प्रश्नोत्तरे, गप्पागोष्टी) चर्चा करणार हे ठरवतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** निरीक्षण, संप्रेषण, सामाजिक बांधीलकी, व्यावसायिक कौशल्ये, सहकार्य इ.

**आवश्यक साहित्य :** पाण्याची बाटली, डबा इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना परिसरातील किराणा दुकानांची नावे विचारतात.

२) परिसरातील किराणा दुकानाला भेट देण्यासाठी विद्यार्थ्यांना शिस्ती संदर्भात सूचना देतात. (उदा., एका रांगेत चला, स्वतःच्या वस्तू स्वतः सांभाळा इत्यादी.)

३) शिक्षक विद्यार्थ्यांना परिसरातील क्षेत्रभेटीवेळी पूर्वनियोजनात तयार केलेले प्रश्न विचारून माहिती घेण्यास सांगतात.

४) क्षेत्रभेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांना खालील स्वरूपाचे प्रश्न विचारून वर्गात विद्यार्थ्यांशी चर्चा करतात. उदा.,

**प्रश्न :** १) किराणा दुकानात तुम्ही काय काय पाहिले?

२) किराणा दुकानात यापूर्वी गेला होतात का?

३) दुकानात तुमच्या आवडीच्या कोणकोणत्या वस्तू होत्या?

४) दुकानात कोणकोणत्या वस्तूंवर छापील किंमत होती?

५) दुकानाला भेट देऊन तुम्हाला कोणते अनुभव आले. इत्यादी

## विद्यार्थी कृती :

१) विद्यार्थी परिसरातील भेट दिलेल्या किराणा दुकानाचे नाव सांगतात.

२) विद्यार्थी क्षेत्रभेटी दरम्यान शिक्षकांनी दिलेल्या सूचनेनुसार निरीक्षण करतात व आवश्यक माहिती संकलित करतात.

३) विद्यार्थी परिसरातील भेट दिलेल्या किराणा दुकानाची माहिती सादर करतात.

४) विद्यार्थी क्षेत्रभेटीनंतर होणाऱ्या चर्चेत सहभागी होतात.

अशा प्रकारे बाजार/गोठा/दूध डेअरी/बाग इत्यादी स्थळांना क्षेत्रभेट देता येईल.

## संदर्भ साहित्य :

१) https://youtube.com/watch?v=lqxa-GzNoL4&feature=shared

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ........................................................................................................

**उपक्रमाचे नाव : परिसर ओळख (किराणा दुकान भेट)** **कृतीचे नाव :** ..................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ..................................................................... **इयत्ता :** ..........................

**प्रश्न १ :** किराणा दुकानात तुम्ही काय काय पाहिले?

**उत्तर :** ........................................................................................................

**प्रश्न २ :** किराणा दुकानात यापूर्वी गेला होतात का?

**उत्तर :** ........................................................................................................

**प्रश्न ३ :** दुकानात तुमच्या आवडीच्या कोणकोणत्या वस्तू होत्या?

**उत्तर :** ........................................................................................................

**प्रश्न ४ :** दुकानात कोणकोणत्या वस्तूंवर छापील किंमत होती?

**उत्तर :** ........................................................................................................

**प्रश्न ५ :** दुकानाला भेट देऊन तुम्हाला कोणते अनुभव आले.

**उत्तर :** ........................................................................................................

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : परिसरातील शेताला भेट देणे (परिसर ओळख)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक परिसरातील शेतीबाबत माहिती गोळा करतात.
- शिक्षक परिसरात उपलब्ध शेतीला कुठे व केव्हा, कशी भेट द्यायची याचे नियोजन करतात. संबंधित व्यक्तींना व पालकांना याची पूर्वकल्पना देतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना शिस्तीचे पालन होण्यासाठी सूचना देतात. विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घ्यावी याची सूचना देतात. उदा. पाण्याची बाटली ठेवणे, रांगेत चालणे इत्यादी सूचना.
- शिक्षक विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटी दरम्यान कोणत्या बाबींची माहिती घ्यावी किंवा निरीक्षण करावे याबाबत सविस्तर पूर्वसूचना देतात. खालील प्रश्नांच्या आधारे माहिती संकलित करण्यास सांगतात.

  **प्रश्न :** १) शेत कोणाचे आहे?

  २) शेतात कोण काम करतात?

  ३) शेताला पाणी कोठून मिळते?

  ४) शेतात कोणकोणती पिके घेतात?

  ५) शेतीसाठी कोणकोणती अवजारे लागतात? इत्यादी
- क्षेत्रभेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांसोबत कशा प्रकारे (प्रश्नोत्तरे, गप्पागोष्टी) चर्चा करणार हे ठरवतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** निरीक्षण, संप्रेषण, सामाजिक बांधिलकी, व्यावसायिक कौशल्ये, सहकार्य इ.

**आवश्यक साहित्य :** पाण्याची बाटली, डबा इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना परिसरातील शेतीची माहिती विचारतात.

२) परिसरातील शेतीला भेट देण्यासाठी विद्यार्थ्यांना शिस्ती संदर्भातं सूचना देतात. (उदा., एका रांगेत चला, स्वतःच्या वस्तू स्वतः सांभाळा इत्यादी.)

३) शिक्षक विद्यार्थ्यांना परिसरातील क्षेत्रभेटीवेळी पूर्वनियोजनात तयार केलेले प्रश्न विचारून माहिती घेण्यास सांगतात.

४) क्षेत्रभेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांना खालील स्वरूपाची प्रश्न विचारून वर्गात विद्यार्थ्यांशी चर्चा करतात.

**प्रश्न :** १) शेतावर जाण्याचा रस्ता कसा होता?

२) शेतकऱ्याचा पोशाख कसा होता.

३) शेतात कोणकोणती पिके होती?

४) तेथे झाडे होती का? कोणकोणती झाडे होती?

५) शेतातील पिकांना पाणी कोठून देत होते?

६) शेतीला भेट देऊन तुम्हाला कसे वाटले, काय अनुभव आले. इत्यादी

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी परिसरातील शेतीची माहिती सांगतात.

२) विद्यार्थी क्षेत्रभेटी दरम्यान शिक्षकांनी दिलेल्या सूचनेनुसार निरीक्षण करतात व आवश्यक माहिती संकलित करतात.

३) विद्यार्थी परिसरातील भेट दिलेल्या ठिकाण/स्थळ याची माहिती सादर करतात.

४) विद्यार्थी क्षेत्रभेटीनंतर होणाऱ्या चर्चेत सहभागी होतात.

अशा प्रकारे बाजार/गोठा/दूध डेअरी/बाग इत्यादी स्थळांना क्षेत्रभेट देता येईल.

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................

**उपक्रमाचे नाव : परिसरातील शेताला भेट देणे.** **कृतीचे नाव :** ..............................

**विद्यार्थ्याचे नाव :** ....................................................... **इयत्ता :** ....................

**प्रश्न १ :** शेतावर जाण्याचा रस्ता कसा होता?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न २ :** शेतकऱ्याचा पोशाख कसा होता.

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ३ :** शेतात कोणकोणती पिके होती?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ४ :** तेथे झाडे होती का? कोणकोणती झाडे होती?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ५ :** शेतातील पिकांना पाणी कोठून देत होते?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ६ :** शेताला भेट देऊन तुम्हाला कसे वाटले, काय अनुभव आले.

**उत्तर :** ..........................................................................................

**उपक्रम क्रमांक : ३**

**उपक्रमाचे नाव : कुटुंबातील व्यक्तींची मुलाखत (आजी–आजोबा, आई–बाबा, ताई–दादा, काका–काकू, मामा–मामी)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांशी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांबाबत चर्चा करतात.
- पालकसभेत शिक्षक पालकांना या बाबतीत पूर्वकल्पना देतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना कुटुंबातील प्रिय/आवडणारी यशस्वी व्यक्तीची मुलाखत घेण्यासाठी निवड करण्यास सांगतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना मुलाखत कशी घ्यावी याबाबत सविस्तर सूचना देतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना मुलाखत घेताना खालील प्रकारचे प्रश्न विचारण्यास सांगतात.

  **प्रश्न :** १) तुमचे नाव काय आहे?

  २) तुमची जन्मतारीख काय आहे?

  ३) तुमचे वय किती आहे?

  ४) लहानपणी तुमचा आवडता खेळ कोणता होता.

  ५) तुमच्या लहानपणी काय काय खाऊ मिळायचा?

  ६) लहानपणी तुम्हाला शाळेला जायला आवडत होते का? तुमचे आवडते शिक्षक कोण होते?
- मुलाखतीनंतर शिक्षक विद्यार्थांसोबत चर्चा करण्यासाठी प्रश्न ठरवतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** निरीक्षण, संप्रेषण, अभिव्यक्ती, भाषिक क्षमता.

**आवश्यक साहित्य :** पेन, पेन्सिल इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक कुटुंबातील सदस्यांची नावे व त्यांचे विद्यार्थ्यांशी असलेले नाते विचारतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना कुटुंबातील कोणाची मुलाखत घेणार हे विचारतात.

३) शिक्षक मुलाखत घेताना पूर्वनियोजनात तयार केलेले प्रश्न विचारून माहिती घेण्यास सांगतात व ती माहिती वहीत लिहिण्यास सांगतात.

४) मुलाखतीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांना खालील प्रकारचे प्रश्न विचारतात व त्याबद्दल चर्चा करतात.

  **प्रश्न :** १) तुम्ही कोणाची मुलाखत घेतली त्यांचे नाव सांगा?

  २) त्यांचे तुमच्याबरोबर नाते काय आहे?

३) तुम्ही त्यांचीच मुलाखत का घेतली?

४) तुमच्या व त्यांच्या आवडीनिवडीत काय काय सारखे आहे?

५) त्यांच्या आवडीचा खेळ कोणता होता?

६) मुलाखत घेताना तुम्हाला कोणते अनुभव आले?

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी कुटुंबातील सदस्यांची नावे व त्यांच्याशी असलेले नाते सांगतात.

२) विद्यार्थी कुटुंबातील कोणाची मुलाखत घेणार हे सांगतात.

३) विद्यार्थी मुलाखत घेण्यापूर्वी पूर्वनियोजनात तयार केलेली प्रश्नावली लिहून घेतात.

४) विद्यार्थी मुलाखत घेऊन ती वहीत लिहून ठेवतात व त्याबाबत शिक्षकांबरोबर चर्चा करतात.

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................

**उपक्रमाचे नाव : आजोबांची मुलाखत** **कृतीचे नाव :** ..............................

**विद्यार्थ्याचे नाव :** ....................................................... **इयत्ता :** ....................

**प्रश्न १ :** तुमचे नाव काय आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न २ :** तुमचा वाढदिवस कधी असतो?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ३ :** तुमचे वय किती आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ४ :** लहानपणी तुमचा आवडता खेळ कोणता होता.

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ५ :** तुमच्या लहानपणी काय काय खाऊ मिळायचा?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ६ :** लहानपणी तुम्हाला शाळेला जायला आवडत होते का?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ७ :** तुमचे आवडते शिक्षक कोण होते?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ८ :** तुमचे आवडते शिक्षक कोण होते?

**उत्तर :** ..........................................................................................

# १३) सांविधानिक मूल्यांची रुजवणूक

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : वर्ग मंत्रिमंडळ स्थापना**

**उद्देश :**

१) निवडणूक प्रक्रियेची ओळख होणे.

२) निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणे.

३) वर्ग मंत्रिमंडळात सहभागी होऊन प्रत्यक्ष वर्ग प्रशासनात भाग घेणे.

**पूर्वनियोजित कृती :**

१) वाचन सराव घेणे.

२) ध्वनिप्रक्षेपक सुविधेचा वापर करून विद्यार्थ्यांचे सामूहिक अनुवाचन घेणे.

**विकसित होणारी कौशल्ये :** भारतीय संविधानाप्रति जागरूकता निर्माण होते.

**आवश्यक साहित्य :** ध्वनिप्रक्षेपक, पाठ्यपुस्तक.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेविषयी प्राथमिक माहिती सांगतात.

२) मंत्रिमंडळ व त्याची आवश्यकता याविषयी मुलांसोबत चर्चा करतात.

३) वर्ग मंत्रिमंडळाची स्थापना करून मुलांना निवडणूक प्रक्रिया व वर्ग प्रशासनाचा प्रत्यक्ष अनुभव देतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी वर्गाच्या निवडणूक प्रक्रियेत सहभागी होतात.

२) विद्यार्थी वर्ग मंत्रिमंडळात सहभागी होतात.

३) सोपवलेल्या जबाबदारीनुसार वर्गाचे कामकाज पाहतात.

## १४) विविध व्यवसायांचा परिचय आणि करिअरविषयक मार्गदर्शन

**उपक्रम क्रमांक : १**

**कृतीचे नाव : मी काय करतो/करते?**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विविध व्यवसाय करणाऱ्या कारागीरांच्या, व्यावसायिकांच्या कार्याची (प्लंबर, स्वच्छता कर्मचारी, मूर्तिकार, चित्रकार, शिल्पकार, दुकानदार, डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, वकील याप्रमाणे) माहिती गोळा करतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांच्या आवडत्या व्यवसायाबाबत पालक, मोठे बहिणभाऊ यांच्या मदतीने खालील घटकांबाबत माहिती गोळा करण्यास सांगतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना आवडणाऱ्या व्यावसायिकाची वेशभूषा करून येण्यास व त्याबाबत वरील घटकानुसार ५ मिनिटे सादरीकरण करायचे आहे याबाबत सांगतात.
- परिसरात उपलब्ध नसलेल्या (उदा., शहरी भागात शेतकरी) व्यावसायिकाच्या कार्याबाबत आंतरजालावरील उपलब्ध व्हिडिओ गोळा करून आवश्यकतेप्रमाणे विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी साहित्य (व्हिडिओ लिंक, प्रोजेक्टर इत्यादी आधीच उपलब्ध करून ठेवतात.)

१) तुम्हाला आवडणारा व्यवसाय कोणता?

२) हा व्यवसाय का आवडतो.

३) सादरीकरण करत असलेल्या व्यवसायाचे नाव.

४) तुमच्या परिसरात हा व्यावसायिक कोठे राहतो? (उदा., शाळेजवळ, घराजवळ)

५) व्यवसायाची वेळ.

६) व्यवसायासाठी वेगळा पोशाख लागतो का?

७) व्यवसायाच्या ठिकाणाला काही वेगळे नाव आहे का? (मोकळी जागा, दुकान, शेती, शाळा इत्यादी.)

८) व्यवसायासाठी काय साहित्य लागते.

९) व्यावसायिकांमुळे समाजात काय योगदान मिळते. (उदा., शेती केल्याने अन्नध्यान्य मिळते, डॉक्टरांमुळे रोगांवर उपचार होतात याप्रमाणे.)

१०) तुम्हाला मोठे होऊन कोणता व्यवसाय करायला आवडेल/कोण व्हायला आवडेल?

**विकसित होणारी कौशल्ये :** नवनिर्मिती, कल्पकता, प्रश्न, संभाषण, सादरीकरण.

**आवश्यक साहित्य :** शिक्षकांना व्हिडिओ दाखविण्यासाठी व्हिडिओ लिंक, प्रक्षेपक इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांच्या हजेरी क्रमांकाप्रमाणे त्यांनी पेहराव केलेल्या व्यावसायिकांचे सादरीकरण करण्यास सांगतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना नियोजनाप्रमाणे सादरीकरणासाठी काही मिनिटे देतात.

३) दिलेल्या घटकातील मुद्दा विद्यार्थी/विद्यार्थिनी विसरला/विसरली तर तेथे उर्वरित विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून घटकाबाबत माहिती देतात. (उदा., व्यावसायिक कोठे काम करतो.)

४) परिसरात उपलब्ध नसलेल्या (उदा., शहरी भागात शेतकरी) व्यावसायिकांच्या कार्याबाबत व्हिडिओ आवश्यकतेप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरच्या साहाय्याने दाखवतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांनी ठरवून दिलेल्या क्रमाप्रमाणे त्यांनी पेहराव केलेल्या व्यावसायिकांचे सादरीकरण करतात.

२) विद्यार्थी नियोजनाप्रमाणे ५ मिनिटे सादरीकरण करतात.

३) दिलेल्या घटकातील मुद्दा सादरीकरण करणारा एखादा विद्यार्थी/विद्यार्थिनी विसरला/विसरली तेथे उर्वरित विद्यार्थ्यांना प्रश्न विचारल्यावर त्याचे समुहात उत्तर देतात. (उदा., हा व्यावसायिक कोठे काम करतो? शेतात)

४) शिक्षकांनी परिसरात उपलब्ध नसलेल्या (उदा., शहरी भागात शेतकरी) या व्यावसायिकाच्या कार्याबाबत दाखवलेल्या व्हिडिओचे निरीक्षण करतात, प्रश्न विचारतात, समजून घेतात. (उदा., व्हिडिओतील शेती अवजाराला काय म्हणतात?)

**संदर्भ साहित्य :**

१) व्हिडिओ लिंक


2) https://youtu.be/Wm4R8d0d8kU?si=VrsUASIaOm2RU6rI

3) https://youtu.be/ckKQclquAXU?si=tdmN_hcPi9_xeWio

# १५) कथाकथन

**कथाकथनाचे महत्त्व :**

- कथाकथन आपल्या मेंदूला उत्तेजित करते.
- कथेतून केवळ माहिती घेतली जात नाही, तर भावनादेखील अनुभवता येतात.
- कथेतील शब्द कल्पनाविलासासाठी मदत करतात.
- शब्दसंग्रह वाढतो.
- संभाषणकौशल्य विकसित होते.
- नीतिमूल्ये, भावभावना यांची रुजवणूक होते.
- कथाकथन जीवनाबद्दल, स्वःतबद्दल व इतरांबद्दल सहज मूल्ये शिकवते.
- विविध लोकांबद्दल सकारात्मक दृष्टिकोन वाढीस लागतो.



**उपक्रम क्रमांक :** १

**कृतीचे नाव :** **चित्ररूप गोष्टींचे कथन (Picture Storytelling)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक भारतीय युक्तिकथा, परीकथा आणि पंचतंत्र मधील चित्रे गोळा करतात.
- दैनंदिन ग्रामीण/शहरी जीवनातील प्रसंगचित्रे गोळा करतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** श्रवण, संवाद निरीक्षण व तार्किक कौशल्ये.

**आवश्यक साहित्य :** भारतीय युक्तिकथा, परीकथा, पंचतंत्र याबाबतची पुस्तके चित्रपट्ट्या व शब्दपट्ट्या.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक पंचतंत्रमधील गोष्ट निवडतात.
उदा. कासव आणि बदक

२) या गोष्टीला सुयोग्य चित्रे गोळा करतात.
उदा.






३) शिक्षक सर्व चित्रे विद्यार्थ्यांना दाखवितात आणि कथाकथन करतात.

उदा. एका तळ्यात एक कासव व त्याचे दोन बदक मित्र राहत होते. बदक आणि कासव रोज गप्पागोष्टी करीत असत. एकदा दुष्काळ पडल्यामुळे तळे आटून गेले. सगळे पक्षी तो दुष्काळी भाग सोडून गेले. पण कासवाचे हाल होणार हे लक्ष्यात आल्यावर बदक खूप दुःखी होतात. शेवटी कासव बदकाला एक उपाय सुचवतो. मी एक काठी आणीन. ती मधोमध तोंडाने पकडीन. तुम्ही त्या काठीच्या दोन्ही टोकांना चोचीने घट्ट पकडा...

४) कथा सांगताना कथेतील प्रसंग व चित्रे यांची सांगड घालून कथा मनोरंजक पद्धतीने सादर करतात.

५) शिक्षक विद्यार्थ्यांना गोष्टीचे सादरीकरण करण्यास सांगतात.

(शिक्षकांनी उपलब्ध पुस्तकांचा वापर करावा.)

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी चित्रांचे निरीक्षण करतात.

२) तसेच कथा लक्षपूर्वक ऐकतात.

३) एकेक प्रसंग ऐकताना आणि पाहताना पुढे काय होईल याबाबत उत्सुक असतात.

४) विद्यार्थी चित्रांच्या साहाय्याने कथेचे सादरीकरण करतात.

**संदर्भ साहित्य :**

१) पंचतंत्रामधील गोष्टी

२) परीकथा

३) युक्तिकथा



# १६) वाचनसंस्कृती

**अवांतर वाचनाचे फायदे :**

- वाचनामुळे ज्ञानात भर पडते. जगाची माहिती होते.
- विचारशक्ती वाढते.
- चांगल्या गोष्टींची प्रेरणा मिळते.
- आपली प्रगती करता येते.
- मोकळा वेळ सत्कारणी लागतो.
- मनाला प्रसन्नता लाभते.
- वाचन संस्कृती
- समाजातील सर्व लोकांशी वागण्याची कला अवगत होते.
- मनोरंजन होते.
- माणसाला माणूस बनविते.
- विचार करायला शिकविते.
- मेंदू सक्रिय राहतो.
- मनाची एकाग्रता वाढवतो.
- मानसिक आरोग्य चांगले रहाते.
- कल्पनाशक्ती व सृजनशीलता वाढते.
- ताण कमी होतो.
- झोप शांत लागते.
- समानानुभूती वाढते.
- बौद्धिक क्षमता वाढते.
- चौकस वृत्ती वाढते.
- नवीन शिकण्याची आवड निर्माण होते.

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : सामाईक वाचन (Shared Reading)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक सामाईक वाचन करण्यासाठी वयानुरूप आवश्यक पुस्तकांची निवड करतात.
  उदा., ईसापनीतीमधील चित्रमय गोष्ट.
- शिक्षक निवडलेल्या गोष्टीची चित्रे गोळा करून ठेवतात. यासाठी शालेय स्तरावर उपलब्ध असलेली. ग्रंथालयातील पुस्तके अवांतर वाचनाची पुस्तके विशेषतः चित्ररूप गोष्टींची पुस्तके निवडतात.
- विविध योजनेअंतर्गत शाळेला मिळालेली चित्रमय गोष्टी माहितीची पुस्तके वापरतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** श्रवण, सूक्ष्म निरीक्षण, उच्चारण, आकलन व वाचनकौशल्य.

**आवश्यक साहित्य :** ग्रंथालयातील अवांतर वाचनाची पुस्तके, विशेषतः चित्ररूप गोष्टींची पुस्तके, मोठ्या आकाराची पुस्तके, शब्दपट्ट्या, वाक्यपट्ट्या, मासिके, साप्ताहिक, दिवाळी अंक, वर्तमानपत्रांमधील बालसाहित्य इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक स्वतः सिंह आणि उंदीर या गोष्टीचे वाचन करून दाखवितात आणि पाठोपाठ मुलांना वाचण्यास सांगतात.

२) वाचन संपल्यानंतर आशयावर आधारित तोंडी प्रश्न विचारतात.
उदा., (१) जंगलात कोण राहत होते? (२) सिंह कोठे झोपला होता?

३) शिक्षक गोष्टीतील प्रसंग, पात्र व त्याच्यातील संवाद यांवर आधारित प्रश्न विचारतात.
उदा. (१) उंदराने सिंहाला काय विनंती केली? (२) तुम्हाला या गोष्टीमधील कोणते पात्र आवडले?

४) शिक्षक विद्यार्थ्यांना चित्र दाखवून त्यावर आधारित प्रश्न विचारतात.
उदा. (१) या चित्रात काय दिसते? (२) या चित्रामध्ये सिंह कोठे अडकला आहे?
(अशा प्रकारे शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांनी निवडलेल्या गोष्टीवर आधारित प्रश्न विचारतात.)

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांसोबत वाचन करतात.

२) विद्यार्थी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात.
उदा. (१) सिंह, मंदिर (२) गुहेमध्ये, झाडाखाली

३) विचारलेल्या प्रश्नांची मुक्त उत्तरे देतात.
उदा. (१) मला सोड. मी तुला संकटकाळी मदत करेन. मला खावू नकोस. मला सोडून दे. मला माफ कर. माझ्यावर दया कर. (२) सिंह, उंदीर

४) विद्यार्थी चित्रांचे निरीक्षण करून उत्तरे देतात.
उदा. (१) झाडे, प्राणी, गवत, पक्षी. (२) जाळीमध्ये
(शिक्षक विद्यार्थ्यांची सर्व उत्तरे स्वीकारतात.)

**संदर्भ साहित्य :**

१) वाचनपेटीतील चित्रमय पुस्तके
२) National Book Trust (NBT) कडून मिळालेली पुस्तके
३) 'समग्र शिक्षा अभियान' अंतर्गत मिळालेली पुस्तके
४) 'निपुण भारत' अंतर्गत वाचन साहित्य
५) दात्यांकडून मिळालेले बालसाहित्य
६) Story Weaver - story weaver.org.in
७) Story Weaver Instagram - instagram.com/pbstoryweaver
८) Story Weaver Facebook - facebook.com/pbstoryweaver
९) Story Weaver Twitter - twitter.com/pbstoryweaver
10) Pratham Books - prathambooks.org



वाचनाने समृद्ध होत जाणारा कुठलाही माणूस जीवनाकडे अतिशय उमेदीने बघणारा असतो.

## १७) संगणकाची ओळख

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : माझा अद्भुत मित्र**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातून घरी, शेजारी प्रश्न विचारून संगणक कुठे पाहिला आहे? तो कसा दिसतो? त्यात कोणकोणते भाग असतात? संगणक कोणकोणती कामे करतो? याचे उत्तर विद्यार्थ्यांना मिळविण्यास सांगतील.
- शिक्षक शाळेतील संगणक/संगणक प्रतिकृती/संगणक प्रयोगशाळा/संगणकाचे भित्तिचित्र/चित्र जिथे असेल तिथे विद्यार्थ्यांना गटनिहाय नेण्याचे नियोजन करतात. शिक्षक संगणकाचे चित्र स्टिकर किंवा वर्तमानपत्रातून मिळविण्याचे नियोजन करतील.
- संगणकाचे विविध भाग किंवा चित्र दाखवून संगणकाचे कार्य समजण्यासाठी विद्यार्थ्यांना विचारण्यासाठीचे प्रश्न.

  १) संगणकाच्या भागाचे नाव काय आहे? उदा., मॉनिटर

  २) या भागाचे काम काय आहे? उदा., चित्र दाखवणे

  ३) संगणकाच्या या भागामुळे कोणते काम करता येते? उदा., चित्र पाहणे, चित्रपट पाहणे, पुस्तक वाचणे, गेम खेळणे (विद्यार्थ्यांना संगणकाच्या प्रत्येक भागासाठी भागाच्या नावानुसार योग्य बदल करून वरील तीन प्रश्न विचारावेत.)

  विद्यार्थ्यांना या भागांची नावे माहिती नसल्यास किंवा काही नावे माहिती नसल्यास शिक्षकांनी स्वतः सांगावे. यामध्ये विशेष करून

  १) मॉनिटर  २) कीबोर्ड  ३) साऊंड  ४) माऊस  ५) सीपीयू
- चर्चा – संगणक आपला मित्र होईल का? मित्राप्रमाणे नेहमी मदत करतो का? संगणक हा मानवाचा अद्भुत मित्र कसा काय होऊ शकतो हे स्पष्ट करतात. संगणक आपला अद्भुत मित्र कसा? तो कशी अद्भुत कामे करतो हे सांगतात.

  संगणकाच्या मदतीने केली जाणारी कामे –

  १) चित्र काढता येतात.  २) रंग देता येतो.

  ३) लिहिता (टाईप) येते.  ४) चित्रपट पाहता येतो.

  ५) गाणी ऐकता येतात.  ६) कविता ऐकता येतात.

७) अभ्यास करता येतो. ८) संदेश पाठविता येतो. इत्यादी

एवढी सगळी मदत करतो म्हणून हा मित्र अद्‌भुत आहे. त्याची कामे पाहून आपणास आश्चर्य वाटते.

- संगणकाच्या सर्व भागाचे स्टिक पपेट तयार करावे. संगणकाच्या भागाचे चित्र पेपरच्या स्टिक, स्ट्रॉ किंवा काडीवर चिकटवावे.

**विकसित होणारी कौशल्ये :** डिजिटल साक्षरता, निरीक्षण कौशल्य, सहयोग कौशल्य 'संगणकाची ओळख' मध्ये संगणकाच्या भागांची नावे व उपयोग सांगतात. संगणक आपला अद्‌भुत मित्र असण्याची कारणे समजतात.

**आवश्यक साहित्य :** संगणक, संगणक प्रतिकृती, संगणक व त्याच्या भागांची चित्रे

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना तुम्ही संगणक कोठे-कोठे पाहिला आहे? हे विचारतात त्याच वेळी गटानुसार आलेल्या उत्तरांचे लेखन फलकावर करतात. शिक्षक संगणक/चित्र/प्रतिकृती/चित्र/स्टिकर/भित्तिचित्र दाखवून हे काय आहे? याला आपण अजून कोणत्या नावाने ओळखतो? संगणकाचे भाग दाखवून नावे स्पष्ट करतात. संगणकाच्या मराठी, इंग्लिश नावाचा तोंडी सराव घेतात.

२) संगणकाचे विविध भाग किंवा चित्र दाखवून संगणकाचे कार्य समजण्यासाठी विद्यार्थ्यांना विचारण्यासाठी प्रश्न विचारतात. (खालील उत्तरे ही अपेक्षित उत्तरे आहेत यापेक्षा वेगळी उत्तरे पण येऊ शकतात.)

- साऊंडचा उपयोग काय?

  कविता, गाणी ऐकणे.

- कीबोर्डच्या मदतीने आपण काय-काय करू शकतो?

  लेखन (टायपिंग) करणे.

- माऊसचा उपयोग कशासाठी केला जातो?

  कर्सर इकडे तिकडे करणे, टायपिंगसाठी कर्सर योग्य ठिकाणी ठेवणे, विविध फाईल बंद चालू करण्यासाठी क्लिक करणे इत्यादी.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना गटनिहाय संगणकाची कामे कोणती हे विचारतात व ही कामे फलकावर लिहितात. फलकावर लिहिलेली ही कामे पाहिल्यावर लक्षात येते की संगणक सर्व ठिकाणी व दैनंदिन कामासाठी उपयुक्त आहे. असे आपल्याला सर्व ठिकाणी व भरपूर कामांसाठी घरी कोण मदत करते? मित्र उत्तर आल्यानंतर संगणकाशी तुलना करून 'संगणक आपला अद्‌भुत मित्र' कसा होऊ शकतो हे स्पष्ट करतात.

- चित्र काढता येतात.
- रंग देता येतो.
- लिहिता (टाईप) येते.
- चित्रपट पाहता येतो.
- गाणे ऐकता येतात.
- कविता ऐकता येतात.

• अभ्यास करता येतो.  • संदेश पाठविता येतो.

ही व अशी अनेक कामे करतो तरीही थकत नाही.

४) शिक्षक विद्यार्थ्यांना संगणकाच्या भागाचे स्टिक पपेट दाखवून त्याचे नाव व काय काम आहे ते सांगतात. विद्यार्थ्यांना गटनिहाय पुढे बोलावून त्यानंतर स्टिक पपेट देऊन संगणकाची कामे स्पष्ट करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी, संगणक कोठे पाहिला आहे याचे हे गटनिहाय उत्तरे देतात. विद्यार्थी संगणक/संगणकाचे चित्र/संगणकाची प्रतिकृती/स्टिकर/भित्तिचित्र पाहून हे काय आहे? याला आपण अजून कोणत्या नावाने ओळखतो. संगणकाच्या भागांची नावे सांगतात. संगणकाच्या मराठी, इंग्लिश नावांचा तोंडी सराव करतात.

२) संगणकाचे विविध भाग किंवा चित्र पाहून संगणकाचे कार्य समजण्यासाठी विद्यार्थी प्रश्नांची उत्तरे देतात. विद्यार्थी गटनिहाय, संगणकाची कामे कोणती हे सांगतात.

३) शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात.

४) चर्चेत भाग घेतात.

५) एखादा भाग समजला नाही तर त्याविषयी आवश्यक तेवढे प्रश्न विचारतात.

४) विद्यार्थी फलकावरील उत्तराचे वाचन करतात. शिक्षकांनी सांगितलेल्या भागावर चर्चा करतात. विद्यार्थी संगणक सर्व ठिकाणी व दैनंदिन कामासाठी उपयुक्त आहे. 'संगणक आपला अद्‌भुत मित्र' आहे हे चर्चेच्या माध्यमातून समजून घेतात.

४) विद्यार्थी शिक्षकांचे संगणकाचे स्टिक पपेटसहित सादरीकरण पाहतात. शिक्षकांनी सांगितल्यानुसार त्यात आपला सहभाग नोंदवितात. विद्यार्थी गटनिहाय स्टिक पपेटच्या साहाय्याने सादरीकरण करतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/VI3qjxsEbNg?si=FGJ43njmbQ2XUXmU

2) https://youtu.be/M2LJ4brIqCo?si=nnqdS-Qp5amWNPmS

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : संगणकावर पेंट टूलची ओळख**

**कृतीचे नाव : भौमितिक आकाराचे घर बनविणे**



**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक प्रयोगशाळेतील किंवा ऑफिसमधील डेस्कटॉप कॉम्प्युटर/लॅपटॉपचे नियोजन करतील.
- अधिक संगणक उपलब्ध झाल्यास ही कृती गटाने करण्याचे नियोजन करावे.
- एकच संगणक उपलब्ध असल्यास तो मोठ्या स्क्रिनला (प्रोजेक्टरला) जोडून घ्यावा.
- संगणक सुरू करून उपरोक्त कृती करताना अवलंबवायची प्रक्रिया.
  - ➢ संगणकाचे पॉवर बटण सुरू करावे.
  - ➢ डेस्कटॉप असल्यास सीपीयूचे बटण सुरू करावे./लॅपटॉप असल्यास लॅपटॉपचे बटण सुरू करावे.
  - ➢ विंडोज स्टार्ट बटणावर क्लिक करा.
  - ➢ शोध बारमध्ये 'Paint' टाईप करा.
  - ➢ Paint शब्दावर किंवा आयकॉनवर क्लिक करा किंवा एंटर दाबा.
  - ➢ पेंट ॲप उघडेल.
  - ➢ विविध भौमितिक आकारांच्या आधारे घर बनविण्याची कृती करावी.

**विकसित होणारी कौशल्ये :** निरीक्षण, सृजनकौशल्य, सहयोग कौशल्य, सादरीकरण कौशल्य, डिजिटल साक्षरता, संगणकावर पेंट टूलमध्ये विविध आकार बनवतात.

**आवश्यक साहित्य :** डेस्कटॉप कॉम्प्युटर/लॅपटॉप, प्रोजेक्टर

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना संगणक प्रयोगशाळेत दोन-तीन विद्यार्थ्यांचा एक गट याप्रमाणे गट करून बसवितात.

२) सर्व संगणक व्यवस्था करून ठेवतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना संगणक सुरू करण्यासाठी क्रम सांगून दिशादर्शन करतात.

४) केवळ एक संगणक असल्यास (तो मोठी स्क्रीन/प्रोजेक्टरला जोडतात.) शिक्षक अधूनमधून विद्यार्थी बदलून त्यांच्या मदतीने क्रिया करून घेतात.

५) शिक्षक गटनिहाय विद्यार्थ्यांना पेंट (Paint) सुरू करण्याचा पुढील क्रम प्रात्यक्षिक करून दाखवितात.

   १) विंडोज स्क्रीनवरील पेंट (Paint) प्रोग्राम आयकॉनवर क्लिक करणे.

   २) Enter बटन क्लिक करणे किंवा डबल क्लिक करणे. पेंट (Paint) प्रोग्राम स्क्रीनवर येणार.

६) विद्यार्थ्यांकडून पेंट (Paint) प्रोग्राम सुरू करण्याचे प्रात्यक्षिक करून घेतात.

७) शिक्षक विद्यार्थ्यांना गटनिहाय पेंट (Paint) प्रोग्राममध्ये विविध आकार करण्याचे पुढील क्रम प्रात्यक्षिक

करून दाखवितात. (पेंट प्रोग्राममध्ये विविध आकार तयार करता येतात. काही आकार रेडिमेड दिलेले असतात.) शिक्षक खालील विकल्पांचा उपयोग करतात.

- रीबनवर Shapes ग्रुपमध्ये विविध आकार दिसतात.
- ड्रॉइंग एरियामध्ये माऊसवरील डावे बटण दाबून ओढा/ड्रॅग करणे.
- आकारवर क्लिक करून ड्रॅग केल्यास आकार/साइज बदलणे.
- निवडलेल्या आकारात कलर डबा/फील ऑप्शन आकारात घेऊन रंग भरणे.
- यामध्ये कोणी बोलताना त्यांचा संवाद/वाक्यांसाठी कॉलआऊट (Callout) आकार शोधणे.
- एक कॉलआऊट (Callout) आकार क्लिक करून निवडणे.
- ड्रॉइंग एरियामध्ये माऊसवरील डावे बटन दाबून ओढा/ड्रॅग करणे.
- कॉलआऊट (Callout) आकारात क्लिक करून हवी ते टाइप करून वाक्य ॲड करणे.
- आकारात निवडलेल्या आकारात कलर डबा/फील ऑप्शन आकारात घेऊन रंग भरणे.

६) विद्यार्थ्यांकडून पेंटमधील आकार (Shape) करण्याचे प्रात्यक्षिक करून घेतात.


७) शिक्षक गटनिहाय विद्यार्थ्यांना आकार घेऊन रंग भरण्याच्या आवश्यक तिथे मार्गदर्शन करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे विद्यार्थी संगणक प्रयोगशाळेत दोन– तीन जणांचा एक गट याप्रमाणे बसतात.

२) विद्यार्थी, संगणक सुरू करण्यासाठी शिक्षकाचे दिशादर्शन ऐकून (शिक्षकांनी सांगितलेला क्रम) कृती करतात.

३) विद्यार्थी, गटनिहाय पेंट (Paint) ॲप्लिकेशन सुरू करण्याचा पुढील क्रम (प्रात्यक्षिक) पाहतात. विद्यार्थी पेंट (Paint) प्रोग्राम सुरू करण्याचे प्रात्यक्षिक करतात.




४) विद्यार्थी, गटनिहाय, पेंट (Paint) प्रोग्राममध्ये विविध आकार करण्याचे प्रात्यक्षिक पाहतात. रेडिमेड दिलेले आकार (Shapes) कसे वापरावेत हे समजून घेतात.

५) विद्यार्थी पेंट (Paint) मधील आकार (Shapes) करण्याचे प्रात्यक्षिक करतात.

६) गटनिहाय, विद्यार्थी, ॲप्लिकेशन मधून योग्य तो आकार घेऊन रंग भरण्यासाठी आवश्यक तिथे शिक्षकांचे मार्गदर्शन घेतात.

७) शिक्षक सांगतील व करून दाखवतील त्याप्रमाणे कृतींचे निरीक्षण करतात.

८) शिक्षकांनी वेळोवेळी संधी दिल्यानुसार प्रत्यक्ष कृतीत सहभाग घेतात.

९) कृतींचा सराव करतात.

**संदर्भ साहित्य :** https://youtu.be/vuWVTsMEFB4?si=25xDHe-GcDn_awVG

# १८) लिंग समभाव

**उपक्रम क्रमांक :** २

**उपक्रमाचे नाव : घरकामात मदत**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक शुक्रवारी शेवटच्या तासाला विद्यार्थ्यांना 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत आपण एक छानसा उपक्रम घेणार आहोत हे सांगतात.
- तुम्ही घरी जाऊन आपल्या भावंडांच्या मदतीने दादा/बाबा/आजोबा/ताई/आई/आजी यांच्या करावयाच्या कामांची माहिती करून घेण्यास सांगतात. विद्यार्थी घरी गेल्यानंतर कुटुंबीयांच्या मदतीने होणारी कामे कोणती? व आईची कामे कोणती हे शिक्षकांनी दिलेल्या सूचनेनुसार तोंडी यादी करतात.
- मुले कामाची वर्गवारी घेऊन वर्गात आल्यानंतर, शनिवारच्या पहिल्या तासालाच शिक्षक वर्गातील मुलांचे गट करून परस्परात चर्चा करावयास सांगतात. शिक्षकही चर्चेत सहभागी होतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** लिंगसमभाव, समानता मूल्यांची रुजवणूक, चिकित्सक पद्धतीने वर्गीकरण, गटअध्ययनाचे कौशल्य, संभाषण कौशल्य.

**आवश्यक साहित्य :** घरकामाची रंगवलेली चित्रे, ड्रॉइंग शीट, जलरंग (वॉटर कलर), पेन्सिल, खोडरबर, कार्डशिट इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) मुलांच्या चर्चेत प्रत्यक्ष शिक्षक सहभागी होऊन मुलांबरोबर चर्चा करतात.

२) प्रत्यक्ष मुलांकडून आलेल्या तोंडी यादीतील कामांची विभागणी करतात. त्यात घरात केली जाणारी कामे कोणती? यावर चर्चा करतात.

३) सर्व कामे श्रेष्ठ असतात. स्त्री–पुरुष असा कामात भेदभाव करू नये असे शिक्षक विद्यार्थ्यांना समजावतात. कामाची चित्रे यादी – धान्य निवडणे, भाजी निवडणे, पाणी भरणे भांडी घासणे, स्वयंपाक करणे, दुकानला जाणे, इस्त्री करणे, घरातील वडीलधाऱ्या आजारी व्यक्तीस औषधे देणे, झाडून काढणे, अंगण सारवणे इत्यादी.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी घरून येताना विविध कामांची यादी व त्यांची वर्गवारी याची आपापसात चर्चा करतात व शिक्षकांनी सांगितलेल्या कामांच्या यादीतील कामे कोणकोण करतात ते सांगतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/NKN4_e2RenA?si=9YR_4wmqHxgA56So

## स्तर २ : इयत्ता तिसरी ते पाचवी

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय (Theme) | उपक्रम | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | कृती व खेळांवर आधारित शिक्षण | छान माझा मुखवटा ७५ | ७५ |
| | | बिंदू जोडून पूर्ण करू आरशासारखी प्रतिमा. ७६ | ७६ |
| | | मातकाम : भातुकलची भांडी तयार करूया. ७७ | ७७ |
| | | कागदकाम (ओरिगामी/घडीकाम) ७८ | ७८ |
| २. | पर्यावरण संवर्धन | माझ्या पर्यावरणस्नेही सवयी या थीमवर आधारित पोस्टर मेकिंग स्पर्धा व चित्रकला स्पर्धा | ७९ |
| | | परिसर स्वच्छता उपक्रम | ८० |
| ३. | सामाजिक बांधीलकी | ज्येष्ठांशी संवाद | ८२ |
| ४. | व्यक्तिमत्त्व विकास (माझी वैशिष्ट्ये) | असा मी! असा मी! | ८५ |
| | | नकाशावरील माझे स्थान | ८७ |
| ५. | कृषीविषयक साक्षरता | माझी छोटीशी बाग/परसबाग उपक्रम | ९० |
| | | कृषी अवजारे ओळख उपक्रम | ९१ |
| ६. | वित्तीय व्यवस्थापन/आर्थिक साक्षरता | आनंद बाजार | ९३ |
| | | विद्यार्थी शालेय वस्तुभांडार | ९४ |
| | | माझ्या साठवलेल्या पैशांचे व्यवस्थापन | ९४ |
| ७. | आपत्ती व्यवस्थापनाची मूलतत्त्वे आणि व्यावहारिक कौशल्ये | नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती व्यवस्थापन मॉक ड्रिल | ९८ |
| ८. | २१ व्या शतकातील कौशल्ये | जुन्या वर्तमानपत्रातून अध्ययन | १०१ |
| ९. | समता | समजू शकत असाल तर समजून घ्या! | १०३ |
| १०. | क्षेत्रभेट व यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती | परिसर ओळख (पोस्ट ऑफिस क्षेत्रभेट) | १०४ |
| | | यशस्वी व्यक्तींची मुलाखत (पोस्टमन, लाईनमन, डॉक्टर, ग्रामसेवक, नगरसेवक, शेतकरी, सरकारी नोकरदार इत्यादी.) | १०७ |
| ११. | Mindfullness वर आधारित कलाविष्कार, स्थानिक कला व संस्कृतीचा परिचय | महाराष्ट्र गीत | ११० |
| | | रंगीत कागदामधून कोलाज काम करणे | १११ |
| | | ओरिगामी – नवीन वर्षाच्या शुभेच्छांसाठी सुंदर शुभेच्छा कार्ड तयार करणे. | ११२ |
| | | वहीच्या कोऱ्या कागदापासून पॉकेट डायरी तयार करणे. | ११३ |

| अ.क्र. | विषय (Theme) | उपक्रम | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १२. | पारंपरिक खेळ | आट्यापाट्या | ११४ |
| | | सूरपारंब्या | ११५ |
| १३. | सांविधानिक मूल्यांची रुजवणूक | ‘माझे संविधान माझा अभिमान’ भारतीय संविधान ‘उद्देशिका’ सामूहिक वाचन करणे. | ११७ |
| १४. | विविध व्यवसायांचा परिचय व मानसशास्त्रीय समुपदेशन | फायरलेस कुकिंग | ११८ |
| १५. | कथाकथन | विद्यार्थ्यांनी स्वतःच्या शब्दांत आवडती गोष्ट/कथा पुन्हा सांगणे. | १२० |
| १६. | वाचनसंस्कृती | नमुना सक्रिय वाचन | १२२ |
| १७. | संगणकाची ओळख | चला संगणक हार्डवेअरची ओळख करून घेऊ. | १२३ |
| | | Google translate चा वापर करू व इंग्रजी शिकू. | १२७ |
| १८. | जाणून घेऊया आपल्या परिसराचा इतिहास | आपल्या गावातील किंवा परिसरातील होऊन गेलेले स्वातंत्र्यसैनिक व समाजसुधारक यांच्याविषयी जाणून घेणे. | १३० |
| | | सार्वजनिक वाचनालयास भेट | १३२ |
| | | परिसरातील प्रार्थनास्थळांचा इतिहास जाणून घेणे | १३३ |


✦ ✦ ✦

# १) कृती व खेळांवर आधारित शिक्षण

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : छान माझा मुखवटा**

**पूर्वनियोजित कृती :**

- विद्यार्थ्यांना विविध प्राणी, पशु–पक्षी, कार्टून्स यांचे मुखवटे तयार करण्याविषयी कल्पना देतात.
- कार्डशीट कागद, डिंक, स्केचपेन, दोरा, सजावट साहित्य इत्यादी वस्तू सोबत आणण्याविषयी सूचना देतात.
- सादरीकरणासाठी संकल्पना ठरवून ठेवतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** सर्जनशीलता, कलात्मक कौशल्याचा विकास, संवादकौशल्याचा विकास, संघभावनेचा विकास

**आवश्यक साहित्य :** कार्डशीट कागद, डिंक, स्केचपेन, दोरा, सजावट साहित्य इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे मुखवटे दाखवतात. उदा., लाकूड, कागद, रबर, कागदी प्लेट्स इत्यादींपासून तयार केलेले मुखवटे.

२) विद्यार्थ्यांना कार्डशीटपासून मुखवटा तयार करताना कागदावर रेखाटन, रंगकाम, बाह्यरेषा हाताने कापणे, दोरा बांधणे या टप्प्यांसह कृती पूर्ण करून दाखवतात.

३) विद्यार्थ्यांना मुखवटा बनविण्यासाठी प्रोत्साहन देतात. आवश्यक तेथे मदत करतात.

४) शिक्षक स्वतः मुखवटा चेहऱ्यावर परिधान करून संवाद म्हणतात.

५) विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेला मुखवटा चेहऱ्यावर लावायला सांगतात. पात्रानुसार आवाज काढून वैयक्तिक सादरीकरण करायला सांगतात, त्या पात्राची गुणवैशिष्ट्ये सांगण्यास प्रेरित करतात.

६) त्यांनतर काही विद्यार्थ्यांना गटाने मुखवट्यासह छोटेछोटे संवाद सादर करायला सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या प्रात्यक्षिकाचे निरीक्षण करतात.

२) शिक्षकांच्या सूचनेनुसार त्यांचा आवडता प्राणी, पक्षी, कार्टून यांचे मुखवटे तयार करतात.

३) रेखाटन, रंगकाम, बाह्यरेषा कापणे, दोरा बांधणे या टप्प्याने कृती करतात.

४) तयार केलेला मुखवटा चेहऱ्यावर लावून त्यानुसार प्राणी, पक्षी, कार्टून इत्यादींचा आवाज काढतात.

५) विद्यार्थी समोर येऊन वैयक्तिकरीत्या मुखवट्यांसह छोटेछोटे संवाद सादर करतात.

**संदर्भ साहित्य :**

- https://youtu.be/s3hgr97Tkj8?si=VA61WMcZOIWqv-em
- https://youtu.be/msAzhhDJJ7s?si=vBoVTWmjgCuUanuU

---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : बिंदू जोडून पूर्ण करू आरशासारखी प्रतिमा.**

**पूर्वनियोजित कृती :**

- मुलांना वही, २ पेन आणण्यासाठी सूचना देतात.
- मुलांची बैठक आणि फळा-खडूची व्यवस्था करतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** कारककौशल्ये व एकाच वेळी दोन्ही हातांनी कामे करण्याची कौशल्ये.

**आवश्यक साहित्य :** वही, २ पेन, खडू, फळा, आसनव्यवस्था.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक फळ्यावर चार बिंदूंच्या चार ओळी काढतात. विद्यार्थ्यांना अशा प्रकारे वहीवर चार टिंबांच्या चार ओळी काढायला सांगतात. दोन्ही हातात खडू घेऊन, हात न उचलता दोन दोन बिंदू आडवे, उभे असे क्रमाने जोडतात. पुन्हा हीच कृती वेगाने करून दाखवतात. नंतर विद्यार्थ्यांना दोन्ही हाताचा एकदाच वापर करून रेषा काढून बिंदू क्रमाने जोडायला सांगतात. पुन्हा हीच कृती वेगाने करायला सांगतात.

२) शिक्षक फळ्यावर खडूने दोन्ही हातांचा वापर करून बाहुलीचे चित्र काढून दाखवतात. विद्यार्थ्यांना कृतीचे निरीक्षण करण्याच्या सूचना देतात. वहीवर आवडीप्रमाणे दोन्ही हाताने बाहुलीचे रेखाटन करायला प्रोत्साहित करतात. हीच कृती पुन्हा वेगाने करून घेतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी वहीवर चार बाय चार चे बिंदू काढतील आणि शिक्षकांच्या सूचनेप्रमाणे दोन्ही हातांचा एकदाच वापर करून सुरुवातीचे दोन बिंदू जोडून रेष क्रमांक एक काढतील तसेच नंतर रेष दोन, तीन, चार, पाच, सहा, सात अशा प्रकारे बिंदू जोडून आरशातील प्रतिमा तयार करतात.

२) विद्यार्थी दोन्ही हातात पेन धरून वहीवर बाहुली अथवा आवडीचे चित्र रेखाटतात. तीच कृती वेगाने करतात.

**संदर्भ साहित्य :**

- https://youtu.be.com/shorts/4QRci06MNM0?si=67mxVefleVcYL7B

**उपक्रम क्रमांक : ३**

**उपक्रमाचे नाव : मातकाम : भातुकलची भांडी तयार करूया.**

**पूर्वनियोजित कृती :**

- माती चाळून भिजवतात, विद्यार्थ्यांना सोबत हात पुसण्यासाठी कापड, वस्तू तयार करताना आधार म्हणून पुठ्ठ्याचा तुकडा, पाणी घेण्यासाठी छोटे भांडे आणायला सांगतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** सर्जनशीलता, कारककौशल्ये, सौंदर्यदृष्टी

**आवश्यक साहित्य :** ओली माती, पाण्यासाठी भांडे, जुने कापड, पुठ्ठ्याचा तुकडा.

**शिक्षक कृती :**

१) विद्यार्थ्यांना रांगेत अंतर ठेवून बसवतात.

२) अगोदरच्या दिवशी भिजवून ठेवलेल्या मातीच्या गोळ्यामधून माती घेऊन १५ ते २० रोली तयार करतात. त्यांना एकावर एक रचून हंड्याचा आकार तयार करतात. पाण्याचा वापर करून आकाराला गुळगुळीतपणा आणतात.

३) मातीपासून तवा, कढई, पोळपाट, तांब्या असे आकार तयार करतात.

४) आकार तयार करताना मातीचा वापर, आकार तयार करताना द्यायचा दाब, प्रमाण, वस्तू सुकवण्याची पद्धत याविषयी माहिती देतात.

५) विद्यार्थ्यांना मातीचा गोळा वाटप करून त्यांच्या आवडीप्रमाणे भातुकलीची भांडी तयार करण्यासाठी प्रोत्साहित करतात. आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मदत करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या मातीपासून विविध आकार तयार करण्याच्या कृतीचे निरीक्षण करतात.

२) ओल्या मातीपासून रोली, पोली, गोली या आकारापासून आवडणारी भातुकलीची भांडी तयार करतात.

३) पाण्याचा वापर करून भांड्यांना गुळगुळीतपणा आणतात.

४) पुठ्ठ्याच्या तुकड्यावर तयार झालेली भांडी सुकायला ठेवतात.

५) जुन्या कापडाच्या तुकड्याने हात, भांडे, जागा स्वच्छ करतात.

**संदर्भ साहित्य :**

- https://youtu.be/k_Ha8JGGpEE

**उपक्रम क्रमांक : ४**

**उपक्रमाचे नाव : कागदकाम (ओरिगामी/घडीकाम)**

**पूर्वनियोजित कृती :**

- सोबत घोटीव कागद/पातळ रंगीत कागद आणण्याविषयी सूचना देतात. घड्यांचे प्रकार दर्शविणारा व्हिडिओ तयार ठेवतात.
- कागदाला घड्या घालून मासा, बेडूक, फुलपाखरू, कुत्र्याचा चेहरा, ससा, फूल इत्यादी आकार तयार करण्याची कृती पाहून ठेवतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** नवनिर्मिती, कल्पकता, हस्तकौशल्य, एकाग्रता

**आवश्यक साहित्य :** घोटीव कागद/कार्डशीट पेपर, मोजपट्टी, घड्यांचे प्रकार दर्शविणारा व्हिडिओ इ.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षकांनी घोटीव कागद/कार्डशीट पेपरच्या साहाय्याने मासा, होडी, बेडूक, फुलपाखरू, कुत्रा, कुत्र्याचा चेहरा, ससा, विमान यापैकी काही वस्तू बनविण्याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवतात.

२) विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे कागदकाम/घडीकाम करण्याची संधी देतात.

३) विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरवतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांचे कागदी वस्तू बनविण्याचे प्रात्याक्षिक पाहतात.

२) शिक्षकांच्या सूचनेनुसार व प्रात्यक्षिकाप्रमाणे विद्यार्थ्यांनी कागदकाम/घडीकाम करतात. सूचनेनुसार कागद कामातून आवडती वस्तू तयार करतात.

३) शिक्षकांच्या सूचनेनुसार प्रदर्शन वस्तू मांडतात व इतर विद्यार्थ्यांच्या वस्तूदेखील निरीक्षण करतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/C9-S27KeVvo?feature=shared

2) https://www.youtube.com/live/HUi_t4kLoas?feature=shared

3) https://youtu.be/10xC7B4w3FQ?si=T5dgfSnWexuDBzj9

## २) पर्यावरण संवर्धन

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : माझ्या पर्यावरणस्नेही सवयी या थीमवर आधारित पोस्टर मेकिंग स्पर्धा व चित्रकला स्पर्धा.**

**पूर्वनियोजित कृती :**

- इयत्ता तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणस्नेही सवयी या विषयावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन करणे. या उपक्रमांतर्गत शिक्षक पुढील कोणत्याही एका थीमवर पोस्टर मेकिंग स्पर्धा व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करतात.

  १) पाणी बचत

  २) ऊर्जा/वीज बचत.

  ३) स्वच्छ आणि सुंदर शाळा/घर.

  ४) कचरा व्यवस्थापन इत्यादी.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** सर्जनशीलता, निरीक्षण, पर्यावरण संरक्षण व संवर्धन, जाणीव-जागृती, निसर्गप्रेम, वैज्ञानिक दृष्टिकोन.

**आवश्यक साहित्य :** विविध पोस्टर मेकिंग/चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यासाठी लागणारे साहित्य आणि प्रदर्शन मांडणी करण्यासाठी शाळेत उपलब्ध असणारे साहित्य.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक इयत्ता तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना 'माझ्या पर्यावरणस्नेही सवयी' या विषयावर आधारित शाळेत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांविषयी सविस्तर सूचना देतात.

२) या सूचनांमध्ये स्पर्धेचे निकष, कालावधी आणि नियोजन याविषयी माहिती देतात.

२.१) स्पर्धेकरिता पुढील विषय असतील.

- पाणी बचत
- ऊर्जा/वीज बचत
- स्वच्छ व सुंदर शाळा/घर.
- कचरा व्यवस्थापन

२.२) या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी घरी पोस्टर/चित्र तयार करावे.

२.३) या स्पर्धेसाठी तयारीसाठी २ आठवड्यांचा वेळ असेल.

२.४) तयार पोस्टर संदर्भात २ मिनिट सादरीकरण करणे.

३) शिक्षक स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना कालावधी देऊन प्रदर्शन मांडणीच्या एका शनिवारी विद्यार्थ्यांनी तयार शिक्षक स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना कालावधी देऊन प्रदर्शन मांडणीच्या एका शनिवारी विद्यार्थ्यांनी तयार केलेले पोस्टर आणि चित्रे यांचे संकलन करून प्रदर्शन मांडणी करतात.

४) विद्यार्थ्यांना पोस्टर आणि काढलेल्या चित्रांविषयी थोडक्यात सादरीकरण करण्याची संधी देतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी चित्रकला स्पर्धा व पोस्टर मेकिंग सादरीकरण स्पर्धांमध्ये सहभागी होतात.

२) विद्यार्थी पर्यावरणस्नेही सवयींविषयी आपल्या चित्रातून किंवा पोस्टरमधून अभिव्यक्त होतात.

**संदर्भ साहित्य :**

१) इंटरनेट, माहिती पुस्तिका, वतर्मानपत्रातील कात्रणे इत्यादी.

---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : परिसर स्वच्छता उपक्रम**

**पूर्वनियोजित कृती :**

- इयत्ता तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळेमध्ये 'परिसर स्वच्छता उपक्रम' आयोजित करण्यासाठी विद्यार्थ्यांचे गट करणे, शालेय मैदान व आजूबाजूचा परिसर स्वच्छ करणे, तसेच प्लॅस्टिक व ई–कचरा वेगळा करणे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** श्रमप्रतिष्ठा, पर्यावरण संरक्षण व संवर्धन जाणीव जागृती इत्यादी.

**आवश्यक साहित्य :** परिसर स्वच्छतेसाठी आवश्यक झाडू, खराटे, कचरापेटी (डस्टबिन) इत्यादी साहित्य.

**शिक्षक कृती :**

**अ) परिसर स्वच्छताबाबत उद्बोधन :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना परिसर स्वच्छता या विषयावर आधारित माहिती देऊन परिसर स्वच्छतेचे महत्त्व पटवून देतात.

२) स्वच्छ व सुंदर शालेय परिसर म्हणजे काय, शालेय परिसर स्वच्छ ठेवल्याने होणारे फायदे व स्वच्छ परिसर ठेवण्यामागील विद्यार्थ्यांची भूमिका इत्यादी यांबाबत शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

**ब) परिसर स्वच्छता**

१) शिक्षक विद्यार्थ्यांचे गट करून 'परिसर स्वच्छता उपक्रम' राबवण्यासंबंधी सूचना देतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांचे ५–७ जणांचा मिळून असा गट करतात व त्यांना परिसरातील कचरा उचलणे, ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा करणे, परिसरातील पाला–पाचोळा एकत्र करून शालेय परिसर स्वच्छ करणे इत्यादीबाबत सर्व विद्यार्थ्यांना सूचना देतात.

३) गटानुसार विद्यार्थ्यांना स्वच्छता करण्यासाठी झाडू, डस्टबिन इत्यादीचे वाटप करतात.

४) विद्यार्थ्यांना गटनिहाय काम करत असताना शालेय परिसराची विविध ठिकाणे उदा. वर्गखोल्या क्रीडांगण, ग्रंथालय इत्यादी वाटप करतात.

५) दिलेल्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांना परिसर स्वच्छता करण्यास वेळ देऊन परिसराची स्वच्छता करून घेतात.

### क) परिसर सुशोभिकरण

- शिक्षक विद्यार्थ्यांना 'परिसर स्वच्छता' या उपक्रमांतर्गत परिसर सुशोभिकरणाकरिता गटनिहाय काम करण्यास सांगतात.

## विद्यार्थी कृती :

१) विद्यार्थी परिसर स्वच्छता उपक्रमात सहभागी होतात.

२) विद्यार्थी परिसर स्वच्छतेचे महत्त्व सांगतात व परिसर स्वच्छता उपक्रमात आलेल्या अनुभवांचे सादरीकरण करतात.

## संदर्भ साहित्य :

१) इंटरनेट, पर्यावरण स्वच्छतेसंदर्भात माहिती पुस्तिका.

या शिवाय शाळेमध्ये परिसर स्वच्छता उपक्रमांतर्गत खालील कृतींचा समावेश शिक्षक करू शकतात.

१) शालेय परिसरातील फेकून द्यावयाच्या प्लॅस्टिकच्या वस्तूंचे संकलन करून टाकाऊपासून टिकाऊ वस्तूंची निर्मिती करणे व प्रदर्शन भरविणे.

२) वनस्पतींचा पालापाचोळा, फुले, पाने, दगड इत्यादींचे संकलन व त्यापासून रंगकाम, चित्र/कलाकृती निर्मिती करणे.

३) 'स्वच्छ शाळा आणि सुंदर शाळा' अंतर्गत शालेय परिसर सुशोभिकरण करणे.

४) कचरापेटी रंगरंगोटी करणे.

५) स्वच्छतेसंदर्भात घोषवाक्ये तयार करून शालेय परिसरात लावणे.

६) स्वच्छता मॉनिटर नेमून वर्गाची व शालेय परिसराची स्वच्छता करण्यास प्रोत्साहित करणे आणि वर्षाच्या शेवटी 'बेस्ट स्वच्छता मॉनिटर' म्हणून एका विद्यार्थ्याला सन्मानित करणे.

## ३) सामाजिक बांधीलकी

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **ज्येष्ठांशी संवाद**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांच्या मदतीने परिसरातील/गावातील/तालुक्यातील/जिल्ह्यातील विविध वृद्धाश्रमे/जेष्ठ नागरिक संघ याबाबत माहिती गोळा करतात.
- शिक्षक यादी केलेल्या वृद्धाश्रमांपैकी/जेष्ठ नागरिक संघातील कोणत्या ठिकाणास भेट द्यायची आहे किंवा वृद्धाश्रमातील/जेष्ठ नागरिक संघातील कोणत्या ज्येष्ठ नागरिकांना शाळेत भेटीसाठी बोलवायचे यासंदर्भात नियोजन करतात. संबंधित ज्येष्ठ नागरिकांना व विद्यार्थ्यांच्या पालकांना याबाबत पूर्वकल्पना देतात. वृद्धाश्रमातील/जेष्ठ नागरिक संघातील जेष्ठ व्यक्तींच्या प्रवासासाठी अथवा वृद्धाश्रमात/जेष्ठ नागरिक संघात जाण्यासाठी वाहनाची व्यवस्था करतात व उपक्रमाचा दिवस व वेळ निश्चित करतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांच्या साहाय्याने जेष्ठ नागरिकांच्या भेटीसाठी आवश्यक साहित्याची यादी करतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांशी ज्येष्ठ नागरिकांच्या भेटीदरम्यान कोणत्या बाबींची माहिती, माहितीचे निरीक्षण व त्यांना कोणते प्रश्न विचारावे याबाबत चर्चा करतात. चर्चेतून विद्यार्थ्यांच्या मदतीने जेष्ठ नागरिकांशी साधावयाच्या संवादाची प्रश्नावली तयार करून घेतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, संप्रेषण, सहकार्य, सामाजिक बांधीलकी, संवेदनशीलता

**आवश्यक साहित्य :** प्रश्नावली, पेन इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना परिसरातील/ गावातील/तालुक्यातील/जिल्ह्यातील वृद्धाश्रमांची/जेष्ठ नागरिक संघाची माहिती देतात.

२) शिक्षक भेटीसाठी ठरवलेल्या वृद्धाश्रमामध्ये जेष्ठ नागरिक संघातील शाळेत बोलविलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी कसे वागावे याबाबत सूचना देतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांच्या भेटीसाठी घेऊन जातात. किंवा ज्येष्ठ नागरिकांना शाळेत बोलावतात.

४) शिक्षक विद्यार्थ्यांना चर्चेतून तयार केलेल्या प्रश्नावलीच्या साहाय्याने जेष्ठ नागरिकांविषयी माहिती घेण्यास सांगतात.

५) शिक्षक ज्येष्ठ नागरिकांच्या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करतात व आवश्यकतेनुसार मदत करतात.

६) भेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून चर्चा (प्रश्नोत्तरे, गप्पागोष्टी) करतात.

प्रश्न : १) ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधताना कसे वाटले? त्याचे अनुभव ऐकताना तुम्हांला काय वाटले? त्यांच्याशी संवाद साधल्यानंतर तुम्हाला काय शिकायला मिळाले?

२) ज्येष्ठ नागरिकांसाठी तुम्हांला काय करायला आवडेल?

३) ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधल्यानंतर तुम्हांला कोणती प्रेरणा मिळाली? तुमच्या घरातील वृद्धांच्या भावना तुम्हाला समजल्या का? इत्यादी

### विद्यार्थी कृती :

१) विद्यार्थी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांच्या भेटीदरम्यान अथवा शाळेत बोलविल्यानंतर शिक्षकांनी दिलेल्या सूचनेनुसार निरीक्षण करतात.

२) विद्यार्थी प्रश्नावलीच्या साहाय्याने आवश्यक माहिती संकलित करतात.

३) विद्यार्थी वृद्धाश्रमास भेट देताना सुरक्षेचे नियम पाळून ज्येष्ठ नागरिकांशी भेट व संवाद पूर्ण करतात.

४) विद्यार्थी या भेटीनंतर होणाऱ्या चर्चेत सहभागी होतात.

५) विद्यार्थी ज्येष्ठ नागरिकांच्या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना जाणवलेल्या संवेदनांबद्दल अभिव्यक्त होतात.

### संदर्भ साहित्य :

१) 'नटसम्राट' नाटकातील काही संवाद

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................

**उपक्रमाचे नाव : ज्येष्ठांशी संवाद**

**कृतीचे नाव :** ......................................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ...................................................... **इयत्ता :** ....................

**प्रश्न १ :** तुमचे नाव काय आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न २ :** तुमचा जन्म कोणत्या तालुक्यात, जिल्ह्यात झाला आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ३ :** तुमचे वय काय आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ४ :** तुमचे शिक्षण किती झाले आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ५ :** तुमचे शिक्षण किती झाले आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ६ :** तुमचे शिक्षण किती झाले आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ७ :** तुमचे शिक्षण किती झाले आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ८ :** तुम्हाला तुमचा वेळ कुठे घालवायला आवडतो?

**उत्तर :** ..........................................................................................

## ४) व्यक्तिमत्त्व विकास

## माझी वैशिष्ट्ये

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **असा मी! असा मी!**

**पूर्वनियोजित कृती :**

- विद्यार्थ्यांना स्वतःची संचिका तयार करण्यासाठी आवश्यक मुद्द्यांची माहिती देतात. त्या मुद्द्यांसंदर्भात घरात आई, वडील, मोठी भावंडे यांच्यासोबत चर्चा करण्यास सांगतात. सदर बाबींची मुद्द्यांची नोंद संचिकेत करून घेण्यास सांगतात.
- विद्यार्थ्यांकडून माहिती गोळा करण्यासाठी मुद्द्यांची यादी करतात.

  १) माझे वजन  २) माझी उंची  ३) माझी जन्मतारीख  ४) माझा संपर्क क्रमांक

  ५) माझे छंद  ६) माझी आवड  ७) माझी नावड इत्यादी.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** संभाषण, शारीरिक विकास, बौद्धिक विकास.

**आवश्यक साहित्य :** वजनकाटा, उंची मोजण्याचे साधन इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) विद्यार्थ्यांना गटात परस्परांच्या आवडी-निवडी, छंद, माहिती, कुटुंब यांविषयी मुक्त चर्चा करण्यास सांगतात. उदा., पालकांचा व्यवसाय, आई काय करते? घरातील सदस्य संख्या?

२) ज्या विद्यार्थ्यांनी माहिती लिहून आणलेली आहे. त्यांची माहिती वाचतात, खात्री करतात. त्यांची संचिका तयार करतात. ज्यांनी माहिती आणलेली नाही त्या विद्यार्थ्यांची वजन, उंची प्रत्यक्ष मोजतात.

३) त्यानंतर, प्रत्येक गटातून दोन विद्यार्थी समोर बोलवून प्रथम स्वतःची ओळख करून देण्यास सांगतात. त्यामध्ये विद्यार्थी स्वतःची ओळख, आवडते छंद, आवड-निवड याविषयी व्यक्त होतात.

४) त्यानंतर विद्यार्थी त्यांच्या सहभागी मित्राचीदेखील ओळख करून देतात. अशा प्रकारे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना जोडीजोडीने पुढे बोलावून अधिकाधिक व्यक्त कशा प्रकारे होतील यासाठी शिक्षक प्रोत्साहित करतील व वर्गातील इतर विद्यार्थी तसेच आवड-निवड अथवा छंद या बाबींवर चर्चा करून सदर बाबी SWOC (Strength, Weakness, Opportunities, Challenges) यानुसार कसे वर्गीकरण करता येईल याविषयी मुक्तपणे विद्यार्थ्यांसोबत संवाद साधतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी उपरोक्त मुद्द्यांच्या अनुषंगाने वैयक्तिक, कुटुंबातील, सदस्यांशी चर्चा करून माहितीची नोंद संचिकेत करतात. तसेच वर्गामध्येही आपल्या वर्गमित्राशी चर्चेमध्ये सहभागी होतात.

२) विद्यार्थी त्यांची संचिका तयार करतात. योग्य ठिकाणी शिक्षकांची मदत घेतात. सदर संचिकेचे जतन करून ठेवतात.

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................

**उपक्रमाचे नाव : असा मी ! असा मी!**

**कृतीचे नाव :** .......................................................

**विद्यार्थ्यांचे नाव :** ....................................................... **इयत्ता :** ....................

**प्रश्न १ :** माझे वजन

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न २ :** माझी उंची

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ३ :** माझी उंची

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ४ :** माझी उंची

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ५ :** माझे छंद

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ६ :** माझी आवड

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ७ :** माझी नावड

**उत्तर :** ..........................................................................................

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : नकाशावरील माझे स्थान**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना आपण कोठे राहतो याबद्‌दल सविस्तर मार्गदर्शन करतात. पत्ता लिहिण्यासाठी खालीलप्रमाणे छापील मजकुरासह A4 कागद तयार करतात.

जसे : स्वतःचे नाव : ..........................................................................................

वडिलांचे नाव : ..........................................................................................

घराचा पत्ता : ..........................................................................................

..........................................................................................

घर क्रमांक : ..........................................................................................

रस्ता : ..........................................................................................

वार्ड क्र. : ..........................................................................................

गाव/शहर : ............................., ता. : ........................., जि. .........................

राज्य : ........................., देश : ......................., पिन कोड : .........................

पत्ता लिहिण्यासाठी लागणारी माहिती जसे : गाव/शहर, जिल्हा, राज्य, देश याबद्‌दल माहिती देतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, संभाषण, बौद्‌धिक विकास, तंत्रज्ञान कौशल्ये

**आवश्यक साहित्य :** पत्ता लिहिण्यासाठी खालीलप्रमाणे छापील मजकुरासह A4 कागद (प्रत्येक विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र). तालुक्याचा, जिल्ह्याचा नकाशा (शाळेनुसार), महाराष्ट्र राज्याचा व भारत देशाचा नकाशा, पृथ्वीगोल, मोबाईल किंवा संगणकावर Map App असलेला (Mapples/Google).

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना पत्ता कसा लिहावा हे समजावून सांगतात. पत्ता लिहिण्यासाठी खालीलप्रमाणे छापील मजकुरासह A4 कागद प्रत्येक विद्यार्थ्याला देतात. जसे :

स्वतःचे नाव : ..........................................................................................

वडिलांचे नाव : ..........................................................................................

घरचा पत्ता : ..........................................................................................

..........................................................................................

घर क्रमांक : ..........................................................................................

रस्ता : ..........................................................................................

वार्ड क्र. : ..........................................................................................

गाव/शहर : ..............................., ता. : ............................, जि. ..........................,

राज्य : ........................., देश : ........................., पिन कोड : ................................

२) शिक्षक विद्यार्थ्यांना आपले गाव/शहर नकाशावर शोधण्यास सांगतात.

३) शिक्षक मोबाइल किंवा संगणकावर नकाशा दाखविणारा ॲप ओपन करून त्यावर शाळेचा पत्ता शोधून शाळेचे स्थान जिल्ह्यात, राज्यात व देशात (Zoom in, Zoom out) करून दाखवितात.

### विद्यार्थी कृती :

१) विद्यार्थी दिलेल्या कागदानुसार छापील मजकुरावर आपल्या गाव/शहराचे स्थान आपला पूर्ण पत्ता लिहितात. जसे :

स्वतःचे नाव : ..........................................................................................

वडिलांचे नाव : ..........................................................................................

घराचा पत्ता : ..........................................................................................

..........................................................................................

घर क्रमांक : ..........................................................................................

रस्ता : ..........................................................................................

वार्ड क्र. : ..........................................................................................

गाव/शहर : .............................., ता. : .........................., जि. : ............................,

राज्य : ........................., देश : ........................., पिन कोड : ................................

(टीप : विद्यार्थी पत्ता लिहिलेला कागद स्वत: संचिकेमध्ये लावतात.)

२) विद्यार्थी नकाशाचे निरीक्षण करून आपल्या गावाचे स्थान तालुका, जिल्हा, राज्य व देश या नकाशांमध्ये शोधून दाखवितात.

३) विद्यार्थी घरी जाऊन मोठ्यांच्या मदतीने नकाशा ॲपवर आपल्या घराचे स्थान शोधतात.

४) आपले गाव/शहर यांची इतिहास गुणवैशिष्ट्ये यांच्या नोंदी देखील करतात.

**संदर्भ साहित्य :** https://youtu.be/AjA98JZt7E0?si=4zwkiOK3qL-wvZi1

**पूरक कृती :** • Map Tricks • Map Reading • Types of Maps

## ५) कृषीविषयक साक्षरता

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : माझी छोटीशी बाग/परसबाग उपक्रम**

**पूर्वनियोजित कृती :**

- विद्यार्थ्यांमध्ये कृषीविषयक साक्षरता विकसित होण्यासाठी माझी छोटीशी बाग/परसबाग उपक्रम आयोजित करणे. या अंतर्गत शिक्षक पुढील कृतींचे आयोजन करतात.

  १) शालेय परिसरात परसबाग तयार करणे व देखभाल करणे.

  २) वर्गाच्या रिकाम्या जागेत/कुंडीत रोपे लावून त्यांची जोपासना करणे.

  ३) शालेय परिसरातील जमा होणारा कचरा जसे – पालापाचोळा, फळांची साली, भाज्यांची देठे संकलित करून त्यापासून कंपोस्ट खत निर्मिती करणे आणि त्याचा वापर करणे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** पर्यावरण संरक्षण व संवर्धन, निसर्गप्रेम, सर्जनशीलता, कारककौशल्यांचा विकास इ.

**आवश्यक साहित्य :** विविध प्रकारची रोपे, फुलझाडे, कुंड्या किंवा रिकामे पत्र्याचे डबे/रंगांचे रिकामे डबे इ.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना माझी छोटीशी बाग/परसबाग उपक्रम या विषयावर आधारित माहिती देऊन त्याबद्दल महत्त्व पटवून सांगतात आणि रोपे आणणे, माती, कुंड्या इतर साहित्य संकलन इत्यादीची पूर्वतयारी करतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना माझी छोटीशी बाग/परसबाग उपक्रम या उपक्रमांतर्गत करावयाच्या नियोजित कृतीबाबत सविस्तर सूचना देतात.

३) शाळेमध्ये परसबाग तयार केली नसेल किंवा रोपांची लागवड केली नसेल तर ती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना या उपक्रमाबाबत करावयाच्या कृतीबाबत मार्गदर्शन करतात.

- प्लॅस्टिकची बाटली/पत्र्याचे डबे यांची रंगरंगोटी करणे.
- फळझाडे, फुलझाडे इत्यादी यांची कुंड्यांमध्ये लागवड करण्यासाठी शिक्षकांना मदत करणे.
- शालेय परसबागेतील कचरा काढून टाकणे व स्वच्छता करणे.
- रोपांना पाणी देणे इत्यादी.

४) शिक्षक ‘स्वच्छ शाळा आणि सुंदर शाळा’ अंतर्गत वर्गातील रिकाम्या जागेत फुलझाडे लावणे आणि त्यांची देखभाल करणे याविषयी गटनिहाय काम करण्यास सांगतात.

५) शिक्षक शालेय परिसरातील कचरा संकलित करून त्यापासून खत निर्मिती करणे आणि त्याचा वापर परसबागेत करण्यास सांगतात.

६) शालेय बागेतून मिळणाऱ्या फुलांपासून कार्यक्रमासाठी आकर्षक पुष्पगुच्छ तयार करण्यास प्रोत्साहन देतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी माझी छोटीशी बाग/परसबाग उपक्रमात सहभागी होतात.

२) शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार वर्गातील मोकळ्या जागेत फुलझाडे लावतात आणि त्यांची देखभाल करतात.

३) विद्यार्थी परिसरातील जमा होणाऱ्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यासाठी आवश्यक कृती करतात.

४) विद्यार्थी शालेय परसबागेतील औषधी वनस्पती व इतर झाडांची नावे सांगून त्यांची माहिती सांगतात.

**संदर्भ साहित्य :**

१) परसबाग तयार करण्यासंबंधीचे व्हिडिओ, माहिती पुस्तिका.

---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : कृषी अवजारे ओळख उपक्रम**

**पूर्वनियोजित कृती :**

- विद्यार्थ्यांमध्ये कृषीविषयक साक्षरता विकसित होण्यासाठी कृषी अवजारे ओळख उपक्रम आयोजित करतात.

  या उपक्रमांतर्गत नियोजित करावयाच्या कृती –

१) शाळेमध्ये कृषी अवजारे यांचे प्रदर्शन भरवण्यासाठी आवश्यक जागा/वर्गखोली यांची उपलब्धता, तसेच कृषी अवजारे मांडणीचे नियोजन करणे.

२) प्रत्यक्ष भेट देऊन किंवा शाळेत मांडलेल्या प्रदर्शनातील शेतीसाठी वापरली जाणारी कृषी अवजारे यांचे निरीक्षण करणे.

३) शालेय परिसरातील परसबागेत वापरली जाणारी कृषी अवजारे याबाबत तज्ज्ञ व्यक्तींकडून दिग्दर्शन करणे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षणक्षमता, वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा, चिकित्सकवृत्ती, संप्रेषण कौशल्य, पर्यावरण संरक्षण व संवर्धन जागृती इत्यादी.

**आवश्यक साहित्य :** कृषी अवजारांची मांडणी करण्यासाठी लागणारे साहित्य (टेबल, खुर्ची इत्यादी)

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना कृषी अवजारे यांची ओळख होण्यासाठी शाळेमध्ये प्रदर्शन भरविण्यासाठी नियोजन करतात. शक्य असल्यास प्रत्यक्ष भेट देऊन कृषी अवजारे यांचे निरीक्षण करण्यासाठी नियोजन करतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना रोपांची लागवड आणि त्यांची देखभाल यासाठी वापरली जाणारी कृषी अवजारे, यांचा वापर कसा करावा याबाबत प्राथमिक माहिती देतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी कृषी अवजारे यांचे काळजीपूर्वक निरीक्षण करतात व माहिती मिळवतात.

२) शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार वर्गातील मोकळ्या जागेत फुलझाडे लावतात आणि त्यांची देखभाल करतात.

३) विद्यार्थी परिसरातील जमा होणाऱ्या कचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यासाठी आवश्यक कृती करतात.

४) विद्यार्थी शालेय परसबागेतील औषधी वनस्पती व इतर झाडांची नावे सांगून त्यांची माहिती सांगतात.

**संदर्भ साहित्य :**

१) परसबाग तयार करण्यासंबंधीचे व्हिडिओ, माहिती पुस्तिका.

## ६) वित्तीय व्यवस्थापन/आर्थिक साक्षरता

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : आनंद बाजार**

**पूर्वनियोजित कृती :** 'आनंद बाजार' हा विद्यार्थ्यांच्या आवडीचा उपक्रम आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार व स्थानिक परिस्थितीनुसार आनंद बाजारात विक्री करण्यासाठी विविध पदार्थ आणण्याची सूचना देतात. त्यासोबतच खरेदी–विक्री व्यवहार होण्यासाठी आवश्यक इतर साहित्यदेखील आणायला सांगतात. जमा–खर्चाच्या नोंदी ठेवण्यासाठी मार्गदर्शन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये :**

१) आर्थिक व्यवहार कौशल्य, व्यवहारज्ञानाचे कौशल्य.

**आवश्यक साहित्य :** भाजीपाला, फळे, खाण्याचे पदार्थ, स्टॉल, वजनकाटा, रोख रक्कम व सुटे पैसे.

**शिक्षक कृती :**

१) 'आनंद बाजार' हा उपक्रम विद्यार्थ्यांना नेहमीच आवडतो.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना वस्तू कशा विकायच्या याबाबत मार्गदर्शन करतात.

३) वस्तूंची किंमत काय आहे हे शिक्षक समजावून सांगतात.

४) वस्तू विकल्यानंतर आलेल्या पैशातून आपले पैसे घेऊन उरलेले पैसे गिऱ्हाईकास परत कसे द्यायचे याबद्दल मार्गदर्शन करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या सूचनांचे पालन करतात.

२) आर्थिक व्यवहार करताना घ्यावयाची दक्षता घेतात.

३) आपल्या हिशोबाच्या नोंदी ठेवतात.

४) आनंद बाजारातून मिळालेल्या या अनोख्या अनुभवाबद्दल आपले मतदेखील व्यक्त करतात.

**संदर्भ साहित्य :** https://youtu.be/BiIMJJaAc_E?si=QBGFQ6DC-_MATMm5
https://youtu.be/uhZVmS9TbTc?si=5kl_M88YRDaFS55P

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : विद्यार्थी शालेय वस्तुभांडार**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांचे गट करतात.
- विद्यार्थ्यांच्या मदतीने विविध शालेय साहित्य घाऊक बाजारातून आणून शाळेत विक्रीसाठी उपलब्ध करतात.
- वस्तूंचे दर निश्चित करून शाळेतील विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये वस्तू विक्रीसाठी उपलब्ध करून देतात.
- विद्यार्थ्यांना नोंदवहीमध्ये खरेदी-विक्री व्यवहार लिहिण्यासाठी मार्गदर्शन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** व्यवहारज्ञान कौशल्य, आर्थिक व्यवहार कौशल्य.

**आवश्यक साहित्य :** पेन, पेन्सिल, रबर, पट्टी, प्रोजेक्ट कागद, प्रोजेक्ट चित्रे, वही, तेलखडू, रिफील.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांचे गट करतात.

२) वेगवेगळ्या गटांकडे वेगवेगळ्या वस्तू विकण्यासाठी ठेवतात.

३) प्रत्येक गटाला आपली स्वतंत्र नोंदवही ठेवण्यास सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शाळेच्या या उपक्रमामध्ये सहभागी होतात.

२) खरेदी-विक्री व्यवहार समजून घेतात.

३) नफा-तोटा या संदर्भाने आर्थिक व्यवहारविषयक ज्ञान आत्मसात करतात.

**संदर्भ साहित्य :** https://youtu.be/xokl0VoMDJU?si=pcEUmD0x3zgO9sGr

---

**उपक्रम क्रमांक : ३**

**उपक्रमाचे नाव : माझ्या साठवलेल्या पैशांचे व्यवस्थापन**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक मुलांना आर्थिक साक्षर कसे करावे याबाबत माहिती घेतात.

  आर्थिक साक्षरता म्हणजे पैशांबाबत योग्य निर्णय घेण्याबाबत आवश्यक ज्ञान, कौशल्य संपादन करणे.
- शिक्षक मुलांना त्यांना मिळणाऱ्या साठवलेल्या/बचत करत असलेल्या/पैशांबाबत योग्य निर्णय घेण्यासाठी सक्षम करण्यासाठी प्रश्नावली तयार करतात.

१) तू कधी दुकानातून किराणा सामान आईला आणून देतो/देते काय?

२) तुम्हाला आई-बाबा, आजी-आजोबा, काका-काकू किंवा इतर नातेवाईक कधी पैसे देतात काय?

३) मिळालेल्या पैशांचे तुम्ही काय करता?

४) मिळालेल्या पैशांची बचत करून तुम्ही तुमच्यासाठी शाळेतील आवश्यक साहित्य घेऊ शकता काय?

५) मिळालेल्या पैशांच्या बचतीतून तुम्ही कधी आईला भाजी विकत घेण्यासाठी सुट्टे पैसे देऊ शकाल काय?

६) पैशांच्या बचतीतून तुम्ही मित्र/मैत्रिणीकडे शाळेतील आवश्यक वस्तू नसेल तर ते घेण्यासाठी मदत करू शकाल काय?

७) बचत केलेल्या पैशांचे कोणते फायदे होऊ शकतात?

- विद्यार्थी सादरीकरण झाल्यावर त्यांना बक्षीस फुल वही, पेन इ. देण्यासाठी नियोजन करतात. (बक्षीस देणे अपरिहार्य नाही. टाळ्या वाजवूनही कौतुक करता येऊ शकेल.)

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांचे वर्गातील संख्येनुसार गट तयार करतात. (किमान ५ विद्यार्थी एक गट याप्रमाणे)

२) शिक्षक मुलांना पूर्वनियोजनात तयार केलेली प्रश्नावली देतात.

३) मुलांना प्रश्नावली सोडविण्यासाठी वेळ देतात.

४) प्रश्नावली सोडवून झाल्यावर वरील प्रश्नानुसार सादरीकरण करण्यास सांगतात.

५) ज्या गटातील जास्त विद्यार्थी बचत करत आहेत त्यांचे कौतुक करतात.

६) जे विद्यार्थी बचतीच्या पैशांचे खाद्यपदार्थ वा इतर अनावश्यक खर्च न करता स्वत:च्या शाळेतील आवश्यक वस्तू, आई-वडील, आजी-आजोबा, मित्र-मैत्रीण यांना मदत करतात त्यांचे कौतुक करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी पूर्वनियोजनात तयार केलेली प्रश्नावली सोडवतात. उदा.

- तू कधी दुकानातून किराणा सामान आईला आणून देतो/देते काय ? - होय
- तुम्हाला आई-बाबा, आजी-आजोबा, काका-काकू किंवा इतर नातेवाईक कधी पैसे देतात काय? - होय
- मिळालेल्या पैशांचे तुम्ही काय करता? बचत करतो.
- मिळालेल्या पैशांची बचत करून तुम्ही तुमच्यासाठी शाळेतील आवश्यक साहित्य घेऊ शकता काय? - होय

- मिळालेल्या पैशांच्या बचतीतून तुम्ही कधी आईला भाजी विकत घेण्यासाठी सुट्टे पैसे देऊ शकाल काय? – होय
- पैशांच्या बचतीतून तुम्ही मित्र/मैत्रिणीकडे शाळेतील आवश्यक वस्तू नसेल तर ते घेण्यासाठी मदत करू शकाल काय ? – होय
- बचत केलेल्या पैशाचे कोणते फायदे होऊ शकतात? पेन, पेन्सिल, वही विकत घेणे, आई–बाबा यांना मदत करणे, गिफ्ट देणे, मित्र–मैत्रीण यांना उधार देणे.

२) प्रश्नावली सोडवून झाल्यावर प्रश्नानुसार सादरीकरण करतात.

३) ज्या गटातील जास्त विद्यार्थी बचत करत आहेत त्यांचे टाळ्या वाजवून कौतुक करतात.

४) जे विद्यार्थी बचतीच्या पैशांचे खाद्यपदार्थ वा इतर अनावश्यक खर्च न करता स्वत:च्या शाळेतील आवश्यक वस्तू, आई वडील, आजी–आजोबा, मित्र–मैत्रीण यांना मदत करतात त्यांचे टाळ्या वाजवून कौतुक करतात.

**संदर्भ साहित्य :** https://youtu.be/JqYoLQXO7j4?si=KRg weA7jtD6BETU

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..............................................................................................................

**उपक्रमाचे नाव : माझ्या कमाईचे नियोजन** **कृतीचे नाव :** ..........................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ..................................................................... **इयत्ता :** .......................

**प्रश्न १ :** तू कधी दुकानातून किराणा सामान आईला आणून देतो/देते काय?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न २ :** तुम्हाला आई–बाबा, आजी–आजोबा, काका–काकू किंवा इतर नातेवाईक कधी पैसे देतात काय?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न ३ :** मिळालेल्या पैशांचे तुम्ही काय करता?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न ४ :** मिळालेल्या पैशांची बचत करून तुम्ही तुझ्यासाठी शाळेतील आवश्यक साहित्य घेऊ शकता काय?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न ५ :** मिळालेल्या पैशांच्या बचतीतून तुम्ही कधी आईला भाजी विकत घेण्यासाठी सुट्टे पैसे देऊ शकाल काय?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न ६ :** पैशांच्या बचतीतून तुम्ही मित्र/मैत्रिणीकडे शाळेतील आवश्यक वस्तू नसेल तर ते घेण्यासाठी मदत करू शकाल काय?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न ७ :** बचत केलेल्या पैशांचे कोणते फायदे होऊ शकतात?

**उत्तर :** ..............................................................................................................

..............................................................................................................

## ७) आपत्ती व्यवस्थापनाची मूलतत्त्वे आणि व्यावहारिक कौशल्ये

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती व्यवस्थापन मॉक ड्रिल**

**पूर्वनियोजित कृती :** शिक्षक विद्यार्थ्यांना २ प्रकारच्या आपत्ती असतात ते सांगतात.

१) मानवनिर्मित आपत्ती : बॉम्बस्फोट, दहशतवादी हल्ला, दंगल या मानवनिर्मित आपत्ती.

२) नैसर्गिक आपत्ती : भूकंप, पूर, चक्रीवादळे, ढगफुटी या सगळ्या नैसर्गिक आपत्ती आहेत.

**आपत्ती व्यवस्थापन व बचाव :** मॉक ड्रिल यासंबंधी माहिती व व्हिडिओ क्लिप यांचे संकलन करतात.

- शिक्षक विद्यार्थ्यांना खालील घटकांच्या आधारे भूकंप आपत्ती व्यवस्थापनाबद्दल माहिती गोळा करण्यास सांगतात.

  १) भूकंप म्हणजे काय?

  २) भूकंप झाल्यावर काय करावे?

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** समय सूचकता, अचूकता, धैर्य व साहस

**आवश्यक साहित्य :** माईक, साऊंड सिस्टिम, मॉक ड्रिल यासंबंधी माहिती व व्हिडिओ क्लिप यांचे संकलन.

**शिक्षक कृती :**

- पूर्वनियोजित घटकांवर आधारित विद्यार्थ्यांनी संकलित केलेली माहिती विचारतात. जसे –

  **१) भूकंप म्हणजे काय?**

  उत्तर : भूकंप ही नैसर्गिक आपत्ती आहे. त्यापासून बचाव करण्याच्या उपाययोजना व्हिडिओच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दाखवणे. त्याप्रमाणे प्रात्यक्षिक करून दाखवणे मॉक ड्रिल घेणे. माहिती सांगणे.

  **२) मॉक ड्रिल म्हणजे काय?**

  उत्तर : भूकंप झाल्यावर किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत स्वतःचा बचाव कसा करावा व इतरांना कशी मदत करावी. इमारत कशी रिकामी करावी याचा सराव करण्याची एक पद्धत आहे. बऱ्याच प्रकरणांमध्ये, इमारतीची विद्यमान फायर अलार्म यंत्रणा सक्रिय केली जाते आणि आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्याप्रमाणे, जवळच्या उपलब्ध निर्गमनांद्वारे इमारत रिकामी केली जाते.

- शिक्षक विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या मॉक ड्रिल कसे असते व ते कसे करावे याची माहिती व प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देतात. जसे :

  - **मॉक ड्रिल :** मॉक ड्रिल हा एक नक्कल केलेला व्यायाम किंवा सराव आहे. जो रिअल–टाईम

आणीबाणीचे अनुकरण करतो, संभाव्य कमकुवतपणाचे मूल्यांकन करण्यासाठी व्यक्ती आणि शालेय संस्थेला तयार करतो, आगीच्या वेळी आपत्कालीन संकटे हाताळण्यासाठी प्रतिसाद वेळ आणि तयारी सुधारण्यासाठी उपयुक्त ठरतो.

- **मॉक ड्रिल दरम्यान दिले जाणारे प्रशिक्षण :**

  १) भूकंप झाल्यावर किंवा आग लागल्यानंतर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती देतात.

  २) भूकंपात सुरक्षित ठिकाणी उभे राहतात. आग विझवण्याची प्रक्रिया सुरू असताना केले जाणारे प्रतिबंधात्मक उपाय सांगतात.

  ३) भूकंपात सुरक्षित ठिकाणी उभे राहून बचाव करतात. आग लागलेल्या इमारतीतून कशा प्रकारे बाहेर पडावे हे सांगतात.

  ४) पीडितांना कशा प्रकारे मदत करावी याची माहिती देतात.

  ५) भूकंपात सुरक्षित ठिकाणी जाणे व प्राण वाचवणे गरजेचे असते. आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी माती, चिखल, पाणी, ओल्या कपड्यांचा व फायर एकस्टिंग्विशरचा वापर कशा प्रकारे करावा याचे प्रात्यक्षिक दाखवतात.

- यावेळी शिक्षक सहभागी विद्यार्थ्यांना आगीपासून स्वतःचा बचाव करणे, जवळच्या दवाखान्यात संपर्क साधणे आणि औषधोपचार मिळवणे. त्याचप्रमाणे अग्निशमन उपकरणांचा अचूक वापर करणे यासंबंधी प्रशिक्षण देतात.

- भूकंप झाल्यावर काय करावे व इमारतीला आग लागल्याचे आढळून आल्यास कोणती खबरदारी घ्यावी.

  १) घराच्या अंगणात, बाहेर मोकळ्या जागेत उभे राहतात. इमारत रिकामी करताना उत्तर किंवा दक्षिण दिशेच्या जिन्याने उतरून मजला त्वरित रिकामा करावा.

  २) लिफ्टचा वापर टाळावा.

  ३) स्टोअर रूममध्ये जाऊ नये.

  ४) आरडाओरडा करू नये किंवा इकडे तिकडे पळू नये.

  ५) स्वतःच्या वस्तू गोळा करण्याचा मोह टाळून, आहे त्या परिस्थितीत इमारतीच्या बाहेर मोकळ्या जागी येण्याचा प्रयत्न करतात.

५) शिक्षक विद्यार्थ्यांना वरील सर्व माहिती चित्रफितीच्या माध्यमातून योग्य पद्धतीने व ज्या ठिकाणी आवश्यकता आहे तिथे प्रात्यक्षिकाद्वारे समजावतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी पूर्वनियोजनानुसार शिक्षकांनी ठरवून दिलेल्या घटकावर संकलित केलेली माहिती सांगतात.

२) ‘भूकंप ड्रिल’ या उपक्रमांतर्गत शिक्षकांनी दिलेली माहिती विद्यार्थी काळजीपूर्वक श्रवण करतात व घेतलेल्या प्रात्यक्षिकामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होतात.

३) शालेय इमारतीमध्ये अथवा कोठेही आग लागलेली असताना कशा प्रकारे स्वसंरक्षण व इतरांचे रक्षण करावे, आगीचे प्रकार कोणते आहेत, भूकंप झाला तर करावयाच्या उपाययोजना प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देतात. या सर्व बाबींवर शिक्षकांनी दिलेली माहिती व प्रात्यक्षिक विद्यार्थी व्यवस्थित समजून घेतात.

**संदर्भ साहित्य :** https://youtu.be/pu_j5aATxws?si=QDblDKXW4ekAaW6S

# ८) २१ व्या शतकातील कौशल्ये

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : जुन्या वर्तमानपत्रातून अध्ययन**

**पूर्वनियोजित कृती :** शुक्रवारी परिपाठात किंवा शेवटच्या तासिकेत शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना खालील सूचना देतात :

- उद्या शाळेत येताना फक्त एक वही, पेन व सोबत कोणत्याही वर्षातील कोणत्याही तारखेचे, कोणत्याही भाषेतील जुने एक वर्तमानपत्र अथवा त्याची काही पाने सोबत आणावीत. घरी वर्तमानपत्र येत नसेल, तर पुडी बांधून दुकानदाराने दिलेला कागद, पुस्तकाला लावलेले कव्हरसुद्धा चालेल. बाकी सूचना उद्या वर्गात मिळतील. (शिक्षकांनीसुद्धा जाणीवपूर्वक काही वर्तमानपत्रे रद्दीतील निवडून आणावीत.) (गट कसे करायचे, प्रश्न किंवा कृती कोणत्या द्यायच्या, वर्तमानपत्रे कोणती घ्यायची ही सर्व कामे शिक्षकांनी पूर्व नियोजनात शुक्रवारीच करावीत.).

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** चिकित्सक विचार, सर्जनशील विचार, सहयोगातून शिक्षण, संभाषण कौशल्य, सादरीकरण कौशल्य, स्वअध्ययन कृती.

**आवश्यक साहित्य :** वही, पेन, रद्दी वर्तमानपत्रे, मुलांनी नाही आणल्यास शिक्षकांनी पुरवठा करावीत. हे सर्व घडताना व्हिडिओ तयार करावेत व मुलांना नंतर दाखवावा. त्यातून स्वतःच्या चुका व चांगल्या बाबी दोन्ही शोधता येतील.

**शिक्षक कृती :**

१) शनिवारी मुले शाळेत आली, की केलेल्या नियोजनानुसार शिक्षक त्यांचे गट तयार करतात. गट करताना तिन्ही वर्गांचे मिश्र किंवा स्तरानुसार किंवा मुलांच्या आवडीनुसार ३ ते ४ मुलांचा एक गट याप्रमाणे गट करतात. काही गट भाषा, काही इंग्रजी, काही गणित, काही परिसर अभ्यास, काही खेळ, काही इतर विषय याप्रमाणे गट करतात. शिक्षक एकेका गटास काम देतात व लघु मध्यंतरापर्यंत काम पूर्ण करून एकत्र जमण्यास सांगतात.

२) मुलांनी आणलेला जुन्या वर्तमानपत्राचा कागद वाचून काढण्यास सांगतात. त्यानंतर प्रत्येक विषयाच्या गटाने काय करायचे त्या सविस्तर सूचना खालीलप्रमाणे देतात.

**कृती १ – भाषा :** आपण वाचलेल्या मजकुरातून नाम, विशेषण व क्रियापदे शोधून अधोरेखित करा व लिहून काढा. किती प्रकारची विरामचिन्हे उपयोगात आणली आहेत? (त्यांची नावे लिहा.)

**कृती २ – गणित :** वाचलेल्या मजकुरात आढळलेले अंक, संख्या अंकी व अक्षरी लिहून काढा. त्याचा चढता, उतरता क्रम लावा, त्याची बेरीज व वजाबाकी करा, मोठ्या संख्येला लहान संख्येने गुणाकार व भागाकार करा. काही संख्या जर दशांश अपूर्णांक किंवा व्यवहारी अपूर्णांकात आढळल्या तर त्यांच्यावर पण त्याच क्रिया करा. तुमच्या वह्या एकमेकांना दाखवा व चूक दुरुस्त करा.

**कृती ३ – परिसर अभ्यास :** वाचलेल्या मजकुरात पाणी, हवा, अवकाश, प्राणी, वनस्पती, सूर्यमाला, पर्यावरण याविषयी बातमी, मजकूर असेल, तर त्यावर चर्चा व चिंतन करा. त्याबद्दल तुम्हांला काय वाटते ते लिहून काढा.

**कृती ४ – खेळ :** वाचलेल्या मजकुरात एखाद्या खेळाची बातमी असल्यास त्या खेळाबद्दल चर्चा करा, अधिकची माहिती करून घ्या व त्या खेळात प्रवीण असलेल्या खेळाडूची माहिती मिळवा. खेळाचा प्रकार ओळखा व तो खेळ शिकण्याचा प्रयत्न करा. कोणत्याही एका खेळाचे फायदे लिहून काढा.

**कृती ५ – चित्रकला :** ज्यांना चित्र काढायला जमते त्यांनी वर्तमानपत्रात पाहून चित्र काढा व रंगवा. (शिक्षकांनी आपल्या कल्पकतेनुसार आणखी कृती वाढवाव्यात. त्यात विशेषण शोधा, संख्या शोधून अंकी, अक्षरी, रोमन, देवनागरी व आंतरराष्ट्रीय लिपीत लिहिणे, त्याची बेरीज, वजाबाकी इत्यादी क्रिया करणे, खेळाची बातमी शोधून खेळाविषयीची माहिती व नियम लिहिणे, पर्यावरणविषयक बातमी शोधून मी काय करावे हे लिहिणे, अपघात/भांडण/युद्ध/खटला न्याय याविषयी वाचून त्यावर आपले मत लिहिणे, जाहिरात वाचून त्यावर मत लिहिणे अशी अनेक कामे देण्यात यावीत.)

**कृती ६ :** सर्व कामे पूर्ण झाल्यावर एका गटाचे दुसऱ्या गटासमोर सादरीकरण व त्यावर चर्चा घेतात.

**कृती ७ :** चर्चेच्या वेळी शिक्षक उपस्थित राहून चर्चेला योग्य वळण देतात व योग्य निष्कर्ष मुलांना काढायला लावतात व मग सर्व वर्गासमोर स्पष्टीकरण करतात.

**कृती ८ :** हे सर्व झाल्यावर वेळेप्रमाणे गट अदलाबदल करून सादरीकरण घेतात.

**कृती ९ :** शेवटी काही निवडक गटप्रमुखांची मते घेतात. आज आम्ही काय शिकलो, कसे शिकलो व आनंद मिळाला का?

**कृती १० :** शिक्षक या सर्व प्रक्रियेचे व्हिडिओ तयार करतात व नंतर दाखवतात. मुलांनी बनवल्यास उत्तमच.

**कृती ११ :** शेवटी शिक्षक समारोप करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी गटात बसतात. शिक्षकांच्या सूचनेनुसार कृती करतात.
२) आवश्यक तेथे चर्चा करतात व सर्वानुमते निर्णय घेतात.
३) लेखनकाम करतात.
४) मूकवाचन करतात व त्यावर आधारित कृती करतात.
५) चिंतन करतात, एकमेकांना शिकण्यात मदत करतात.
६) आवडीनुसार चित्रे काढतात, जाहिराती तयार करतात.
७) आज आपण काय शिकलो ते सांगतात व कसे शिकलो तेही सांगतात.

**संदर्भ साहित्य :** जुनी वर्तमानपत्रे, www. sports. com, www. plants. com, e-papers, मासिके व वर्तमानपत्रे यातील जाहिराती इत्यादी.)

## ९) समता

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : समजू शकत असाल तर समजून घ्या!**

**पूर्वनियोजित कृती :** शिक्षक विद्यार्थ्यांना शनिवारच्या पहिल्या तासिकेमध्ये आपणास काही खेळ घ्यायचे आहेत. त्यासाठी लागणारे साहित्य सोबत घेऊन या, अशी सूचना देतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** –

**आवश्यक साहित्य :** डोळे बांधण्यासाठी कापड, चारही बाजूंना रेषा मारलेला साधा कागद, त्या कागदावर काढलेली आकृती, पेन्सिल, रंग, पेन इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक वर्गामध्ये सर्व विद्यार्थ्यांना गोलाकार बसवतात आणि वर्गातील एका विद्यार्थ्याचा एक हात पाठीमागे दोरीने बांधतात आणि दुसऱ्या हातामध्ये खडू देऊन फलकाजवळ बोलवतात आणि डोळ्यांवर पट्टी बांधून फलकावर काढलेल्या अर्धवट टेबलाला खडूने पाय काढ अशी सूचना देतात.

२) फलकावरील/वहीवरील अशी अनेक अर्धवट चित्रे पूर्ण करण्यास सांगतात. शिक्षक ज्या पद्धतीने सूचना देतात, त्याप्रमाणे विद्यार्थी कृती करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे फलकावर असलेल्या अर्धवट चित्राला डोळ्यांवर पट्टी बांधून पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात.

२) फलकावर किंवा वहीवर काढलेल्या टेबलाच्या अर्धवट चित्राचे पाय काढणे, हत्तीला शेपूट काढणे इत्यादी.

३) या सर्व कृतीनंतर शिक्षक मुलांसोबत गप्पा मारतात. त्यामध्ये ते विद्यार्थ्यांना आलेले अनुभव विचारतात. तुम्हांला जर दृष्टी राहिली नसती, तर तुम्ही ही कामे करू शकला असतात का? अशाच प्रकारचे प्रश्न शिक्षक विद्यार्थ्यांना विचारतात आणि विद्यार्थी त्यावर बोलतात आणि आपली मते व्यक्त करतात.

**संदर्भ साहित्य :**

१) यूट्यूबवरील व्हिडिओ क्लिप.

२) https://youtu.be/7wwTbBmwrTQ?si=iTUf9J4XqXiYCEkM

## १०) क्षेत्रभेट व यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव : परिसर ओळख (पोस्ट ऑफिस क्षेत्रभेट)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक परिसरातील पोस्ट ऑफिसबाबत माहिती गोळा करतात.
- शिक्षक पोस्ट ऑफिसला कुठे, केव्हा कशी भेट द्यायची याचे नियोजन करतात. पोस्ट ऑफिस प्रमुखाची परवानगी घेतात व पालकांना याची पूर्वकल्पना देतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना शिस्तीचे पालन होण्यासाठी सूचना देतात. उदा., पाण्याची बाटली ठेवणे, रांगेत चालणे इत्यादी सूचना
- शिक्षक विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटी दरम्यान कोणत्या बाबींची माहिती घ्यावी किंवा निरीक्षण करावे यांबाबत सविस्तर पूर्व सूचना देतात. खालील प्रश्नांच्या आधारे माहिती संकलित करण्यास सांगतात.

  **प्रश्न** : १) पोस्ट ऑफिसचे नाव काय आहे? २) पोस्ट ऑफिस कोठे आहे? ३) पोस्ट ऑफिसची वेळ काय आहे? ४) पत्रपेटीमधील पत्रे वेगवेगळ्या ठिकाणी कशी पाठवली जातात? ५) पिनकोडवरून गाव कसे शोधतात इत्यादी.
- क्षेत्रभेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांसोबत कशा प्रकारे (प्रश्नोत्तरे, गप्पागोष्टी) चर्चा करणार हे ठरवतात.प्रश्न निश्चित करतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** निरीक्षण, संप्रेषण, सामाजिक भावना.

**आवश्यक साहित्य :** पेन, वही, पाण्याची बाटली इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना परिसरातील पोस्ट ऑफिसची माहिती सांगतात.

२) परिसरातील पोस्ट ऑफिसला भेट देण्यासाठी विद्यार्थ्यांना शिस्ती संदर्भात सूचना देतात. (उदा. एका रांगेत चला, स्वतःच्या वस्तू स्वतः सांभाळा, इत्यादी.)

३) शिक्षक विद्यार्थ्यांना परिसरातील क्षेत्रभेटी वेळी पूर्वनियोजनात तयार केलेले प्रश्न विचारून माहिती घेण्यास सांगतात.

४) क्षेत्रभेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांना पूर्वनियोजनात तयार केलेले प्रश्न विचारून वर्गात विद्यार्थ्यांशी चर्चा करतात.

प्रश्न : १) पोस्ट ऑफिसचे नाव काय होते?

२) पोस्ट ऑफिस कोठे होते?

३) पोस्ट ऑफिसची वेळ काय होती?

४) पोस्ट ऑफिसमध्ये किती कर्मचारी काम करत होते?

५) पत्रपेटीमधील पत्रे वेगवेगळ्या ठिकाणी पाठवण्यासाठी काय केले जात होते?

६) तुम्हाला पिनकोडवरून गाव शोधता येईल का? ते कसे शोधाल?

७) पोस्ट ऑफिसला भेट देऊन तुम्हाला कसे वाटले, काय अनुभव आले इत्यादी

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी परिसरातील भेट दिलेले पोस्ट ऑफिसचे नाव सांगतात.

२) विद्यार्थी क्षेत्रभेटीदरम्यान शिक्षकांनी दिलेल्या सूचनेनुसार निरीक्षण करतात व आवश्यक माहिती संकलित करतात.

३) विद्यार्थी परिसरातील भेट दिलेल्या पोस्ट ऑफिसची माहिती सादर करतात.

४) विद्यार्थी क्षेत्रभेटीनंतर होणाऱ्या चर्चेत सहभागी होतात.

अशा प्रकारे सायकल दुरुस्ती दुकान/सरकारी कार्यालय/दवाखाना/बेकरी/इत्यादींना क्षेत्रभेट देता येईल.

**संदर्भ साहित्य :**

1) https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app&referrer=utm_ source%3Dmobile%26utm_campaign%3Dshare_app

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................

**उपक्रमाचे नाव : परिसर ओळख (पोस्ट ऑफिस क्षेत्रभेट)**

**विद्यार्थ्याचे नाव :** ........................................................ **इयत्ता :** ................

**प्रश्न १ :** पोस्ट ऑफिसचे नाव काय होते?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न २ :** पोस्ट ऑफिस कोठे होते?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ३ :** पोस्ट ऑफिसची वेळ काय होती?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ४ :** पोस्ट ऑफिसमध्ये किती कर्मचारी काम करत होते?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ५ :** पत्रपेटीमधील पत्रे वेगवेगळ्या ठिकाणी पाठवण्यासाठी काय केले जात होते?

**उत्तर :** ..........................................................................................

..........................................................................................

**प्रश्न ६ :** तुम्हाला पिनकोडवरून गाव शोधता येईल का? ते कसे शोधाल?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ७ :** पोस्ट ऑफिसला भेट देऊन तुम्हाला कसे वाटले, काय अनुभव आले?

**उत्तर :** ..........................................................................................

..........................................................................................

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : यशस्वी व्यक्तींची मुलाखत (पोस्टमन, लाईनमन, डॉक्टर, ग्रामसेवक, नगरसेवक, शेतकरी, सरकारी नोकरदार इत्यादी.)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक परिसरातील क्षेत्रात ठिकाणी काम करणाऱ्या यशस्वी व्यक्तींची माहिती मिळवतात.
- यशस्वी व्यक्तीची निवड करून त्यांना याबाबत पूर्वकल्पना देतात व त्यांची परवानगी घेतात.
- मुलाखत घेतेवेळी शिस्तीचे पालन करण्यासंदर्भात विद्यार्थ्यांना सूचना देतात. (उदा., शांतता राखणे, आपापसात न बोलणे, मध्येच प्रश्न न विचारणे, एका प्रश्नाचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर दुसरा प्रश्न विचारावा, महत्त्वाची माहिती लिहून ठेवा, नवीन शब्द ऐकला तर लिहून ठेवावा इत्यादी.)
- शिक्षक यशस्वी व्यक्तीच्या उपलब्धतेनुसार व विद्यार्थी संख्येनुसार विद्यार्थ्यांचे गट करतात. शिक्षक विद्यार्थ्यांशी चर्चा करून मुलाखतीमध्ये विचारावयाच्या प्रश्नांची यादी/अनुसूची तयार करतात.

  उदा., (१) तुमचे नाव काय आहे? (२) तुमचा व्यवसाय कोणता आहे? (३) तुम्ही काम करता त्याचे स्वरूप काय आहे? (४) तुम्हांला तुमचे काम आवडते का? (५) तुम्ही हे काम कधीपासून करता?(६) काम करताना कोणकोणती काळजी घ्यावी लागते? इत्यादी

**विकसित होणारी कौशल्ये :** निरीक्षण, संप्रेषण, अभिव्यक्ती, भाषिक क्षमता.

**आवश्यक साहित्य :** वही, पेन, पेन्सिल इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक परिसरात काम करणारे/व्यवसाय करणारे/नोकरी करणारे/शेती करणारे यांची नावे विचारतात.

२) शिक्षक कोणाची मुलाखत घेणार हे विद्यार्थ्यांना विचारून ठरवतात.

३) शिक्षक मुलाखत घेताना पूर्वनियोजनात तयार केलेले प्रश्न विचारून माहिती घेण्यास सांगतात व माहिती वहीत लिहिण्यास सांगतात.

४) मुलाखतीनंतर शिक्षक विद्यार्थांसोबत खालील प्रश्नांच्या आधारे चर्चा करतात हे ठरवतात.

उदा., (१) तुम्ही कोणाची मुलाखत घेतली? (२) त्यांचे काम/व्यवसाय कोणता होता? (३) ते काम किती वर्षांपासून करत आहेत? (४) त्यांच्या कामात कोणती काळजी घ्यावयाची असते? (५) तुम्हाला हे काम करायला आवडेल का? (६) त्यांची मुलाखत घेऊन तुम्हाला कसे वाटले, काय अनुभव आले इत्यादी.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी त्यांच्या परिसरातील विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या यशस्वी व्यक्तींची नावे सांगतात.

२) विद्यार्थी कोणाची मुलाखत घेणार हे सांगतात.

३) विद्यार्थी शिक्षकांनी दिलेल्या सूचनांचे पालन करतात.

४) विद्यार्थी मुलाखत घेण्यापूर्वी पूर्वनियोजनात तयार केलेली प्रश्नावली लिहून घेतात.

५) विद्यार्थी मुलाखत घेऊन त्याची माहिती वहीत लिहून ठेवतात व मुलाखतीनंतर होणाऱ्या चर्चेत सहभागी होतात.

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ........................................................................................................

**उपक्रमाचे नाव :** **यशस्वी व्यक्तींची मुलाखत (पोस्टमन, लाईनमन, डॉक्टर, ग्रामसेवक, नगरसेवक, शेतकरी, सरकारी नोकरदार इत्यादी.)**

**कृतीचे नाव :** ........................................................................................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ................................................................. **इयत्ता :** ....................

**प्रश्न १ :** तुमचे नाव काय आहे?

**उत्तर :** ........................................................................................................

**प्रश्न २ :** तुमचा व्यवसाय कोणता आहे?

**उत्तर :** ........................................................................................................

**प्रश्न ३ :** तुम्ही काम करता त्याचे स्वरूप काय आहे?

**उत्तर :** ........................................................................................................

........................................................................................................

**प्रश्न ४ :** तुम्हांला तुमचे काम आवडते का?

**उत्तर :** ........................................................................................................

........................................................................................................

**प्रश्न ५ :** तुम्ही हे काम कधीपासून करता?

**उत्तर :** ........................................................................................................

**प्रश्न ६ :** तुम्हाला आपले काम करताना कोणकोणती काळजी घ्यावी लागते?

**उत्तर :** ........................................................................................................

........................................................................................................

## ११) Mindfullness वर आधारित
## कलाविष्कार, स्थानिक कला व संस्कृतीचा परिचय

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **महाराष्ट्र गीत**

**पूर्वनियोजित कृती :**

- शुक्रवारी शेवटच्या तासाला शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना शनिवारी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती देणे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** आपल्या राज्यातील सामाजिक व कला संस्कृतीचा वारसा माहिती होणे व त्याबद्दल आदर भावना निर्माण होण्यास मदत होणे.

**आवश्यक साहित्य :** माईक, म्युझिक सिस्टिम/हार्मोनिअम

**शिक्षक कृती :**

१) शनिवारी शिक्षक विद्यार्थ्यांना वर्गात एकत्र बसवतात. त्यांना महाराष्ट्राची संस्कृती व महाराष्ट्र गीत याबद्दल माहिती सांगतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना महाराष्ट्र गीत म्हणून दाखवितात व विद्यार्थ्यांकडून ते पाठ करून घेतात. या अनुषंगाने शिक्षक विद्यार्थ्यांना महाराष्ट्राविषयी माहिती सांगतात.

३) शिक्षक महाराष्ट्राची संस्कृती, महाराष्ट्रातील सर्व जाती-धर्म सलोख्याने राहणाऱ्या लोकांची माहिती विद्यार्थ्यांना सांगतात. तालासुरात विद्यार्थी महाराष्ट्र गीत कसे गातील याकडे शिक्षक लक्ष देतात.

**विद्यार्थी कृती :**

१) शिक्षक सांगत असलेली माहिती विद्यार्थी आवडीने ऐकतात व महाराष्ट्र गीताचा सराव करतात, महाराष्ट्र गीत तालासुरात व आनंदाने गातात.

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रम २ : रंगीत कागदांपासून कोलाज काम करणे.**

**पूर्वनियोजित कृती :**

- शुक्रवारी शेवटच्या तासाला शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना शनिवारी घेण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती देतात व तयारी करण्यास सांगतात. साहित्याची यादी लिहून देतात व साहित्य आणण्यासाठी सांगतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** बौद्धिक कौशल्य, बहुअंगी विचार, आकलन क्षमता वाढ

**आवश्यक साहित्य :** रंगीबेरंगी क्राफ्ट पेपर, कात्री, डिंक, पांढरा कागद, पेन्सिल, उपलब्ध टाकाऊ पेपर, वस्तू इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शनिवारी शिक्षक विद्यार्थ्यांना गटाने कार्य देतात. विद्यार्थी गटाने बसवून घेतात व विद्यार्थ्यांना सर्व साहित्याचे वाटप करतात.

२) दिलेल्या साहित्यातून कृती कशी तयार करायची हे सांगतात. कोणत्या पद्धतीची करायची आहे, ती कृती चित्र स्वरूपात कशी मांडायची आहे या संदर्भात माहिती देतात.

३) कोलाज पद्धतीचे फायदे, त्याचा उपयोग आणि त्याचे सौंदर्य याबद्दल विद्यार्थ्यांशी चर्चा करतात.

४) शिक्षक विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान जागृत करून विद्यार्थ्यांना विविध रंगांच्या कागदांचा वापर करून वेगवेगळी फळे, फुले यांचे चित्र काढण्यास सांगतात.

५) शिक्षक फळे व फुले या चित्रांच्या आकाराचे रंगीत कागदाचे तुकडे करून डिंकाच्या साहाय्याने चिकटवतात.

६) शिक्षक अशा पद्धतीचे कोलाज काम करण्यास शिकवितात. या संदर्भातील नमुना चित्रही विद्यार्थ्यांना दाखवतात. शिवाय विद्यार्थ्यांसमोर कोलाज कामाचे प्रात्यक्षिक करून दाखवितात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांनी दाखवलेली कृतीचे निरीक्षण करतात व त्याप्रमाणे अनुकरण करतात.

२) उपलब्ध साहित्यामध्ये कोणते चित्र बनवता येईल याचा विचार करतात. स्वतःच्या कल्पनाशक्तीच्या जोरावर नवनवीन चित्र निर्मिती करण्याचा प्रयत्न करतात.

३) काम गटागटाने करत असल्याने एकमेकांमध्ये लागलेल्या स्पर्धेचा, चुरशीचा आनंद घेतात व उपक्रम पूर्ण करतात.

**उपक्रम क्रमांक : ३**

**उपक्रम २ : ओरिगामी – नवीन वर्षाच्या स्वागतासाठी भेटकार्ड तयार करणे.**

**पूर्वनियोजित कृती :** विद्यार्थ्यांना शुक्रवारच्या शेवटच्या तासात दुसऱ्या दिवशी होणाऱ्या कला, कार्यानुभवाविषयीच्या तासिकेसंबंधी सूचना देणे. थोडक्यात विषयाची पार्श्वभूमी सांगणे व कृती करण्यासाठी आवश्यक साहित्य लिहून देणे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण कौशल्य, हस्तकौशल्य.

**आवश्यक साहित्य :** रंगीत कागद, खळ, कात्री, पट्टी, पेन्सिल, सजावटीचे उपलब्ध साहित्य, रंगीत पेन इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) रंगीत कागद घेऊन शिक्षक मधोमध घडी घालतात.

२) कार्ड तयार करताना शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार आकार कापण्यास सांगतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना शुभेच्छा लिहिण्यासाठीच्या कागदावर फिकट रंगाचा किंवा पांढरा कागद चिकटवण्यास सांगतात. त्या त्यावर शुभेच्छा संदेश लिहितात.

४) मुखपृष्ठावर आकर्षक सजावट करण्यासाठी कागदी फुले तयार करून चिकटवतात, सजावटीच्या साहित्याचा वापर करून आकर्षक रंगसंगतीमध्ये सजावट करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या सूचना लक्षपूर्वक ऐकतात व शिक्षकांच्या सूचनेनुसार कृती करतात.

**उपक्रम क्रमांक : ४**

**उपक्रम २ : वहीच्या कोऱ्या पानांपासून पॉकेट डायरी तयार करणे.**

**पूर्वनियोजित कृती :** विद्यार्थ्यांना शुक्रवारच्या शेवटच्या तासिकेत दुसऱ्या दिवशी होणाऱ्या कला कार्यानुभवविषयीच्या तासिकेसंबंधी सूचना देणे. थोडक्यात विषयाची पार्श्वभूमी सांगणे व कृती करण्यासाठी आवश्यक साहित्य लिहून देणे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, हस्तकौशल्य

**आवश्यक साहित्य :** जुन्या वहीची कोरी पाने, रंगीत कागद, खळ, कात्री, पट्टी, पेन्सिल, सजावटीचे उपलब्ध साहित्य, रंगीत पेन इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक सर्वप्रथम जुन्या वहीची कोरी पाने घेऊन मधोमध घडी घालतात.

२) त्यानंतर डायरी तयार करताना विद्यार्थ्यांना आवडेल त्या आकारात डायरी बनवण्यास सांगतात.

३) शिक्षक वहीची कोरी पाने, सुई, दोऱ्याने शिवतात किंवा डिंकाच्या साहाय्याने चिकटवतात.

४) मुखपृष्ठावर आकर्षक सजावट करण्यासाठी कागदी फुले तयार करून चिकटवतात, तसेच सजावटीचे साहित्य यांचा वापर करून आकर्षक रंगसंगतीमध्ये सजावट करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या सूचना लक्षपूर्वक ऐकतात व शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे कृती करतात.

२) विद्यार्थी जुन्या वहीची कोरी पाने घेऊन पॉकेट डायरी तयार करतात व दररोज तिचा वापर शाळेतील अभ्यास लिहिणे किंवा दैनंदिन नोंदी करण्यासाठी करतात.

३) या प्रकारची सुंदर आणि छान अशी आकर्षण पॉकेट डायरी तयार करू शकतात.

# १२) पारंपरिक खेळ

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : आट्यापाट्या**

**उद्देश :**

- आट्यापाट्या हा खेळ भारतातील पारंपरिक खेळांपैकी एक आहे. प्राचीन काळापासून मुलांमध्ये हा खेळ लोकप्रिय आहे. हा खेळ विशेषतः ग्रामीण भागात शाळांमध्ये आणि सण-उत्सवांच्या प्रसंगी खेळला जातो. या खेळाच्या माध्यमातून शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना मिळते.

**पूर्वनियोजित कृती :**

- **साहित्य संकलन :**
  - ➢ खेळण्यासाठी मोकळे मैदान किंवा घरातील मोकळी जागा.
  - ➢ जमिनीवर आखण्यासाठी खडू किंवा रंगीत पावडर.
- **सुरक्षितता निर्देश :**
  - ➢ खेळताना चांगल्या प्रकारे बसून खेळावे.
  - ➢ इतरांशी सहकार्य करून खेळावे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :**

१) शारीरिक विकास : धावणे, उड्या मारणे यामुळे शारीरिक चपळता वाढते.

२) मानसिक विकास : खेळाच्या विविध तंत्रांचा विचार करून निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते.

३) सामाजिक कौशल्ये : सामूहिक खेळामुळे सहकार्य व संघभावना विकसित होते.

४) तणाव निवारण : मजा व आनंदामुळे ताणतणाव कमी होतो.

**आवश्यक साहित्य :**

१) जमिनीवर आखण्यासाठी : खडू किंवा रंगीत पावडर.

२) खेळण्यासाठी मोकळे मैदान : शाळेचे मैदान, अंगण किंवा कोणतेही खुले क्षेत्र.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक खेळाची ओळख, खेळाची पद्धत, नियम, व खेळाचे तंत्र विद्यार्थ्यांना समजवून सांगतात.

२) खेळ कसा खेळायचा याचे प्रात्यक्षिक दाखवतात.

३) खेळताना कोणती सुरक्षितता घ्यावी याचे मार्गदर्शन करतात.

४) विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन करतात.

५) शिक्षक विद्यार्थ्यांना खेळाची पुढील माहिती देतात.

आट्यापाट्या हा एक पारंपरिक मैदानी खेळ आहे. खेळ दोन संघात खेळला जातो. पूर्वी संध्याकाळच्या वेळी हा खेळ खेळायचे. त्याचे मैदान ९० फूट लांब बाय ११ फूट रूंद या आकारमानाचे असते. या मैदानावर एक उभी पाटी तिला 'सुरपाटी' म्हणतात व त्यावर नऊ आडव्या पाट्यांनी तिला संरक्षण पाटीमध्ये विभागणी केलेली असते. या खेळामध्ये एका संघातील खेळाडू दुसऱ्या संघातील खेळाडूची आडवणूक अथवा कोंडी करतात. मग ती केलेली कोंडी तोडायची असते व प्रतिस्पर्धी संघातील खेळाडू त्यांना स्पर्श करून बाद करण्याचा प्रयत्न करतात. त्याच वेळी दुसऱ्या संघातील खेळाडू बचाव करत हुलकवणे देऊन निसटून जाण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे या खेळात अडवणूक, पाठ शिवणे, हुलकावणी या तिन्ही तंत्राचा वापर होतो खेळ सुरू होतो त्या पाटीला 'कपाळपाटी' म्हणतात व ज्या पाटीला खेळ संपतो त्या पाटीला 'लोण' म्हणतात मध्यभागी सूरपाटी असते. ती समान भाग करते. दोन संघ असतात. प्रत्येक संघात नऊ किंवा बारा खेळाडू असतात. मैदानावर नऊ पाट्यांना समान भाग देतात. मैदानाभोवती दहा फूट मोकळी जागा असावी लागते. तीन डावांचा समावेश असतो. दोन डाव जो सलग जिंकतो तो संघ विजयी होतो किंवा किती खेळाडू बाद करतात गुणपद्धतीने ही सामना खेळला जातो. प्रत्येक डाव सात मिनिटाचा असतो. प्रत्येक डावांच्या मध्यभागी पाच मिनिटांची विश्रांती वेळ असते. प्रत्येक संघात सहा खेळाडू पूर्वी असायचे वेळ हा २० मिनिटांचा असायचा, हल्ली या खेळासाठी पाच पंच असतात. नऊ अधिक तीन असे मिळून प्रत्येक संघात बारा खेळाडू असतात. प्रतिस्पर्ध्याला स्पर्श करून तो खेळाडू बाद करणे हे कौशल्य आहे. हा खो-खो खेळा सारख्याच प्रकारचा खेळ आहे. आट्यापाट्या हा खेळ संपूर्ण भारतामध्ये खेळला जातो. शासनाने शालेय स्पर्धांमध्ये सुद्धा या पारंपरिक खेळाचा समावेश केलेला आहे.

## विद्यार्थी कृती :

१) खेळासाठी आवश्यक साहित्य जसे - खडू किंवा रंगीत पावडर आणणे.

२) खेळाच्या नियमांचे पालन करून खेळणे.

३) सहकाऱ्यांसोबत खेळताना एकमेकांना मदत करणे व एकत्र खेळणे.

४) घरात व शाळेत सराव करणे.

## संदर्भ साहित्य :

**१) पुस्तके :**


- भारतीय पारंपरिक खेळ, लेखक - राजेश पाटील.
- बालकांसाठी खेळ व क्रीडा, लेखक - संतोष राव.

२) **लेख :**

- आट्यापाट्या खेळाचे इतिहास, लेखक – सुमित देशमुख.
- भारतीय सांस्कृतिक खेळ, लेखक – मनीषा पाटील.

---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : सुरपारंब्या**

**उद्देश :**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक सुरपारंब्या खेळाशी संबंधित माहितीचे संकलन करतात.
- सुरपारंब्या या पारंपरिक खेळाविषयी माहिती विद्यार्थ्यांस गोळा करण्यास सांगतात व त्याविषयी घटक ठरवून देतात.
- सुरपारंब्या हा खेळ भारताव्यतिरिक्त अजून कोणत्या देशात खेळला जातो? सुरपारंब्या म्हणजे काय? हा खेळ खेळण्यासाठी कोणते साहित्य आवश्यक आहे. पाठलाग करणे व बचाव करणे म्हणजे काय? या अनुषंगाने शिक्षक विद्यार्थ्यांना माहिती देतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** चपळता, युक्तीशक्ती, पायांची व हातांची वेगवान हालचाल, नेत्र समन्वय, शरीर निर्व्यसनी, चाणाक्ष व्यक्ती, कौशल्य विकास, नागमोडी धावणे, हुलकावणी देणे, जलद धावणे, चकवा देणे, प्रतिस्पर्ध्यांची ताकद, वेग आजमावणे.

**आवश्यक साहित्य :** बांबूची किंवा इतर फांदीची दोन फूट लांबीची छोटी काठी, वर्तुळाकार रिंगण आखण्यासाठी पांढरी भुकटी किंवा चुना.

**शिक्षक कृती :**

१) सुरपारंब्या हा खेळ खेळण्यासाठी वडाचे झाड किंवा इतर झाडे जेथे आहेत तेथे मोठ्या झाडाच्या खाली मातीचे मैदान तयार करून घेतात.

२) सुरपारंब्या या पारंपरिक खेळाविषयी माहिती विद्यार्थ्यांना विचारतात.

३) सुरपारंब्या खेळ व खेळाचे नियम या विषयासंदर्भात विद्यार्थ्यांना थोडक्यात माहिती देतात.

४) सुरपारंब्या हा खेळ खेळताना पाळावयाच्या सुरक्षित नियमासंदर्भात विद्यार्थ्यांना जाणीव करून देतात.

५) हा खेळ खेळण्यासाठी पाच ते सात विद्यार्थ्यांचा एकच गट तयार करतात व एकावर डाव किंवा राज्य असते.

६) सुरपारंब्या हा खेळ कसा खेळावा? हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीद्वारे समजवतात.

७) गटांतील एका विद्यार्थ्याने खाली राहून सुरकाठी जोरात पाया खालून दूरवर फेकायची. बाकीचे सर्व मुले झाडावर चढलेली असतील. ज्या विद्यार्थ्यांवर राज्य आहे, त्याने धावत जाऊन ती काठी आणून वर्तुळाकार रिंगणामध्ये ठेवायची व लगेच पाठलाव करत झाडावर चढून त्या विद्यार्थ्यांना स्पर्श करायचा ज्या विद्यार्थ्याला हाताने स्पर्श होतो त्या विद्यार्थ्यांवर राज्य होते.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी सुरपारंब्या या खेळाविषयी संकलित केलेली माहिती सांगतात.

२) शिक्षकांनी खेळ खेळताना पाळावयाच्या सुरक्षिततेच्या नियमांविषयी माहितीचे काळजीपूर्वक श्रवण करतात.

३) सूरपारंब्या हा खेळ व त्याच्या नियमांविषयी शिक्षकांनी सांगितलेली माहिती लक्षपूर्वक ऐकतात. कृती समजून घेतात.

४) हा खेळ खेळण्यासाठी सहा ते सात विद्यार्थ्यांचा एक गट तयार करतात व एका विद्यार्थ्यांवर डाव किंवा राज्य असते.

५) प्रत्यक्ष खेळ कसा खेळायचा याविषयी शिक्षकांनी दाखवलेल्या प्रात्यक्षिकांचे सर्व विद्यार्थी शिक्षकांचे काळजीपूर्वक निरीक्षण करून हा खेळ खेळतात.

**संदर्भ :**

१) कौशल्यविकास आणि मनोरंजक खेळ, एटीएम पब्लिकेशन.

२) जीवन शिक्षण अंकांमधील लेख, पारंपरिक खेळ

३) शारीरिक शिक्षण हस्तपुस्तिका

४) विविध खेळ भारतीय विचार, साधना प्रकाशन, पुणे.

५) ट्रॅडिशनल इंडियन गेम, श्री आकाश सोनार.

## १३) सांविधानिक मूल्यांची रुजवणूक

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव : 'माझे संविधान माझा अभिमान' भारतीय संविधान 'उद्देशिका' सामूहिक वाचन करणे.**

**उद्देश : भारतीय संविधानाच्या उद्देशिकेची ओळख होणे.**

**पूर्वनियोजित कृती :**

- वाचन सराव घेणे.
- ध्वनिप्रक्षेपक सुविधेचा वापर करून विद्यार्थ्यांचे सामूहिक अनुवाचन घेणे.

**विकसित होणारी कौशल्ये :** भारतीय संविधानाविषयी जागरूकता निर्माण होते.

**आवश्यक साहित्य :** 'ध्वनिप्रक्षेपक', 'संविधान उद्देशिका'.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाविषयी प्राथमिक माहिती सांगतात.

२) शिक्षक भारतीय संविधान उद्देशिकेमधील महत्त्वपूर्ण शब्दांचे अर्थ सांगतात.

३) भारतीय संविधान 'उद्देशिका' अनुवाचन करतात. सदर उपक्रम परिपाठावेळी नियमित घेतात. २६ नोव्हेंबर रोजी 'संविधान दिन' साजरा करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी वर्गामध्ये भारतीय संविधान 'उद्देशिका'चे सामूहिक वाचन करतात.

२) २६ नोव्हेंबर रोजी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली 'संविधान दिन' साजरा करतात.

**संदर्भ साहित्य :**

१) भारतीय संविधान प्रदर्शनी फलक

२) भारतीय संविधान म्हणत असतानाचे विविध व्हिडिओ.



## १४) विविध व्यवसायांचा परिचय आणि करिअरविषयक मार्गदर्शन

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव : फायरलेस कुकिंग**

**पूर्वनियोजित कृती :**

- शाळेत कोणकोणते पदार्थ विस्तव/शेगडीशिवाय करता येतात याबाबत पदार्थांचे वेगळे प्रकार उदा. कच्चा चिवडा, दडपे पोहे, चटणी, ठेचा, फ्रुटसॅलेड, व्हेजिटेबल सॅलेड इत्यादीबाबत घटक, पाककृती याबाबत माहिती गोळा करतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार शेगडीशिवाय स्वयंपाक पोह्यांचा कच्चा चिवडा या पाककृतीसाठी लागणाऱ्या पदार्थांत कोणते पोषक घटक असतात. याबाबत पालक, मोठे बहीणभाऊ यांच्या मदतीने खालील घटकाबाबत माहिती गोळा करण्यास सांगतात तसेच शनिवारी आणावयास सांगतात.

  १) पोहे २) चुरमुरे ३) शेंगदाणे ४) खोबरे ५) खाण्याचे तेल
  ६) तिखट ७) मीठ ८) साखर ९) लिंबू १०) कोथिंबीर
  ११) कांदा/कांद्याची पात १२) डाळे

- शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांना कोणता घटक आणणे शक्य होणार आहे हे विचारून त्याचे प्रमाण किती असायला हवे याबाबत सांगतात. शालेय पोषणआहार किंवा शाळा/आचारी यांच्याकडून सदर पाककृती करण्यासाठी मोठे पातेले, चमचा, प्लेट्स यांची व्यवस्था आधीच उपलब्ध करून ठेवतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** पाककौशल्य, कल्पकता, जीवनकौशल्य

**आवश्यक साहित्य :** पोहे, चुरमुरे, शेंगदाणे, खोबरे, खाण्याचे तेल, तिखट, मीठ, साखर, लिंबू, कोथिंबीर, कांदा/कांद्याची पात, मोठे पातेले, चमचा, प्लेट्स इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना प्रथम पोहे, कुरमुरे पातेल्यात टाकण्यास सांगतात.
२) त्यानंतर पातेल्यात डाळे, शेंगदाणे, खोबरे टाकण्यास सांगतात.
३) यावर तिखट, मीठ, साखर हे जिन्नस विद्यार्थ्यांना टाकण्यास सांगतात.
४) शालेय पोषणआहारातील मावशी/ताईंकडून कांदा चिरून घेतात व तो यावर टाकण्यास सांगतात.
५) यावर तेल टाकण्यास सांगून हे मिश्रण चमच्याने ढवळून एकत्रित करतात.
६) यावर लिंबू पिळून वर बारीक चिरलेली कोथिंबीर टाकतात.

७) विद्यार्थ्यांनी आणलेल्या घटकातील पोषण घटक कोणते हे विचारतात.

८) चिवडा झाल्यावर विद्यार्थ्यांना वाटून स्वतःही आस्वाद घेतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांनी ठरवून दिलेल्याप्रमाणे खाद्यघटक आणतात.

२) खाद्यघटकात कोणते पोषक घटक आहे याबाबत माहिती गोळा करतात. खालीलप्रमाणे सांगतात. जाणून घेतात.

(पोहे – कर्बोदके, कुरमुरे – कर्बोदके, पोटॅशिअम, शेंगदाणे – प्रथिने, डाळे – विटामिन बी, खोबरे– कॅल्शिअम, कोथिंबीर – विटामिन सी)

३) शिक्षकांनी सांगितलेल्या क्रमाने खाद्यघटक पातेल्यात टाकतात.

४) शिक्षक करत असलेल्या पाककृतीचे निरीक्षण करतात.

५) पाककृतीचा आस्वाद घेतात.

**संदर्भ साहित्य : व्हिडिओ लिंक**

१) https://youtu.be/TCi1yCDwqT0?si=wOhtqrmzN8uWyV6U

२) https://youtube.com/shorts/mZQ9s_tLFPU?si=B7AiPFmUJxxb4KpA

## १५) कथाकथन

**उपक्रमाचे नाव : विद्यार्थ्यांनी स्वतःच्या शब्दात आवडती गोष्ट/कथा पुन्हा सांगणे.**

**पूर्वनियोजित कृती :**

- विविध लोककथा, दंतकथा, साहसकथा, विनोदीकथा, रहस्यकथा यांचा संग्रह करतात.
- विविध बालसाहित्य यातील कथांचा संग्रह करतात. उदा., बालमित्र, किशोर, चंपक, वयम, छात्र प्रबोधन
- विविध कथांचे संवादपट्ट्या तयार करतात.
- कथा सादरीकरणासाठी बाहुलीनाट्य व विविध नकली चेहरे तयार करून ठेवतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** अर्थपूर्ण शब्द, वाक्य, परिच्छेद आणि शब्दउच्चार यांचा योग्य वापर, अभिनय आणि अभिव्यक्त कौशल्ये, आत्मविश्वास, सभाधीटपणा, संवादशैली

**आवश्यक साहित्य :** कथांचा संग्रह, संवादपट्ट्या, बाहुलीनाटय (Puppet), नकली चेहरे (Mask)

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विविध लोककथा, दंतकथा, साहसकथा, विनोदीकथा, रहस्यकथा यांचा संग्रह करतात.

२) तसेच विद्यार्थ्यांना विविध बालसाहित्य यातील कथांचा संग्रह करायला सांगतात. उदा. बालमित्र, किशोर, चंपक, वयम, छात्र प्रबोधन

३) एका कथेच्या संवादपट्ट्या तयार करतात.

४) कथा सादरीकरणासाठी बाहुलीनाट्य किंवा विविध नकली चेहरे तयार करून ठेवतात.

५) कथा सादरीकरणासाठी काही मुलांना सोबत घेतात.

६) शिक्षक विद्यार्थ्यांबरोबर प्रभावीपणे कथा सादर करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी विविध बालसाहित्य यातील कथांचा संग्रह करतात. उदा. बालमित्र, किशोर, चंपक, वयम, छात्र प्रबोधन.

२) कथेच्या संवादपट्ट्यांचा सराव करतात.

३) वाचलेली किंवा ऐकलेली आणि आवडती कथा सादर करतात.

४) काही विद्यार्थी बाहुली किंवा नकली चेहरे यांद्वारे कथेचे सादरीकरण करतात.

**संदर्भ साहित्य :**

१) बालमित्र २) निवडक किशोर व किशोर मधील कथा ३) चंपक ४) वयम

५) छात्र प्रबोधन ६) चांदोबा ७) राजीव तांबे यांचे कथासंग्रह ८) वर्तमानपत्रामधील बालसाहित्य

९) दिवाळी अंकामधील बालसाहित्य

## १६) वाचनसंस्कृती

**उपक्रमाचे नाव : नमुना सक्रिय वाचन (Model Active Reading)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षकांनी त्याचा पुरेसा सराव करतात. वाचलेल्या मजकुराचे आकलन व्हावे यासाठी काही कृती तयार करतात.
- विद्यार्थी आवडीने सहभागी होतील अशा तंत्रांचा वापर करतात. उदा. कथाकथन, भूमिकाभिनय, Reading Relay Activity, Voice Modulation Activity इत्यादी.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** श्रवण, प्रकटवाचन, संभाषण आणि आकलन.

**आवश्यक साहित्य :** सहज उपलब्ध होणारी चित्ररूप, मनोरंजनात्मक गोष्टींची पुस्तके, मासिके, उदा चांदोबा, किशोर, चंपक, चिकू-पिकू, वयम, ठकठक, Tell me Why, Wisdom, वर्तमानपत्रातील बालसाहित्य इ. मराठीसह हिंदी व इंग्रजी भाषेतील बालसाहित्य उपलब्ध ठेवावीत.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक एक छोटी मनोरंजक कथा निवडतात. उदा., नीला सत्यनारायण यांच्या 'मैत्र' या पुस्तकामधील कथा – बाहुलीची किंमत.

२) शिक्षक आवाजामध्ये चढ-उतार करत आणि हावभावासहित या कथेचे प्रकटवाचन करतात.

३) त्यानंतर या कथेचे विद्यार्थ्यांकडून प्रकटवाचन करून घेतात.

४) प्रकटवाचनानंतर शिक्षक विद्यार्थ्यांचे गट (४ ते ५ विद्यार्थी) तयार करतात आणि भूमिकाभिनयाद्वारे अथवा वरील सुचविलेल्या तंत्राद्वारे वाचन करून घेतात.

५) शिक्षक विद्यार्थ्यांच्या वाचनाचे निरीक्षण करतात.

६) प्रकटवाचन प्रभावी होण्यासाठी आवश्यक बाबी सुचवतात. उदा., आवाजामधील आरोह-अवरोह, संवादशैली, देहबोली याबाबत उदाहरण देऊन स्पष्ट करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या प्रकटवाचनाचे निरिक्षण करून लक्षपूर्वक ऐकतात.

२) विद्यार्थी शिक्षकांबरोबर प्रकटवाचन करतात.

३) त्यानंतर गट तयार करून गटामध्ये प्रकटवाचन करतात आणि लक्षपूर्वक ऐकतात.

४) इतर गटांना आवाजाचा त्रास होणार नाही याची काळजी घेतात.

## संदर्भ साहित्य :


१) चांदोबा

२) किशोर

३) चंपक

४) चिकू-पिकू

५) वयम

६) ठकठक

७) Tell me Why

८) Wisdom

९) Read to Me App

१०) StoryWeaver (storyweaver.org.in)

११) StoryWeaver Instagram (instagram.com/pbstoryweaver)

१२) StoryWeaver Facebook (facebook.com/pbstoryweaver)

१३) StoryWeaver Twitter (twitter.com/pbstoryweaver)

१४) Pratham Books (prathambooks.org)




विकासाला गती देणारी चाके म्हणजे पुस्तके.

# १७) संगणकाची ओळख

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : चला संगणक हार्डवेअरची ओळख करून घेऊ...**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक उपक्रम घेण्याच्या आदल्या दिवशी किंवा काही दिवस अगोदर विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातून घरी, शेजारी प्रश्न विचारून हार्डवेअर म्हणजे काय? संगणकाची हार्डवेअर कोणकोणती आहेत? याचे उत्तर मिळविण्यास सांगतील.

  (संगणक हार्डवेअर – संगणक हार्डवेअरमध्ये संगणकाचे भौतिक भाग असतात, ज्याला आपण हात लावून पाहू शकतो. जसे की, सेंट्रल प्रोसेसिंग युनिट (CPU), रँडम एक्सेस मेमरी (RAM), मदरबोर्ड, संगणक डेटा स्टोरेज, ग्राफिक्स कार्ड, साऊंड कार्ड आणि कॉम्प्युटर केस. यात मॉनिटर, माऊस, किबोर्ड आणि स्पीकर यांसारख्या बाह्य उपकरणांचा समावेश आहे.)
- शिक्षक शाळेतील संगणकाचे हार्डवेअर/संगणक हार्डवेअर प्रतिकृती/संगणक प्रयोगशाळा/संगणकाचे भित्तिचित्र/चित्र ज्या ठिकाणी असे अशा ठिकाणी विद्यार्थ्यांना घेऊन जातील व त्यांचे गट करतील.
- विद्यार्थ्यांचे ४–४ किंवा विद्यार्थी संख्येनुसार योग्य होईल असे गट तयार करतील.
- शिक्षक संगणकाच्या हार्डवेअरचे स्टिकर किंवा वर्तानपत्रातून चित्रांची कात्रणे मिळवतील.
- संगणकाचे हार्डवेअर संकल्पना व चित्र दाखवून संगणकाच्या हार्डवेअरचे कार्य समजण्यासाठी विद्यार्थ्यांना विचारण्यासाठीचे नमुना प्रश्न :

  १) संगणकाच्या हार्डवेअरचे नाव काय आहे? (उदा., मॉनिटर)

  २) या हार्डवेअरचे काय काम आहे? (उदा., चित्र दाखवणे)

  ३) संगणकाच्या हार्डवेअरमुळे कोणते काम करता येते?

  (उदा. चित्र पाहणे, केलेले काम किंवा फाईल पाहणे, चित्रपट पाहणे, पुस्तक वाचणे, गेम खेळणे)

  (प्रत्येक भागासाठी/हार्डवेअरसाठी वरील तीन प्रश्न योग्य तो बदल करून विचारावेत.)
- चर्चा : संगणकाच्या हार्डवेअरची काळजी व हाताळणी व्यवस्थित करावी हे स्पष्ट करतात.

  १) तुमचा किबोर्ड नियमितपणे स्वच्छ करा.

  २) केबल्स व्यवस्थित ठेवा.

  ३) मॉनिटर नियमित पुसून स्वच्छ करा.

४) तुमचा संगणक थंड वातानुकूलित ठिकाणी ठेवा.

५) योग्य पद्धतीने संगणक बंद करा. थेट पॉवर बटन बंद करू नका.

- संगणकाच्या हार्डवेअरच्या स्टिक पपेट तयार करणे. संगणकाच्या भागाचे चित्र पेपरच्या स्टिक, स्ट्रॉ किंवा काडीवर चिकटविणे.

**विकसित होणारी कौशल्ये :** डिजिटल साक्षरता, निरीक्षण कौशल्य, संभाषण कौशल्य, सहयोग कौशल्य 'संगणकाची ओळख' मध्ये संगणकाच्या हार्डवेअरची नावे व उपयोग सांगतात. संगणक मल्टीमीडिया ऑडिओ, व्हिडिओ, इमेज इत्यादी असण्याचे कारणे समजतात.

**आवश्यक साहित्य :** प्रत्यक्ष संगणक/संगणक प्रतिकृती, संगणक चित्र, संगणक हार्डवेअर – प्रत्यक्ष/प्रतिकृती/ संगणक हार्डवेअरची चित्रे.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक ४-४ विद्यार्थ्यांचे गट तयार करतात.

२) शिक्षक पूर्वतयारी म्हणून विद्यार्थ्यांना माहिती घ्यायला सांगितलेल्या, हार्डवेअर म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर विचारतात व त्यावर गटात चर्चा करतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना तुम्ही संगणकाचे हार्डवेअर कोठे कोठे पाहिलेले आहे? हे विचारतात त्याच वेळी गटानुसार आलेल्या उत्तरांचे लेखन फलकावर करतात.

४) शिक्षक संगणकाचे हार्डवेअरचे/चित्र/प्रतिकृती/चित्र/स्टिकर/भितिचित्र किंवा प्रत्यक्ष हार्डवेअर दाखवून हे काय आहे? याला आपण अजून कोणत्या नावाने ओळखतो?

५) संगणकाचे हार्डवेयर भाग दाखवून नावे स्पष्ट करतात. संगणकाच्या मराठी, इंग्लिश नावाचा तोंडी सराव घेतात. (सेंट्रल प्रोसेसिंग युनिट (CPU), रँडम एक्सेस मेमरी (RAM), मदरबोर्ड, संगणक डेटा स्टोरेज, ग्राफिक्स कार्ड, साऊंड कार्ड आणि कॉम्प्युटर केस. यात मॉनिटर, माऊस, किबोर्ड आणि स्पीकर)

६) संगणकाचे हार्डवेअर विविध भाग किंवा चित्र दाखवून संगणकाचे कार्य समजण्यासाठी विद्यार्थ्यांना विचारण्यासाठी प्रश्न तयार करतात.

१) संगणकाच्या हार्डवेअरचे नाव काय आहे? (उदा. मॉनिटर)

२) या संगणकाच्या हार्डवेअरचे काय काम आहे? (उदा. चित्र दाखवणे)

३) संगणकाच्या हार्डवेअरमुळे कोणते काम करता येते? (उदा. चित्र पाहणे, केलेले फाईल काम पाहणे, चित्रपट पाहणे, पुस्तक वाचणे, गेम खेळणे)

प्रत्येक संगणकाचे हार्डवेअरसाठी वरील तीन प्रश्न विचारणे. (हे नमुना प्रश्न आहेत. यामध्ये शिक्षण परिस्थिती पाहून प्रश्नांची संख्या वाढवतात.)

७) शिक्षक विद्यार्थ्यांना गटनिहाय संगणकाच्या हार्डवेअरची कामे कोणती हे विचारतात.

८) विद्यार्थ्यांच्या आलेली उत्तरे फलकावर नोंदवितात. याबाबत विद्यार्थ्यांना आपापसात चर्चा करण्यास वेळ देतात.

९) फलकावर नोंदविलेली माहिती पाहिल्यावर लक्षात येते की, मल्टीमीडिया तयार करण्यास उपयुक्त आहे, असे आपल्याला सर्वप्रकारचे ऑडिओ, व्हिडिओ तयार करता येतात. सर्व ठिकाणी व भरपूर कामासाठी संगणकाचे हार्डवेअर उपयुक्त आहे हे स्पष्ट करतात.

१०) शिक्षक विद्यार्थ्यांना संगणकाच्या हार्डवेअरचे स्टिक पपेट दाखवून त्याचे नाव व काम विचारतात व माहिती असल्यास स्वत: सांगतात.

११) विद्यार्थ्यांना गटनिहाय पुढे बोलवून त्यानंतर स्टिक पपेट देऊन संगणकाचे हार्डवेअर व कामे स्पष्ट करतात.

१२) संगणक हार्डवेअरची काळजी कशी घ्यावी व स्वच्छता कशी करावी याविषयी माहिती सांगतात व चर्चा करतात. तुमचा किबोर्ड नियमितपणे स्वच्छ करणे, केबल्स व्यवस्थित ठेवणे, मॉनिटर नियमित पुसून स्वच्छ करणे, पीसी थंड ठेवणे, योग्य पद्धतीने संगणक बंद करणे व थेट पॉवर बटन बंद न करणे. (हे कसे करावे याविषयी चर्चा करतात व आवश्यक स्पष्टीकरण देतात.)

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी संगणकाचे हार्डवेअर कोठे-कोठे पाहिलेले आहे हे सांगतात. त्याचवेळी गटानुसार आलेल्या उत्तरांच्या नोंदी व नंतर वाचन करतात.

२) विद्यार्थी संगणकाचे हार्डवेअर/हार्डवेअर चित्र/प्रतिकृती/चित्र/स्टिकर/भित्तिचित्र पाहून हे काय आहे? याला आपण अजून कोणत्या नावाने ओळखतो? अशा प्रश्नांची उत्तरे देतात.

३) संगणकाचे हार्डवेअर भाग पाहून नावे सांगतात. संगणकाच्या हार्डवेअरच्या मराठी, इंग्लिश नावाचा तोंडी सराव करतात.

४) संगणकाचे हार्डवेअर विविध भाग किंवा चित्र दाखवून संगणकाच्या हार्डवेअरचे कार्य समजण्यासाठी विद्यार्थी प्रश्नांची उत्तरे देतात.

५) विद्यार्थी गटनिहाय संगणकाच्या हार्डवेअरची कामे कोणती हे सांगतात.

६) विद्यार्थी नोंदविलेल्या उत्तराचे वाचन करतात. गटनिहाय आपसात विद्यार्थी चर्चा करतात.

७) संगणकाच्या हार्डवेअरमुळे मल्टीमीडिया सर्व प्रकारचे ऑडिओ, व्हिडिओ तयार करता येतात. सर्व ठिकाणी व भरपूर कामासाठी संगणकाचे हार्डवेअर उपयुक्त आहे, हे स्पष्ट करतात.

८) विद्यार्थी संगणकाच्या हार्डवेअरचे स्टिक पपेटद्वारे क्षिकांनी केलेले सादरीकरण पाहतात.

९) विद्यार्थी गटनिहाय स्टिक पपेटच्या साहाय्याने संगणकाचे हार्डवेअर व कामे स्पष्ट करतात.

१०) संगणकाची व त्यांच्या हार्डवेअरची निगा कशी राखावी याची माहिती ऐकतात व चर्चेत भाग घेतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/jSR79PPu5rs?si=OfktXjWkJpKLd_mT

**उपक्रम क्रमांक : २**


**उपक्रमाचे नाव : Google translate चा वापर करू व इंग्रजी शिकू...**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक संगणकाचे व इंटरनेटचे उपयोग विद्यार्थ्यांना सांगतात.

**संगणक व इंटरनेटचे उपयोग :**

- माहिती संग्रहित करणे, पुनर्प्राप्त करणे आणि त्यावर प्रक्रिया करणे. दस्तऐवज टाइप करणे, ई–मेल पाठविणे, गेम खेळणे आणि वेब ब्राउझ करणे. (इंटरनेटवरून माहिती मिळविणे), अभ्यास करणे, धडा समजून घेणे, कविता ऐकणे इत्यादींसाठी संगणक व इंटरनेटचा उपयोग होतो.




- दुसरी भाषा शिकणे, भाषांतर करणे इत्यादींसाठी सुद्धा संगणक व इंटरनेटचा उपयोग होतो.
- शिक्षक गुगल ट्रान्सलेशन विषयी माहिती सांगतात.
- Google translate ही एक बहुभाषी तांत्रिक मशीन भाषांतर सेवा आहे. जी Google ने मजकूर, दस्तऐवज आणि वेबसाइट्स एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अनुवादित करण्यासाठी विकसित केली आहे.हे वेबसाइट इंटरफेस, Android आणि IOS साठी मोबाइल ॲप, तसेच एक API (ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस) पुरविते जे वापरकर्त्यांना ब्राउझर विस्तार आणि सॉफ्टवेअर अद्ययावत करण्यास मदत करते.
- गुगल translate चा वापर कशा प्रकारे करावा हे विद्यार्थ्यांना सांगतात.

  उदा. संगणक, laptop, मोबाईलवरसुद्धा त्याचा वापर करता येतो.

  Google translate चा वापर करून इंग्रजी कशी शिकता येते हे सांगतात.

- मोबाईल किंवा संगणकावर गुगल ट्रान्सलेशन टूल ओपन करतात. यासाठी प्लेस्टोर वरून मोबाइलसाठी Google translate हे ॲप डाऊनलोड करून किंवा वेब ब्राउजर वरून Google translate शोधून त्यामध्ये भाषांतर करण्यासाठी दोन्ही भाषा कशा निवडायच्या हे दाखवितात.
- छोटे, छोटे मराठी शब्द बोलून किंवा किबोर्डचा वापर करून टाईप करणे व ते आपोआप कसे दुसऱ्या भाषेत भाषांतरित होतात हे प्रात्याक्षिक करून दाखवतील.
- शब्दाप्रमाणेच छोट्या वाक्यांचा सराव करून घेतात.
- तसेच टाईप केलेले लिसन (साऊंड) या चिन्हाचा वापर करून कसे ऐकता येईल याबाबत माहिती करून देतील.

- याचा सराव करून घेतात व स्वयं अध्ययन करून कशी इंग्रजी शिकता येईल याची माहिती देतात.
- मोबाइलवर Google translate सुरू करणे. त्याची योग्य ती सेटिंग करणे.
- या सर्व सेटिंगचा शिक्षक अगोदरच स्वत: सराव करून घेतील.
- शिक्षक विद्यार्थ्यांना Google translate चा वापरविषयी माहिती सांगणे.
- प्रत्यक्ष भाषांतर करायला लावणे.
- विद्यार्थी सराव.

**विकसित होणारी कौशल्ये :** निरीक्षण, भाषांतर, सृजनकौशल्य, सादरीकरण कौशल्य, विद्यार्थी छोटे-छोटे इंग्रजी शब्द व वाक्ये भाषांतर करू शकतील. विद्यार्थ्यांची शब्दसंपदा वाढेल. इंग्रजी भाषा शिकण्यास मदत होईल.

**आवश्यक साहित्य :** मोबाइल, संगणक, प्रक्षेपक साहित्य, इंटरनेट सुविधा, गुगल ट्रान्सलेट ॲप

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक संदर्भ साहित्यात नोंदविलेला किंवा त्याच्याशी सुसंगत असा व्हिडिओ दाखवतात.

२) शिक्षक इंग्रजी शब्दांचे मराठी अर्थ सांगतात. काही इंग्रजी शब्द सांगून विद्यार्थ्यांना त्याचा मराठी अर्थ विचारतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना मराठी अर्थ माहीत नसल्यास तो मोबाइलवर कसा शोधावा याबाबत मार्गदर्शन करतात.

४) शिक्षक विद्यार्थ्यांना मोबाइलवर Google translate ओपन करून सेटिंगची माहिती सांगतात.

५) Google translate मध्ये इंग्रजी शब्द लिहून तो मराठीत कसा बदलतो याची माहिती देतात.

   - मोबाईल किंवा संगणकावर Google translate सुरू करणे.

- भाषांतर करावयाची (मराठी) व ज्यामध्ये भाषांतर होईल (इंग्रजी) भाषा निवडणे.
- मराठी भाषेच्या चौकटीत बोलून किंवा लिहून छोटे शब्द किंवा वाक्य टाईप करणे.
- भाषांतर झालले साऊंड चिन्हाच्या मदतीने ऐकणे व ते पुन्हा बोलणे.
- ही कृती काही विद्यार्थ्यांना करायला लावून त्यांचा सराव करून घेणे.

६) Google translate मध्ये इंग्रजीतून मराठीत व मराठीतून इंग्रजीत कसा बदल करावा हे सांगतात.

७) भाषांतराचा सराव करायला सांगतील.

८) विद्यार्थ्यांचा बोलून लिहिण्याचा व ऐकून बोलण्याचा सराव करून घेतील.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांनी दाखविलेली व्हिडिओ क्लिप लक्षपूर्वक पाहतात. शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात.

२) विद्यार्थी मोबाइलवर Google translate कसे ओपन करावे हे समजून घेतात.

३) विद्यार्थी गटनिहाय बसतात, मग Google translate मध्ये इंग्रजी शब्द लिहून तो मराठीत कसा बदलतो याची माहिती ऐकतात व त्याविषयी चर्चा/सराव करतात.

४) विद्यार्थी शिक्षकाच्या मोबाइलमध्ये Google translate ओपन करून इंग्रजी शब्दांचा अर्थ शोधतात.

५) कृतीचे अनुकरण करून झाल्यानंतर दुसरी कृती करतात.

६) भाषांतराचा सराव करतात. (संगणक/लॅपटॉप/मोबाइलच्या मदतीने)

७) शिक्षक सांगतील त्याप्रमाणे सर्व कृती व त्यांचा क्रम लक्षात ठेवतात.

८) सांगितलेल्या क्रमाने कृतींचा सराव करतात.

९) स्वत: भाषांतर करून इंग्रजी शिकण्याचा सराव करतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/Dbg99MIoB9E

## १८) जाणून घेऊया आपल्या परिसराचा इतिहास

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : आपल्या गावातील किंवा परिसरातील होऊन गेलेले स्वातंत्र्यसैनिक व समाज सुधारक**

**उपक्रमाची पूर्वतयारी :**

१) मुख्याध्यापक व संस्थाप्रमुख यांची परवानगी घेणे.

२) पालकसभा घेऊन उपक्रमाविषयी माहिती देणे व त्यांची मदत घेणे.

३) विद्यार्थ्यांना उपक्रमाची माहिती करून देणे.

४) उपक्रमासाठी उपयोगी पडतील असे लिखित, मौखिक व भौतिक साधनांची यादी तयार करणे.

५) विद्यार्थ्यांचे गट तयार करून घेणे.

६) आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे.

**उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) विद्यार्थ्यांना आपल्या गावाचा समृद्ध इतिहास याविषयी माहिती करून देणे.

२) आपल्या गावातील स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे स्वातंत्र्य मिळवण्यासाठीचे योगदान तसेच समाज सुधारक व समाजसुधारक यांचे कार्य याविषयी विद्यार्थ्यांना जाणीव करून देणे.

३) विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य वाढीस लावणे.

४) विद्यार्थ्यांमध्ये इतिहास विषयाची गोडी निर्माण करणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे.

६) विद्यार्थ्यांमध्ये इतिहास लेखन व संशोधन कसे करावे याबद्दल माहिती मिळवणे.

**उपक्रमाची कार्यवाही :**

१) प्रथम विद्यार्थ्यांचे गट तयार करून विद्यार्थ्यांना ठरावीक परिसर नेमून दिला जाईल.

२) विद्यार्थी नेमून दिलेल्या परिसरात जाऊन तेथील ज्येष्ठ व्यक्ती, तज्ञ यांना प्रत्यक्ष भेटून गावातील होऊन गेलेले स्वातंत्र्यसैनिक व समाजसुधारक यांची माहिती मिळवतील.

३) विद्यार्थी यासाठी गावातील ग्रामपंचायत कार्यालय, नगरपरिषद यात स्वातंत्र्यसैनिकांविषयीच्या व समाजसुधारक यांच्या काही नोंदी आढळतात का याविषयी माहिती मिळवतील.

४) विद्यार्थी इतिहासाची पुस्तके, वृत्तपत्र यातून माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतील.

५) विद्यार्थी गावातील सार्वजनिक व शाळेतील ग्रंथालय याला भेट देऊन सध्या सैनिक व समाजसुधारक यांच्याबद्दल माहिती मिळण्याचा प्रयत्न करतील.

६) विद्यार्थी त्यांना माहिती असलेल्या स्वातंत्र्यसैनिक व समाजसुधारक यांच्याविषयी जास्तीची माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतील.

७) विद्यार्थी गावातील उभारलेले काही वास्तू, शिल्प वा स्मारक असतील तर त्या ठिकाणी भेट त्याचा इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न करतील.

८) विद्यार्थी गावातील माजी सैनिक यांच्याकडून सुद्धा माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतील.

९) विद्यार्थी यांना मिळालेली माहिती एकत्र करून हाती घेतलेला उपक्रम यशस्वी करतील.

**उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यमापन :**

१) विद्यार्थ्यांचेसमूहातील व समाजातील वर्तन यांचे निरीक्षण करणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य व मदतीची भावना आहे का याचे निरीक्षण करणे.

३) विद्यार्थ्यांच्या मिळालेला माहितीची नोंद घेण्याच्या पद्धतीची अवलोकन करणे.

**उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) विद्यार्थ्यांमध्ये इतिहास विषयाची आवड निर्माण होईल.

२) विद्यार्थ्यांना इतिहास लेखनाची प्राथमिक माहिती मिळेल.

३) विद्यार्थ्यांना आपल्या गावातील स्वातंत्र्यसैनिक व समाजसुधारक याविषयी माहिती मिळेल. गावाचा इतिहास त्यांना समजेल.

४) विद्यार्थ्यांचे कृतीतून अध्ययन होईल .

५) विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळेल.

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : सार्वजनिक वाचनालयास भेट**

**उपक्रमाची पूर्वतयारी**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगतील.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना एखाद्या संस्थेची स्थापनेपासून वर्तमान कार्यापर्यंत माहिती कशा पद्धतीने घेतली जाते याविषयी मार्गदर्शन करतील.

३) संबधित वाचनालयाला भेटीची आगाऊ कल्पना देणे. परवानगी मिळवणे.

४) वाचनालयाला भेट देऊन विचारावयाच्या प्रश्नांची यादी करणे.

**उपक्रमाची उद्‌दिष्टे :**

१) सार्वजनिक वाचनालयाचे महत्त्व समजून घेणे.

२) वाचनालयासंबंधी माहिती मिळवणे.

३) वाचनालयातील पुस्तके व त्याची नोंद कशी ठेवली जाते, त्यांची देवघेव कशी केली जाते हे समजून घेणे.

४) वाचनालयाचा इतिहास समजून घेणे.

**उपक्रमाची कार्यवाही / अंमलबजावणी :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना वाचनालयाला द्यावयाच्या भेटीविषयी माहिती देतील.

२) शिक्षक या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार करतील. त्यांचे आवश्यकतेनुसार गटामध्ये विभाजन करतील.

३) विद्यार्थी वाचनालयाची माहिती घेत असताना शिक्षक सुलभक म्हणून वेळोवेळी मार्गदर्शन करतील.

४) विद्यार्थी शिक्षकांच्या सहकार्याने वाचनालयाची माहिती लिहितील.

**उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यमापन :**

१) क्षेत्रभेटीदरम्यानचे विद्यार्थ्यांचे वर्तन, त्यांची तयारी, माहिती मिळवण्याचे कौशल्य याविषयी शिक्षक निरीक्षण करतील.

२) शिक्षक विद्यार्थ्यांचे संवाद कौशल्य हे सुद्‌धा पाहतील.

**उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) विद्यार्थी वाचनालयाचा इतिहास समजेल.

२) विद्यार्थी माहिती मिळवण्याचे कौशल्य व माहितीवर प्रक्रिया करण्याचे कौशल्य शिकतील.

**उपक्रम क्रमांक : ३**

**उपक्रमाचे नाव : परिसरातील प्रार्थनास्थळांचा इतिहास जाणून घेणे**

**उपक्रमासाठी करावयाची पूर्वतयारी :**

१) शिक्षक व पालकांच्या मदतीने परिसरातील प्रार्थनास्थळांची यादी करतील.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना प्रार्थनास्थळाची माहिती कशी घ्यावयाची याबाबत मार्गदर्शन करतील.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना प्रार्थनास्थळाची रचना, स्थापत्य, बांधकाम, नमुना, कालखंड या अंगाने कशी माहिती संकलन करायची हे सांगतील.

**उद्‌दिष्टे :**

१) प्रार्थनास्थळांचा ऐतिहासिक व पौराणिक वारसा समजून घेणे.

२) विद्यार्थ्यांना प्रार्थनास्थळांचा रचना, ऐतिहासिक वारसा, बांधकामशैली, इतिहास या अंगाने अध्ययन करण्यासाठी सक्षम करणे.

३) विविध प्रार्थनास्थळांच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या सामाजिक उपक्रमांची माहिती घेणे.

**कार्यवाही / अंमलबजावणी :**

१) शिक्षक प्रार्थनास्थळांच्या यादीनुसार विद्यार्थ्यांचे इयत्तानिहाय गट करतील.

२) गटनिहाय करावयाच्या प्रार्थनास्थळांना भेटी यांचे नियोजन शिक्षक करतील.

३) विद्यार्थी प्रार्थनास्थळांची गटनिहाय माहिती घेत असताना विद्यार्थी सुलभक म्हणून मार्गदर्शन करतील.

४) विद्यार्थी माहितीचे संकलन योग्य पद्‌धतीने करत आहेत, की नाही याची खातरजमा शिक्षक करतील.

५) शिक्षक विद्यार्थ्यांना प्रार्थनास्थळाचा इतिहास जाणून घेण्यासाठी मदत करतील.

६) जमा केलेल्या माहितीच्या आधारे प्रार्थनास्थळाचा इतिहास लिहिण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांना मदत करतील.

**उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यमापन :**

१) विद्यार्थी समूहाद्‌वारे कसे अध्ययन करतात याचे निरीक्षण करणे.

२) प्रार्थनास्थळाची माहिती घेण्यासाठी विद्यार्थी योग्य प्रश्नांची निवड करतात का हे पाहणे.

३) विद्यार्थी उचित माहितीचे संकलन करतात का हे तपासणे.

४) विद्यार्थी माहितीचे व्यवस्थापन कसे करतात याचे मूल्यांकन करणे.

**उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) विद्यार्थ्यांना विविध प्रार्थनास्थळांचे ऐतिहासिक व पौराणिक महत्त्व समजेल.

२) विद्यार्थ्यांना प्रार्थनास्थळांचे सामाजिक उपक्रम यांची माहिती होईल.

३) विद्यार्थी इतिहास लेखनाविषयी प्राथमिक माहिती मिळवतील.

४) विद्यार्थ्यांमध्ये माहिती संकलनाचे व माहिती व्यवस्थापनाचे कौशल्य निर्माण होईल.

## स्तर ३ : इयत्ता सहावी ते आठवी

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय (Theme) | उपक्रम | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | कृती व खेळांवर आधारित शिक्षण | दोन्ही हाताने रेखाटूया त्रिकोण आणि वर्तुळ<br>दोन्ही हातांनी लिहू स्वतःचे नाव | १३७ |
| | | मातकाम – मातीची भांडी आणि फळे तयार करूया. | १३८ |
| | | कागदकाम व पुठ्ठाकाम – कागदाच्या लगद्यापासून विविध वस्तू तयार करणे. | १३९ |
| | | त्रिमित दृश्य निर्मिती – शेती | १४० |
| २. | प्राणायाम/योग/ध्यानधारणा/श्वसनाची तंत्रे | सर्वांगासन व्यायाम | १४२ |
| | | विविध योगासने | १४३ |
| ३. | पर्यावरण संवर्धन | शालेय परिसरातील कचऱ्याचे ऑडिट करणे. | १४४ |
| | | चला निसर्गमित्र बनू! | १४७ |
| ४. | सामाजिक बांधीलकी | समाजातील समस्या व त्यावरील उपाय | १४९ |
| | | कागदाची गंमत व किंमत | १५० |
| ५. | व्यक्तिमत्त्व विकास | नकाशावरील माझे स्थान | १५३ |
| | | एक दिवस व्यावसायिकांसंगे | १५५ |
| | | सोडवून तर पाहा | १५६ |
| | | अभिरूप ग्रामसभा | १५७ |
| ६. | कृषीविषयक साक्षरता | 'फार्म टू प्लेट' अंतर्गत भरडधान्य पाककृती स्पर्धा | १५९ |
| | | शेतीपूरक व्यवसाय | १६० |
| ७. | वित्तीय व्यवस्थापन | शालेय बचत बँक | १६३ |
| | | माझ्या कमाईचे नियोजन | १६४ |
| ८. | आरोग्य रक्षण करण्यासाठी उपाययोजना | 'सकस आहार... पळतील आजार' | १६७ |
| | | स्वसंरक्षण – प्रात्यक्षिक व व्याख्यान | १७० |
| ९. | एकविसाव्या शतकातील कौशल्ये | जल ही जीवन है! | १७४ |
| | | मी छायाचित्रकार (Video Grapher) झालो! | १७८ |
| १० | समता | नातेसंबंध हाताळण्याचे कौशल्य | १७९ |
| ११. | क्षेत्रभेट व यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती | आपल्या सभोवती (बँक क्षेत्रभेट) | १८१ |
| | | वृद्धाश्रम भेट | १८४ |
| | | संग्रहालय भेट | १८९ |
| | | जाणून घेऊया (यशस्वी व्यक्तीची मुलाखत) | १९४ |

| अ.क्र. | विषय (Theme) | उपक्रम | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १२. | पारंपरिक खेळांचा परिचय | लगोरी | १९६ |
| | | विटी–दांडू | १९९ |
| | | बास्केटबॉल | २०२ |
| १३. | कला | रंगीत कागदांमधून सजावट करण्यासाठी रंगीत चेंडू तयार करणे. | २०५ |
| | | इतर संस्कृतींची व समुदायांची माहिती घेणे. | २०५ |
| १४. | सांविधानिक मूल्यांची रुजवणूक | चला जाणून घेऊया भारतीय संविधान – प्रश्नमंजूषा | २०७ |
| | | भारतीय संविधान निर्मिती प्रकिया, सादरीकरण. | २०८ |
| १५. | विविध व्यवसायांचा परिचय आणि करिअरविषयक मार्गदर्शन | नेल आर्ट | २१० |
| | | ट्रॉफी मेकर | २११ |
| | | धातूकाम | २१५ |
| | | स्वयंपूर्ण गाव याबाबत माहिती (अलुतेदार, बलुतेदार) | २१७ |
| | | उद्योजकता | २२० |
| १६. | कथाकथन | आधुनिक काळानुरूप रूपांतरण (Modern Adaptations of Stories) | २२४ |
| १७. | वाचनसंस्कृती | वाचू आनंदे, लिहू नेटके | २२६ |
| १८. | तंत्रज्ञान कौशल्य – सायबर सुरक्षितता | सायबर गुन्हेगारीचे प्रकार | २२९ |
| | | माहिती (डेटा) चा योग्य वापर | २३२ |
| | | संगणक, मोबाइल वापरत असताना घ्यायची सायबर सुरक्षा | २३६ |
| | | सायबर सुरक्षा संसाधने ओळख | २४० |
| १९. | लोकसेवा हक्क अधिनियम | तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, तहसील कचेरी, पंचायत समिती, RTO कार्यालयास क्षेत्रभेट. | २४४ |
| | | क्षेत्रभेट : महा ई–सेवा केंद्रास भेट | २४७ |
| २०. | जाणून घेऊया आपल्या परिसराचा इतिहास | परिसरातील प्राचीन बारव, विहीर, तलाव या जल–व्यवस्थापनाच्या स्रोतांचा अभ्यास करणे. | २२५० |
| | | किल्ले व दुर्ग यांना भेटी | २५१ |
| | | राहुटी | २५२ |

## १) कृती व खेळांवर आधारित शिक्षण

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : दोन्ही हाताने रेखाटूया त्रिकोण आणि वर्तुळ.**

**पूर्वनियोजित कृती :**

- मुलांच्या बैठक व्यवस्थेचे नियोजन करतात. सोबत दोन पेन, एक वही आणण्याची सूचना देतात. खडू व फळ्याची व्यवस्था करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** दोन्ही हातांनी काम करण्याचे कौशल्य, तर्कशुद्ध विचार, अवयव समन्वय

**आवश्यक साहित्य :** वही, दोन पेन, खडू.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना रांगेमध्ये बसायला सांगतात. विद्यार्थ्यांना कृतीचे निरीक्षण करायला सांगतात.

२) शिक्षक दोन्ही हातांमध्ये दोन खडू घेतात. फळ्यावर एका हाताने वर्तुळ आणि दुसऱ्या हाताने त्रिकोण एकाच वेळी काढून दाखवतात. तीच कृती सुरुवातीला हळुवार आणि नंतर वेगाने करतात.

३) विद्यार्थ्यांना वहीवर एकाच वेळी दोन्ही हातांचा वापर करून, एका हाताने वर्तुळ आणि दुसऱ्या हाताने त्रिकोण काढायला सांगतात. तीच कृती सुरुवातीला हळुवार आणि नंतर वेगाने करून घेतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या कृतीचे बारकाईने निरीक्षण करतात.

२) दोन्ही हातांमध्ये दोन पेन घेऊन एकाच वेळी एका हाताने त्रिकोण व दुसऱ्या हाताने वर्तुळ काढण्याचा सराव करतात.

३) हा सराव खूप वेळा केल्यानंतर प्रत्येक विद्यार्थी समोर येऊन फळ्यावर खडूने एकाच वेळी दोन्ही हातांनी त्रिकोण आणि वर्तुळ काढून दाखवतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/JCLzjdyCx4k?si=ZGChg5nge4ILbhks

**उपक्रमाचे नाव : दोन्ही हातांनी लिहू स्वत:चे नाव**

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना रांगेमध्ये बसायला सांगतात. शिक्षक जी कृती करत आहेत त्याचे सूक्ष्म निरीक्षण करायला सांगतात.

२) शिक्षक दोन्ही हातांमध्ये दोन खडू घेतात आणि फळ्यावर एकाच वेळेस दोन्ही हातांनी स्वतःचे नाव लिहून दाखवतात.

३) मुलांना सूचना देऊन वहीवर एकाच वेळी दोन्ही हातांचा वापर करून, स्वतःचे नाव लिहायला सांगतात विद्यार्थ्यांकडून पुन्हा पुन्हा सराव करून घेतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या कृतीचे बारकाईने निरीक्षण करतात. दोन्ही हातांमध्ये दोन पेन घेऊन एकाच वेळी दोन्ही हातांनी स्वतःचे नाव लिहिण्याचा सराव करतात.

२) हा सराव पाच ते सात वेळा केल्यानंतर, समोर येऊन फळ्यावर दोन्ही हातांनी स्वतःचे नाव लिहून दाखवतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtube.com/shorts/nαXHZqvKyFw?si=UD6bvokUxgqSHM1k

---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : मातकाम – मातीची भांडी आणि फळे तयार करूया.**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक माती चाळून भिजवून ठेवतात. विद्यार्थ्यांना सोबत हात पुसण्यासाठी कापड, वस्तू तयार करताना आधार म्हणून पुठ्ठ्याचा तुकडा, पाणी घेण्यासाठी छोटे भांडे, जुने वर्तमानपत्र/कागद व दोरा आणायला सांगतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** सर्जनशीलता, कारककौशल्य, सौंदर्यदृष्टी

**आवश्यक साहित्य :** ओली माती, पाण्यासाठी भांडे, जुने कापड, पुठ्ठ्याचा तुकडा, जुने वर्तमानपत्र/कागद, दोरा.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना गोलाकार बसवतात. कृतींचे निरीक्षण करण्यासोबत मातीचा, पाण्याचा वापर करण्याची पद्धत, स्वच्छता यांविषयी माहिती देतात.

२) जुने वर्तमानपत्र चुरगळून, दाब देऊन, दोरा गुंडाळून फळे/फळभाज्या यांचे आकार तयार करतात. उदा., वांगी, केळी, गाजर इत्यादी.

३) तयार झालेल्या आकारांवर योग्य प्रमाणात ओली केलेली माती हळुवार लावतात. पाण्याचा वापर करून आकार रेखीव करतात.

४) शिक्षक विद्यार्थ्यांना हे आकार सुकल्यानंतर ॲक्रेलिक/पेस्टल रंगाने रंगवावे याविषयी माहिती सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) पाणी, पुठ्ठ्याचा तुकडा, जुने कापड इत्यादी साहित्य सोबत घेऊन अर्ध गोलाकारात बसतात.

२) जुन्या वर्तमानपत्राचे तुकडे एकमेकांना जोडून आणि त्यावर दोरा गुंडाळून आवडती फळे/फळभाज्या यांचे आकार तयार करतात.

३) तयार झालेल्या आकारांवर ओल्या मातीचा थर हळुवार लावतात. पाण्याचा वापर करून आकार आणखी रेखीव करतात.

४) पुठ्ठ्याच्या तुकड्यावर तयार झालेले आकार सुकायला ठेवतात.

५) जुन्या कापडाच्या तुकड्याने हात, भांडे व जागा स्वच्छ करतात.

६) ४-५ दिवसांनी आकार वाळल्यानंतर ते ॲक्रेलिक/पेस्टल रंगाने रंगवतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/rK9bQeOz2iw?feature=shared

---

**उपक्रम क्रमांक : ३**

**उपक्रमाचे नाव : कागदकाम व पुठ्ठाकाम – कागदाच्या लगद्यापासून विविध वस्तू तयार करणे.**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांच्या मदतीने मेथी पावडर/डिंक वापरून कागदाचा लगदा तयार करतात.
- विद्यार्थी बैठक व्यवस्था, तयार झालेल्या वस्तू वाळवण्यासाठी जागेची व्यवस्था करतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना पुठ्ठ्याचा तुकडा, रंग, ब्रश, जुने कापड, तार, दोरा, मोजपट्टी, डिंक, कटर, कात्री इत्यादी साहित्य बरोबर आणायला सांगतात.
- विद्यार्थ्यांकडून कागदाच्या लगद्यापासून विविध वस्तू तयार करून घेतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** सर्जनशील विचार, नवनिर्मिती, पुनर्वापर.

**आवश्यक साहित्य :** वर्तमानपत्राचे जुने कागदापासून मेथी पावडर/डिंक वापरून तयार केलेला कागदाचा लगदा, रंगीत कागदाचे तुकडे, टॅल्कम पावडर, विविध प्रकारचे रंग, ब्रश, दोरा, तार, पाणी, मोजपट्टटी, डिंक, कटर, कात्री, इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) आदल्या दिवशी कागदाचा लगदा कसा तयार करतात याची माहिती सांगून विद्यार्थ्यांच्या मदतीने लगदा तयार करून घेतात किंवा संबंधित व्हिडिओ दाखवतात. (ज्यामध्ये कागदाच्या लगद्यापासून वस्तू तयार केलेल्या आहेत.) विद्यार्थ्यांना सर्व कृतींचे निरीक्षण करण्यास सांगतात.

२) एखादी तार, काड्या घेऊन दोऱ्याने घट्ट बांधून आवडत्या वस्तूचा सांगाडा तयार करतात. उदा. प्राणी, पक्षी, फुलदाणी इत्यादी.

३) त्यावर कागदाचा लगदा हळुवार लावून आवडत्या वस्तूचा आकार तयार करतात. त्यावर डिंकाच्या साहाय्याने कोऱ्या कागदाचे तुकडे चिकटवतात. आकार आणखी रेखीव करतात. वस्तू वाळल्यानंतर त्या योग्य रंगाने रंगवतात.

४) कृती पूर्ण झाल्यावर जागा स्वच्छ करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) अगोदरच्या दिवशी कागदाचा लगदा तयार करायला मदत करतात. संबंधित व्हिडिओ पाहतात. (ज्यामध्ये कागदाच्या लगद्यापासून वस्तू तयार केलेल्या आहेत.) प्रथम आपल्याला जी वस्तू बनवायची आहे, त्या वस्तूचे चित्र रेखाटन किंवा प्रतिकृती समोर ठेवतात.

२) त्या वस्तूच्या आकाराप्रमाणे तार आणि दोऱ्यापासून सांगाडा तयार करतात. एकजीव झालेला कागदाचा लगदा घेऊन आपल्या समोरील चित्राप्रमाणे भाग बनवण्याचा प्रयत्न करतात.

३) योग्य पद्धतीने लगदा थापून आकार तयार करून घेतात. टॅल्कम पावडरचा उपयोग करतात. तयार झालेल्या आकारावर डिंकाच्या साहाय्याने कोरे कागद चिकटवतात.

४) प्रतिकृती तयार झाल्यानंतर वाळवतात. पूर्ण वाळल्यानंतर त्या आकाराला रंग देतात.

---

**उपक्रम क्रमांक : ४**

**उपक्रमाचे नाव : त्रिमित दृश्य निर्मिती – शेती**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना घर अथवा झोपडी, झाडे, सायकल, नांगरणी करणारे शेतकरी, ट्रॅक्टर, कणसासह पिके, बाज/पलंग, कोंबड्या अशी शेतीशी संबंधित जुन्या वर्तमानपत्रातील चित्रे जमा करून आणायला सांगतात. त्याचबरोबर जुने पुठ्ठे, डिंक, कात्री, कटर आणायला सांगतात.
- विद्यार्थ्यांना गटात बसता येईल अशी बैठक व्यवस्था करतात.
- तयार झालेले साहित्य एकत्र मांडून एकसंध त्रिमित दृश्य रचना तयार होण्यासाठी सपाट पृष्ठभाग तयार करून ठेवतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** कलात्मक कौशल्य, संवादकौशल्य, सांघिक कार्य करण्याचे कौशल्य.

**आवश्यक साहित्य :** घर अथवा झोपडी, झाडे, सायकल, नांगरणी करणारे शेतकरी, ट्रॅक्टर, कणसासह पिके, बाज/पलंग, कोंबड्या अशी शेतीशी संबंधित रंगीत चित्रे, जुने पुठ्ठे, डिंक, कात्री, कटर इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांचे गट तयार करतात. विद्यार्थ्यांनी शिक्षकांकडे जमा केलेल्या रंगीत चित्रांमधून बाह्य रेषांवर कापलेली चित्रे प्रत्येक गटाला वाटतात.

२) विद्यार्थ्यांना प्राप्त झालेली चित्रे जुन्या पुठ्ठ्यांवर डिंकाच्या साहाय्याने चिकटवायला सांगतात.

३) तयार झालेल्या प्रत्येक चित्राच्या मागे दोन-दोन काटकोन त्रिकोण आकारातील पुठ्ठे जोडतात. ज्यामुळे त्या आकृत्या सरळ सपाट पृष्ठभागावर उभ्या राहतील. क्रमवार गटांकडून तिथे टेबलवर जमा करतात.

४) एका सरळ पृष्ठभागावर एक एक करून एकसंध त्रिमित दृश्य रचना करतात. सर्व चित्रे वेगळ्या टेबलावर जमा करून विद्यार्थ्यांना स्वतः चित्रमांडणी करून, वेगळी त्रिमित दृश्य रचना करण्यासाठी प्रोत्साहित करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी आपापल्या गटात बसतात.

२) शिक्षकांनी पुरवलेली चित्रे त्यावर चिकटवून पुठ्ठा चित्रानुसार कापतात. तयार झालेल्या चित्राच्या मागे दोन काटकोन त्रिकोण चित्र व्यवस्थित उभे राहील अशा पद्धतीने चिकटवतात.

३) तयार झालेली चित्रे शिक्षकांकडे जमा करतात. शिक्षकांनी केलेल्या कृतीचे निरीक्षण करतात.

४) शिक्षकांच्या सूचनेनंतर स्वतः त्या चित्रांपासून त्रिमित दृश्य रचना करतात.

## २) प्राणायाम/योग/ध्यानधारणा/श्वसनाची तंत्रे

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **सर्वांगासन व्यायाम**

**पूर्वनियोजित कृती :**

- सर्वप्रथम शिक्षक सर्वांगासन व्यायामाचे प्रात्यक्षिक करून दाखविण्याचे नियोजन करतात व शिक्षक विद्यार्थ्यांकडून सर्वांगासन व्यायामाचे प्रकार करून घेतात. यासाठी नियोजन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** शारीरिक लवचिकता, शारीरिक स्नायूंचा विकास, चपळता.

**आवश्यक साहित्य :** योगासन पट्टी

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक सर्वांगासनाचे प्रात्यक्षिक करून दाखवतात.

२) सर्वप्रथम शिक्षक आसनपट्टीवर पाय जमिनीला समांतर ठेवतात.

३) त्यानंतर ९०° कोनात पाय वर घेतात.

४) त्यानंतर १८०° कोनात पाय हाताचा आधार घेऊन पाठीमागे घेतात.

५) त्यानंतर ९०° कोनात पाय वर घेतात व पाठीला हाताचा आधार देतात.

**विद्यार्थी कृती :**

१) सर्वप्रथम विद्यार्थी आसनपट्टीवर पाय जमिनीला समांतर ठेवतात.

२) त्यानंतर ९०° कोनात पाय वर घेतात.

३) त्यानंतर १८०° कोनात पाय हाताचा आधार घेऊन पाठीमागे घेतात.

४) त्यानंतर ९०° कोनात पाय वर घेतात व पाठीला हाताचा आधार देतात.

**संदर्भ साहित्य :**

१) आयुष मंत्रालय भारत सरकारची योगासनासंदर्भात अधिकृत यूट्यूब लिंक.

२) आयुष मंत्रालय भारत सरकार – योगासन पद्मासनाचा व्हिडिओ.

https://youtube.com/@ministryofayushofficial?si=T8DRU5J7V2bqAjtj

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : विविध योगासने**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक एक दिवस अगोदर विद्यार्थ्यांना उपक्रमासंदर्भात आवश्यक साहित्य सोबत आणण्यासाठी सांगतात, तसेच वेळेसंदर्भात योग्य सूचना देतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** शारीरिक लवचिकता, शारीरिक स्नायूंचा विकास, चपळता, समन्वयता, एकाग्रता, श्वासावरील नियंत्रण.

**आवश्यक साहित्य :** योगासन पट्टी

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक सर्वप्रथम विद्यार्थ्यांना सोपी योगासने करून दाखवतात.

२) शिक्षक हास्याचे प्रकार करून दाखवतात.

३) श्वासासंदर्भात योगासनांचे प्रकार करून दाखवतात.

४) शिक्षक विद्यार्थ्यांना उजव्या हाताच्या अंगठ्याने उजवी नाकपुडी हळुवार बंद करून डाव्या नाकपुडीने श्वास घेण्यासाठी सांगतात. त्यानंतर अनामिका व करंगळीने डाव्या नाकपुडीला बंद करून उजव्या नाकपुडीवरील अंगठा बाजूला करून उजव्या नाकपुडीने श्वास घेणे. अशा प्रकारे तीन आवर्तने करून दाखवतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी सर्वप्रथम सोपी योगासने करतात.

२) विद्यार्थी हास्यांचे प्रकार शिक्षकांसोबत करतात.

३) श्वासासंदर्भात योगासनांचे प्रकार करतात.

४) विद्यार्थी उजव्या हाताच्या अंगठ्याने उजवी नाकपुडी हळुवार बंद करून डाव्या नाकपुडीने श्वास घेतात. त्यानंतर अनामिका व करंगळीने डाव्या नाकपुडीला बंद करून उजव्या नाकपुडीवरील अंगठा बाजूला करून उजव्या नाकपुडीने श्वास घेतात. अशा प्रकारे तीन आवर्तने करून दाखवतात.

**संदर्भ साहित्य :**

१) 'आयुष' मंत्रालय भारत सरकारची योगासनासंदर्भात अधिकृत यूट्यूब लिंक.

२) 'आयुष' मंत्रालय भारत सरकार – योगासन

३) https://youtube.com/@ministryofayushofficial?si=T8DRU5J7V2bqAjtj

## ३) पर्यावरण संवर्धन

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव : शालेय परिसरातील कचऱ्याचे ऑडिट करणे.**

**पूर्वनियोजित कृती :**

- 'शालेय परिसरातील कचऱ्याचे ऑडिट' या उपक्रमाचे आयोजन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :**

१) पर्यावरण संरक्षण

२) निरीक्षण

३) वैज्ञानिक दृष्टिकोन

४) वैयक्तिक व सामाजिक जबाबदारीचे भान

५) संवाद

६) सर्जनशीलता

७) नेतृत्व इ.

**आवश्यक साहित्य :** वही, पेन, खडू, फळा, प्रोजेक्टर, टाकाऊ वस्तू, डिंक, रंगीत कागद, कुदळ, फावडे इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक शालेय परिसरात कचरा गोळा होणारी ठिकाणे निश्चित करतात.

२) शिक्षक शालेय परिसरात तयार होणाऱ्या कचऱ्याचे ऑडिट करण्यासाठी तक्ते बनवतात.

३) तक्त्यामध्ये खालीलप्रमाणे स्तंभ असावेत.

- कचरा गोळा होण्याचे ठिकाण
- कचऱ्याचे स्वरूप (ओला/सुका)
- कचऱ्याचे अंदाजे वजन
- विघटनशील कचऱ्याचे अंदाजे प्रमाण %
- अविघटनशील कचऱ्याचे अंदाजे प्रमाण %
- कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जाते?

४) शिक्षक विद्यार्थ्यांचे गट करून उपक्रमाबाबत सूचना देतात.

५) शिक्षक विद्यार्थ्यांना कचऱ्याचे ऑडिट कसे करावे याबाबत सूचना देतात.

६) माहितीचे संकलन व विश्लेषण करण्यास विद्यार्थ्यांना मदत करतात.

७) प्राप्त माहितीवरून निष्कर्ष काढण्यास मदत करतात.

८) निष्कर्षावरून संभाव्य उपाययोजना कोणत्या करता येतील याविषयी चर्चा घडवून आणतात.

६) संकलित माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांना अहवाल लेखन करण्यास सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या सूचनेनुसार उपक्रमामध्ये सक्रिय सहभागी होतात.

२) विद्यार्थी गटामध्ये प्रकल्प करतात.

३) संकलित माहितीवरून अहवाल लेखन करतात.

४) शिक्षकांना प्रकल्प अवलोकनार्थ सादर करतात.

**संदर्भ साहित्य :**

१) इंटरनेटवरील संबंधित विषयाची माहिती.

२) यूट्यूबवर उपलब्ध असणारे सुयोग्य व समर्पक व्हिडिओ.

३) ग्रंथालयात संबंधित विषयाचे उपलब्ध असणारी पुस्तके.

या उपक्रमाच्या अनुषंगाने शिक्षकांना स्थानिक परिस्थितीनुसार पुढील कृतींचे आयोजनसुद्धा करता येईल.

१) घरात तयार होणाऱ्या कचऱ्याचे ऑडिट करणे.

२) शून्य कचरा प्रकल्प राबवणे.

३) कचऱ्याची सुयोग्य पद्धतीने विल्हेवाट लावणाऱ्या विविध तंत्राची माहिती घेणे.

४) शालेय परिसरातील कचऱ्यापासून कंपोस्ट बनवणे.

५) टाकाऊ वस्तूंपासून बनवलेल्या टिकाऊ वस्तूंचे प्रदर्शन भरवणे.

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..............................................................................................................

**उपक्रमाचे नाव : शालेय परिसरातील कचऱ्याचे ऑडिट करणे.**

**विद्यार्थ्याचे नाव :** ................................................................ **इयत्ता :** ......................

| | |
|---|---|
| कचरा गोळा होण्याचे ठिकाण | .................................................................... |
| कचऱ्याचे स्वरूप (ओला/सुका) | .................................................................... |
| कचऱ्याचे अंदाजे वजन | .................................................................... |
| विघटनशील कचऱ्याचे अंदाजे प्रमाण % | .................................................................... |
| अविघटनशील कचऱ्याचे अंदाजे प्रमाण % | .................................................................... |
| कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जाते? | ....................................................................<br>.................................................................... |

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रम : चला निसर्गमित्र बनूया**

**पूर्वनियोजित कृती :**

- विद्यार्थ्यांसाठी 'चला निसर्गमित्र बनूया' या उपक्रमांतर्गत सर्पमित्राचे व्याख्यान आयोजित करणे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :**

१) पर्यावरण संरक्षण जाणीवजागृती

२) वैज्ञानिक दृष्टिकोन

३) वैयक्तिक व सामाजिक जबाबदारीचे भान

४) संवाद

५) माहिती संकलन

६) नेतृत्व इत्यादी

**आवश्यक साहित्य :** खडू, फळा, प्रोजेक्टर इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गातील जिज्ञासू व आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन निसर्गमित्र मंडळ स्थापना करतात. या मंडळामार्फत 'सर्पमित्र व्याख्यान' या पर्यावरणपूरक उपक्रमाचे आयोजन करतात.

२) परिसरातील सर्पमित्रांशी संपर्क साधून त्यांचे व्याख्यान/मुलाखतीचे आयोजन करतात व आवश्यक पूर्वतयारी करतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांच्या मदतीने नियोजित शनिवारी व्याख्यानासाठी पोस्टर्स, घोषवाक्ये लावून वातावरण निर्मिती करतात.

४) सर्पमित्र विद्यार्थ्यांना सापांच्या जाती, सापांविषयी असलेल्या अंधश्रद्धा, सापांविषयी शास्त्रीय ज्ञान, सापांचे अन्नसाखळीतील महत्त्व, त्यांच्यापासून स्वतःचा बचाव कसा करावा याबाबत मार्गदर्शन करतात.

५) सर्पमित्र विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान करतात.

६) शिक्षक व्याख्यान संपल्यानंतर विद्यार्थ्यांना अधिक माहितीचे संकलन करायला सांगतात व त्याविषयी सूचना देऊन समारोप करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या सूचनेनुसार उपक्रमामध्ये सक्रिय सहभागी होतात.

२) विद्यार्थी व्याख्यान काळजीपूर्वक ऐकतात व शंका विचारतात.

३) विद्यार्थी निसर्गमित्र म्हणून स्वतःची भूमिका जाणून घेतात.

**संदर्भ साहित्य :**

१) इंटरनेटवरील माहिती

२) यूट्यूबवर उपलब्ध असणारे सुयोग्य व समर्पक व्हिडिओ.

३) ग्रंथालयात संबंधित विषयाचे उपलब्ध असणारी पुस्तके.

या उपक्रमाव्यतिरिक्त शिक्षक 'निसर्गमित्र' उपक्रमांतर्गत पुढील कृतीचे आयोजन करू शकतात.

१) सागरी मित्र या विषयावर व्याख्यान.

२) वृक्षमित्र उपक्रम

३) सापांच्या विविध जाती दाखविणारी पोस्टर्स तयार करणे व त्यांचे सादरीकरण.

४) 'निसर्गमित्र म्हणून माझी भूमिका' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजन.

५) निसर्गमित्र अंतर्गत परिसर स्वच्छता व निर्माल्य संकलन उपक्रम इत्यादी.

## ४) सामाजिक बांधीलकी

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव : समाजातील समस्या व त्यावरील उपाय**

**पूर्वनियोजित कृती :**

- शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने, शिक्षक गावातील/शहरातील/जवळपासच्या क्षेत्रातील एक किंवा अधिक वयोवृद्धांची यादी करतात.
- शिक्षक नियोजनाच्या काही दिवस अगोदर भेट घेतात. (यामध्ये विद्यार्थ्यांचे आजोबा किंवा इतर उपलब्धतेनुसार.) त्यांना शनिवारी शाळेत/एखाद्या वृद्धाच्या घरी/कोणत्याही योग्य सार्वजनिक ठिकाणी येण्याचे निमंत्रण देतात.
- आपुलकीचे/वडिलकीचे/त्यांच्या अनुभवावर आधारित प्रश्न विचारण्यासाठी प्रश्न तयार करतात. (एकत्र कुटुंब, पूर्वीच्या काळात एकमेकांना मदत करण्याची पद्धती, वाहतूक दळणवळण, विविध समारंभ व इतर प्रासंगिक प्रश्न)
- मुलांनाही प्रश्न विचारण्याची संधी देण्यासाठी, प्रश्नांचा सराव घेतात.
- आजोबांना शाळेत घेऊन येणे, त्यांना घरी सोडवणे या सर्व कृती विद्यार्थ्यांनी करण्याचे नियोजन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** संवादकौशल्य, जीवनकौशल्य

**आवश्यक साहित्य :** जेष्ठ नागरिकांचा छोटेखानी सत्कार करण्यासाठी फुले.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक गावातील/शहरातील/जवळपासच्या क्षेत्रातील एक किंवा अधिक वयोवृद्धांना शाळेत बोलावतात.

२) शिक्षक त्यांचे शब्द सुमन/प्रत्यक्ष फूल/फुले देऊन स्वागत करतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्याशी संवाद साध्यण्यास सांगतात.

४) शिक्षक विद्यार्थ्यांशी वयोवृद्ध व्यक्तींबरोबर साधलेल्या संवादाबद्दल चर्चा करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) स्वागत समारंभात भाग घेतात.

२) ज्येष्ठांशी संवाद साधतात.

३) विद्यार्थी त्यांना काही आपुलकीचे/वडिलकीचे/त्यांच्या अनुभवावर आधारित प्रश्न विचारतात. (एकत्र कुटुंब, पूर्वीच्या काळात एकमेकांना मदत करण्याची पद्धती, वाहतूक दळणवळण, लग्न समारंभ व इतर प्रासंगिक प्रश्न)

३) आजोबांना शाळेत घेऊन येणे, त्यांना घरी सोडवणे या पर्यंत सर्व कृती शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी करतात.

---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : कागदाची गंमत व किंमत**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना घरी, परिसरात अथवा शाळेत वापरून झालेले कागद जमा करण्यास सांगतात. उदा. खराब कागद, पुठ्ठे, लग्नपत्रिका, गिफ्टचे खराब पेपर, खराब रंगीत कागद जुन्या वह्यांचे लिहून उपयोगात आणलेले कागद.
- शिक्षक उपक्रमासाठी आवश्यक साहित्याची यादी करतात, यातील विद्यार्थ्यांना सहज शक्य होईल ते साहित्य आणायला सांगतात व उर्वरित साहित्य शिक्षक उपलब्ध करून देतात. शिक्षक कागदाचा पुनर्वापर करून बनवायच्या विविध वस्तूंची यादी करतात.

  जसे – ओरिगामी, शोभेच्या वस्तू, तोरण, माळा, फुले, मुखवटे, वह्या, पुठ्ठ्यांचे घर, यान, वारी इत्यादी कृतींची चर्चा करतात.
- शिक्षक कागदापासून विविध वस्तू बनवण्यासाठी वेळेचे नियोजन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, संप्रेषण, सहकार्य, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधीलकी निसर्गप्रेम, सर्जनशीलता.

**आवश्यक साहित्य :** टाकाऊ खराब झालेले कागद, लग्नपत्रिका, खराब गिफ्ट पेपर, खराब रंगीत कागद, जुन्या वह्यामधील लिहून उपयोगात आणलेले कागद, पुठ्ठा, डिंक, दोरा, सुई, कात्री, इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांशी कागदाच्या उपयोगाविषयी चर्चा करतात. कागद कसा तयार होतो या प्रक्रियेविषयी माहिती सांगतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना आपण कागद कोठे वापरतो याविषयी माहिती देतात.

३) वापरात आलेल्या कागदांचे नंतर काय होते याविषयी माहिती देतात.

४) शिक्षक विद्यार्थ्यांना टाकाऊ कागदांच्या लगद्यापासून विविध वस्तू बनविण्यासंदर्भात मार्गदर्शन करतात.

५) शिक्षक टाकाऊ कागदांपासून विविध वस्तू बनवून घेतात.

६) शिक्षक उपक्रमातील कृती करताना आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मदत व मार्गदर्शन करतात.

७) शिक्षक विद्यार्थ्यांनी वस्तू बनवून झाल्यानंतर प्रश्नावलीच्या आधारे कागदाची बचत व कागदाच्या पुनर्वापराविषयी चर्चा करतात. प्रश्न विचारून चर्चा (प्रश्नोत्तरे, गप्पागोष्टी) करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी कागदाचे उपयोग समजून घेतात. कागद कसा तयार होतो याची प्रक्रिया समजून घेतात.

२) विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारचे टाकाऊ, खराब झालेले कागद, लग्नपत्रिका, गिफ्टचे खराब पेपर, खराब रंगीत कागद, जुन्या वह्यांमधील लिहून उपयोगात आणलेले कागद, जमा करतात.

३) विद्यार्थी कागदापासून बनवायच्या विविध वस्तूंची यादी करतात.

४) कागदाच्या लगद्यापासून वस्तू बनविण्याची कृती समजून घेऊन प्रत्यक्ष वस्तू बनवतात अथवा कागदापासून तयार होणाऱ्या वस्तू तयार करतात.

५) विद्यार्थी आवश्यक तेथे शिक्षकांची मदत घेतात.

६) विद्यार्थी कागदाच्या पुर्नवापराविषयी चर्चेत सहभागी होतात.

७) विद्यार्थी कागदाची बचत करतात. कागद जपून वापरण्याविषयी निर्णय घेतात.

**संदर्भ साहित्य :**

१) टाकावू कागदाच्या लगद्यापासून तयार करण्यात आलेल्या वस्तूचे फोटो.

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..............................................................................................

**उपक्रमाचे नाव : कागदाची गंमत व किंमत**

**विद्यार्थ्याचे नाव :** ........................................................................ **इयत्ता :** ....................

**प्रश्न १ :** कागद कसा तयार होतो?

**उत्तर :** ..............................................................................................

..............................................................................................

**प्रश्न २ :** कागदाचा वापर कुठे-कुठे केला जातो?

**उत्तर :** ..............................................................................................

..............................................................................................

**प्रश्न ३ :** कागदाचा पुनर्वापर शक्य आहे का? पुनर्वापर शक्य असल्यास कशा प्रकारे?

**उत्तर :** ..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

**प्रश्न ४ :** कागदाचा पुनर्वापर करणे का गरजेचे आहे?

**उत्तर :** ..............................................................................................

..............................................................................................

**प्रश्न ५ :** तुम्ही कागदाची बचत कशी कराल?

**उत्तर :** ..............................................................................................

..............................................................................................

**प्रश्न ६ :** कागदाचा पुनर्वापर आणि निर्सगाचे संवर्धन यांचा संबंध आहे का?

**उत्तर :** ..............................................................................................

..............................................................................................

## ५) व्यक्तिमत्त्व विकास

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : नकाशावरील माझे स्थान**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना आपण कोठे राहतो याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करतात. पत्ता लिहिण्यासाठी खालीलप्रमाणे छापील मजकुरासह A4 कागद तयार करतात.

जसे : स्वतःचे नाव : ..........................................................................................

वडिलांचे नाव : ..........................................................................................

घराचा पत्ता : ..........................................................................................

..........................................................................................

घर क्रमांक : ..........................................................................................

रस्ता : ..........................................................................................

वार्ड क्र. : ..........................................................................................

गाव/शहर : ............................, ता. : ........................., जि. ........................

राज्य : ........................, देश : ........................, पिन कोड : ........................

पत्ता लिहिण्यासाठी लागणारी माहिती जसे : गाव/शहर, जिल्हा, राज्य, देश याबद्दल माहिती देतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, संभाषण, बौद्धिक विकास, तंत्रज्ञान कौशल्ये

**आवश्यक साहित्य :** पत्ता लिहिण्यासाठी खालीलप्रमाणे छापील मजकुरासह A4 कागद (प्रत्येक विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र). तालुक्याचा, जिल्ह्याचा नकाशा (शाळेनुसार), महाराष्ट्र राज्याचा व भारत देशाचा नकाशा, पृथ्वीगोल, मोबाईल किंवा संगणकावर Map App असलेला (Mapples/Google).

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना पत्ता कसा लिहावा हे समजावून सांगतात. पत्ता लिहिण्यासाठी खालीलप्रमाणे छापील मजकुरासह A4 कागद प्रत्येक विद्यार्थ्याला देतात. जसे :

स्वतःचे नाव : ..............................................................................................

वडिलांचे नाव : ..............................................................................................

घरचा पत्ता : ..............................................................................................

..............................................................................................

घर क्रमांक : ..............................................................................................

रस्ता : ..............................................................................................

वार्ड क्र. : ..............................................................................................

गाव/शहर : ..............................., ता. : ............................, जि. ..........................,

राज्य : ........................., देश : ........................., पिन कोड : ...................................

२) शिक्षक विद्यार्थ्यांना आपले गाव/शहर नकाशावर शोधण्यास सांगतात.

३) शिक्षक मोबाइल किंवा संगणकावर नकाशा दाखविणारा ॲप ओपन करून त्यावर शाळेचा पत्ता शोधून शाळेचे स्थान जिल्ह्यात, राज्यात व देशात (Zoom in, Zoom out) करून दाखवितात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी दिलेल्या कागदानुसार छापील मजकुरावर आपल्या गाव/शहराचे स्थान आपला पूर्ण पत्ता लिहितात. जसे :

स्वतःचे नाव : ..............................................................................................

वडिलांचे नाव : ..............................................................................................

घराचा पत्ता : ..............................................................................................

..............................................................................................

घर क्रमांक : ..............................................................................................

रस्ता : ..............................................................................................

वार्ड क्र. : ..............................................................................................

गाव/शहर : ..............................., ता. : ............................, जि. : ............................,

राज्य : ........................., देश : ........................., पिन कोड : ...................................

(टीप : विद्यार्थी पत्ता लिहिलेला कागद स्वत: संचिकेमध्ये लावतात.)

२) विद्यार्थी नकाशाचे निरीक्षण करून आपल्या गावाचे स्थान तालुका, जिल्हा, राज्य व देश या नकाशांमध्ये शोधून दाखवितात.

३) विद्यार्थी घरी जाऊन मोठ्यांच्या मदतीने नकाशा ॲपवर आपल्या घराचे स्थान शोधतात.

४) आपले गाव/शहर यांची इतिहास गुणवैशिष्ट्ये यांच्या नोंदी देखील करतात.

**संदर्भ साहित्य :** https://youtu.be/AjA98JZt7E0?si=4zwkiOK3qL-wvZi1

**पूरक कृती :** • Map Tricks • Map Reading • Types of Maps

---

**उपक्रम क्रमांक :** २

**उपक्रमाचे नाव :** **एक दिवस व्यावसायिकासंगे**

**पूर्वनियोजन कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना खालील आपल्या परिसरातील विविध व्यवसाय व व्यावसायिकांची माहिती देतात. परिसरातील कोणत्याही एका व्यावसायिकासोबत एक दिवस राहून त्याचे संपूर्ण कार्य व दिनक्रम समजून घेण्याबाबत सांगतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** आर्थिक साक्षरता, समानानुभूती, व्यावसायिक कौशल्यांची माहिती, विश्लेषण, मत मांडणे, निरीक्षण, संप्रेषण

**आवश्यक साहित्य :** वही, पेन.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या परिसरातील विविध व्यवसाय, परिचित व्यावसायिक उदा. किराणा दुकानदार, भाजी विक्रेता, फळ विक्रेता, मोबाइल दुकानदार इत्यादींची माहिती गोळा करण्यास सांगतात.

२) परिसरातील कोणत्याही एका व्यवसायिकासोबत त्यांची परवानगी घेऊन किमान २ तास त्यांच्या सोबत व्यतित करण्यास सांगतात.

३) सदर कालावधीत स्वतःच्या सुरक्षिततेबाबत काळजी घेण्याविषयी अवगत करतात.

४) सदर कालावधीत त्यांच्या कामाचे निरीक्षण करून पुढील बाबींच्या नोंदी घेण्याबाबत सांगतात.

उदा. व्यवहार कसे होतात, काय-काय तयारी करावी लागते, कामाचे स्वरूप, दैनंदिन कमाई, मालाची/सामानांची मांडणी, व्यवस्था इत्यादी.

५) सदर कृती सुट्टीच्या दिवशी करून त्याविषयी अनुभवांचे सादरीकरण, चर्चा 'आनंददायी शनिवार' च्या नियोजित वेळी घेतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी त्यांच्या परिसरातील विविध व्यवसाय, परिचित व्यावसायिक उदा., किराणा दुकानदार, भाजी विक्रेता, मोबाइल दुकानदार इत्यादींची माहिती गोळा करतात.

२) परिसरातील विविध व्यावसायिकांबाबत उपक्रम घेण्याबाबत पूर्वपरवानगी व चर्चा करतात.

३) नेमून दिलेल्या कालावधीमध्ये सदर उपक्रम पूर्ण करतात.

४) उपक्रमादरम्यान येणाऱ्या अडचणी, त्यावरील उपाय, आर्थिक उलाढाल, नफा–तोटा यांविषयी संबधित व्यावसायिक यांचेशी चर्चा करून नोंदी करतात.

५) 'आनंददायी शनिवार' या दिवशी सादरीकरण व चर्चा करतात.

**संदर्भ साहित्य :**

१) विविध व्यावसायिकांची माहिती.

**टीप :** मोठ्या स्वरूपात सदर उपक्रम विद्यार्थ्यांचे गट करून घेता येईल.

---

**उपक्रम क्रमांक :** ३

**उपक्रमाचे नाव : सोडवून तर पाहा**

**पूर्वनियोजित कृती :**

- विविध पारंपरिक कोडी, बौद्धिक खेळ, हुमणे यांची माहिती एकत्रित करतात. त्याचबरोबर वर्तमानपत्रातील बौद्धिक खेळ. उदा., सुडोकू, शब्दकोडे, अंककोडे यांविषयी एकत्रित मांडणी करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** तर्क, कार्यकारणभाव, चिकित्सक विचार, पडताळा घेणे, सर्जनशीलता, बौद्धिक विकास, भाषिक विकास.

**आवश्यक साहित्य :** विविध कोडी, चित्रे, शब्दकोडे.

**शिक्षक कृती :**

१) बौद्धिक विकास हा व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वाचा पैलू आहे. याकरिता वर्गात शिक्षक विद्यार्थ्यांना विविध पारंपरिक कोडी, बौद्धिक कोडी, पारंपरिक हुमणे, Tic Tac Toe खेळ स्वतंत्र किंवा गटात सोडविण्यास सांगतील. यांची गटात स्पर्धा घेण्याचे नियोजन करतात.

२) शिक्षक विद्यार्थ्यांनी विविध कोडी सोडविल्यानंतर छोटी छोटी कोडी, सुडोकू, शब्द कोडे, अंक कोडे, स्वतः तयार करण्यास सांगतील. निर्मिती केलेली कोडी इतर गटांना सोडविण्याकरिता देतील. निर्मिती केलेली कोडी, साहित्य यांचे वर्गात प्रदर्शन भरवतात.

**विद्यार्थी कृती :**

१) शिक्षकांनी दिलेली कोडी, हुमणे सोडविण्याकरिता प्रत्यक्ष उत्स्फूर्त सहभाग नोंदवतील. वर्गात स्पर्धेमध्ये सक्रिय सहभागी होतील.

२) विद्यार्थी प्रत्यक्ष कोडी, शब्दकोडी, अंककोडी सोडवतील. प्रत्यक्ष स्वतः गटात सुडोकू, शाब्दिक कोडे, अंक कोडे तयार करतील.

**संदर्भ साहित्य :**

१) जादुई गणित पुस्तिका, वर्तमानपत्रातील शाब्दिक कोडे, सुडोकू.

---

**उपक्रम क्रमांक : ४**

**उपक्रमाचे नाव : अभिरूप ग्रामसभा**

**पूर्वनियोजित कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना गावातील ग्रामपंचायत, त्यांची कार्यपद्धती याविषयी सविस्तर माहिती देतात.

२) आवश्यकतेनुसार संबधित व्हिडिओ सादरीकरण, प्रत्यक्ष ग्रामपंचायतील भेट देण्याचे नियोजन करतात.

३) अभ्यासाकरिता आणि अधिक माहिती करिता पुरेसा कालावधी व स्रोत उपलब्ध करून देतात. जसे – इंटरनेट, संगणक इत्यादी.

४) शिक्षक विद्यार्थ्यांना ग्रामसभेमधील लोकप्रतिनिधी, निवड प्रक्रिया निकष याबद्दल माहिती गोळा करण्यास सांगतात.

५) शिक्षक विद्यार्थ्यांना उपक्रमादरम्यान होणारी चर्चा, प्रत्येक व्यक्तीची भूमिका याविषयी माहिती देतात.

**कृती :**

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** नेतृत्व, संघभावना, संवाद, कौशल्य, संप्रेषण, संविधानिक मुल्ये.

**आवश्यक साहित्य :** टेबल, खुर्च्या आणि स्टेशनरीसह सुसज्ज वर्गखोली.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांसोबत सर्व फर्निचरने सुसज्ज खोलीत बैठक व्यवस्था करून घेतात.

२) शिक्षक आवश्यक स्टेशनरी उपलब्ध करून देतात. जसे : कागद, पेन, पेन्सिल इत्यादी.

३) नियोजनानुसार विद्यार्थ्यांकडून अभिरूप ग्रामसभा यांची बैठक व्यवस्था करून घेतात.

४) अभिरूप ग्रामसभेचे प्रत्यक्ष कामकाज किमान दोन तास चालेल या दृष्टीने चर्चेचे मुद्दे, निर्णय याची नोंद घेतात. उदा., ग्रामसभेची विषयपत्रिका, गावातील समस्या व त्यावर उपाय, आवश्यक ठराव इत्यादी.

**विद्यार्थी कृती :**

१) शिक्षकांच्या मदतीने खोलीत आवश्यक फर्निचरसह बैठक व्यवस्था करतात.

२) अभिरूप ग्रामसभेतील कामकाजात प्रत्यक्ष सहभाग घेतात.

३) सदर उपक्रमात अभिप्राय नोंदवितात.

## ६) कृषीविषयक साक्षरता

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : 'फार्म टू प्लेट' अंतर्गत भरडधान्य पाककृती स्पर्धा**

**पूर्वनियोजित कृती :**

- विद्यार्थ्यांमध्ये कृषीविषयक साक्षरता विकसित होण्यासाठी भरडधान्य पाककृती स्पर्धा आयोजन करणे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :**

१) कृषी तंत्रज्ञान व अन्नप्रक्रिया

२) वैज्ञानिक दृष्टिकोन

३) अन्न परिरक्षण

४) सुसंवाद

५) माहिती साक्षरता

६) नेतृत्व

७) सादरीकरण कौशल्य इत्यादी

**आवश्यक साहित्य :** वही, पेन, खडू, फळा, प्रोजेक्टर, डस्टबिन, रंगरंगोटीचे साहित्य, अन्नपदार्थांची मांडणी करण्यासाठी प्लेट इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना भरडधान्य पाककृती स्पर्धेबाबत माहिती देतात.

२) शिक्षक या स्पर्धेच्या सूचना विद्यार्थ्यांना समजावून देतात.

- भरडधान्याचा वापर करून पाककृती तयार करावयाची आहे.
- अन्नपदार्थाचे पोषणमूल्य व तयार करण्याची कृतीचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण करावे.
- पाककृती तयार करण्यासाठी पालकांचे मार्गदर्शन घेऊ शकतात.
- स्वतःची सुरक्षितता व योग्य काळजी घेऊन पालकांच्या मार्गदर्शनाखाली पाककृती घरी तयार करायची आहे.
- स्पर्धेच्या दिवशी तयार केलेली पाककृती व सोबत माहिती वजा पोस्टर शाळेत आणावे.
- आकर्षक मांडणी करून पाककृती बाबत २ मिनिटे सादरीकरण करावे.

३) विद्यार्थ्यांना पाककृती स्पर्धेसाठी पुरेसा वेळ देऊन स्पर्धेच्या दिवसाचे नियोजन सांगतात.

४) प्रत्यक्ष स्पर्धेच्या दिवशी विद्यार्थ्यांना टेबल व इतर साहित्य देऊन योग्य मांडणी करण्यास सांगतात.
५) मांडणी झाल्यानंतर मूल्यमापन पथकामार्फत मूल्यमापन करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या सूचनेनुसार उपक्रमामध्ये सक्रिय सहभागी होतात.
२) पालकांच्या मदतीने विविध पाककृती तयार करून आणतात.
३) पाककृतीबाबत सादरीकरण करतात.
४) भरडधान्याचे आहारातील महत्त्व व पोषणमूल्याबाबत माहिती सांगतात.

**संदर्भ साहित्य :**

१) इंटरनेटवरील माहिती
२) यूट्यूबवर उपलब्ध असणारे सुयोग्य व समर्पक व्हिडिओ.
३) ग्रंथालयात संबंधित विषयाचे उपलब्ध असणारे पुस्तक.

या उपक्रमाअंतर्गत स्थानिक परिस्थितीनुसार पुढील कोणत्याही कृतीचे नियोजन करता येईल.

१) शेतातून ताटात येईपर्यंत होणारा अन्नधान्याचा प्रवास समजून घेणेसाठी क्षेत्रभेटीचे आयोजन करणे किंवा सुसंगत शैक्षणिक व्हिडिओ दाखवणे.
२) अन्नप्रक्रिया उद्योगामधील प्रगतशील शेतकऱ्यांच्या मुलाखतीतून कृषीविषयक विविध प्रक्रिया समजून घेणे.
३) पशुपालन, जनावरांचा गोठा, कुक्कुटपालन, दूध डेअरी इत्यादी यांसारख्या शेतीपूरक व्यवसाय स्थळांना भेटी देणे व माहिती मिळवणे.
४) एक राज्य निवडून त्या राज्याच्या आहार वैशिष्ट्यांवर आधारित पाककृतीची माहिती संकलित करणे.
५) भरडधान्यापासून तयार होणारे अन्नपदार्थ आणि त्यांचे पोषणमूल्य याबाबत जाणीवजागृती करणारे पोस्टर प्रदर्शन आयोजित करणे.

---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : शेतीपूरक व्यवसाय**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांसाठी शेतीपूरक व्यवसाय या विषयांतर्गत दूधव्यवसायाविषयी माहिती घेणे या उपक्रमाचे आयोजन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :**

१) शेतीपूरक व्यवसायाबद्दल माहिती

२) संवादकौशल्य

३) नेतृत्व

४) निरीक्षण इत्यादी

**आवश्यक साहित्य :** क्षेत्रभेटीसाठी आवश्यक साहित्य

**शिक्षक कृती :**

**भरडधान्य पाककृती स्पर्धा :**

१) शिक्षक शेतीपूरक व्यवसायांतर्गत विद्यार्थ्यांना दूधव्यवसायमधील दुग्धपदार्थ निर्मिती, त्यातील विविधता, नवीन तंत्रज्ञान, पॅकेजिंग इत्यादीविषयी माहिती होण्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या दूध डेअरी प्रकल्पाला क्षेत्रभेट या उपक्रमाबाबत माहिती देतात.

२) शिक्षक क्षेत्रभेटीसाठी आवश्यक ते नियोजन करतात.

३) शिक्षक क्षेत्रभेटी करिता पूर्वनियोजनासाठी आवश्यक पत्रव्यवहार, वाहन सुविधा आणि इतर मानत्यांबाबत कामकाज करतात.

४) विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीदरम्यान घ्यावयाची काळजी, करावयाचे निरीक्षण व नोंदी याबाबत सविस्तर सूचना देतात.

५) विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीदरम्यान शंकांचे समाधान होण्यासाठी प्रश्न विचारण्यास आणि संवाद साधण्यास प्रोत्साहित करतात.

६) शिक्षक क्षेत्रभेटीतील आलेले अनुभव त्यांच्याशी संवाद साधून जाणून घेतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या सूचनेनुसार क्षेत्रभेट उपक्रमामध्ये सहभागी होतात.

२) विद्यार्थी क्षेत्रभेटीदरम्यान दिलेली माहिती समजून घेतात आणि नोंदी करतात.

३) विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान होण्यासाठी प्रश्न विचारतात.

४) विद्यार्थी क्षेत्रभेटीतील आलेले अनुभव सांगतात.

**संदर्भ साहित्य :**

इंटरनेट व माहिती पुस्तिका

या उपक्रमाच्या अनुषंगाने स्थानिक परिस्थितीचा विचार करून, परिसराजवळ असणाऱ्या शेतीपूरक

व्यवसाय केंद्राला क्षेत्रभेट आयोजित करणे किंवा तज्ज्ञ व्यावसायिकांचे व्याख्यान आयोजित करणे.

१) काजू प्रक्रिया उद्योग क्षेत्रभेट/व्याख्यान.

२) रेशीम उत्पादन प्रक्रिया क्षेत्रभेट/व्याख्यान.

३) विविध फळांपासून क्रश, जॅम निर्मिती क्षेत्रभेट/व्याख्यान

४) मत्स्यव्यवसाय व्याख्यान.

५) खाद्यपदार्थ गुणवत्ता व पॅकेजिंग या विषयावर व्याख्यान इत्यादी.

# ७) वित्तीय व्यवस्थापन

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : शालेय बचत बँक**

**पूर्वनियोजित कृती :**

- शालेय बचत बँक निर्मिती करण्यासाठी सर्वप्रथम शिक्षक हे आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांकडे शालेय कामकाज करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांकडे बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी करावयाची जबाबदारी, कामे, कर्तव्य यांच्याविषयी सर्वप्रथम सर्वांना मार्गदर्शन करतात व जबाबदारी निश्चित करतात.
- हिशोबाचे नियोजन व व्यवस्थापन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** बचत करण्याची सवय, बँकिंग व्यवहार कौशल्य

**आवश्यक साहित्य :** वही, पेन, बचत पुस्तक.

**शिक्षक कृती :**

१) शालेय शालेय बचत बँक निर्मिती करण्यासाठी सर्वप्रथम शिक्षक हे आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांकडे शालेय कामकाज करण्यासाठी बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांची करावयाची जबाबदारी, कामे, कर्तव्य यांच्याविषयी सर्वप्रथम सर्वांना मार्गदर्शन करतात व जबाबदारी निश्चित करतात.

२) हिशोबाचे नियोजन व व्यवस्थापन करतात. शिक्षक विद्यार्थ्यांना बँकेचे महत्त्व समजावून सांगतात.

३) बँकेत पैसे ठेवणे आणि काटकसरीची सवय लागते व पैशांचे संरक्षण होते. बचत केलेल्या पैशावर बँक व्याज देते ही माहिती शिक्षक विद्यार्थ्यांना देतात.

**विद्यार्थी कृती :**

१) शाळेतील विद्यार्थ्यांकडे शालेय कामकाज करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांकडे बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांची करावयाची जबाबदारी, कामे, कर्तव्य पार करतात व जबाबदारी समजावून घेतात.

२) हिशोबाचे नियोजन व व्यवस्थापन करतात. विद्यार्थ्यांना बँकेचे महत्त्व समजते. बँकेत पैसे ठेवण्याची आणि काटकसरीची सवय लागते. विद्यार्थी बँकेचे महत्त्व समजावून घेतात.

३) शिल्लक पैसे घरात न ठेवता ते बँकेत ठेवण्याची सवय लागते. थेंबे थेंबे तळे साचे या पद्धतीने बँकेत पैसे ठेवल्याने पैशांमध्ये वाढ होत असते.

४) विद्यार्थी आपल्याजवळील पैशाचे नियोजन करतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/S6qV1_Qzmv8?si=DqjFoBxfisqp2CxA

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : माझ्या कमाईचे नियोजन**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांसोबत चर्चा करून खाद्य मेळाव्याची तारीख, खाद्यपदार्थ, इतर सजावट याबाबत नियोजन करतात.
- खाद्य मेळाव्यात जो खाद्यपदार्थ बनविणे शक्य असेल त्याची विद्यार्थिनिहाय यादी तयार करतात.
- खाद्यपदार्थ खाद्य मेळाव्यासाठी ठेवण्यापूर्वी त्याला आलेला सगळा खर्च – साहित्य खरेदी, बनविण्याची किंमत, एकूण खर्च खाद्यपदार्थ प्रत्येक प्लेट विक्री किंमत, एकूण विक्री किंमत, झालेला नफा/तोटा याची नोंद ठेवण्यास सांगतात.
- मिळालेल्या नफ्याचे नियोजन २५% रक्कम एका दिवशीची घरात भाजी विकत घेणे. तसेच २५% रक्कम गरजूंना मदत करणे व उर्वरित रक्कम बचत करणे असे करायचे आहे असे सांगतात.
- यापैकी कोणी कसे नियोजन केले/खर्च केला याबाबत नोंद ठेवण्यास सांगतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** बचत करण्याची सवय, बँकिंग व्यवहार कौशल्य

**आवश्यक साहित्य :** वही, पेन, बचत पुस्तक.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना खालील प्रश्न विचारतात.

- खाद्य मेळाव्यासाठी खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी किती खर्च आला?
- खाद्यपदार्थ विक्रीतून किती मिळकत झाली?
- नफा झाला की तोटा झाला?
- किती रुपये नफा/तोटा झाला?
- मिळालेल्या रकमेपैकी २५% रक्कम एका दिवसाची भाजी विकत घेणे तसेच २५% रक्कम गरजूंना मदत केल्यावर बचतीसाठी किती पैसे वाचतील?

२) ज्या विद्यार्थ्याचा जास्त नफा झाला त्याचे कौतुक करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी आनंद मेळाव्यात सहभागी होतात व विक्रीसाठी खाद्यपदार्थ ठेवतात. (उदा. पाणी–पुरी, भेळ, मिसळ पाव इत्यादी.)

- खाद्य मेळावा यासाठी खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी किती खर्च लागला हे सांगतात.

- खाद्यपदार्थ विक्रीतून किती मिळकत झाली हे सांगतात.
- नफा झाला की तोटा झाला हे सांगतात.
- किती रुपये नफा/तोटा झाला सांगतात.
- मिळालेल्या रकमेपैकी २५% रक्कम एका दिवसाची भाजी विकत घेणे. तसेच २५% रक्कम गरजूला दान केल्यावर बचतीसाठी किती पैसे वाचतील याबाबत माहिती देतात.

२) ज्या विद्यार्थ्यांचा जास्त नफा झाला त्याचे टाळ्या वाजवून कौतुक करतात.

**संदर्भ साहित्य :**

https://youtu.be/9ZxpWI1rDTE?si=VBYfrxOzoJpK67ds

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..............................................................................

**उपक्रमाचे नाव : माझ्या कमाईचे नियोजन** **कृतीचे नाव :** ..............................

**विद्यार्थ्याचे नाव :** ........................................................ **इयत्ता :** ..............

**प्रश्न १ :** खाद्य मेळाव्यासाठी खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी किती खर्च आला?

**उत्तर :** ..............................................................................

**प्रश्न २ :** खाद्यपदार्थ विक्रीतून किती मिळकत झाली?

**उत्तर :** ..............................................................................

**प्रश्न ३ :** नफा झाला की तोटा झाला?

**उत्तर :** ..............................................................................

**प्रश्न ४ :** किती रुपये नफा/तोटा झाला?

**उत्तर :** ..............................................................................

..............................................................................

**प्रश्न ५ :** मिळालेल्या रकमेपैकी २५ % रक्कम एका दिवसाची भाजी विकत घेणे तसेच २५% रक्कम गरजूंना दान केल्यावर बचतीसाठी किती पैसे वाचतील?

**उत्तर :** ..............................................................................

..............................................................................

..............................................................................

## ८) आरोग्य रक्षण करण्यासाठी उपाययोजना

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : 'सकस आहार – पळतील आजार'**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक सकस आहारामुळे आजारांपासून कसे संरक्षण होते या विषयीची माहिती, संदर्भचित्रे व व्हिडिओ यांचे संकलन करतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना सकस आहारामुळे आजारांपासून कसे संरक्षण होते याविषयी माहिती गोळा करण्यासाठी घटक ठरवून देतात.

  घटक :
  - सकस आहार म्हणजे काय?
  - सकस आहाराचे घटक कोणकोणते आहेत?
  - सकस आहाराला अजून कोणत्या नावाने संबोधले जाते?

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** तर्कसंगत विचार, चिकित्सक वृत्ती, आरोग्यदायी सवयी, सकस आहाराचे महत्त्व.

**आवश्यक साहित्य :** चित्रे, व्हिडिओ क्लिप

**शिक्षक कृती :** पूर्वनियोजनानुसार शिक्षक विद्यार्थ्यांना सकस आहारामुळे आजारांपासून कसे संरक्षण होते याविषयी एकत्रित करण्यासाठी सांगितलेली माहिती विचारतात.

१) सकस आहार म्हणजे काय? (उत्तर : रोजच्या अन्नपदार्थांत पुरेशा प्रमाणात पोषणतत्त्वांचा समावेश करणाऱ्या आहाराला 'सकस आहार' असे म्हणतात.)

२) सकस आहाराचे घटक कोणकोणते आहेत? (उत्तर : कर्बोदके, दुग्धजन्य पदार्थ, फळे व भाजीपाला, स्निग्धपदार्थ, तृणधान्य, खनिजे, पाणी व कडधान्य इत्यादी.)

३) सकस आहाराला अजून कोणत्या नावाने संबोधले जाते? (उत्तर : समतोल आहार)

शिक्षक विद्यार्थ्यांना सकस आहार कोणता? सकस आहारामुळे आजारांपासून होणारा बचाव याविषयी खालील मुद्द्यांचे महत्त्व पटवून देतात.

- सकस आहार : रोजच्या अन्नपदार्थांत पुरेशा प्रमाणात पोषकतत्त्वांचा समावेश असणाऱ्या आहाराला सकस आहार असे म्हणतात.

- निरोगी शरीरासाठी संतुलित, पौष्टिक व सकस आहार आवश्यक आहे. योग्य वाढ आणि विकासासाठी ते आवश्यक आहे. तसेच आहारात पोषकतत्त्वांचे योग्य संतुलन राखणे गरजेचे आहे. शिवाय भाज्या, फळे, मांस यांचे सेवन केल्याने आजार टाळण्यास आणि आरोग्य सुधारण्यास मदत होते.
- सकस आहारामुळे आजारांपासून संरक्षण :
  - सकस आहार शरीराला योग्य प्रकारे कार्य करण्यास मदत करते आणि रोगापासून संरक्षण करते.
  - सकस आहारामुळे एन्झाईम्स, हार्मोन्स आणि शरीरातील इतर रसायने तयार होण्यास मदत होते.
  - सकस आहार शरीराच्या पेशींची दुरुस्ती आणि पुनर्निमिती करण्यासाठी पोषक ठरतो.
  - सकस आहार अन्नातून पोषकतत्त्वे शोषून घेण्यास आणि वापरण्यास मदत होते.
  - पोषक आहार नियमित शारीरिक क्रियाकलाप हे हृदयविकार, कर्करोग आणि पक्षाघात यासह जुनाट आजारांना प्रतिबंध करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.
  - मुलांमध्ये आणि पौगंडावस्थेतील मुलांमध्ये नियमित शारीरिक हालचाली केल्याने आणि सकस आहाराचे सेवन केल्याने लठ्ठपणा आणि संबंधित जुनाट आजारांचा धोका कमी होतो.
  - जीवनसत्त्वे ए, सी, ई, डी आणि बी6 निरोगी रोगप्रतिकारक यंत्रणा टिकवून ठेवण्यास उपयुक्त आहेत. आपल्या रोगप्रतिकारक शक्तीसाठी सकारात्मक कार्य करणाऱ्या खनिजांमध्ये जस्त, तांबे आणि सेलेनियमचा समावेश आहे.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी पूर्वनियोजनानुसार शिक्षकांनी ठरवून दिलेल्या घटकांवर संकलित केलेली माहिती सांगतात.

२) सकस आहार व त्यामुळे आजारांपासून बचाव याविषयी शिक्षकांनी सांगितलेल्या माहितीचे काळजीपूर्वक श्रवण करतात.

३) निरोगी जीवनशैलीसाठी सकस आहाराचे असलेले महत्त्व आत्मसात करतात.

४) दैनंदिन जीवनात सकस व संतुलित आहार देतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtube.com/@ministryofayushofficial?si=T8DRU5J7V2bqAjtj

2) https://en.wikipedia.org/wiki/Nutrition

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ....................................................................................................................

**उपक्रमाचे नाव : सकस आहार – पळतील आजार** **कृतीचे नाव :** ..........................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ...................................................................... **इयत्ता :** ..........................

**प्रश्न १ :** सकस आहार म्हणजे काय?

**उत्तर :** ........................................................................................................................

........................................................................................................................

**प्रश्न २ :** सकस आहाराचे घटक कोणकोणते आहेत?

**उत्तर :** ........................................................................................................................

........................................................................................................................

**प्रश्न ३ :** सकस आहाराला अजून कोणत्या नावाने संबोधले जाते?

**उत्तर :** ........................................................................................................................

**उत्तर :**

१) रोजच्या अन्नपदार्थांत पुरेशा प्रमाणात पोषणतत्वांचा समावेश करणाऱ्या आहाराला 'सकस आहार' असे म्हणतात.

२) उत्तर : कर्बोदके, दुग्धजन्य पदार्थ, फळे व भाजीपाला, स्निग्धपदार्थ, तृणधान्य, खनिजे, पाणी व कडधान्य इत्यादी.

३) समतोल आहार

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : स्वसंरक्षण – प्रात्यक्षिक व व्याख्यान**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक स्वसंरक्षणावर आधारित माहिती, व्हिडिओ यांचे संकलन करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** धैर्य, साहस, दूरदृष्टी, हस्त व नेत्र समन्वय, आत्मविश्वास.

**आवश्यक साहित्य :** चित्रे, व्हिडिओ क्लिप.

**शिक्षक कृती :** पूर्वनियोजनानुसार शिक्षक विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणावर गोळा करण्यासाठी माहिती विचारतात. जसे :

१) स्वसंरक्षण म्हणजे काय? (उत्तर : स्वतःचे, एखाद्याच्या मालमत्तेचे किंवा एखाद्याच्या गटाचे रक्षण करण्याची कृती म्हणजे स्वसंरक्षण होय.)

२) स्वसंरक्षणासाठी कोणकोणते उपक्रम घेतले जातात? (उत्तर : ज्युडो, कराटे, बॉक्सिंग, तायक्वांदो इत्यादी.) शिक्षक विद्यार्थ्यांना स्वसंरक्षण म्हणजे काय? दक्षता, स्वसंरक्षण तंत्र यांविषयी व्याख्यान व प्रात्यक्षिकाच्या आधारे समजावतात.

**१) स्वसंरक्षण :** स्वसंरक्षण हा एक प्रतिकारक उपाय आहे ज्यामध्ये स्वतःचे आरोग्य आणि कल्याण हानीपासून बचाव करणे समाविष्ट आहे. धोक्याच्या वेळी बळाचा वापर करण्याचे कायदेशीर औचित्य म्हणून स्वसंरक्षणाच्या अधिकाराचा वापर अनेक अधिकारक्षेत्रांमध्ये उपलब्ध आहे. स्वसंरक्षण म्हणजे हिंसाचाराच्या तात्काळ धोक्याचा सामना करण्यासाठी शारीरिक शक्तीचा वापर करणे होय. अशी शक्ती सशस्त्र किंवा निःशस्त्र असू शकते. दोन्ही बाबतीत, यशाची शक्यता विविध निकषांवर अवलंबून असते, एकीकडे धोक्याच्या तीव्रतेशी संबंधित, परंतु बचावकर्त्याच्या मानसिक आणि शारीरिक तयारीवर देखील.

शालेय वयात अथवा नंतरही स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिल्यास ते संकटात उपयोग ठरते. शारीरिक अत्याचार फक्त स्त्रियांवर होतात असे नाही, तर मुलांवर देखील होऊ शकतात, म्हणून शालेय वयातच मुलामुलींना स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण द्यावे व त्यांनी प्रशिक्षणातील डावपेचांचा सराव करावा. खरे स्वसंरक्षण प्रत्यक्ष शारीरिक झटापटीच्या कितीतरी आधीपासूनच सुरू होते. त्यामुळे संभाव्य संकट ओळखण्याइतके सावध असावे.

- अत्यंत ठामपणे शाब्दिक किंवा देहबोली सारख्या माध्यमांचा वापर करणे.
- संरक्षणात्मक रणनीतींचा अवलंब करून संकट टाळणे अथवा त्याची तीव्रता खूप कमी करणे.
- आणि केवळ अंतिम उपाय म्हणूनच प्रत्यक्ष शरीरबळाचा वापर करणे.

ही स्वसंरक्षणाची तीन मूलतत्त्वे आहेत. या तीन मूलतत्त्वांच्या साहाय्याने प्रभावीपणे प्रतिबंध करता येतो. स्वसंरक्षण करताना धोका ओळखणे, धोक्याची तीव्रता कमी करणे व प्रतिहल्ला करणे या बाबी महत्त्वाच्या ठरतात.

२) **स्वरक्षणाच्या वेळी घ्यावयाची दक्षता :** दररोज घराबाहेर जावे लागत असल्यामुळे स्वतःच्या बाबतीत पुढीलप्रमाणे काळजी घेतल्यास स्वसंरक्षण करण्यासाठी सक्षम होण्यास मदत होईल. संकट आल्यावर प्रतिकार करण्यापेक्षा संकट येऊच नये यासाठी पुढील प्रमाणे दक्षता घेता येतील.

अ) सावधानता : कमी रहदारीचा व कमी लोकवस्तीचा रस्ता टाळावा. तेथून जाणे गरजेचे असल्यास विश्वासू व्यक्तींच्या सोबतीने जावे.

- भुयारी मार्गाचा वापर करताना सावध असावे. बरोबर विश्वासू व्यक्ती असल्याशिवाय या मार्गाचा वापर करू नये.
- आपली वैयक्तिक माहिती, आपला मोबाइल नंबर, घरचा फोन नंबर व पालकांचा मोबाईल नंबर तसेच घरचा पत्ता अनोळखी लोकांना देऊ नये.
- गैरफायदा घेतला जाऊ नये म्हणून आपल्यातील कमतरता अनोळखी व्यक्तींना सांगू नये.
- बऱ्याच मुलामुलींना प्रवासात, रस्त्यावरून चालताना इअरफोन, हेडफोन लावून संगीत ऐकण्याची किंवा मोबाइलवर बोलण्याची सवय असते. त्यात ते दंग असतात. सर्वसामान्य वाटणाऱ्या या सवयींमुळे आजूबाजूचे भान राहत नाही. चोर, गुंड व मवाली अशा मुलांचा फायदा घेतात.
- शाळा भरण्यापूर्वी किंवा शाळा सुटल्यावर शाळेच्या आवारात किंवा वर्गामध्ये एकटे थांबू नये.
- सुट्टीच्या दिवशी शाळेत कोणत्याही कारणाने बोलावले असता इतर विद्यार्थ्यांना देखील विचारून खात्री करून घ्यावी. तसेच पालकांना देखील त्याबाबत माहिती द्यावी.
- शाळेत किंवा कुठेही जाताना अनोळखी व्यक्तीच्या (स्त्री अथवा पुरुष) गाडीतून जाण्याचे टाळावे.
- एखाद्या वेळी जवळचे नातेवाईक, आई अथवा वडिलांचे आजारपण, दवाखाना, अपघात यांसारखी कारणे सांगून नेण्यासाठी शाळा, महाविद्यालय अथवा घरी अचानक अपरिचित व्यक्ती येतात, अशा वेळी त्या प्रसंगाची खात्रीशीर माहिती घेऊन ओळखीच्या व खात्रीच्या व्यक्तीला सोबत घेऊन जावे. अनोळखी व्यक्तीबरोबर कुठल्याही परिस्थितीत एकटे जाऊ नये.

ब) पूर्वसूचना : बरेचदा संकटाची चाहूल समोरच्या व्यक्तीच्या बोलण्यावरून, शारीरिक हालचालींवरून लागते किंवा आंतरिक सूचना मिळते अशा वेळी जास्त सावधगिरी बाळगावी.

- गर्दीच्या वेळी जर कोणी शारीरिक जवळीक करत असेल तर, त्याच वेळी आसपासच्या लोकांच्या लक्षात येईल अशा पद्धतीने स्पष्ट बोलून विरोध करावा.
- वाईट हेतूने त्रास देणारे लोक जर पाठलाग करणे, जवळ यायचा प्रयत्न करणे, पकडण्याचा प्रयत्न करणे, जवळीक साधण्यासाठी पत्ता विचारणे किंवा रस्ता विचारणे, सतत अवाजवी खुशामत किंवा स्तुती करणे, सतत मदत करण्याची संधी शोधणे, महाग व चैनीच्या वस्तू भेट देण्याचे आमिष दाखवणे, हॉटेलमध्ये नेणे, चित्रपटगृहात नेणे, मॉलमध्ये खरेदीसाठी नेणे, मोटरसायकल अथवा कारमधून दूरवर फिरायला नेणे व अधिकारी असल्याची बतावणी करून एकटे बाजूला घेऊन जाणे अशा कोणत्याही प्रकारे वागत असतील, तर ही अत्याचाराची पूर्वसूचना समजून सावध व्हावे.
- आपल्या येण्या–जाण्याच्या मार्गात कोणी पाठलाग करत असल्याचे लक्षात आल्यास सावध व्हावे व पालकांना याबाबत माहिती द्यावी.

क) देहबोली : माणसाच्या देहबोलीवरून नजरेवरून, त्याच्या मनातले भाव समजू शकतात. अत्याचार करणाऱ्या माणसाची नजर व हालचालींचा अंदाज घ्यावा व सतर्क रहावे. मुलांनी नेहमी विचारांच्या तंत्रेत हरवून निष्काळजीपणे न चालता निर्भयपणे पण तितकेच सावधपणे चालावे. हल्ला कोठूनही होऊ शकतो. मात्र चालण्यात निर्भयता आणि आत्मविश्वास दिसला तर, सहसा कोणीही वाटेला जाण्याचे धाडस करत नाही. स्वसंरक्षणासाठी शारीरिक ताकद महत्त्वाची असतेच; पण मानसिक स्वास्थ हे तितकेच महत्त्वाचे असते. निर्णयक्षमता, दृढता, आत्मविश्वास यांचाही वाटा शारीरिक व मानसिक सुदृढते इतकाच महत्त्वाचा असतो. त्यासाठी पुढील गोष्टी महत्त्वाच्या ठरतात.

- आत्मविश्वास न गमवता संकटाला धैर्याने तोंड द्यावे.
- मुलींनीदेखील उद्युक्त करणारी वेशभूषा व वर्तन टाळावे.
- मुले व मुली दोघांनीही नेहमी सावध असावे.
- अचानक हल्ला, जबरदस्ती झाल्यास प्रसंगावधान ठेवावे. वेळ व प्रसंग पाहून शक्ती अथवा युक्तीचा वापर करावा.

ड) शारीरिक सक्षमता : शारीरिक सक्षमता असणे ही मूलभूत बाब आहे व अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी ती गरजेची आहे. संकटसमयी गर्भगळीत झाले तर कोणीही संरक्षण करू शकणार नाही. जर मन कणखर असेल तर आजूबाजूची परिस्थिती, आजूबाजूच्या वस्तू, आपल्या जवळील वस्तू तसेच शरीराचे वेगवेगळे अवयव उदाहरणार्थ – आपले डोके, कपाळ, हातांची बोटे, नखे, मूठ, तळहात, कोपर, गुडघे व पायांच्या टाचा यांचा उपयोग परिस्थितीनुसार स्वसंरक्षणासाठी करता येतो. हा उपयोग करताना मनगट बोटे वाकवून स्वसंरक्षण करता येते.

३) **स्वसंरक्षण तंत्र :** स्वसंरक्षणाच्या तंत्राकडे आक्रमणाची सज्जता म्हणून न पाहता अंगचटीला येऊन हल्लेखोरांच्या संभाव्य हल्ल्यापासून स्वतःचा बचाव करण्याची पूर्वतयारी म्हणून पाहिले पाहिजे.

४) **स्वसंरक्षणाच्या पद्धती :** (खालील स्वसंरक्षणाच्या पद्धतीचे शिक्षक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृती करून दाखवतील व विद्यार्थ्यांकडून ही प्रात्यक्षिक करून घेतील.)

- वार करणे.
- वार अडवणे.
- प्रतिस्पर्ध्यावर ताबा मिळविणे.
- सुरक्षित पद्धतीने खाली पडणे.

**विद्यार्थी कृती :**

१) स्वसंरक्षणावर पूर्वनियोजनानुसार ठरविलेल्या घटकांवर आधारित माहितीचे संकलन करून शिक्षकांना सांगतात.

२) विद्यार्थी शिक्षकांनी सांगितलेली स्वसंरक्षण, दक्षता व स्वसंरक्षणाची तंत्रे याविषयीची माहिती काळजीपूर्वक श्रवण करतात व प्रत्यक्ष कृतीत सहभागी होतात.

३) शिक्षकांनी स्वसंरक्षणाच्या पद्धतीचे दाखविलेल्या प्रात्यक्षिकाप्रमाणे विद्यार्थी स्वतः प्रत्यक्ष कृती करतील.

**संदर्भ साहित्य :**

१) स्वसंरक्षण मार्गदर्शिका – महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

२) स्वसंरक्षणावर आधारित उपक्रम ज्युडो या खेळाची लिंक.

1) https://youtu.be/LyqgUwQCxIQ?feature=shared

## ९) एकविसाव्या शतकातील कौशल्ये

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **जल ही जीवन है !**

**पूर्वनियोजित कृती :**

- पाणी म्हणजे जल. जल म्हणजे जीवन म्हणूनच जल हे तो कल है ! थोडक्यात, जल ही जीवन है ! हा संदेश विद्यार्थी जीवनातच रुजायला हवा. शिक्षक विद्यार्थ्यांशी आदल्या दिवशी मैदानावर वरीलप्रमाणे संवाद साधतात आणि पुढील बाबतीत माहिती संकलित करायला सांगतात.
    - पाण्याचे उपयोग.
    - पाण्याचे स्रोत
    - पाणी बचतीसाठी उपाययोजना
    - पाण्याचे महत्त्व
    - रेन वॉटर हार्वेस्टिंग
    - पाणी अडवा, पाणी जिरवा इत्यादी.

२) उपक्रमाच्या आदल्या दिवशी शिक्षक वर्गातील विद्यार्थ्यांचे गट तयार करून घेतात.

३) पाण्यासंदर्भात आवश्यक ती माहिती गटनिहाय संकलित करण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांना वृत्तपत्र, क्रमिक पुस्तके, दीक्षा ॲप इत्यादींची मदत घेण्यास सांगतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** चिकित्सक विचार, स्वजाणीव, परिणामकारक संप्रेषण, समस्या निराकरण.

**आवश्यक साहित्य :** क्रमिक पुस्तके, वृत्तपत्रे, वही, पेन, वृक्षारोपणासाठी विविध प्रकारच्या बिया इत्यादी.

**शिक्षक कृती :** शिक्षक विद्यार्थ्यांना गटनिहाय पुढीलप्रमाणे तोंडी प्रश्न विचारून संवाद घडवून आणतात.

१) पाण्याचा उपयोग आपण कोणकोणत्या कामासाठी करतो ?

२) पाणी दूषित होऊ नये म्हणून कोणते उपाय करता येतील ?

३) पाणी हेच जीवन आहे असे का म्हणतात ?

४) पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण किती आहे ?

५) पाणी बचतीसाठी आपल्याला कोणते उपाय करता येतील ?

६) अनेक वेळा ग्रहण काळातील पाणी टाकून दिले जाते याबद्दल आपले मत काय आहे ?

७) उन्हाळ्यात आठ दिवस नळाला पाणी आलेच नाही, तर घरच्या घरी पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे?

८) वाळवंटात गेलात तर तुम्ही पाण्याची गरज कशी भागवणार?

९) दुबई–भारत भुयारी मार्गाबद्दल आपणांस काही माहिती असल्यास त्याबद्दल सांगा.

१०) राजस्थानमध्ये जल पुनर्भरणासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत?

११) उदयपूर हे वाळवंटातील शहर असूनही थंड ठिकाण म्हणून का ओळखले जाते?

१२) पाणीटंचाई समस्या निराकरणासाठी तूम्ही काय करू शकता?

वरीलप्रमाणे अनेक प्रश्न विचारून, विद्यार्थ्यांत संवाद घडवून आणतात. आपल्या जीवनातील पाण्याचे महत्त्व, पाण्याची बचत, पाणी–समस्या निवारणबाबत आपली जबाबदारीविषयक सुसंवाद साधतात.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात.

२) पाण्याचे महत्त्व जाणून आपली जबाबदारी समजून घेतात. इतर तत्सम उपक्रमात सहभाग नोंदवतात.

३) विद्यार्थी या उपक्रमामुळे प्रेरित होऊन आपल्या परिसरात पाणीबचतीसाठी प्रयत्न करतात.

**संदर्भ साहित्य :** क्रमिक पुस्तके, वृत्तपत्र, दीक्षा ॲपवरील व्हिडिओ. शिक्षक वरील कृतीसोबत तत्सम प्रकारच्या पुढील काही नावीन्यपूर्ण कृती इयत्तेला अनुसरून विद्यार्थ्यांकडून करून घेतात.

- इस्राईलची शेतीबाबत माहिती संग्रहित करा.
- पावसाचे प्रमाण वाढण्यासाठी आपण कोणत्या गोष्टी करू शकतो याबद्दल थोडक्यात लिहा.
- विविध प्रकारच्या बियांचे संकलन करून बीज बँक तयार करा.
- स्थानिक परिस्थितीनुसार पाण्याचे स्रोत – उदा., नदी, विहीर, कालवा, तलाव, धरण, पाझर तलाव इत्यादी ठिकाणी क्षेत्रभेट आयोजन.
- जल पुनर्भरणसाठी शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांचे श्रमदान.
- एक मूल, एक झाड अंतर्गत वृक्षारोपण करून वृक्षसंवर्धन करणे.
- पाण्याचे महत्त्व स्पष्ट करणाऱ्या घोषवाक्यांचे संकलन, वादविवाद स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा, चित्रकला स्पर्धाचे आयोजन.

पाण्याचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी विद्यार्थी स्वरचित कविता लेखन, नाट्यीकरण, पथनाट्य, जनजागृतीकरिता रॅलीचे आयोजन हस्तलिखित भित्तिपत्रक इत्यादी उपक्रमांचे आयोजन करतात.

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ......................................................................

**उपक्रमाचे नाव : जल ही जीवन है!** **कृतीचे नाव :** ..............................

**विद्यार्थ्याचे नाव :** .................................................... **इयत्ता :** ....................

**प्रश्न १ :** पाण्याचा उपयोग आपण कोणकोणत्या कामासाठी करतो?

**उत्तर :** ......................................................................

......................................................................

**प्रश्न २ :** पाणी दूषित होऊ नये म्हणून कोणते उपाय करता येतील?

**उत्तर :** ......................................................................

......................................................................

**प्रश्न ३ :** पाणी हेच जीवन आहे असे का म्हणतात?

**उत्तर :** ......................................................................

......................................................................

**प्रश्न ४ :** पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण किती आहे?

**उत्तर :** ......................................................................

......................................................................

**प्रश्न ५ :** पाणी बचतीसाठी आपल्याला कोणते उपाय करता येतील?

**उत्तर :** ......................................................................

......................................................................

**प्रश्न ६ :** अनेक वेळा ग्रहण काळातील पाणी टाकून दिले जाते याबद्दल आपले मत काय आहे?

**उत्तर :** ......................................................................

......................................................................

**प्रश्न ७ :** उन्हाळ्यात आठ दिवस नळाला पाणी आलेच नाही, तर घरच्या घरी पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे?

**उत्तर :** ....................................................................................................

....................................................................................................

**प्रश्न ८ :** वाळवंटात गेलात तर तुम्ही पाण्याची गरज कशी भागवणार?

**उत्तर :** ....................................................................................................

....................................................................................................

**प्रश्न ९ :** दुबई–भारत भुयारी मार्गाबद्दल आपणांस काही माहिती असल्यास त्याबद्दल सांगा.

....................................................................................................

....................................................................................................

**प्रश्न १० :** राजस्थानमध्ये जल पुनर्भरणासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत?

**उत्तर :** ....................................................................................................

....................................................................................................

**प्रश्न ११ :** उदयपूर हे वाळवंटातील शहर असूनही थंड ठिकाण म्हणून का ओळखले जाते?

**उत्तर :** ....................................................................................................

....................................................................................................

**प्रश्न १२ :** पाणीटंचाई समस्या निराकरणासाठी तूम्ही काय करू शकता?

**उत्तर :** ....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : मी छायाचित्रणकार (Videographer) झालो!**

**पूर्वनियोजित कृती :**

- व्हिडिओग्राफी करण्याकरिता आवश्यक तांत्रिक साहित्य उदा. मोबाईल, संगणक उपलब्ध करून घेणे.
- छायाचित्रण करण्याकरिता आवश्यक सामाजिक, सांस्कृतिक विषयांची यादी विद्यार्थ्यांना करण्यास सांगणे. उदा. सामाजिक समस्या, स्थानिक परिसराची/शहराची वैशिष्ट्यपूर्ण/महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये, सांस्कृतिक पार्श्वभूमी इ.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** –

**आवश्यक साधनसामग्री :** –

**शिक्षक कृती :**

१) उपक्रमाविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करून (Short Video) (२ ते ५ मिनिटांचा) करता येईल असा विषय निवडण्यास सांगतात.

२) Videography (छायाचित्रण) करण्याचे तांत्रिक निकष व त्याविषयीचे मार्गदर्शन करतात.

३) विद्यार्थी मोबाईलद्वारे त्यांनी निवडलेल्या विषयावर चित्रीकरण करू शकतील याप्रकारे प्रत्यक्ष दिग्दर्शन करतात.

४) छायाचित्रण पूर्ण झाल्यानंतर व्हिडिओचे पुढील कामकाज उदा. Editing, voice over कसा द्यायचा, त्याकरिताची उपलब्ध मोफत ॲप्स यांविषयी प्रत्यक्ष दिग्दर्शनाद्वारे माहिती देतात.

५) सदर उपक्रममकरिता विद्यार्थ्यांना गटनिहाय कामकाज करण्यास सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

शिक्षकांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार निवडलेल्या विषयावर आवश्यक खबरदारी घेऊन २ ते ५ मिनिटांकरिताचे छायाचित्रण करतात.

प्रत्यक्ष शिक्षक व सहाध्यायी यांच्या मदतीने छायाचित्रण पूर्ण करतात. आनंददायी शनिवारी निर्मिती करण्यात आलेल्या व्हिडिओचे गटनिहाय प्रत्यक्ष सादरीकरण करतात.

# १०) समता

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : नातेसंबंध हाताळण्याचे कौशल्य.**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना शनिवारच्या आनंददायी तासिकेसाठी शुक्रवारी शेवटच्या तासिकेत मुलांना सूचना देतात.
- शाळेची वनभोजनासाठी गावातील द्राक्ष बागायतीला भेट देऊन वनभोजनासाठी गावातीलच ठिबकसिंचन सेंद्रियशेती, उस ाचे गुऱ्हाळ, गुलाबाची बाग, हुरडा पार्टी, ग्रीन हाऊस, शेततळे, ग्रीन प्लांटपैकी शेतीला भेट देण्यासाठी जाणार आहोत यासाठी मुलांना सूचित करतात.
- आपापल्या घरून डबा घेऊन येण्याची सूचना करतात. वनभोजनासाठी लागणारे साहित्य सोबत ठेवायला सांगतात.
- आपण वनभोजनासाठी कुठे जाणार आहोत याची आपल्या पालकांना पूर्वकल्पना देतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :**

१) नातेसंबंधाचा विकास
२) वैज्ञानिक दृष्टिकोन
३) भौगोलिक व पर्यावरणीय दृष्टिकोन
४) संवाद कौशल्याचा विकास
५) अचूक निरीक्षणे टिपली
६) आत्मविश्वास वाढला
७) सहकार्यवृत्तीचा विकास
८) सर्जनशीलतेचा विकास
९) साहित्यिक दृष्टिकोनाचा आनंद

**आवश्यक साहित्य :** डबा, पाण्याची बॉटल, टोपी, शूज, नोंदवही, आसन पट्टी, वही, पेन, दुर्बीण, कॅमेरा इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना परिपाठातच वनभोजनाला जाण्यासाठी सर्व सूचना देतात.
२) मुले वनभोजनासाठी लागणारे साहित्य घेऊन आलेत याची खात्री करून घेतात.

३) विद्यार्थी संख्येनुसार गट तयार करून एक गटप्रमुख नेमतात.

४) वनभोजनादरम्यान शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होणार नाही याची सूचना देतात.

५) मुलांना भौगोलिक, पर्यावरणीय, कृषी, सौंदर्यात्मक, नैसर्गिक, जलव्यवस्थापन, जलस्रोत, कौशल्याधिष्ठित शिक्षण, प्राणीमात्राबद्दल सहानुभूती, श्रमाचे महत्त्व, शेतीचे प्रकार, या दृष्टिकोनातून निसर्गाचे निरीक्षण करण्यासाठी मार्गदर्शन करतात.

६) प्रथमतः वनभोजनस्थळी मुलांची बैठकव्यवस्था सुव्यवस्थित करून डबे खाण्याची सूचना देतात व डबा एकमेकांना शेअर करून खाण्याची सूचना देतात.

७) वनभोजन घेतानाचे अनुभव, प्रसंग, लिहायला सांगतात व वनभोजन स्थळी कुठल्याच प्रकारचा कचरा होणार नाही याची दक्षता घ्यायला सांगितली जाते.

८) त्यानंतर विद्यार्थ्यांना सांगितलेल्या मुद्द्यांवर निरीक्षणे लिहायला सांगतात.

९) शेवटी विविध गुणदर्शनाच्या सुप्त कलागुणांना वाव म्हणून गाण्याच्या भेंड्या, डान्स, कविता, नकला हा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम होतो.

१०) शिक्षक विद्यार्थ्यांचे निरीक्षण करतात. कोणत्या विद्यार्थ्यात कोणते गुण आहेत हे टिपतात कार्यक्रमादरम्यान वेळावेळी सूचना देतात. प्रोत्साहित करतात वनभोजनाचे अनुभव सांगायला सांगतात पण यातून काय शिकलो हे सांगतात.

### विद्यार्थी कृती :

१) विद्यार्थ्यांनी निसर्गाच्या सानिध्यात स्वतःच्या डब्याचा मनसोक्त आस्वाद घेत घेत अनेक मित्रांच्या डब्यांमधील पदार्थांचाही आस्वाद घेतात.

२) त्याचसोबत पर्यावरणीय भौगोलिक दृष्टिकोनातून वैज्ञानिक दृष्टी, कृषी, निसर्गाचे निरीक्षण केले. त्याचसोबत पक्षी, फळे, पाने, शेती, माती, दगड, गोटे, मातीचे व पिकांचे प्रकार, पाण्याचे स्रोत अशा विविध गोष्टींची निरीक्षणे केली व टिपणेही काढली.

३) मुलांनी आनंदाने गाण्याच्या भेंड्या, डान्स, स्वलिखीत कथा–कवितांचे सादरीकरण करून स्वअभिव्यक्तीचा अनुभव घेतला आणि यामुळेच स्नेहभोजन हा उपक्रम अतिशय महत्त्वपूर्ण तर ठरलाच त्याच बरोबर सहकार्यवृत्ती, भौगोलिक, नैसर्गिक, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकासही झाला.

४) विद्यार्थ्यांच्या अनुभवातून मुले व मुलींना सादर करण्याची संधी दिल्याने त्यामध्ये मैत्रीचे संबंध परिपक्व होतात. एकमेकांबद्दल सहानुभूती, आदर, विश्वास वाढून निखळ मैत्रीचे संबंध निर्माण होतात.

## ११) क्षेत्रभेट व यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **आपल्या सभोवती (बँक क्षेत्रभेट)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक क्षेत्रभेटीसाठी बँकेला भेट देण्याचे निश्चित करतात.
- शिक्षक परिसरातील क्षेत्रभेटीसाठी निवडलेल्या बँक प्रमुखांची परवानगी घेतात व पालकांची पूर्व परवानगी घेतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना सुरक्षासंबंधी व शिस्तीचे पालन होण्यासाठी सूचना देतात. विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घ्यावी याची सूचना देतात. (उदा. पाणी बॉटल ठेवणे, रांगेत चालणे, परवानगीशिवाय अनोळखी वस्तूंना हात लावू नये, शांतता राखणे, लक्षपूर्वक ऐकणे, स्वतःच्या साहित्याची काळजी घेणे इ. सूचना)
- शिक्षक क्षेत्रभेटीसाठी ठिकाण निश्चित झाल्यानंतर विद्यार्थ्यांशी चर्चा करून प्रश्नावली तयार करतात. उदा., गावातील बँक भेट

  १) बँकेचे नाव काय आहे?

  २) बँकेची वेळ किती आहे?

  ३) बँकेत किती कर्मचारी काम करतात?

  ४) बँकेचे खातेदार किती आहेत?

  ५) बँक ग्राहकांसाठी कोणकोणत्या सुविधा देते?

  ६) बँक ग्राहकांसाठी कोणकोणत्या योजना राबवतात?

  ७) बँकेतील व्यवहार कसे केले जातात?

  ८) चेकबुक, एसएमएस, लोन, लॉकर यांबद्दल माहिती मिळवा.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, संप्रेषण, सहकार्य, प्रश्नकौशल्य, व्यावसायिक विकास

**आवश्यक साहित्य :** पूर्वपरवानगीचे पत्र, प्रश्नावली, पाण्याची बाटली, डबा इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक पूर्वनियोजनानुसार विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीसाठी घेऊन जातात.

२) शिक्षक क्षेत्रभेटीच्या ठिकाणी शिस्तीचे व सुरक्षेचे पालन करण्यासाठी सूचना देतात.

३) शिक्षक प्रश्नावलीच्या साहाय्याने क्षेत्रभेटीच्या ठिकाणची माहिती विद्यार्थ्यांना घेण्यास सांगतात.

४) शिक्षक क्षेत्रभेटीच्या ठिकाणी शक्य असल्यास आवश्यक ते फोटो घेतात/विद्यार्थ्यांना घ्यायला सांगतात.

५) शिक्षक क्षेत्रभेटी दरम्यान विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करतात. मदत करतात.

६) शिक्षक विद्यार्थ्यांना अहवाल/प्रकल्प लेखनासाठी मुद्दे देतात. जसे की, क्षेत्रभेटीचे ठिकाण, दिनांक, वार, वेळ, क्षेत्रभेटीचा हेतू, साहित्य, मिळालेली माहिती, समारोप याप्रमाणे विद्यार्थ्यांशी चर्चा करून अहवाल लेखन करून घेतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी प्रश्नावलीच्या मदतीने माहिती मिळवतात.

२) विद्यार्थी क्षेत्रभेटी दरम्यान निरीक्षण करतात. संबंधिताना प्रश्न विचारून आवश्यक माहिती संकलित करतात.

३) विद्यार्थी क्षेत्रभेटीच्या ठिकाणी शिस्तीचे व सुरक्षेचे पालन करतात.

४) विद्यार्थी क्षेत्रभेटीच्या ठिकाणी शक्य असल्यास आवश्यक ते फोटो घेतात. प्रश्न/शंका विचारतात.

५) क्षेत्रभेटीचे ठिकाण, दिनांक, वार, वेळ, क्षेत्रभेटीचा हेतू, साहित्य, मिळालेली माहिती, समारोप या मुद्द्यांच्या आधारे अहवाल लेखन करतात. आवश्यक तेथे फोटो जोडतात.

अशा प्रकारे लघुउद्योग, बंधारा, नदीचा उगम/नदी किंवा स्थानिक परिस्थितीनुसार उपलब्ध ठिकाणी क्षेत्रभेटी देता येतील.

**संदर्भ साहित्य :**

1) https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app&referrer=utm_source%3Dmobile%26utm_campaign%3Dshare_app

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................

**उपक्रमाचे नाव : आपल्या सभोवताली (बँक क्षेत्रभेट)** **कृतीचे नाव :** ..........................................

**विद्यार्थ्याचे नाव :** .......................................................... **इयत्ता :** ....................

**प्रश्न १ :** बँकेचे नाव काय आहे?

**उत्तर :** ..........................................................................

**प्रश्न २ :** बँकेची वेळ किती आहे?

**उत्तर :** ..........................................................................

**प्रश्न ३ :** बँकेत किती कर्मचारी काम करतात?

**उत्तर :** ..........................................................................

**प्रश्न ४ :** बँकेचे खातेदार किती आहेत?

**उत्तर :** ..........................................................................

**प्रश्न ५ :** बँक ग्राहकांसाठी कोणकोणत्या सुविधा देते?

**उत्तर :** ..........................................................................

..........................................................................

**प्रश्न ६ :** बँक ग्राहकांसाठी कोणकोणत्या योजना राबवतात?

**उत्तर :** ..........................................................................

..........................................................................

**प्रश्न ७ :** बँकेतील व्यवहार कसे केले जातात?

**उत्तर :** ..........................................................................

..........................................................................

**प्रश्न ८ :** चेकबुक, एसएमएस, लोन, लॉकर यांबद्दल माहिती मिळवा.

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : वृद्धाश्रम भेट**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक परिसरातील वृद्धाश्रमाचे ठिकाणे, नावे, अंतर इ. बाबत माहिती गोळा करतात.
- शिक्षक परिसरात उपलब्ध वृद्धाश्रमांपैकी कुठे व केव्हा भेट द्यायची याचे नियोजन करतात. संबंधित व्यक्तींना व पालकांना याची पूर्वकल्पना देतात.
- आवश्यकता असल्यास वाहनाची व्यवस्था करतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना शिस्तीचे पालन होण्यासाठी सूचना देतात. विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घ्यावी याची सूचना देतात. उदा. पाणी बॉटल ठेवणे, रांगेत चालणे, वृद्ध व्यक्तींना आदराने व आपुलकीने बोलणे इ. सूचना
- शिक्षक विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटी दरम्यान कोणत्या बाबींची माहिती घ्यावी किंवा निरीक्षण करावे याबाबत सविस्तर पूर्वसूचना देतात.

  उदा. १) वृद्धाश्रमाचे नाव काय आहे?

  २) वृद्धाश्रम कोठे आहे?

  ३) वृद्धाश्रमाला भेट देण्याची वेळ काय आहे?

  ४) वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्तीची संख्या किती आहे?

  ५) वृद्धाश्रमात कोणकोणत्या सोई सुविधा दिल्या जातात?

  ६) वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्ती येण्याचे कारणे काय आहेत?

  ७) वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्तीच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी काय केले जाते?

  ८) वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्तीचे वाढदिवस साजरे केले जातात का?

  ९) वृद्धाश्रमातील वृद्ध व्यक्तींना गप्पागोष्टी केल्यानंतर तुम्हाला कसे वाटले?

  १०) वृद्धाश्रम असावेत का? यावर तुमचे मत सांगा.

  ११) वृद्ध व्यक्तींना वृद्धाश्रमात जाण्याची वेळ येऊ नये यासाठी आपण काय करायला हवे?

  १२) वृद्धाश्रमाला भेट देऊन तुम्हांला कसे वाटले, काय अनुभव आले इत्यादी.
- क्षेत्रभेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांसोबत कशा प्रकारे (प्रश्नोत्तरे, गप्पागोष्टी) चर्चा करणार हे ठरवतात. प्रश्न निश्चित करतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना अहवाल/प्रकल्प लेखनासाठी मुद्दे देतात. जसे कि, क्षेत्रभेटीचे ठिकाण, दिनांक,

वार, वेळ, क्षेत्रभेटीचा हेतू, साहित्य, मिळालेली माहिती, समारोप याप्रमाणे विद्यार्थ्यांशी चर्चा करून अहवाल लेखन करून घेतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, संप्रेषण, सहकार्य, आदर

**आवश्यक साहित्य :** पाण्याची बाटली, डबा इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना परिसरातील वृद्धाश्रमाची माहिती सांगतात.

२) परिसरातील वृद्धाश्रमाला भेट देण्यासाठी विद्यार्थ्यांना शिस्तीसंदर्भात सूचना देतात. (उदा. एका रांगेत चला, स्वतःच्या वस्तू स्वतः सांभाळा, वृद्ध व्यक्तींना आदराने व आपुलकीने बोलणे)

३) शिक्षक विद्यार्थ्यांना परिसरातील क्षेत्रभेटीवेळी पूर्वनियोजनात तयार केलेले प्रश्न विचारून माहिती घेण्यास सांगतात.

४) क्षेत्रभेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांना पूर्वनियोजनात तयार केलेले प्रश्न विचारून चर्चा करतात.

उदा. १) वृद्धाश्रमाचे नाव काय होते?

२) वृद्धाश्रम कोठे होते?

३) वृद्धाश्रमाला भेट देण्याची वेळ काय होती?

४) वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्तींची संख्या किती होती?

५) वृद्धाश्रमात कोणकोणत्या सोईसुविधा दिल्या जातात?

६) वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्ती येण्याची कारणे काय होती?

७) वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्तींच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी काय केले जाते?

८) वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्तींचे वाढदिवस साजरे केले जातात का?

९) वृद्धाश्रमातील वृद्ध व्यक्तींना गप्पागोष्टी केल्यानंतर तुम्हाला कसे वाटले?

१०) वृद्धाश्रम असावेत का? यावर तुमचे मत सांगा.

११) वृद्ध व्यक्तींना वृद्धाश्रमात जाण्याची वेळ येऊ नये यासाठी आपण काय करायला हवे?

१२) वृद्धाश्रमाला भेट देऊन तुम्हांला कसे वाटले, काय अनुभव आले इत्यादी.

५) शिक्षक क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करतात, मदत करतात.

६) विद्यार्थ्यांना आलेल्या अनुभव, मिळालेली माहिती याचे संकलन करण्यास सांगतात.

७) विद्यार्थ्यांकडून पूर्वनियोजनानुसार क्षेत्रभेटीचे अहवाल/प्रकल्प लेखन करून घेतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी परिसरातील भेट दिलेले ठिकाण/स्थळ याचे नाव सांगतात.

२) विद्यार्थी क्षेत्रभेटीदरम्यान शिक्षकांनी दिलेल्या सूचनेनुसार निरीक्षण करतात व आवश्यक माहिती संकलित करतात.

३) विद्यार्थी परिसरातील भेट दिलेल्या स्थळाची माहिती सादर करतात.

४) विद्यार्थी क्षेत्रभेटीनंतर होणाऱ्या चर्चेत सहभागी होतात.

५) विद्यार्थी क्षेत्रभेटीच्या ठिकाणी शक्य असल्यास आवश्यक ते फोटो घेतात. प्रश्न/शंका विचारतात.

६) विद्यार्थी पूर्वनियोजनानुसार क्षेत्रभेटीचे अहवाल/प्रकल्प लेखन करतात.

- अशा प्रकारे लघुउद्योग, बंधारा, नदीचा उगम/नदी, ऐतिहासिक वास्तू किंवा स्थानिक परिस्थितीनुसार उपलब्ध ठिकाणे/स्थळे इ. ना क्षेत्रभेट देता येईल.

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ........................................................................................................

**उपक्रमाचे नाव : वृद्धाश्रम भेट** **कृतीचे नाव :** ......................................

**विद्यार्थ्याचे नाव :** .............................................................. **इयत्ता :** ........................

**प्रश्न १** : वृद्धाश्रमाचे नाव काय आहे?

**उत्तर** : ........................................................................................................

**प्रश्न २** : वृद्धाश्रम कोठे आहे?

**उत्तर** : ........................................................................................................

**प्रश्न ३** : वृद्धाश्रमाला भेट देण्याची वेळ काय आहे?

**उत्तर** : ........................................................................................................

**प्रश्न ४** : वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्तीची संख्या किती आहे?

**उत्तर** : ........................................................................................................

**प्रश्न ५** : वृद्धाश्रमात कोणकोणत्या सोई सुविधा दिल्या जातात?

**उत्तर** : ........................................................................................................

........................................................................................................

**प्रश्न ६** : वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्ती येण्याचे कारणे काय आहेत?

**उत्तर** : ........................................................................................................

........................................................................................................

**प्रश्न ७** : वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्तीच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी काय केले जाते?

**उत्तर** : ........................................................................................................

........................................................................................................

**प्रश्न ८** : वृद्धाश्रमात वृद्ध व्यक्तीचे वाढदिवस साजरे केले जातात का?

**उत्तर** : ..........................................................................................................

**प्रश्न ९** : वृद्धाश्रमातील वृद्ध व्यक्तींना गप्पागोष्टी केल्यानंतर तुम्हांला कसे वाटले?

**उत्तर** : ..........................................................................................................

..........................................................................................................

**प्रश्न १०** : वृद्धाश्रम असावेत का? यावर तुमचे मत सांगा.

**उत्तर** : ..........................................................................................................

..........................................................................................................

**प्रश्न ११** : वृद्ध व्यक्तींना वृद्धाश्रमात जाण्याची वेळ येऊ नये यासाठी आपण काय करायला हवे?

**उत्तर** : ..........................................................................................................

..........................................................................................................

**प्रश्न १२** : वृद्धाश्रमाला भेट देऊन तुम्हांला कसे वाटले?

**उत्तर** : ..........................................................................................................

..........................................................................................................

**उपक्रम क्रमांक : ३**

**उपक्रमाचे नाव : संग्रहालय भेट**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांच्या मदतीने परिसरातील/ गावातील तालुक्यातील/जिल्ह्यातील विविध संग्रहालयांची नावे, अंतर, ऐतिहासिक महत्त्व इ. बाबत माहिती गोळा करतात.
- शिक्षक यादी केलेल्या संग्रहालयापैकी कोणत्या संग्रहालयाला केव्हा भेट द्यायची याचे नियोजन करतात. संबंधित व्यक्तींना व पालकांना याची पूर्वकल्पना देतात. प्रवासासाठी वाहनाची व्यवस्था करतात. दिवस वेळ निश्चित करतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना शिस्तीचे पालन होण्यासाठी सूचना देतात. विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घ्यावी याची सूचना देतात. उदा. पाण्याची बाटली घेणे, रांगेत चालणे, स्वच्छता ठेवणे, संग्रहालयात शांतता राखणे इ.
- शिक्षक क्षेत्रभेटीदरम्यान कोणत्या बाबींची माहिती घ्यावी किंवा निरीक्षण करावे याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देतात.

उदा. १) संग्रहालयाचे नाव काय आहे?

२) संग्रहालय कोणत्या तालुक्यात, कोणत्या जिल्ह्यात आहे?

३) आपण निवडलेल्या संग्रहालयात कशाचा संग्रह आहे?

४) ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह करणे का आवश्यक आहे?

५) संग्रहालयातील वस्तूची काळजी कशा प्रकारे घेतली जाते?

६) या संग्रहालयातील वस्तू कोणत्या कालखंडातील आहेत?

७) त्यांचे ऐतिहासिक महत्त्व काय आहे?

८) संग्रहालयाची वास्तू कोणाच्या अधिकारात आहे?

९) संग्रहालयाची वेळ काय असते ?

१०) संग्रहालयाच्या कामकाजाच्या सोयीसाठी बनवलेले नियम कोणते? ते योग्य आहेत का?

११) संग्रहालय पाहण्यासाठी तिकीट आहे का? असल्यास त्याची किंमत योग्य आहे का?

१२) संग्रहालयातील वस्तूंची मांडणी कशा प्रकारे केली आहे?

१३) ऐतिहासिक वस्तूंची माहिती देणारे फलक आहेत का ?

१४) संग्रहालयाची माहिती देण्यासाठी गाईड/मार्गदर्शक आहे का? इत्यादी.

- क्षेत्रभेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांशी कशा प्रकारे चर्चा करणार हे ठरवितात.
- क्षेत्रभेटीसाठी आवश्यक साहित्याची यादी करतात, ते साहित्य सोबत घेण्याच्या विद्यार्थ्यांना सूचना देतात.
- शिक्षक क्षेत्रभेटीनंतर विद्यार्थ्यांकडून कशा प्रकारे अहवाल/प्रकल्प लेखन करून घ्यायचे हे ठरवितात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, संप्रेषण, सहकार्य, ऐतिहासिक वारश्याविषयी जागरूकता

**आवश्यक साहित्य :** प्रश्नावली, पेन, वही, डबा, पाण्याची बाटली, टोपी, कॅमेरा, होकायंत्र इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना परिसरातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील संग्रहालयांची माहिती देतात.

२) पूर्वनियोजनानुसार क्षेत्रभेटीसाठी ठरवलेल्या संग्रहालयात विद्यार्थ्यांनी कसे वागावे यासंदर्भात सूचना देतात.

३) शिक्षक विद्यार्थ्यांना संग्रहालयात क्षेत्रभेटीसाठी घेऊन जातात.

४) पूर्वनियोजनात तयार केलेले प्रश्न विचारून माहिती घेण्यास सांगतात. आवश्यक तेथे व शक्य असल्यास फोटो घ्यायला सांगतात.

५) शिक्षक क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करतात, मदत करतात

६) क्षेत्रभेटीनंतर शिक्षक विद्यार्थ्यांशी चर्चा करतात.

उदा. १) आपण भेट दिलेल्या संग्रहालयात कोणत्या वस्तुंचा संग्रह होता?

२) तुम्हांला संग्रहालय कसे वाटले?

३) यापूर्वी तुम्ही कोणत्या संग्रहालयाला भेट दिली आहे का?

४) तुम्हांला स्वत:ला कोणत्या वस्तूंचा संग्रह करायला आवडतो? का?

५) संग्रहालयात आणखी कोणत्या वस्तूंची भर घालता येईल?

६) संग्रहालयाची आवश्यकता का आहे? इत्यादी.

७) तुमचा अनुभव कसा होता? इत्यादी

७) क्षेत्रभेटीचे ठिकाण, अंतर, लागलेला वेळ, संकलित माहिती व समारोप याप्रमाणे अहवाल लेखन करून घेतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी संग्रहालयांची यादी तयार करतात.

२) विद्यार्थी क्षेत्रभेटीदरम्यान शिक्षकांनी दिलेल्या सूचनेनुसार निरीक्षण करतात व प्रश्नावलीच्या साहाय्याने आवश्यक माहिती संकलित करतात. शंका व प्रश्न विचारतात.

३) आवश्यक तेथे व शक्य असल्यास फोटो घेतात.

४) शिस्त व सुरक्षेचे नियम पाळून क्षेत्रभेट पूर्ण करतात.

५) विद्यार्थी क्षेत्रभेटीनंतर होणाऱ्या चर्चेत सहभागी होतात.

६) दिलेल्या मुद्‌द्यांच्या आधारे अहवाल/प्रकल्प लेखन करतात. शक्य झाल्यास फोटो जोडतात.

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................

**उपक्रमाचे नाव : संग्रहालय भेट** **कृतीचे नाव :** ..............................

**विद्यार्थ्याचे नाव :** ....................................................... **इयत्ता :** ......................

**प्रश्न १** : संग्रहालयाचे नाव काय आहे?

**उत्तर** : ..........................................................................................

**प्रश्न २** : संग्रहालय कोणत्या तालुक्यात, कोणत्या जिल्ह्यात आहे?

**उत्तर** : ..........................................................................................

**प्रश्न ३** : आपण निवडलेल्या संग्रहालयात कशाचा संग्रह आहे?

**उत्तर** : ..........................................................................................

**प्रश्न ४** : ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह करणे का आवश्यक आहे?

**उत्तर** : ..........................................................................................

**प्रश्न ५** : संग्रहालयातील वस्तूची काळजी कशा प्रकारे घेतली जाते?

**उत्तर** : ..........................................................................................

..........................................................................................

**प्रश्न ६** : या संग्रहालयातील वस्तू कोणत्या कालखंडातील आहेत?

**उत्तर** : ..........................................................................................

..........................................................................................

**प्रश्न ७** : त्यांचे ऐतिहासिक महत्त्व काय आहे?

**उत्तर** : ..........................................................................................

..........................................................................................

**प्रश्न ८** : संग्रहालयाची वास्तू कोणाच्या अधिकारात आहे?

**उत्तर** : ..................................................................................................

**प्रश्न ९** : संग्रहालयाची वेळ काय आहे?

**उत्तर** : ..................................................................................................

**प्रश्न १०** : संग्रहालयाच्या कामकाजाच्या सोयीसाठी बनवलेले नियम कोणते? ते योग्य आहेत का?

**उत्तर** : ..................................................................................................

..................................................................................................

**प्रश्न ११** : संग्रहालय पाहण्यासाठी तिकीट आहे का? असल्यास त्याची किंमत योग्य आहे का?

**उत्तर** : ..................................................................................................

..................................................................................................

**प्रश्न १२** : संग्रहालयातील वस्तूंची मांडणी कशा प्रकारे केली आहे?

**उत्तर** : ..................................................................................................

..................................................................................................

**प्रश्न १३** : संग्रहालयातील वस्तूंची मांडणी कशा प्रकारे केली आहे?

**उत्तर** : ..................................................................................................

..................................................................................................

**प्रश्न १४** : ऐतिहासिक वस्तूंची माहिती देणारे फलक आहेत का ?

**उत्तर** : ..................................................................................................

**प्रश्न १५** : संग्रहालयाची माहिती देण्यासाठी गाईड/मार्गदर्शक आहे का?

**उत्तर** : ..................................................................................................

**उपक्रम क्रमांक : ४**

**उपक्रमाचे नाव : जाणून घेऊया (यशस्वी व्यक्तींची मुलाखत)**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक आपल्या शालेय परिसरातील, गावातील यशस्वी व्यक्तींची विद्यार्थ्यांच्या मदतीने यादी करतात. विविध ठिकाणी काम करणाऱ्या यशस्वी व्यक्तींची माहिती मिळवतात. (यशस्वी उद्योजक, डॉक्टर, लोकप्रतिनिधी, सरकारी कर्मचारी इत्यादी.)
- यादीतील यशस्वी व्यक्तींची मुलाखतीसाठी निवड करून त्यांना याबाबत पूर्वकल्पना देतात व त्यांची परवानगी घेतात.
- शिक्षक निवड केलेल्या यशस्वी व्यक्तींच्या क्षेत्रानुसार विद्यार्थ्यांचे गट करून विद्यार्थ्यांकडून मुलाखतीसाठी प्रश्नावली तयार करून घेतात.

  उदा. १) तुमचे पूर्ण नाव काय?

  २) तुमचे शिक्षण किती झाले आहे?

  ३) तुम्हाला या क्षेत्रात/व्यवसायात का यावेसे वाटले?

  ४) शिक्षण पूर्ण करताना तुम्हाला काही अडचणी आल्या का?

  ५) या क्षेत्रात/व्यवसायात येण्यासाठी तुम्ही काय तयारी केली?

  ६) या क्षेत्रात/व्यवसायात येण्यासाठी तुम्हाला कोणत्या समस्या आल्या? त्यावर तुम्ही कशी मात केली.

  ७) या क्षेत्रात/व्यवसायात येण्यासाठी कोणाचे मार्गदर्शन मिळाले?

  ८) तुमच्या कामात कोणाकोणाची मदत झाली?

  ९) तुमचे दिवसभराचे वेळापत्रक कसे असते?

  १०) कामाव्यतिरिक्त तुम्ही कोणते छंद जोपासता?

  ११) भविष्यातील तुमचे नियोजन काय आहे? इत्यादी.
- मुलाखत घेताना शिस्तीचे पालन करण्यासंदर्भात सूचना देतात. (उदा. शांतता राखणे, आपापसात न बोलणे, मध्येच प्रश्न न विचारणे, एका प्रश्नाचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर दुसरा प्रश्न विचारावा, महत्त्वाची माहिती लिहून ठेवा, नवीन शब्द ऐकला तर लिहून ठेवावा इत्यादी.)
- मुलाखतीची वेळ, ठिकाण निश्चित करतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, संप्रेषण, अभिव्यक्ती, भाषिक क्षमता, सामाजिक भावना.

**आवश्यक साहित्य :** वही, पेन, प्रश्नावली, कॅमेरा इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) पूर्वतयारीत ठरल्याप्रमाणे विद्यार्थी संख्येनुसार विद्यार्थ्यांचे गट करून मुलाखतीचे आयोजन करतात.

२) आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

३) शिक्षक मुलाखत झाल्यानंतर मिळालेल्या माहितीची विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करतात.

उदा.
- तुम्ही कोणाची मुलाखत घेतली?
- तुम्हांला त्यांचा कोणता गुण आवडला?
- या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी काय करणे आवश्यक आहे?
- मुलाखत घेताना तुम्हांला कोणते अनुभव आले?
- तुम्ही या मुलाखतीतून काय शिकलात?

४) शिक्षक मुलांना आलेले अनुभव, मिळालेली माहिती याचे संकलन करतात.

५) शिक्षक मुलांकडून मुलाखतीचे अहवाल लेखन करून घेतात.

**विद्यार्थी कृती :**

१) मुलाखतीसाठी यशस्वी व्यक्तींची नावे सुचवतात.

२) गटागटाने वेगवेगळ्या यशस्वी व्यक्तींच्या मुलाखतीसाठी शिक्षकांच्या मार्गदर्शनाने प्रश्नावली तयार करतात.

३) प्रत्यक्ष मुलाखत घेतात व उत्तरे नोंदवतात.

४) आवश्यक तेथे व शक्य असल्यास फोटो घेतात.

५) मुलाखत झाल्यानंतर वर्गातील चर्चेत सहभागी होतात.

६) मुलाखतीचे अहवाल लेखन करतात. उपलब्ध झाल्यास मुलाखतीचा फोटो जोडतात.

## १२) पारंपरिक खेळांचा परिचय

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **लगोरी**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक लगोरी खेळाशी संबंधित माहितीचे संकलन करतात.
- लगोरी खेळाची माहिती विद्यार्थ्यांस गोळा करण्यास सांगतात व यासाठी घटक ठरवून देतात.
    - लगोरी या खेळाला अजून कोणत्या नावाने संबोधले जाते?
    - लगोरी खेळ केव्हापासून खेळला जातो?
    - लगोरी खेळात किती संघ खेळतात?
    - लगोरी कशास म्हणतात?
    - लगोरी फोडण्यास कोणत्या चेंडूचा वापर करतात?

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** संघभावना, एकाग्रता, चपळता, सहकार्य, हस्त व नेत्र समन्वय, धोरणात्मक विचार.

**आवश्यक साहित्य :** लगोरी, चेंडू, चुना, दोरी, मेजरींग टेप.

**शिक्षक कृती :**

१) लगोरी खेळ खेळण्यासाठी १८.२८ मी. ते ३०.४८ मी. व्यासाचे वर्तुळ आखून घेतात.

२) लगोरी खेळाविषयी विद्यार्थ्यांना माहिती विचारतात.

३) लगोरी खेळ व खेळाच्या नियमांविषयी विद्यार्थ्यांना थोडक्यात माहिती देतात.

४) खेळ खेळताना सुरक्षिततेच्या महत्त्वाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण करतात.

५) खेळ खेळण्यासाठी विद्यार्थ्यांची गटात विभागणी करतात.

६) खेळ कसा खेळावा हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीद्वारे समजावतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी लगोरी खेळाविषयी संकलित केलेली माहिती सांगतात.

२) खेळ खेळताना सुरक्षिततेच्या महत्त्वाविषयी जाणून घेतात.

३) शिक्षकांनी लगोरी खेळ व खेळाच्या नियमांविषयी सांगितलेली माहिती लक्ष देऊन ऐकतात.

४) खेळ खेळण्यासाठी गटात विभागतात.

५) प्रत्यक्ष खेळ कसा खेळावा याविषयी शिक्षकांनी दाखविलेल्या प्रात्यक्षिकाचे काळजीपूर्वक निरीक्षण करून खेळ खेळतात.

**संदर्भ साहित्य :** 1) https://youtu.be/tOD8DK7kLiY?si=kJ4zKcqm33U1dgU0

2) https://youtu.be/oq_3DNyD1IA?si=5SLgAfJg5Pmm_2WL

3) https://marathiglobalvillage.com/traditional-cultural-games/

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................

**उपक्रमाचे नाव : लगोरी** **कृतीचे नाव :** ....................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ................................................................ **इयत्ता :** ...............

**प्रश्न १ :** लगोरी या खेळाला अजून कोणत्या नावाने संबोधले जाते?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न २ :** लगोरी खेळ केव्हापासून खेळला जातो?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ३ :** लगोरी खेळात किती संघ खेळतात?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ४ :** लगोरी कशास म्हणतात?

**उत्तर :** ..........................................................................................

..........................................................................................

**प्रश्न ५ :** लगोरी फोडण्यास कोणत्या चेंडूचा वापर करतात?

**उत्तर :** ..........................................................................................

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : विटी-दांडू**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विटी-दांडू खेळाशी संबंधित माहितीचे संकलन करतात.
- विटी-दांडू या पारंपरिक खेळाविषयी माहिती विद्यार्थ्यांस गोळा करण्यास सांगतात व त्याविषयीचे घटक ठरवून देतात.
  - विटी-दांडू हा खेळ भारताव्यतिरिक्त अजून कोणत्या देशात खेळला जातो?
  - गल म्हणजे काय?
  - हा खेळ खेळण्यासाठी कोणते साहित्य आवश्यक आहे?
  - ओली सुकी म्हणजे काय?

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** हस्त व नेत्र समन्वय, एकाग्रता, चपळता, आत्मविश्वास, धोरणात्मक विचार, संघभावना.

**आवश्यक साहित्य :** विटी, दांडू, खापर

**शिक्षक कृती :**

१) विटी-दांडू खेळ खेळण्यासाठी लागणारी गल तयार करून घेतात.

२) विटी-दांडू खेळाविषयी विद्यार्थ्यांना माहिती विचारतात.

३) विटी-दांडू खेळ व खेळाचे नियम याविषयी विद्यार्थ्यांना थोडक्यात माहिती देतात.

४) खेळ खेळताना पाळावयाच्या सुरक्षिततेच्या नियमांविषयी विद्यार्थ्यांना जाणीव करून देतात.

५) खेळ खेळण्यासाठी विद्यार्थ्यांची गटात विभागणी करतात.

६) विट-दांडू हा खेळ कसा खेळावा हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीद्वारे समजावतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी विटी-दांडू या खेळाविषयी संकलित केलेली माहिती सांगतात.

२) शिक्षकांनी खेळ खेळताना पाळावयाच्या सुरक्षिततेच्या नियमांविषयीच्या माहितीचे काळजीपूर्वक श्रवण करतात.

३) विटी दांडू हा खेळ व त्याच्या नियमांविषयी शिक्षकांनी सांगितलेली माहिती लक्षपूर्वक ऐकतात.

४) खेळ खेळण्यासाठी गटात विभागतात.

५) प्रत्यक्ष खेळ कसा खेळावा याविषयी शिक्षकांनी दाखविलेल्या प्रात्यक्षिकाचे काळजीपूर्वक निरीक्षण करून खेळ खेळतात.

**संदर्भ साहित्य :** 1) https://youtu.be/pYPnYPHxwB8?feature=shared

2) https://vishwakosh.marathi.gov.in/32640/

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................................

**उपक्रमाचे नाव : विटी–दांडू** **कृतीचे नाव :** ........................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ...................................................................... **इयत्ता :** .................

**प्रश्न १ :** विटी–दांडू हा खेळ भारताव्यतिरिक्त अजून कोणत्या देशात खेळला जातो?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न २ :** गल म्हणजे काय?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न ३ :** हा खेळ खेळण्यासाठी कोणते साहित्य आवश्यक आहे?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न ४ :** ओली सुकी म्हणजे काय?

**उत्तर :** ..........................................................................................................

**उपक्रम क्रमांक : ३**

**उपक्रमाचे नाव : बास्केटबॉल**

**पूर्वनियोजित कृती :**

१) शिक्षक बास्केटबॉल खेळाशी संबंधित मैदान, नियम, कौशल्य व फायदे याविषयी माहितीचे संकलन करतात.

२) विद्यार्थ्यांना बास्केटबॉल या खेळाविषयी माहिती गोळा करण्यास सांगतात व त्यासाठी घटक ठरवून देतात.

- बास्केटबॉल खेळाच्या मैदानाचे मोजमाप काय असते?
- बास्केटबॉल संघात किती खेळाडू असतात?
- बास्केटबॉल हा कोण कोणत्या नंबरचा असतो?
- बास्केटबॉल खेळासाठी कोणता पोशाख आवश्यक आहे?

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** जलदगतीने निर्णय घेणे, धोरणात्मक विचार, संघभावना, सहकार्य, समन्वय, अचूकता.

**आवश्यक साहित्य :** चुना, दोरी, मेजरींग टेप, बास्केटबॉल, शिटी.

**शिक्षक कृती :**

१) बास्केटबॉल खेळण्यासाठी लागणाऱ्या (२८ मी × १५ मी) मैदानाची आखणी करतात.

२) बास्केटबॉल खेळा विषयी विद्यार्थ्यांना माहिती विचारतात.

३) बास्केटबॉल खेळाविषयी खालील माहिती देतात.

- मैदान : २८ मी × १५ मी (ज्या ठिकाणी मातीचे मैदान व बास्केटबॉल पोल उपलब्ध आहेत त्या ठिकाणी चुना व मेजरींग टेप, दोरी यांच्या साहाय्याने आखणी करण्यात यावी. ज्या ठिकाणी बास्केटबॉल पोल उपलब्ध नसतील त्या ठिकाणी बांबूच्या व रिकामी टोपलीच्या (टोपीला छिद्र करून) साहाय्याने बास्केटबॉल पोल तयार करणे यावा.)
- खेळाडू : १२ खेळाडू (५ खेळाडू मैदानात खेळतात, ७ बदली खेळाडू असतात.)
- नियम :
  - ◈ प्रतिस्पर्ध्यांनी एकमेकांना धक्का न मारता हा खेळ खेळावा.
  - ◈ जेव्हा प्रतिस्पर्धी बचावासाठी समोर अथवा जवळ उभा असेल तेव्हा खेळाडूंनी ५ सेकंदापेक्षा जास्त वेळ चेंडू हातात ठेवू नये म्हणजेच पास, ड्रिबल किंवा गोल कडे शूट करावा.
  - ◈ संघाच्या ताब्यात चेंडू आल्यानंतर आठ सेकंदात चेंडू मध्यरेषा पार करून प्रतिस्पर्ध्याच्या कोर्टवर

चाल करून जावे व एकूण २४ सेकंदात प्रतिस्पर्ध्यावर रिंगवरून गोल करण्याचा प्रयत्न करावा.

◈ हातात चेंडू घेऊन चालताना अथवा पळताना एकापेक्षा जास्त पावले घेण्यास मनाई असून खेळाडूंनी एकमेकांकडे चेंडू पास करत अथवा ड्रिबल करत प्रतिस्पर्ध्यावर चाल करून जावे.

४) कौशल्य : ड्रिबलिंग, पासिंग, शूटिंग, फूटवर्क, रिबाऊंडिंग

५) बास्केटबॉल खेळाचे फायदे :

- बास्केटबॉल हा रोमांचक खेळासोबतच आरोग्याच्या दृष्टिकोनातूनही खूप महत्त्वाचा आहे.
- बास्केटबॉल खेळल्याने शारीरिक भावनिक आणि सामाजिक विकास होतो.
- बास्केटबॉल खेळल्याने स्नायू मजबूत होतात आणि तग धरण्याची क्षमता वाढते.
- नियमित बास्केटबॉल खेळल्याने हाडे मजबूत होतात हृदय निरोगी राहते आत्मविश्वास वाढतो.
- तणावाची पातळी कमी होऊन आनंदी राहण्यास मदत होते.
- शारीरिक संतुलन आणि समन्वय सुधारते आणि शरीराचा संरचनात्मक विकास होतो.
- खेळताना पाळावयाच्या सुरक्षिततेच्या नियमांविषयी विद्यार्थ्यांना अवगत करतात.
- खेळ खेळण्यासाठी विद्यार्थ्यांचे गट तयार करून बास्केटबॉल हा खेळ कसा खेळावा हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीद्वारे समजावतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी बास्केटबॉल या खेळाविषयी संकलित केलेली माहिती सांगतात.

- बास्केटबॉल खेळाच्या मैदानाचे मोजमाप काय असते? (उत्तर : २६ मी × १५ मी)
- बास्केटबॉल संघात किती खेळाडू असतात? (उत्तर : १२ खेळाडू)
- बास्केटबॉल हा कोण कोणत्या नंबरचा असतो? (उत्तर : मुलींसाठी ६ नंबर, मुलांसाठी ७ नंबर)
- बास्केटबॉल खेळासाठी कोणता पोशाख आवश्यक आहे? (उत्तर : हाफ पॅन्ट, मुलांसाठी सँडो बनियन, मुलींसाठी टी–शर्ट व शूज)

२) बास्केटबॉल खेळाविषयी शिक्षकांनी सांगितलेले नियम, तंत्र, कौशल्य व फाऊल हे काळजीपूर्वक ऐकतात व समजून घेतात.

३) खेळ खेळताना पाळावयाच्या सुरक्षिततेच्या नियमांविषयी जाणून घेतात.

४) शिक्षकांनी दाखवलेल्या प्रात्यक्षिकाप्रमाणे प्रत्यक्ष खेळ खेळण्यासाठी सुरुवात करतात.

**संदर्भ साहित्य :** 1) https://youtu.be/q-v9LsFpMpI?si=oC-DgI4RdG1O1Ds-

2) https://youtu.be/qgg2PU5aLBA?si=9vfvkMgfWcuk8hoX

3) https://youtu.be/vse-ENNEz8w?si=0XivmyMdNPWkW42P

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................

**उपक्रमाचे नाव : बास्केटबॉल** **कृतीचे नाव :** ....................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ............................................................ **इयत्ता :** ...............

---

**प्रश्न १ :** बास्केटबॉल खेळाच्या मैदानाचे मोजमाप काय असते?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न २ :** बास्केटबॉल संघात किती खेळाडू असतात?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ३ :** बास्केटबॉल हा कोणकोणत्या नंबरचा असतो?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ४ :** बास्केटबॉल खेळासाठी कोणता पोशाख आवश्यक आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

## १३) कला

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : सजावट करण्यासाठी रंगीत कागदांपासून रंगीत चेंडू तयार करणे.**

**पूर्वनियोजित कृती :**

- शुक्रवारी किंवा शेवटच्या तासिकेला शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना शनिवारी घेण्यात येणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती देतात व तयारी करण्यास सांगतात. साहित्याची यादी लिहून देतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** टाकाऊ वस्तूमधून, कागदातून व उपलब्ध साहित्यातून बौद्धिक कौशल्य, बहुअंगी विचार, आकलन क्षमता वाढीस लागते.

**आवश्यक साहित्य :** रंगीबेरंगी क्राफ्ट पेपर, कात्री, डिंक, पांढरा कागद, पेन्सिल, उपलब्ध टाकाऊ पेपर वस्तू इत्यादी.

**शिक्षक कृती :**

१) शनिवारी शिक्षक विद्यार्थ्यांना गटाने कार्य देतात.

२) विद्यार्थी गटाने बसवून घेतात.

---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : इतर संस्कृतीची व समुदायाची माहिती घेणे.**

**पूर्वनियोजित कृती :** शुक्रवारी परिपाठात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शनिवारी घेण्यात येणाऱ्या उपक्रमांबद्दल माहिती देणे व तयारी करून घेण्यास सांगणे.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** इतर राज्यामधील संस्कृतीबद्दल आदरभाव निर्माण होतो, थोर युगपुरुष यांच्या कार्याची दखल घेण्याची सवय जोपासली जाते.

**आवश्यक साहित्य :** वही, कागद, पेन, डिंक उपक्रमाशी निगडित चित्रे.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना उपक्रमाविषयी माहिती देतात.

२) विद्यार्थ्यांना शेजारील राज्य - गुजरात याबद्दल त्यांच्या सांस्कृतिक धरोहर संदर्भात माहिती सांगतात.

३) गुजरातमधील समुदायांची, त्यांच्या गायन, नृत्य व कलेची माहिती देतात.

४) गुजरातचा सांस्कृतिक वारसा या संदर्भात विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानावर आधारित चर्चा करतात.

५) गुजरातमध्ये खेळले जाणारे सांस्कृतिक खेळ दांडिया, गरबा यासंदर्भात माहिती देतात.

६) गुजराती लोकगीते याबद्दल माहिती देतात.

७) गुजराती पेहराव व भाषा यांचे महत्त्व समजावून सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी आवडीने शिक्षकांनी दिलेली माहिती ऐकतात.

२) पूर्वज्ञानावर आधारित माहितीने शिक्षकांसोबत चर्चा करतात.

३) शिक्षकांना प्रश्न विचारतात.

४) शिक्षकांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे व दाखवलेल्या चित्रांच्या आधारे छोटे प्रोजेक्ट तयार करतात.

५) या प्रोजेक्टमध्ये शिक्षकांनी सांगितलेल्या माहितीचा व स्वतः घेतलेल्या माहितीचा उपयोग करतात.

६) चित्र चिकटवतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/zo5nVkvrKNE?si=lawRq1X703930K3A

2) https://www.marathimol.in/gujarat-information-in-marathi/

# १४) सांविधानिक मूल्यांची रुजवणूक

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रम १ चे नाव : चला जाणून घेऊया भारतीय संविधान – प्रश्नमंजूषा**

**उद्‌देश :** भारतीय संविधानाविषयी माहिती जाणून घेणे.

**पूर्वनियोजित कृती :**

- विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रत उपलब्ध करून देणे. संविधानावर आधारित प्रश्नमंजुषेच्या स्पर्धेविषयी माहिती सांगणे. भारतीय संविधानावर आधारित प्रश्नमंजुषेसाठी प्रश्न निर्मिती करणे. प्रश्नमंजुषेच्या अनुषंगाने बैठक व्यवस्था करणे.

**विकसित होणारी कौशल्ये :** माहिती मिळविणे, मिळालेल्या माहितीचे आकलन होण्यासाठी वाचन करणे, लक्षपूर्वक ऐकणे, प्रश्न समजून घेणे, अचूक प्रतिसाद देणे.

**आवश्यक साहित्य :** भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रत, प्रक्षेपक, विद्यार्थ्यांना वितरित करावयाची पारितोषिके.

**शिक्षक कृती :**

१) प्रश्नमंजुषेच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे गट तयार करतात. प्रत्यक्ष प्रश्नमंजुषेचे आयोजन करतात. विद्यार्थ्यांना भारतीय संविधानावर आधारित वैविध्यपूर्ण प्रश्न विचारतात. जसे –

१) भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीची पहिली बैठक कधी झाली?

उत्तर : ..................................................................

२) भारतीय राज्यघटनेत एकूण किती कलमे आहेत?

उत्तर : ..................................................................

३) भारतीय संविधान समितीचे अध्यक्ष कोण होते?

उत्तर : ..................................................................

गटनिहाय प्राप्त गुणांचे फलकावर लेखन करतात. विद्यार्थ्यांना उत्तर देण्यासाठी वेळोवेळी प्रेरणा देतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी भारतीय संविधानावर आधारित प्रश्नमंजुषेत सहभागी होण्याच्या दृष्टीने संविधानाविषयी अधिकाधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतात. प्रत्यक्ष स्पर्धेत सहभागी होतात. शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात.

**संदर्भ साहित्य :** .

१) भारतीय संविधानावर आधारित माहितीच्या विविध स्रोत – पाठ्यपुस्तके, इंटरनेट इत्यादी

२) प्रश्नमंजुषेवर आधारित व्हिडिओ.

---

**उपक्रम क्रमांक :** २

**उपक्रमाचे नाव : भारतीय संविधान निर्मिती प्रकिया सादरीकरण**

**उद्देश :** भारतीय संविधान प्रक्रिया समजून घेणे.

**पूर्वनियोजित कृती :** संविधान निर्मिती प्रक्रिया समजून घेणे व PPT तयार करणे.

**विकसित होणारी कौशल्ये :** माहिती मिळविणे, लक्षपूर्वक ऐकणे, सादरीकरण, संगणक हाताळणी.


**आवश्यक साहित्य :** संगणक, पेनड्राईव्ह, PPT.


**शिक्षक कृती :** भारतीय संविधान निर्मिती प्रक्रिया : पीपीटी संविधान प्रत तयार करून सादरीकरण घेतात.

**विद्यार्थी कृती :** विद्यार्थी भारतीय संविधान निर्मिती प्रक्रिया : पीपीटी च्या साहाय्याने सादरीकरण तयार करून सादर करतात.

**संदर्भ साहित्य :** भारतीय संविधानस्तंभ फोटो, भारतीय संविधान मूळ प्रत.







भारत का संविधान
उद्देशिका

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ......................................................................................................

**उपक्रमाचे नाव : चला जाणून घेऊया भारतीय संविधान**

**कृतीचे नाव :** ....................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ................................................................ **इयत्ता :** ......................

**प्रश्न १ :** भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीची पहिली बैठक कधी झाली?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न २ :** भारतीय राज्यघटनेत एकूण किती कलमे आहेत?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न ३ :** भारतीय संविधान समितीचे अध्यक्ष कोण होते?

**उत्तर :** ..............................................................................................................

**उत्तर :**

१) ९ डिसेंबर १९४६.

२) ४४८ कलमे

३) डॉ. राजेंद्र प्रसाद

## १५) विविध व्यवसायांचा परिचय आणि करिअरविषयक मार्गदर्शन

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **नेल आर्ट**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक नेल आर्टबाबत इंटरनेटवरून खालील बाबीं संदर्भात माहिती गोळा करतात.
- आवश्यक साहित्य
- नेल आर्टच्या कृती पायऱ्या
- विविध डिझाईन
- नेल आर्ट करणाऱ्या व्यावसायिकाचे नाव
- हा व्यवसाय कोठे केला जातो?
- साधारणपणे नेल आर्टसाठी एक नख याप्रमाणे किती पैसे घेतले जातात?

नेल आर्ट करण्यासाठी पालकांच्या अनुमतीने विद्यार्थ्यांना साहित्य घेऊन येण्यास सांगतात.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, सर्जनशीलता ,कला कुसर.

**आवश्यक साहित्य :** नेल पॉलिश/नेल वार्निश, चमकते रंग, नेल आर्ट पेन, नेल डॉटर ज्याला 'डॉटिंग टूल्स'म्हणून देखील ओळखले जाते, नेल आर्ट ब्रश, स्टेशनरी टेप/स्टिकर, पातळ रंगीत स्ट्रिपिंग टेप, स्पंज (ग्रेडिएंट इफेक्ट्ससाठी), नेल स्टिकर, छोटी वाटी, पाण्याची बाटली.

**शिक्षक कृती :** शिक्षक विद्यार्थ्यांना नखाच्या सजावटीविषयी पुढीलप्रमाणे माहिती देतात.

१) नेल आर्ट म्हणजे नखाला विविध प्रकारे सजविण्याची कला.

२) या कलेचा वापर आजच्या काळात मोठ्या प्रमाणात केला जातो.

३) नेल आर्ट पार्लर येथे जाऊन केले जाते.

४) यासाठी प्रत्येकी एक नख १००/– रुपये कमीत कमी अशी किंमत आकारली जाते.

५) आवश्यक साहित्यात नमूद केलेले साहित्य यासाठी वापरले जाते.

शिक्षक विद्यार्थ्यांना नेल आर्टसाठी खालील पायऱ्यांप्रमाणे कृती करून दाखवतात.

१) नखावर पहिल्यांदा नेलपेंटचा कोणत्याही एका रंगाचा प्राथमिक थर लावावा.

२) यानंतर त्याच नखावर दुसऱ्या रंगाचे दोन थर लावावेत.

३) हे थर सुकू द्यावेत.

४) यावर लवकर सुकू शकतो तो top-coat लावावा व तो सुकू द्यावा.

५) पांढऱ्या acrylic रंगात थोडे पाणी मिसळावे.

६) पेंट ब्रशने नेलपेंट लावलेल्या नखावर छोटे फूल/चंद्र/फुलपाखरू काढावे.

७) काळ्या नेल पेंटचा उपयोग करून बारीक brush ने वरील फूल/चंद्र/फुलपाखरूसाठी बाहेरील किनार काढावी.

८) यावर top-coat लावावे व सुकू द्यावे.

९) अनावश्यक लागलेले नेलपेंट, नेलपेंट रिमुव्हरने कापसाच्या बोळ्याच्या साहाय्याने पुसून टाकावे.

१०) शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे नेलआर्ट करण्यास सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) शिक्षकांनी नेल आर्टबाबत दिलेली माहिती काळजीपूर्वक ऐकतात.

२) विद्यार्थी शिक्षक करीत असलेल्या कृतीचे निरीक्षण करतात.

३) कृती पायऱ्यांप्रमाणे नेल आर्टच्या आवडीनुसार वेगवेगळ्या डिझाईन्स करतात.

**संदर्भ साहित्य :**


1) प्री–व्होकेशनल गाईडलाईन्स - NCERT

2) hhttps://youtube.com/shorts/_oawZl2lp6c?si=MzXeYMJhullR5UBP

3) https://youtube.com/shorts/aEcOWq_ZfFc?si=EYZQbkfPeOz5NZCB


---

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : ट्रॉफी मेकर**

**पूर्व नियोजित कृती :**

- शिक्षक ट्रॉफी मेकरबाबत इंटरनेटवरून खालील बाबीसंदर्भात माहिती गोळा करतात.
  - ➢ आवश्यक साहित्य
  - ➢ ट्रॉफी मेकरच्या कृती पायऱ्या
  - ➢ विविध डिझाईन
  - ➢ ट्रॉफी मेकर करणाऱ्या व्यावसायिकाचे नाव
  - ➢ हा व्यवसाय कोठे केला जातो?
  - ➢ एका ट्रॉफीसाठी साधारणपणे किती पैसे घेतात?

**आवश्यक साहित्य :** निकेल धातूचा पत्रा, पेवटर धातूचा पत्रा, कांस्य धातूचा पत्रा, स्टेनलेस धातूचा पत्रा चमकण्यासाठी, पॉलिश, टेम्पलेट, काच, ॲक्रेलिक, लाकडाची फळी, विविध रंग, ब्रश, पातळ, रंगीत स्ट्रिपिंग टेप, स्पंज (ग्रेडिएंट इफेक्ट्ससाठी), छोटीवाटी, चमकते रंग, स्टेशनरी टेप/स्टिकर, स्टिकर

**विकसित होणारी कौशल्ये/फलनष्पत्ती :**

अवकाशीय, तार्किक, निरीक्षण, सर्जनशीलता, कलाकुसर

**अंमलबजावणी दरम्यान शिक्षक कृती :**

शिक्षक विद्यार्थ्यांना ट्रॉफी मेकरविषयी पुढीलप्रमाणे माहिती देतात.

१) ट्रॉफी म्हणजे विविध प्रकारच्या प्रावीण्य प्राप्त प्रतीके आकर्षक तयार करणे.

२) या कलेचा वापर आजच्या युगात मोठ्या प्रमाणात केला जातो

३) एखाद्या क्षेत्रात प्राविण्य प्राप्त व्यक्तीस ट्रॉफी दिली जाते.

४) अंदाजे एका ट्रॉफीची किंमत २५०/- रुपये असते.

५) आवश्यक साहित्यात नमूद केलेले साहित्य ट्रॉफी बनविण्यासाठी वापरले जाते.

विद्यार्थ्यांना ट्रॉफी मेकरसाठी खालील पायऱ्याप्रमाणे कृती असतात हे समजावून सांगतात.

**१) तयारी :** यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो, ज्यामध्ये काही प्रकरणांमध्ये ३ प्रिंटिंगचा समावेश होतो. एकदा ३ कलाकृती तयार केल्यावर, आम्ही तयार केलेल्या तुकड्यासाठी कास्टिंग मोल्ड, स्टॅन्सिल किंवा अगदी घटक तयार करण्यासाठी प्रिंट्स वापरतो.

**२) घटक हस्तकला :** चांदी आणि सोन्याची कोणतीही बेस्पोक ट्रॉफी किंवा कमिशन, अनेक गुंतागुंतीच्या घटकांनी बनलेले असते. आम्ही परिश्रमपूर्वक तंत्रांच्या वर्गीकरणासह प्रत्येक घटक हस्तकला करतो.

**३) कताई :** हाताने फिरणारा धातू धातूकामातील सर्वांत नाट्यमय धातू आहे आणि शतकानुशतके वापरला जात आहे. विशेषत: ट्रॉफी बनवताना, इच्छित आकार तयार करण्यासाठी अनेक तुकडे कातले जाऊ शकतात. प्रतिकृती तयार करण्यासाठी चाकाचा पुन्हा वापर.

**४) कास्टिंग :** थॉमस लाइटमध्ये, आम्ही प्लास्टर प्रोग्राम मोल्ड तयार करण्यासाठी हस्तकला आणि ३ मुद्रित साहित्य दोन्ही वापरतो. या साच्यामध्ये द्राव आकार ओतला उभा राहण्यासाठी तयार होण्यास तयार होईल. मोल्ड आणि कास्टिंगचा वापर क्राफ्टिंग प्रक्रिया अधिक कार्यक्षम बनू शकतो; हे तुम्हाला एकवचनी घटकांच्या अनेक समान आवृत्या तयार करण्यास अनुमती देते. हे स्वतःला कन बदलण्याची प्रक्रिया तयार करण्याची प्रक्रिया अधिकाधिक बनू शकते.

**५) स्मिथिंग :** प्रक्रियेचा अधिक क्लिष्ट भाग, परंतु हस्तनिर्मित लक्झरी सोने आणि चांदी कमिशन, सिल्व्हरस्मिथिंग आणि सोनारकाम तयार करण्याच्या सर्वात महत्वाच्या पायरीमध्ये विविध तंत्रांचा

समावेश आहे. हँडसॉच्या साहाय्याने 'छेदणे', सँडपेपरने 'फाइल डाऊन करणे किंवा फाईल्सच्या अनेक वेगवेगळ्या ग्रेड्स किंवा मशीन प्रेसने स्टॅम्पिंग करणे, तयार झालेल्या तुकड्याच्या जटिलतेत भर घालणाऱ्या प्रत्येक घटकामध्ये छोटे बदल केले जातात.

६) **हॉट फोर्जिंग आणि प्लॅनिशिंग :** हॉट फोर्जिंग या धातूला आकार देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती आहेत. हॉट फोर्जिंग ही धातूला वाकवण्यासाठी किंवा आकर देण्यासाठी पुरेसे तापमानापर्यंत गरम करण्याची प्रक्रिया आहे. धातू गरम केल्यावर विस्तारते आणि ताणते म्हणून, घटकाला आकार देताना उष्णता वापरणे नेहमीच सर्वोत्तम पर्याय नसते. प्लॅनिंशिग हॅमर केला जातो. घटकांना अचूक आकारात हातोडा हा एक कला प्रकार आहे ज्यामध्ये प्रभूत्त्व मिळविण्यासाठी अनेक वर्षे लागतात.

७) **इच्छित आकार व सजावट मिळविणे :** एकदा का तुकड्याचे घटक तयार आणि आकार घेतल्यानंतर, ते सुशोभित करण्यासाठी आणि पूर्ण करण्यासाठी तयार केले जातात. यात पाढलाग आणि खोदकाम गुंतागुंत आणि पॉलिशिंग आणि प्लेटिंगद्वारे तयार केलल्या सुंदर फिनिशचा समावेश होतो.

८) **Repousse आणि पाठलाग :** Repousse हे धातूकाम करण्याचे तंत्र आहे ज्यामध्ये धातूच्या पृष्ठभागावर कमी आरामात एक रचना तयार करण्यासाठी उलट बाजूने हातोडा मारून धातूला आकार दिला जातो. पाठलाग किंवा एम्बॉसिंग हे एक समान तंत्र सहसा एकत्रिपणे वापरली जातात. दोन्ही तंत्रे ही प्राचीन काळापासून धातूकाम करणाऱ्यांच्या पिढ्यानपिढ्या पार पाडलेली कौशल्य आहेत.

९) **पॅलिशिंग :** पॉलिशिंग ही एक फिनिशिंग प्रक्रिया आहे जी अपघर्षक 'मोप' सह धातूचा तुकडा गुळगुळीत करते. पॉलिशर्स ३००० rmp पेक्षा वेगाने फिरणारे मोटारीकृती पॉलिशिंग लेथ वापरतात, धातूचा निस्तेज आणि घाणेरडा तुकडा अचूक मिरर फिनिशमध्ये नेण्यासाठी ते एकामागून एक वेगवेगळ्या प्रकारचे मॉप हेड वापरतात. मोप हेड्स ज्या गतीने फिरत आहेत ते लक्षात घेता, अनुभवी लोकांसाठी पॉलिश करणे हे एक धोकादायक काम असू शकते.

१०) **इलेक्ट्रोप्लेटिंग :** इलेक्ट्रोप्लेटिंग म्हणजे धातूचे क्षार असलेल्या द्रवणात बुडवून ठेवलेल्या वस्तूवर धातुचा लेप टाकणे होय. धातूच्या मीठामध्ये सकारामक चार्ज केलेले धातूचे आयन असतात त्यामुळे वस्तूकडे आकर्षित होतात. परिणामी वस्तूच्या पृष्ठभागावर धातूचा पातळ थर तयार होतो. थॉमस लायटकडे सोन्याचे आणि चांदीच्या दोन्ही इलेक्ट्रोप्लेटिंग टाक्या आहेत जे अगदी सर्वांत मोठे कमिशन देखील सामावून घेऊ शकतात. प्लेटिंगच्या इच्छित जाडी आणि वापरलेले द्रावण यावर अवलंबून, इलेक्ट्रोप्लेटिंग काही काही मिनिटांपासून अर्ध्या तासापर्यंत कुठेही लागू शकते. विशेष म्हणजे, आपण ज्या वस्तूंना प्लेट लावू इचि छत नाही त्य भागांना 'स्टॉपिंग ऑफ' ( ) झाकून विशिष्ट क्षेत्रांना लक्ष्य करणे शक्य आहे.

**११) खोदकाम :** खोदकाम ही प्रक्रिया आहे ज्याद्वारे धातूमध्ये खोबणी कापली जातात, सामान्यत: धातूची वस्तू डिझाइनसह सजवण्यासाठी. डायमंड टीप असलल्या तंतोतंत मशीनसह, विस्तृत डिझाइन्स कोरतो ज्यात सुशोभित चांदीची भांडी आहेत. एका शतकाहून अधिक मशीन खोदकाम करणे शक्य झाले असलरे तरी, हाताने खोदकाम करणे ही बहुतेकदा सर्वात प्रशंसनीय मेटल कार्य प्रक्रियांपैकी एक हस्तकला आहे ज्याला साधने योग्यरीत्या तीक्षण करायची हे शिकण्यासाठी किमान एक वर्ष आवश्यक आहे.

**१२) तुकडे एकत्र करणे आणि योग्य जुळवणे :** एकदा पुरेसे घटक तयार झाल्यानंतर, आणि काही हलकी साफसफाई आणि पॉलिशिंग केल्यानंतर, ते एकत्र करणे आवश्यक आहे. अंतिम तुकडा एकत्र करण्याचे अनेक मार्ग आहेत.

**१३) सोल्डरिंग :** सोल्डरिंग ही उष्णता, दाब आणि फिलर मटेरियल ''सोल्डर'' वापरून धातूचे दोन तुकडे एकत्र करण्याची प्रक्रिया आहे. सोल्डर आसपासच्या धातूद्वारे शोषले जाते; परिणाम म्हणजे एक जोड आहे जो धातूला एकत्र जोडण्यापेक्षा खरोखर मजबूत आहे. विशेष म्हणजे, स्टर्लिंग सिल्व्हरसोबत काम करताना, अंतिम तुकडा हॉलमार्क करण्यासाठी, सिल्व्हर-आधारित सोल्डरिंग मटेरियल वापरणे अत्यावश्यक आहे जे एसे ऑफिसने सेट केलेल्या मानकांचे पालन करते.

**१४) असेंब्ली :**

बऱ्याच प्रकरणांमध्ये, object d'art मध्ये नट बोल्ट आणि स्क्रू एकत्र ठेवण्यासाठी किमान काही घटक असतात. त्यांचा वापर केवळ मजबूत पायाच नाही तर तुकडा वेगळे करणे आणि दुरुस्त करणे देखील सोपे करते. तयार झालेले कमिशन मजबूत आणि सुंदर दोन्ही आहे याची खात्री करण्यासाठी कुशल कारागीर हे आवश्यक घटक डिझाइनमध्ये समाविष्ट करण्यासाठी त्यांचे सर्व कौशल्य वापरतात.

**१५) उत्पत्ती आणि गुणवत्ता सुनिश्चित करणे :** कमिशन एकत्र केल्यावर, गुणवत्ता नियंत्रण कार्यसंघाकडे सुपूर्द केले जाते जे हे सुनिश्चित करतात की प्रत्येक तुकडा अचूक मानकांची पूर्तता करतो.

**१६) हॉलमार्किंग :**

हॉलमार्क हे अधिकृत चिन्ह आहे किंवा चांदी, सोने आणि प्लॅटिनम सारख्या सामग्री प्रमाणित करण्यासाठी उदात्त धातूंपासून बनवलेल्या वस्तूंवर मारलेल्या चिन्हांची मालिका आहे. सर्व Thomas Lyte bespoke हॉलमार्क केलेल्या चांदी आणि सोन्याच्या वस्तू या मानकांचे पालन करतात. यूकेमध्ये कोणत्याही वस्तूला हॉलमार्क केल्याशिवाय सोने किंवा चांदी म्हणून विकणे किंवा त्याचे वर्णन करणे बेकायदेशीर आहे. UK Assay Office चा हॉलमार्क प्रश्नातील हॉलमार्क केलेल्या आयटमच्या उत्पत्तीची हमी देतो आणि ती शुद्धता आणि सूक्ष्मतेच्या सर्व कायदेशीर मानकांशी सुसंगत आहे.

**१७) गुणवत्ता नियंत्रण :**

प्रक्रियेतील सर्वात महत्वाच्या टप्प्यांपैकी एक गुणवत्ता नियंत्रण आहे. Thomas Lyte येथे, प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता नियंत्रण होते, संपूर्ण टीमद्वारे वैयक्तिक घटकांची नियमितपणे तपासणी केली जाते. आमच्या लंडन–आधारित कार्यशाळेत 'QC रूम' वापरून ते चिन्ह किंवा अशुद्धता ओळखतात ज्या कारागीरांनी तयार केलेला तुकडा कार्यशाळेतून बाहेर पडण्यापूर्वी सुधारणे आवश्यक आहे. तेजस्वी दिवे आणि जेट–ब्लॅक स्पेसचे संयोजन अगदी हलके स्कफदेखील हायलाइट करू शकते.

**विद्यार्थी कृती :**

१) शिक्षक ट्रॉफी बनविण्याबाबत देणारी माहिती काळजीपूर्वक ऐकतात.

**संदर्भ :**

- ऍक्रेलिक ट्रॉफी
- सिल्व्हर
- एिल्एग्लिंटन टॉफी
- पुतळा
- चॅम्पियनशिप बेल्ट
- PSN ट्रॉफी
- हेल्स ट्रॉफी
- रोझेट
- हेडहंटिंग
- यश (व्हिडिओ गेमिंग)
- फलक

प्री–वोकेशनल गाईड लाईन्स – NCERT

https://thomaslyte.com/the-making-process/

https://nsdicindia.org/sector-skill-councils

---

**उपक्रम क्रमांक : ३**

**उपक्रमाचे नाव : धातूकाम**

**पूर्वनियोजित कृती :** माहिती वेल्डिंग बाबत

**नियोजित कृती/पूर्वनियोजन :**

- शिक्षक परिसरातील वेल्डिंगच्या दुकानाची माहिती घेतात, भेट देण्याचे ठिकाण ठरवतात.
- शिक्षक विद्यार्थ्यांना भेटीच्या स्थळी नेण्यासाठी पालकांची परवानगी घेतात. ३ शिक्षक विद्यार्थ्यांशी चर्चा करून माहिती घेण्याचे घटक ठरवतात.
  - ➢ वेल्डिंग म्हणजे काय?
  - ➢ वेल्डिंगचे प्रकार कोणते?
  - ➢ वेल्डिंगचे उपयोग कोणते?

➢ वेल्डिंगशी निगडीत व्यवसाय कोणते?

➢ वेल्डमेंट म्हणजे काय?

➢ वेल्डिंग चे सूत्र काय?

- शिक्षक विद्यार्थ्यांचे वरील घटकानुसार माहिती घेण्यासाठी गट तयार करतात. त्यांना माहिती घेण्यासाठी घटक वाटून देतात.
- भेटीच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करण्यासाठी नियम सांगतात.

➢ कोणत्याही वस्तूला हात लावू नये.

➢ प्रक्रिया सुरू असलेल्या ठिकाणापासून सुरक्षित अंतरावर राहावे.

➢ अनावश्यक गर्दी टाळावी.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, सहयोग कौशल्य, प्रश्न कौशल्य व्यावहारिक कौशल्य

**आवश्यक साहित्य :** वही, पेन, पाणी बॉटल, प्रथमोपचार पेटी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना वेल्डिंगच्या दुकानात घेऊन जातात.

२) वेल्डींगचे कार्य करणाऱ्या व्यक्तीस त्याचे कार्य करण्यास सांगतात.

३) विद्यार्थ्यांना सुरक्षा नियमांचे पालन करण्यास सांगतात

४) विद्यार्थ्यांना निरीक्षण करून प्रश्न विचारण्यास सांगतात.

५) विद्यार्थ्यांना त्यांना दिलेल्या घटकाबाबत अधिक माहिती घेऊन पुढच्या वेळी उपलब्ध वेळेत गटात सादरीकरण करण्यास सांगतात

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी सुरक्षा नियमांचे पालन करतात.

२) दिलेल्या घटकानुसार प्रश्न विचारतात व खालील प्रमाणे माहिती समजून घेतात व टिपणे घेतात.

३) वेल्डिंग ही धातू किंवा थर्मोप्लास्टिक जोडण्याची प्रक्रिया आहे. यात खूप उष्णतेच्या,दाबाच्या साहाय्याने जोडण्याची प्रक्रिया केली जाते.

४) वेल्डिंग चे प्रकार  गॅस मेटल आर्क वेल्डिंग, फ्लक्स-कोरडे वायर-आर्क वेल्डिंग. शिल्डेड मेटल आर्क वेल्डिंग, गॅस टंगस्टन आर्क वेल्डिंग .

५) वेल्डिंगचा उपयोग विविध धातूची संरचना, भाग आणि उपकरणे तयार करण्यासाठी केला जातो.

६) वेल्डिंगशी निगडीत व्यवसाय मिलिटरी वेल्डर, एमआयजी वेल्डर, अंडरवाटर वेल्डर, वेल्डिंग इन्स्पेक्टर,

पाईप वेल्डर, फेब्रीकेटर वेल्डर, वेल्डिंग इंजिनीअर इत्यादी.

७) वेल्डमेंट म्हणजे–
   वेल्डिंगने दोन तुकडे जोडल्यानंतर जो जोड तयार होतो त्याला वेल्ड्मेंट म्हणतात.

८) विद्यार्थी विल्डिंग प्रक्रियेबाबत इंटरनेटवरून अधिक माहिती घेतात व शिक्षकानी सांगितलेल्या वेळेत सादरीकरण करतात.

---

**उपक्रम क्रमांक : ४**

**उपक्रम : स्वयंपूर्ण गाव याबाबत माहिती (अलुतेदार, बलुतेदार)**

**पूर्वनियोजित कृती :**

- ग्रामीण संस्कृती उद्यानास भेट.

**नियोजित कृती/पूर्वनियोजन :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना पूर्वीच्या काळी गावांमध्ये कसा व्यवसाय चालायचा, गावे स्वयंपूर्ण कशी होती या बाबत माहिती देण्यासाठी अलुतेदार व बलुतेदार या संकल्पनेबाबत माहिती गोळा करतात.

२) बलुतेदारमध्ये कोणते १२ व्यवसाय येतात जे शेतकऱ्याच्या महत्त्वाच्या गरजा भागवत असत त्या बद्दल माहिती गोळा करतात.

   (उदा. सोनार, कुंभार, सुतार, लोहार, न्हावी, परिट, चांभार, तेली, शिंपी, गवंडी, विणकर आणि गुरव)

३) अलुतेदार म्हणजे जे शेतकऱ्यांच्या नैमित्तिक गरजा पुरवत त्याबाबत इंटरनेटवरून माहिती घेतात.

४) अलुतेदार, बलुतेदार यांचे राहणीमान, घर कसे असायचे, ते कशाचा व्यवसाय करायचे याबाबत प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी संस्कृती उद्यानास भेटीचे नियोजन करतात.

५) विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष उद्यान भेटीसाठी मुख्याध्यापकांसोबत ठरवून इतर विषय शिक्षकांचेही क्षेत्रभेटीस नेण्यासाठी सहकार्य मिळण्याबाबत नियोजन करतात.

६) विद्यार्थ्यांच्या पालकांची परवानगी घेतात.

७) शिक्षक विद्यार्थ्यांशी चर्चा करून माहिती घेण्याचे घटक ठरवतात.

   - व्यावसायिकाला कोणते विशेष नाव आहे?
   - व्यावसायिक कोणता व्यवसाय करताना दिसतो?
   - व्यवसायासाठी कोणती अवजारे वापरली आहेत
   - व्यावसायिकाचा पेहराव कोणता आहे?
   - आजच्या काळात या व्यवसायात झालेला बदल

८) शिक्षक भेटीच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करण्यासाठी नियम सांगतात.

- कोणत्याही वस्तूला हात लावू नये.
- मुर्ती व शिल्पापासून योग्य त्या अंतरावर राहावे.
- अनावश्यक गर्दी टाळावी.
- शिल्पा भोवतीच्या कुंपणातून आत जाऊ नये.

**विकसित होणारी कौशल्य/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, सहयोग कौशल्य, प्रश्न कौशल्य,माहिती संकलन व सादरीकरण, व्यावहारिक कौशल्य

**आवश्यक साहित्य :** वही, पेन, पाणी बॉटल, प्रथमोपचार पेटी इ.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना संस्कृती उद्यनात घेऊन जातात.

२) प्रत्येक शिल्पाचे निरीक्षण करून तेथे लिहिलेल्या माहितीचे वाचन करून नोंदी घेण्यास सांगतात.तसेच त्याबाबतची अधिकची माहिती सांगतात.

३) विद्यार्थ्यांना सुरक्षा नियमांचे पालन करण्यास सांगतात.

४) विद्यार्थ्यांना त्यांना दिलेल्या घटकाबाबत अधिक माहिती घेऊन पुढच्या वेळी एका व्यावसायिकाच्या व्यवसायासंबंधी प्रत्यक्ष भेटीत घेतलेली माहिती व आजच्या काळात त्यात झालेला बदल याबद्दल उपलब्ध वेळेत (किमान ५ विद्यार्थ्यांच्या) गटात सादरीकरण करण्यास सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी सुरक्षा नियमांचे पालन करतात दिलेल्या घटकानुसार शिल्पाचे निरीक्षण करतात व दिलेल्या माहितीचे वाचन करतात, समजून घेतात व टिपणे घेतात.

२) उदा. व्यावसायिकाचे नाव - कुंभार

३) व्यवसाय - मातीच्या मूर्त्या, भांडी बनविणे व विकणे.

४) अवजारे व साहित्य माती, चाक (लेथ), पाणी, आवा, गंडा, चोपणे, बांबूचा दांडा, मण्यांची माळ, साचे इत्यादी पेहराव - पुरुष - धोतर, स्त्रिया नऊवारी साडी.

५) विद्यार्थी इंटरनेटच्या साहाय्याने त्यांना दिलेल्या घटकासंबंधात अधिक माहिती गोळा करतात व आताच्या परिस्थितीत झालेल्या बदलाबाबत सादरीकरण करतात.

**संदर्भ :**

१) विकिपीडिया,

२) गावचे अलुतेदार आणि बलुतेदार - लेखक : शंकरराव खरात.

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................

**उपक्रमाचे नाव : माझ्या कमाईचे नियोजन** **कृतीचे नाव :** ....................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ................................................................ **इयत्ता :** ........................

**प्रश्न १ :** व्यावसायिकाला कोणते विशेष नाव आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न २ :** व्यावसायिक कोणता व्यवसाय करताना दिसतो?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ३ :** व्यवसायासाठी कोणती अवजारे वापरली आहेत?

**उत्तर :** ..........................................................................................

**प्रश्न ४ :** व्यावसायिकाचा पेहराव कोणता आहे?

**उत्तर :** ..........................................................................................

**उपक्रम क्रमांक : ५**

**उपक्रमाचे नाव : उद्योजकता**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक मुख्याध्यापक व इतर शिक्षक यांचेशी चर्चा करून परिसरातील खाऊ गल्लीतील विविध खाद्यपदार्थ विक्री करणारे उद्योजक यांची विद्यार्थ्यांनी मुलाखत घेण्याचे उद्दिष्ट सांगून तारीख, नियोजन याबाबत चर्चा करतात.

  (उद्दिष्टे – १) उद्योजकतेबाबत विद्यार्थ्यांचा सकारात्मक दृष्टिकोन तयार करणे. २) श्रमप्रतिष्ठा याबाबत आदर निर्माण करणे.)
- शिक्षक विद्यार्थ्यांचे वर्गातील संख्येनुसार गट तयार करतात. (एका गटात किमान ५ विद्यार्थी)
- शिक्षक मुलांना वर्गातील केलेल्या गट संख्येनुसार परिसरातील यशस्वी खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या यशस्वी हातगाडीवाले यांची माहिती घेण्यास सांगतात. (यशस्वी–ज्यांच्या हातगाडीवर खाद्यपदार्थ घेण्यासाठी सतत मोठ्या प्रमाणात गर्दी असते.)
- शिक्षक मुलांमध्ये हातगाडीवाल्याने उद्योग का सुरू केला, त्यामागची प्रेरणा, उद्योजकतेचा दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी खालील प्रश्नावली तयार करतात.

१) आपले शिक्षण किती झाले आहे?

२) हा उद्योग सुरू करण्यासाठी प्रेरणा काय होती?

३) उद्योग सुरू करण्यासाठी कोणती पूर्वतयारी करावी लागली?

४) उद्योग सुरू करताना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले काय?

५) अडचणींवर आपण कशी मात केली?

६) सुरुवातीपासूनच ग्राहकांची अशी गर्दी होती काय?

७) ग्राहक येण्यासाठी आपण नेमके काय करता?

८) ग्राहक टिकवून ठेवण्यासाठी आपण कोणती काळजी घेता?

९) आपली रोज किती कमाई होते सांगू शकाल काय?

१०) या व्यवसायासाठी किती खर्च करावा लागतो सांगू शकाल काय?

११) खाद्यपदार्थ आपण तयार करता काय?

१२) खाद्यपदार्थ तयार करताना कोणती काळजी घेता?

१३) हा उद्योग सुरू करण्यासाठी कोणती कौशल्ये आवश्यक आहेत असे वाटते?

१४) यापुढे आणखी काय करायचे स्वप्न आहे?

१५) शिक्षक खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या विक्रेत्यांना मुलाखतीची दिनांक सांगतात.

१६) शिक्षक विद्यार्थ्यांना भेटीची दिनांक सांगतात.

१६) शक्य असेल तर सर्व मुलांना प्रश्नावली उपलब्ध करून देतात किंवा वहीत लिहायला सांगतात.

**आवश्यक साहित्य :** वही, पेन, पाणी बॉटल, कॅप

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक मुख्याध्यापक यांच्या परवानगीने इतर शिक्षकांसोबत विद्यार्थ्यांना खाऊ गल्लीत घेऊन जातात.

२) हातगाडीवाल्यांना मुलाखतीचे उद्दिष्ट सांगतात.

३) मुलांना गटात प्रश्न विचारायला सांगतात.

४) नोंदी घ्यायला सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांच्या सूचनेचे पालन करतात.

२) गटात प्रश्नावलीप्रमाणे प्रश्न विचारतात.

३) नोंदी घेतात.

(या उपक्रमाची प्रश्नावली सोबत जोडली आहे.)

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................

**उपक्रमाचे नाव : उद्योजकता** **कृतीचे नाव :** ..............................

**विद्यार्थ्याचे नाव :** .................................................. **इयत्ता :** ....................

**प्रश्न १** : आपले शिक्षण किती झाले आहे?

**उत्तर** : ..........................................................................

**प्रश्न २** : हा उद्योग सुरू करण्यासाठी प्रेरणा काय होती?

**उत्तर** : ..........................................................................

..........................................................................

**प्रश्न ३** : उद्योग सुरू करण्यासाठी कोणती पूर्वतयारी करावी लागली?

**उत्तर** : ..........................................................................

..........................................................................

..........................................................................

**प्रश्न ४** : उद्योग सुरू करताना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले काय?

**उत्तर** : ..........................................................................

..........................................................................

..........................................................................

**प्रश्न ५** : अडचणींवर आपण कशी मात केली?

**उत्तर** : ..........................................................................

..........................................................................

..........................................................................

**प्रश्न ६** : सुरुवातीपासूनच ग्राहकांची अशी गर्दी होती काय?

**उत्तर** : ..........

..........

**प्रश्न ७** : ग्राहक येण्यासाठी आपण नेमके काय करता?

**उत्तर** : ..........

..........

**प्रश्न ८** : ग्राहक टिकवून ठेवण्यासाठी आपण कोणती काळजी घेता?

**उत्तर** : ..........

..........

**प्रश्न ९** : आपली रोज किती कमाई होते सांगू शकाल काय?

**उत्तर** : ..........

**प्रश्न १०** : या व्यवसायासाठी किती खर्च करावा लागतो सांगू शकाल काय?

**उत्तर** : ..........

**प्रश्न ११** : खाद्यपदार्थ आपण तयार करता काय?

**उत्तर** : ..........

**प्रश्न १२** : खाद्यपदार्थ तयार करताना कोणती काळजी घेता?

**उत्तर** : ..........

..........

**प्रश्न १३** : हा उद्योग सुरू करण्यासाठी कोणती कौशल्ये आवश्यक आहेत असे वाटते?

**उत्तर** : ..........

**प्रश्न १४** : यापुढे आणखी काय करायचे स्वप्न आहे?

**उत्तर** : ..........

..........

## १६) कथाकथन

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : आधुनिक काळानुरूप रूपांतरण (Modern Adaptations of Stories)**

**पूर्वनियोजित कृती :**

- विविध पारंपरिक कथांचा संग्रह
- विविध पारंपरिक कथा यांचे आधुनिक काळात रूपांतर केलेल्या कथांचा संग्रह.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** भाषिक सर्जनशीलता, कल्पकता, संवादशैली, अभिनय

**आवश्यक साहित्य :** पारंपरिक कथांची पुस्तके स्वनिर्मित रूपांतरीत केलेली कथा. उदा. तहानलेला कावळा ससा आणि कासव लाकूडतोड्या वगैरे.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक पारंपरिक कथांची पुस्तके निवडून मुलांना उपलब्ध करून देतात.

२) शिक्षक पारंपरिक कथा सादर करतात.

उदा., तहानलेला कावळा

एकदा एका कावळ्याला फार तहान लागते. तो पाण्याचा खूप शोध घेतो. पण पाणी काही मिळत नाही. शेवटी त्याला एक भांडे दिसते. त्यात पाणी असते पण त्याची पातळी खाली गेलेली असते. त्याला पाणी काही पिता येत नाही. मग त्याला एक कल्पना सुचते. तो त्या पाण्यात छोटे खडे टाकायला सुरुवात करतो. खडे पडू लागतात तशी पाण्याची पातळी वाढू लागते. असे करता करता पाणी त्याला पिता येईल एवढ्या पातळीपर्यंत आले. त्यानंतर कावळ्याने भरपूर पाणी प्यायले आणि तो निघून गेला.

तात्पर्य : प्रयत्ने वाळूचे कण रगडता तेलही गळे.

३) तसेच कथा सादर करताना आवाजाची विविध तंत्रे वापरतात.

४) कथा सादर करताना आधुनिक काळानुसार त्यामध्ये बदल करतात.

उदा. चतुर कावळा

एकदा एका कावळ्याला फार तहान लागते. तो पाण्याचा खूप शोध घेतो. पण पाणी काही मिळत नाही. शेवटी त्याला एक भांडे दिसते. त्यात पाणी असते पण त्याची पातळी खाली गेलेली असते. त्याला पाणी काही पिता येत नाही. तो इकडे तिकडे पाहतो आणि मग त्याला एक कल्पना सुचते. त्याला जवळच वेगवेगळ्या गवताच्या काड्या पडलेल्या दिसतात. त्या काड्यांमध्ये त्याला एक रंगीत स्ट्रॉ दिसतो. तो उडत तेथे जातो आणि इकडे तिकडे पाहतो. क्षणाचा विलंब न करता तो स्ट्रॉ चोचीमध्ये पकडतो. त्यानंतर घाईघाईने तो भांड्याकडे येतो आणि स्ट्रॉ त्या भांड्यात टाकतो. त्यानंतर कावळा स्ट्रॉच्या मदतीने भरपूर पाणी पितो आणि तो निघून जातो.

तात्पर्य : जर आपण आपली युक्ती वापरली तर काहीही साध्य होऊ शकते.

'शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ'.

४) अशा प्रकारे शिक्षक विद्यार्थ्यांना कथा तयार करायला सांगतात.

५) तसेच आंतरवर्गीय कथाकथन स्पर्धेचे आयोजन करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी लक्षपूर्वक कथा ऐकतात.

२) तसेच आवाजाची तंत्रे आत्मसात करण्याचा प्रयत्न करतात.

३) पारंपरिक कथेमध्ये आधुनिक काळानुसार त्यामध्ये बदल करून कथाकथनामध्ये भाग घेतात.

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/eGGUpa_P3xE

2) https://youtu.be/ED14BOgfP08?si=_FhHm41pibxHWQNN

# १७) वाचनसंस्कृती

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **वाचू आनंदे, लिहू नेटके**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक इयत्ता सहावी ते आठवी या स्तरानुसार पुस्तकांची निवड करतात.
- या पुस्तकांमध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी या पुस्तकांचा समावेश करतात.
- कथा, कविता, चरित्र, माहिती, विज्ञान कथा, नाटिका, कार्टुन्स, वैचारिक निबंध, पत्रलेखन, ललित लेखन, प्रवासवर्णन इत्यादी पुस्तकांचा समावेश करतात.
- इयत्तानिहाय पुस्तकांचे गठ्ठे तयार करून ठेवतात .
- वाचलेल्या पुस्तकाची नोंद पुढील मुद्द्यांद्वारे करतात.

  १) पुस्तकाचे नाव

  २) लेखकाचे नाव

  ३) प्रकाशक व प्रकाशन वर्ष

  ४) पुस्तक प्रकार

  ५) पृष्ठ संख्या

  ६) भाषाशैली

  ७) आशय सारांश

  ८) मला आवडलेल्या बाबी

  ९) मला न आवडलेली बाब

**विकसित होणारी कौशल्य / फलनिष्पत्ती :** वाचनगती वाढविणे, आकलन क्षमता, लेखनकौशल्य, अभ्यासकौशल्य (वाचून नोंद ठेवणे.)

**आवश्यक साहित्य :** कथा, कविता, चरित्र, माहिती, विज्ञानकथा, नाटिका, कार्टुन्स, वैचारिक निबंध, पत्रलेखन, ललितलेखन, प्रवासवर्णन इत्यादी पुस्तके, मासिके, वाचक दैनंदिनी.

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांच्या स्तरानुसार पुस्तकांची निवड करतात.

उदा., सुधा मूर्ती यांनी लिहिलेले पुस्तक 'वाइज अँड अदरवाइज'

- शिक्षक हे पुस्तक स्वतः वाचतात आणि पुस्तकाचे पुनरावलोकन करतात.
- हे पुस्तक वाचून झाल्यावर शिक्षक वरील मुद्द्यांद्वारे लेखन करतात. उदा.

- ◈ पुस्तकाचे नाव : वाइज अँड अदरवाइज
- ◈ लेखकाचे नाव : सुधा मूर्ती
- ◈ प्रकाशक व प्रकाशन वर्ष : मेहता पब्लिशिंग हाऊस, सप्टेंबर २००३
- ◈ पुस्तक प्रकार : कथा
- ◈ पृष्ठ संख्या : २०६
- ◈ भाषाशैली : समजण्यास अतिशय सोपी, रंजक

**आशय सारांश :**

सुधा मूर्ती यांच्या वास्तविक जीवनातील घटनांमधील ५१ कथांचा संग्रह असलेले हे नॉन फिक्शन पुस्तक आहे. सुधा मूर्ती यांनी या पुस्तकात देशभरातील लोकांबद्दल काही मार्मिक आणि डोळे उघडणाच्या कथा कथन केल्या आहेत. तसेच पुस्तकात अविश्वसनीय उदाहरणांचाही समावेश करण्यात आला आहे. हे पुस्तक २००३ मध्ये प्रकाशित झाले असून, मूळ पुस्तक हे इंग्रजी भाषेमध्ये असून त्याचा मराठी अनुवाद लीना सोहोनी यांनी केला आहे.

**मला आवडलेल्या बाबी :**

एकंदरीत या पुस्तकामधील कथा लहान, खुसखुशीत आणि अत्यंत वस्तुस्थितीनुसार लिहिलेल्या आहेत. ओघवत्या भाषाशैलीमुळे या कथा आपल्या अंतकरणाला भिडतात आणि विचार करायला भाग पाडतात.

**मला न आवडलेली बाब :**

१) या पुस्तकामधील मला न आवडलेली बाब म्हणजे, म्हाताऱ्याकडून मिळालेला ज्ञानाचा वसा यामधील म्हाताऱ्याकडून हा शब्द. या शब्दाऐवजी वृद्धाकडून असा पाहिजे होता.

२) त्यानंतर शिक्षक त्यांनी केलेल्या पुस्तकाचे पुनरावलोकन विद्यार्थ्यांना वाचून दाखवतात.

३) शिक्षक त्यांनी तयार केलेल्या गठ्ठ्यांमधून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे पुस्तक वाचायला सांगतात.

४) शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांनी वाचलेल्या पुस्तकाचे वरील मुद्द्यांच्या आधारे पुनरावलोकन करायला सांगतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी शिक्षकांनी केलेल्या पुस्तकाचे पुनरावलोकन लक्षपूर्वक ऐकतात.

२) विद्यार्थी त्यांच्या आवडीचे पुस्तक वाचतात.

३) वाचलेल्या पुस्तकाचे विद्यार्थी पुनरावलोकन वरील मुद्द्यांच्या आधारे Readers Diary मध्ये लिहून काढतात.

४) त्यानंतर विद्यार्थी हे पुनरावलोकनाचे प्रकटवाचन करतात.
(शिक्षक विद्यार्थ्यांना पुस्तक पुनरावलोकन ही कृती वर्षभर चालू ठेवायला सांगतात.)

**संदर्भ साहित्य:**


1) https://www.insidemarathibooks.in/index.php/2020/01/04/review-shyamchi-aai-marathi-book/
2) https://www.insidemarathibooks.in/index.php/2022/10/07/jangalchi-duniya-marathi-book-review/
3) https://www.insidemarathibooks.in/index.php/2022/06/28/jangalach-den-marathi-book-review/
4) https://www.insidemarathibooks.in/index.php/2021/05/28/agnipankh-marathi-book-review/
5) https://www.insidemarathibooks.in/index.php/2020/04/11/bhokarwadichya-goshti-marathi-book-review/




पुस्तके वाचल्याने बौद्धिक कुतूहल वाढते आणि शिकण्याची इच्छा निर्माण होते.

## १८) तंत्रज्ञान कौशल्य - सायबर सुरक्षितता

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : सायबर गुन्हेगारीचे प्रकार**

**१) पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना खालील बाबतीत अधिक माहिती देतील.
  - ➢ सायबर गुन्हेगारी
  - ➢ सायबर गुन्हेगारीचे प्रकार
  - ➢ आपल्या अवतीभोवती घडणारी सायबर गुन्हेगारी.
  - ➢ समाजातील नागरिकांना आलेले अनुभव
  - ➢ सायबर गुन्हेगारीत छळ कसा आणि कोणत्या पद्धतीने होण्याची शक्यता असते?
  - ➢ सायबर सुरक्षा म्हणजे काय?
  - ➢ सायबर सुरक्षा देण्यासाठीचे उपाय

  शिक्षक पालकांच्या अनुमतीने याबाबत समाजात घडणारी विविध उदाहरणे देतील. स्थानिक परिस्थितीनुसार यात योग्य तो बदल करतील.

**विकसित होणारी कौशल्ये :** निरीक्षण, जाणीव-जागृती, जबाबदारी

**आवश्यक साहित्य :** शिक्षक निर्मित PowerPoint सादरीकरण, संगणक, मोबाइल

**शिक्षक कृती :**

शिक्षक विद्यार्थ्यांना खालील बाबतीत अधिक माहिती देतात.

१) सायबर गुन्हेगारी म्हणजे काय? ऑनलाइन पद्धतीने फसविणे म्हणजे काय?, बेकायदेशीर कृत्य करणे. उदा. इमेल, वेबसाईटच्या बाबतीत हे दिसून येते.

२) सायबर गुन्हेगारीचे प्रकार किती व कोणते? भरपूर प्रकार, येथे अपेक्षित किमान ४ - हॅकींग, वेब हायजॅकींग, पोर्नोग्राफी, चाईल्ड पोर्नोग्राफी. (योग्य उदाहरणे देऊन स्पष्टीकरण करतील.)

३) आपल्या अवतीभोवती सायबर गुन्हेगारी कशी घडते? ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, स्पूफिंग, क्रेडीट कार्ड फसवणूक.

४) हे सांगून त्याद्वारे समाजातील नागरिकांना कशा प्रकारे धमकावले जाते? फोनवरून, ईमेलद्वारे, मेसेजद्वारे आणि त्यांचा छळ कसा आणि कोणत्या पद्धतीने केला जातो? - वैयक्तिक/सार्वजनिक खाते हॅकींग, वैयक्तिक माहिती चोरून, साधनात व्हायरस टाकून, ऑनलाइन शिवीगाळ व पाठलाग करून.

५) सायबर सुरक्षा म्हणजे नेमके काय? सायबर गुन्हेगारीपासून वाचण्यासाठी अमलात आणलेल्या उपाययोजना सांगतात.

६) सायबर सुरक्षा देणारे उपाय कोणते? यामध्ये अधिकृत प्रणाली वापरणे, क्लिष्ट पासवर्ड ठेवणे, पासवर्ड कोणासही न देणे, वैयक्तिक माहिती कोणासमोरही न उघडणे, अनोळखी व्यक्तींशी ओळख न करणे या विषयी माहिती सांगतात.

७) आपण कोणती खबरदारी घेतली पाहिजे? यामध्ये सतत ऑनलाइन राहणे टाळावे, लहान बालकांच्या व्यवहारावर लक्ष ठेवावे, निनावी फोन/मेसेज/इमेल प्रतिसाद न देणे हे अत्यंत सोप्या भाषेत, धमकावणे आणि छळ याबद्दल अधिक माहिती देतात.

**विद्यार्थी कृती :**

विद्यार्थी सायबर धमकी, त्याची पद्धत आणि त्याद्वारे होणारे नुकसान, केला जाणारा छळ याबद्दल अधिक जाणून घेतात व शिक्षकांशी चर्चा करतात.

१) सायबर गुन्हेगारी म्हणजे काय?– ऑनलाइन पद्धतीने फसविणे, बेकायदेशीर कृत्य करणे. उदा. ई–मेल, वेबसाईट हे समजावून घेतात.

२) सायबर गुन्हेगारीचे प्रकार किती व कोणते? भरपूर प्रकार, येथे अपेक्षित किमान ४ – हॅकींग, वेब हायजॅकींग, पोर्नोग्राफी, चाईल्ड पोर्नोग्राफी हे समजावून घेतात.

३) आपल्या अवतीभोवती सायबर गुन्हेगारी कशी घडते? ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, स्पूफिंग, क्रेडीट कार्ड फसवणूक. हे वापराबाबत कोणती काळजी घ्यावी हे समजून घेतात.

४) समाजातील नागरिकांना कशा प्रकारे धमकावले जाते? फोनवरून, ईमेलद्वारे, मेसेजद्वारे याचे प्रकार व पद्धती समजून घेतात.

५) आणि त्यांचा छळ कसा आणि कोणत्या पद्धतीने केला जातो?– वैयक्तिक/सार्वजनिक खाते हॅकींग, वैयक्तिक माहिती चोरून, साधनात व्हायरस टाकून, ऑनलाइन शिवीगाळ व पाठलाग करून हे समजावून घेतात.

६) सायबर सुरक्षा म्हणजे नेमके काय? सायबर गुन्हेगारीपासून वाचण्यासाठी अमलात आणलेले उपाययोजना हे लक्षपूर्वक ऐकतात व त्याविषयी चर्चा करतात.

७) सायबर सुरक्षा देणारे उपाय कोणते? अधिकृत प्रणाली वापरणे, क्लिष्ट पासवर्ड ठेवणे, पासवर्ड कोणासही न देणे, वैयक्तिक माहिती कोणासमोर ही न उघडणे, अनोळखी व्यक्तींशी ओळख न करणे. याचे पालन करण्याविषयी चर्चा करतात.

८) आपण कोणती खबरदारी घेतली पाहिजे? सतत ऑनलाइन राहणे टाळावे, लहान बालकांच्या व्यवहारावर लक्ष ठेवावे, निनावी फोन/मेसेज/इमेल प्रतिसाद न देणे इत्यादी बाबी समजून देतात.

उदा. **Phishing message's, email, links**

> Congratulations!
> You're eligible for a tax refund of $ 550.
> Click the link to claim now :
> irs.gov.refund-claim

**संदर्भ साहित्य :**

1) https://youtu.be/iYvd6IcmPJU?feature=shared

उदा. **Phishing message's, email, links**

> HSBC ALERT : Request for
> NEW payee MR D FRASER
> has been made on your account.
> If thish was NOT done by you,
> visit : hs-internet-cancel-payees
> .com/login

**संदर्भ साहित्य :**

2) https://youtu.be/fVeUeC7fYmg?si=Z4VF0

उदा. **phishing message's, email, links**

**Types of Bank Account Hacking**

| TYPE | DESCRIPTION |
|---|---|
| phishing Attacks | Deceptive Emails or Websites Are used to Trick Individuals into Revealing Sensitive information. |
| Card Skimming and Cloning | Capture of card details for fraudulent use, followed by the creation of counterfeit card. |
| Man-in-the Middle Attacks | Interception and manipulation of communication between parties to steal or alter data. |
| ATM Hacking | Physical or digital exploitation of ATMs to withdraw funds or collect card data. |
| Identity Theft | Theft of personal information for fraudulent purpose, including unauthorized access to bank accounts. |
| Malware Attacks | Infection of Device with malicious software to gain unauthorized access to bank accounts. |

FINANCE STRATEGISTS

3) https://youtu.be/fVeUeC7fYmg?feature=shared

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : माहिती (डेटा) चा योग्य वापर**

## १) पूर्वनियोजित कृती :

शिक्षक खालील घटकांचा स्वतः अभ्यास करतील.

- डेटा म्हणजे काय?
- डेटा कुठून-कुठून प्राप्त होतो?
- डेटाचे प्रकार कोणते?
- डेटा कसा साठवून ठेवता येतो?
- डेटाचे वर्गीकरण, विश्लेषण कसे करावे?
- डेटा उल्लंघन/गैरवापर याबद्दल अधिक माहिती मिळवतील, तसेच एक पीपीटी तयार करतील.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** निरीक्षण, आत्मविश्वास, विश्वसनीयता, विद्यार्थी डेटा उल्लंघन नेमके कसे होते? हे अचूक ओळखतात.

**आवश्यक साहित्य :** शिक्षकनिर्मित PowerPoint सादरीकरण, संगणक, मोबाइल

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना डेटा कशाला म्हणतात? - प्राथमिक स्वरुपात पुरविलेली कच्ची माहिती मग ती ऑनलाइन असो वा ऑफलाइन याविषयी विद्यार्थ्यांना समजावून सांगतात याविषयी चर्चा घडवून आणतात.

२) डेटा कुठून कुठून प्राप्त होतो? - फोन/मेसेज/इमेल/सर्वेक्षण/ऑनलाइन फॉर्म, प्रतिसाद

३) डेटाचे प्रकार किती? - २, संख्यात्मक आणि गुणात्मक याबाबत स्पष्टीकरण करतात.

४) डेटा कसा साठवून ठेवता येतो? पोर्टलवर, ड्राईव्हवर, क्लाऊडवर याची प्रक्रिया सांगतात.

५) डेटाचे वर्गीकरण, विश्लेषण कसे होते? - विविध सोफ्टवेअरद्वारा उदा. SPSS, Google फॉर्म, एक्सेल शीट याबाबत माहिती देतात.

६) डेटा उल्लंघन/गैरवापर कसे होते? वैयक्तिक कामासाठी, चोरी करण्यासाठी, त्रास देण्यासाठी, आर्थिक लूट करण्यासाठी.

७) त्याचा परीणाम काय होतो? वैराश्य, मनोविकृतपणा येणे, वाईट मार्गाला लागणे याबद्दल अधिक माहिती देतात.

## विद्यार्थी कृती :

१) डेटा कशाला म्हणतात? – प्राथमिक स्वरूपात पुरविलेली कच्ची माहिती मग ती ऑनलाइन असो वा ऑफलाइन हे समजून घेतात व चर्चेत सहभाग घेतात.

२) डेटा कुठून-कुठून प्राप्त होतो? – फोन/मेसेज/इमेल/सर्वेक्षण/ऑनलाइन फॉर्म, प्रतिसाद याबाबत समजून घेतात.

३) डेटाचे प्रकार किती? २- संख्यात्मक आणि गुणात्मक याबाबत समजून घेतात.

४) डेटा कसा साठवून ठेवता येतो? पोर्टलवर, ड्राईव्हवर, पोर्टवर, क्लाऊडवर याबाबत माहिती ऐकतात.

५) डेटाचे वर्गीकरण, विश्लेषण कसे होते?- विविध सोफ्टवेअरद्वारा उदा. SPSS, Google फॉर्म, एक्सेल शीट.

६) डेटा उल्लंघन/गैरवापर कसे होते? वैयक्तिक कामासाठी, चोरी करण्यासाठी, त्रास देण्यासाठी, आर्थिक लूट करण्यासाठी याबाबत माहिती घेतात व चर्चा करतात.

७) त्याचा परीणाम काय होतो? डेटा कशाला म्हणतात? याविषयी समजून घेतात.

८) डेटा उल्लंघन कसे होते? याबद्दल अधिक जाणून घेतात.

उदा.







## संदर्भ साहित्य :

1) https://youtu.be/gPqaVBiQvRk?feature=shared

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..............................................................................................................

**उपक्रमाचे नाव : माझ्या कमाईचे नियोजन** **कृतीचे नाव :** ..........................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ...................................................................... **इयत्ता :** ......................

**प्रश्न १ :** डेटा कशाला म्हणतात?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न २ :** डेटा कुठून कुठून प्राप्त होतो?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न ३ :** डेटाचे प्रकार किती?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न ४ :** डेटा कसा साठवून ठेवता येतो?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न ५ :** डेटाचे वर्गीकरण, विश्लेषण कसे होते?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न ६ :** डेटा उल्लंघन/गैरवापर कसा होतो?

**उत्तर :** ..............................................................................................................

**प्रश्न ७ :** त्याचा परिणाम काय होतो?

**उत्तर :** ..............................................................................................................

**उत्तर :**

१) प्राथमिक स्वरूपात पुरविलेली प्राथमिक माहिती मग ती ऑनलाइन असो किंवा ऑफलाइन.

२) फोन/मेसेज/इमेल/सर्वेक्षण/ऑनलाइन फॉर्म, प्रतिसाद.

३) २, संख्यात्मक आणि गुणात्मक

४) पोर्टवर, ड्राईव्हवर, क्लाऊडवर

५) विविध सॉफ्टवेअरद्‌वारा उदा. SPSS, Google फॉर्म, एक्सेल शीट.

६) वैयक्तिक कामासाठी, चोरी करण्यासाठी, त्रास देण्यासाठी, आर्थिक लूट करण्यासाठी.

७) नैराश्य, मनोविकृतपणा येणे, वाईट मार्गाला लागणे याबद्‌दल अधिक माहिती देतात.

**उपक्रम क्रमांक : ३**

**उपक्रमाचे नाव : संगणक, मोबाइल वापरत असताना घ्यावयाची सायबर सुरक्षा**

**पूर्वनियोजित कृती :**

- शिक्षक विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात संगणक, मोबाइल वापरत असताना सायबर सुरक्षा महत्त्वाची का आहे? याविषयी माहिती मिळवतील व त्याचा अभ्यास करतील.
- दैनंदिन वापरातील माहिती देवाणघेवाण संबंधी विविध उपकरणे कोणती?
- समाजमाध्यमे म्हणजे काय?
- समाजमाध्यमांची उदाहरणे कोणकोणती? उदाहरणे तयार करून ठेवतील.
- समाजमाध्यमे वापरताना आपल्या उपकरणात सायबर सुरक्षा कशी ठेवावी?
  याबद्दल अधिक माहिती तयार करून ठेवतील.

**विकसित होणारी कौशल्य/फलनिष्पत्ती :** जबाबदारी, जाणीव-जागृती, सर्जनशीलता, विद्यार्थी ऑनलाइन कार्य करीत असताना सायबर सुरक्षा किती महत्त्वाची आहे हे जाणून घेतात.

**आवश्यक साहित्य :** शिक्षक निर्मित PowerPoint सादरीकरण, संगणक, मोबाइल

**शिक्षक कृती :**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात संगणक, मोबाइल वापरत असताना सायबर सुरक्षा महत्त्वाची का आहे? याविषयी माहिती देतात.

२) विविध उपकरणे कोणती? संगणक, मोबाइल, टॅबलेट, लॅपटॉप याविषयी माहिती देतात.

३) समाजमाध्यमे म्हणजे काय? समाजातील व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क करण्यासाठी वापरली जाणारी साधने याविषयी चर्चा घडवून आणतात.

४) समाजमाध्यमांची उदाहरणे कोणकोणती? WhatsApp Twitter, Digi locker, Facebook याबाबत माहिती देतात.

५) समाजमाध्यमे वापरताना आपल्या उपकरणात सायबर सुरक्षा कशी ठेवावी? अधिकृत प्रणाली (सॉफ्टवेअर) वापर, अधिकृत संकेतस्थळावरून समाजमाध्यमे प्राप्त करणे, उपकरणांची सेटिंग अद्ययावत ठेवणे, अनधिकृत संकेतस्थळावरून कुठलीही माहिती/फोटो/संदेश प्राप्त न करणे याबाबत चर्चा करतात.

६) शिक्षक विद्यार्थ्यांना माहिती देताना अँटीव्हायरस आणि अँटी-मॅलवेअर सॉफ्टवेअर वापरा. अज्ञात स्रोतांकडून डाऊनलोड टाळा असे आवाहन करतात.

७) यासारखे विविध सोशल मिडिया अप्स वापरत असताना सायबर सुरक्षा महत्त्वाची का आहे? वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी, सामाजिक दर्जा सुयोग्य राखण्यासाठी, एकमेकांचा आदर करण्यासाठी याबद्दल अधिक माहिती देतात.

## विद्यार्थी कृती :

१) विद्यार्थी दैनंदिन जीवनात संगणक, मोबाइल वापरत असताना सायबर सुरक्षा महत्त्वाची का आहे? समजून घेतात.

२) विविध उपकरणे कोणती? संगणक, मोबाइल, टॅबलेट, लॅपटॉप याविषयी जाणून घेतात.

३) समाजमाध्यमे म्हणजे काय? समाजातील व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क करण्यासाठी वापरली जाणारी साधने याविषयी चर्चेत सहभाग घेतात.

४) समाजमाध्यमांची उदाहरणे कोणकोणती? WhatsApp Twitter, Digi locker, Facebook याविषयी समजून घेतात.

५) समाजमाध्यमे वापरताना आपल्या उपकरणात सायबर सुरक्षा कशी ठेवावी? अधिकृत प्रणाली (सॉफ्टवेअर) वापर, अधिकृत संकेतस्थळावरून समाजमाध्यमे प्राप्त करणे, उपकरणांची सेटिंग अद्ययावत ठेवणे, अनधिकृत संकेतस्थळावरून कुठलीही माहिती/फोटो/संदेश प्राप्त न करणे याबाबत चर्चा करतात.

६) यासारखे विविध सोशल मिडिया ॲप्स वापरत असताना सायबर सुरक्षा महत्त्वाची का आहे? वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी, सामाजिक दर्जा सुयोग्य राखण्यासाठी, एकमेकांचा आदर करण्यासाठी हे समजून घेतात.


७) सामाजिक माध्यमांवर कोणतीही पोस्ट शेअर करीत असताना त्यातून सामाजिक स्वास्थ्य बिघडणार नाही याची काळजी घेणे. याबाबत माहिती समजून घेतात.

८) कोणतीही पोस्ट टाकताना कोणताही बाका प्रसंग निर्माण होणार नाही यादृष्टीने जबाबदारीने वागणे किती अत्यावश्यक आहे. याबाबत जाणून घेतात.

९) विविध सोशल मिडिया ॲप्सचा वापर करीत असताना सायबर सुरक्षा म्हणून त्यांना पासवर्ड देणे आणि तो मजबूत असावा तसेच सुरक्षेच्या कारणास्तव तो सातत्याने बदलता ठेवावा. हे समजून घेतात.

१०) विद्यार्थी दैनदिन जीवनात स्वतः तसेच कुटुंबातील, शेजाऱ्यांद्वारे वापरल्या जाणाऱ्या विविध सोशल मीडिया ॲप्सबाबत नेमकी कोणती सायबर खबरदारी घेतली पाहिजे? याची माहिती करून घेतात.

११) आपल्याद्वारे सामाजिक माध्यमांवर कोणतीही पोस्ट शेअर करीत असताना त्यातून सामाजिक स्वास्थ्य बिघडणार नाही याची काळजी घेतात.




१२) आपल्याद्वारे कोणतीही पोस्ट फॉरवर्ड करताना सामाजिक तेढ निर्माण होणार नाही याची

खबरदारी घेऊन विविध सामाजिक माध्यमांवर जबाबदारीने वागतात. याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेतात.

१३) विद्यार्थी अँटीव्हायरस आणि अँटी–मॅलवेअर सॉफ्टवेअरचे महत्त्व जाणून घेतात आणि अज्ञात स्त्रोतांकडे दुर्लक्ष करतात.

## संदर्भ साहित्य :

1) https://youtu.be/UIcQbHrORt4?feature=shared

उदा. WhatsApp Twitter, Digi locker, Facebook, Instagram वर येणारे मेसेजस




उदा. Windows ऑपरेटिंग सिस्टिम, सॉफ्टवेअर Antivirus kits




1) https://www.youtube.com/live/5PwileChkvY?feature=shared

2) https://youtu.be/Ll9iP305qdQ?feature=shared

3) https://www.youtube.com/live/5PwileChkvY?feature=shared

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................................

**उपक्रमाचे नाव : माझ्या कमाईचे नियोजन** **कृतीचे नाव :** ........................................

**विद्यार्थ्याचे नाव :** .................................................................................. **इयत्ता :** ..............................

**प्रश्न १ :** दैनंदिन जीवनात संगणक, मोबाइल वापरत असताना सायबर सुरक्षा महत्त्वाची का आहे?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न २ :** विविध उपकरणे कोणती?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न ३ :** समाजमाध्यमे म्हणजे काय?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न ४ :** समाजमाध्यमांची उदाहरणे कोणकोणती?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न ५ :** समाजमाध्यमांचा वापर करताना आपल्या उपकरणात सायबर सुरक्षा कशी ठेवावी?

**उत्तर :** ..........................................................................................................

**उत्तर :**

१) –

२) संगणक, मोबाइल, टॅबलेट, लॅपटॉप

३) समाजातील व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क करण्यासाठी वापरली जाणारी साधने

४) WhatsApp Twitter, Digi locker, Facebook

५) अधिकृत प्रणाली (सॉफ्टवेअर) वापर, अधिकृत संकेतस्थळावरून समाजमाध्यमे प्राप्त करणे, उपकरणांची सेटिंग अद्ययावत ठेवणे, अनधिकृत संकेतस्थळावरून कुठलीही माहिती/फोटो/संदेश प्राप्त न करणे.

**उपक्रम क्रमांक : ४**

**उपक्रमाचे नाव : सायबर सुरक्षा संसाधनांची ओळख**

**पूर्वनियोजित कृती :**

शिक्षक खालील मुद्द्यांचा अभ्यास करून, एक आकर्षक पीपीटी (PPT) तयार करतील.

- सायबर सुरक्षा म्हणजे काय?
- सायबर सुरक्षा उपाय
- विविध सायबर सुरक्षा यंत्रणा
- सायबर सुरक्षा जागरूकता करणाऱ्या शासकीय, निमशासकीय संस्था
- सायबर सुरक्षा दिन
- एक अध्यापक, विद्यार्थी व नागरिक म्हणून आपली जबाबदारी त्याबाबत आवश्यक माहिती मिळवतील.

**विकसित होणारी कौशल्ये/फलनिष्पत्ती :** जाणीवजागृती, सहकार्य, समन्वय

**आवश्यक साहित्य :** शिक्षकनिर्मित PowerPoint सादरीकरण, संगणक, मोबाइल

**शिक्षक कृती :**

शिक्षक खाली नमूद केल्यानुसार आवश्यक माहिती, स्पष्टीकरण देतील व चर्चा घडवून आणतील.

१) शिक्षक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा म्हणजे काय? – स्वतः किंवा इतरांचे संगणकप्रणाली, कम्युनिकेशन उपकरणे, डेटा सेंटर्स, नेटवर्क्स इत्यादींना दुर्भावनापूर्ण हल्ल्यांपासून, सायबर हल्ल्यांपासून संरक्षित करण्यासाठी केलेल्या कार्यक्षम सुरक्षाउपाय तंत्र याविषयी माहिती देतात.

२) सायबर सुरक्षाउपाय – स्वतः किंवा इतरांच्या नियमित वापरत असलेल्या वेबसाईट अधिकृत असणे, नियमित आपल्या उपकरणांची सेटिंग अद्ययावत करणे, कुठलीही घटना घडल्यास आपल्या घरातील, जवळच्या व्यक्तींचा सल्ला घेणे.

३) सायबर सुरक्षा जागरूकता कार्यक्रम कोणकोणत्या शासकीय, निमशासकीय संस्थांमार्फत आयोजित केले जातात? – राष्ट्रीय सायबर सुरक्षा एजन्सी (एनसीएसए) : यासाठी विविध संकेतस्थळ आपणास उपयुक्त आहेत, https://www.ncsira.org/home/, सायबर सुरक्षा आणि क्राइम रिस्पॉन्स सेंटर (सीएससीआरसी): https://cybercrime.gov.in/, सायबर टिप्स हेल्प लाइन :१९३०, https://www.cyberlawsindia.net/ याबाबत सविस्तर माहिती देतात.

४) सायबर सुरक्षा दिन कधी साजरा करतात?– ५ फेब्रुवारी हा दिन भारतात 'Safe Internet Day' म्हणून साजरा करावा. यादिवशी सायबर जागरूकतेबाबत कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

५) एक अध्यापक, विद्यार्थी व नागरिक म्हणून आपली जबाबदारी काय?– आपल्या परिसरातील सायबर सुरक्षा पुरविणाऱ्या अधिकृत संस्था, व्यक्ती यांचे संपर्क क्रमांक नेहमी सोबत ठेवावे, शासनाने नेमून दिलेल्या सायबर विश्वात सुरक्षित व संरक्षित शालेय वातावरण निर्मितीकरिता मार्गदर्शक तत्त्वे, धोरणे व पद्धतीचे पालन करा. आपल्या विद्यार्थ्यांच्या हालचाली, वर्तनावर लक्ष ठेवून त्यांना काही मदतीचे गरज आहे काय? याबाबत नेहमी जागृत रहा.

त्याबाबत अधिक माहिती देतात.

## विद्यार्थी कृती :

विद्यार्थी शिक्षकांच्या सूचनेनुसार खालील मुद्द्यांबाबत कृती करतील.

१) सायबर सुरक्षा म्हणजे काय? – स्वतः किंवा इतरांचे संगणकप्रणाली, कम्युनिकेशन उपकरणे, डेटा सेंटर्स, नेटवर्क्स इत्यादींना दुर्भावनापूर्ण हल्ल्यांपासून, सायबर हल्ल्यांपासून संरक्षित करण्यासाठी केलेल्या कार्यक्षम सुरक्षाउपाय तंत्र होत.

२) सायबर सुरक्षा उपाय – स्वतः किंवा इतरांच्या नियमित वापरत असलेल्या वेबसाईट अधिकृत असणे, नियमित आपल्या उपकरणांची सेटिंग अद्ययावत करणे, कुठलीही घटना घडल्यास आपल्या घरातील, जवळच्या व्यक्तींचा सल्ला घेणे. याबाबत माहिती घेतील व चर्चा करतील.

३) सायबर सुरक्षा जागरूकता कार्यक्रम कोणकोणत्या शासकीय, निमशासकीय संस्थांमार्फत आयोजित केले जातात? – राष्ट्रीय सायबर सुरक्षा एजन्सी (एनसीएसए) : यासाठी विविध संकेतस्थळ आपणास उपयुक्त आहेत, https://www.ncsira.org/home/, सायबर सुरक्षा आणि क्राइम रिस्पॉन्स सेंटर (सीएससीआरसी): https://cybercrime.gov.in/, सायबर टिप्स लाइन :१९३०, https://www.cyberlawsindia.net/ याबाबत सविस्तर माहिती देतात.

४) 'सायबर सुरक्षा दिन' कधी साजरा करतात? – ५ फेब्रुवारी हा दिन भारतात 'Safe Internet Day' म्हणून साजरा करावा. यादिवशी सायबर जागरूकतेबाबत कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

५) एक अध्यापक, विद्यार्थी व नागरिक म्हणून आपली जबाबदारी काय? – आपल्या परिसरातील सायबर सुरक्षा पुरविणाऱ्या अधिकृत संस्था, व्यक्ती यांचे संपर्क क्रमांक नेहमी सोबत ठेवावे, शासनाने नेमून दिलेल्या सायबर विश्वात सुरक्षित व संरक्षित शालेय वातावरण निर्मितीकरिता मार्गदर्शक तत्त्वे, धोरणे व पद्धतीचे पालन करा. आपल्या विद्यार्थ्यांच्या हालचाली, वर्तनावर लक्ष ठेवून त्यांना काही मदतीचे गरज आहे काय? याबाबत अधिक माहिती जाणून घेऊन नेहमी जागृत राहतात.

## संदर्भ साहित्य :


1) https://www.youtube.com/watch?v=vBcArxypYRg

2) https://www.youtube.com/watch?v=TS1ydjYpjT8

3) https://www.youtube.com/watch?v=3e4JdZyrJGg

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ....................................................................................................

**उपक्रमाचे नाव : माझ्या कमाईचे नियोजन** **कृतीचे नाव :** ....................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ................................................................ **इयत्ता :** ........................

**प्रश्न १ :** सायबर सुरक्षा म्हणजे काय?

**उत्तर :** ....................................................................................................

....................................................................................................

**प्रश्न २ :** सायबर सुरक्षा उपाय –

**उत्तर :** ....................................................................................................

....................................................................................................

**प्रश्न ३ :** सायबर सुरक्षा जागरूकता कार्यक्रम कोणकोणत्या शासकीय, निमशासकीय संस्थांमार्फत आयोजित केले जातात?

**उत्तर :** ....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

**प्रश्न ४ :** सायबर सुरक्षा दिन कधी साजरा करतात?

**उत्तर :** ....................................................................................................

**प्रश्न ५ :** एक अध्यापक, विद्यार्थी व नागरिक म्हणून आपली जबाबदारी काय?

**उत्तर :** ....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

**उत्तर :**

१) स्वतः किंवा इतरांचे संगणकप्रणाली, कम्युनिकेशन उपकरणे, डेटा सेंटर्स, नेटवर्क्स इत्यादींना दुर्भावनापूर्ण हल्ल्यांपासून, सायबर हल्ल्यांपासून संरक्षित करण्यासाठी केलेल्या कार्यक्षम सुरक्षा उपाय तंत्र होत.

२) स्वतः किंवा इतरांच्या नियमित वापरत असलेल्या वेबसाईट अधिकृत असणे, नियमित आपल्या उपकरणांची सेटिंग अद्ययावत करणे, कुठलीही घटना घडल्यास आपल्या घरातील, जवळच्या व्यक्तींचा सल्ला घेणे.

३) राष्ट्रीय सायबर सुरक्षा एजन्सी (एनसीएसए) : यासाठी विविध संकेतस्थळ आपणास उपयुक्त आहेत, https://www.ncsira.org/home/, सायबर सुरक्षा आणि क्राइम रिस्पॉन्स सेंटर (सीएससीआरसी): https://cybercrime.gov.in/, सायबर टिप्स हेल्पलाइन :१९३०, https://www.cyberlawsindia.net/ याबाबत सविस्तर माहिती देतात.

४) ५ फेब्रुवारी हा दिन भारतात 'Safe Internet Day' म्हणून साजरा करावा. यादिवशी सायबर जागरूकतेबाबत कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

५) आपल्या परिसरातील सायबर सुरक्षा पुरविणाऱ्या अधिकृत संस्था, व्यक्ती यांचे संपर्क क्रमांक नेहमी सोबत ठेवावे, शासनाने नेमून दिलेल्या सायबर विश्वात सुरक्षित व संरक्षित शालेय वातावरण निर्मितीकरिता मार्गदर्शक तत्त्वे, धोरणे व पद्धतीचे पालन करा. आपल्या विद्यार्थ्यांच्या हालचाली, वर्तनावर लक्ष ठेवून त्यांना काही मदतीचे गरज आहे काय? याबाबत नेहमी जागृत रहा.

## १९) लोकसेवा हक्क अधिनियम

**उपक्रम क्रमांक :** १

**उपक्रमाचे नाव :** **तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, तहसील कचेरी, पंचायत समिती, RTO कार्यालयास क्षेत्रभेट.**

**उद्देश :** ग्रामपंचायत कार्यालय, तहसील कचेरी, पंचायत समिती, तलाठी, RTO कार्यालय, यामार्फत मिळणाऱ्या सेवांची माहिती घेणे.

**पूर्वनियोजित कृती :**

- शासकीय कार्यालयांच्या कामकाजाच्या दिवशी क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यासाठी शासकीय सुट्ट्यांची माहिती घेतात व यानुसार क्षेत्रभेटीचे नियोजन करतात.
- शासकीय कार्यालयातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना क्षेत्रभेटीची पूर्वसूचना देतात.
- शिक्षक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध कार्यालयांविषयी माहिती गोळा करतात.
  - ➢ ग्रामपंचायत (ग्रामीण विभाग)
  - ➢ पंचायत समिती/तहसील कार्यालय (ग्रामीण विभाग)
  - ➢ क्षेत्रीय कार्यालय (शहरी विभाग)
- विद्यार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, जात पडताळणी प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिललेयर प्रमाणपत्र इत्यादीविषयी पायाभूत माहिती सांगतात.
- कोणत्या स्वरूपाचे प्रश्न विचारायचे याची शिक्षक-विद्यार्थी चर्चा करतात.
- क्षेत्रभेटीच्या दरम्यान विचारावयाच्या प्रश्नांची विद्यार्थ्यांना यादी करण्यास सांगतात. विद्यार्थ्यांना सुचवलेल्या विषयानुरुप प्रश्ननिर्मिती करण्यास सांगतात.
- विद्यार्थ्यांनी काढलेल्या प्रश्नांची तपासणी करून प्रश्नांचे अंतिमीकरण करतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** प्रश्ननिर्मिती, संवाद कौशल्य, माहिती संकलन

**आवश्यक साधनसामग्री :** उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, जात पडताळणी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र इत्यादीचे नमुने.

**शिक्षक कृती :**

१) विद्यार्थ्यांना दहावीनंतर, बारावीनंतर आवश्यक असलेले दाखले किंवा प्रमाणपत्र यांची माहिती मिळवण्यासाठी जवळच्या ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, ग्रामपंचायत, क्षेत्रीय कार्यालयास भेटीचे नियोजन करतात.

२) विद्यार्थ्यांचे ५ –५ किंवा १० – १० याप्रमाणे गट करतात.

३) ग्रामपंचायत/तहसील कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय या ठिकाणी प्रत्यक्ष क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसह आयोजित करतात.

४) विद्यार्थ्यांना माहिती घेत असताना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) विद्यार्थी क्षेत्रभेटीच्या दरम्यान विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची निर्मिती करतात.

जसे –
- उत्पन्नाचा दाखला काढण्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता असते?
- उत्पन्नाचा दाखला काढण्यासाठी कोठे जावे लागते ?
- उत्पन्नाच्या दाखल्याची वैधता किती वर्ष असते?

२) ग्रामपंचायत/तहसील कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय या ठिकाणी प्रत्यक्ष क्षेत्रभेटीमध्ये सहभागी होतात.

३) विविध दाखले/प्रमाणपत्रांना अनुसरून संबंधिताना प्रश्न विचारतात.

उदा. १) वरील सर्व दाखले देणारे संबंधित अधिकारी कोण असतात?

२) वरील सर्व दाखले/सेवा उपलब्ध करून घेण्याचा कालावधी किती असतो?

३) जर उपलब्ध वेळेत दाखले/सेवा नाही मिळाली तर आपील कोणाकडे करायचे?

४) उपलब्ध वेळेत संवा उपलब्ध नाही झाली तर शास्तीची तरतूद काय आहे?

५) नागरिकांनी खोटी माहिती पुरवून सेवा उपलब्ध करून घेतली तर कोणत्या शिक्षेची तरतूद आहे?

४) प्राप्त माहितीचे लेखन व संकलन करतात.

५) मिळालेल्या माहितीवर आधारित सहध्यायी व शिक्षक यांच्यासोबत चर्चा करतात.

**संदर्भ साहित्य :** १) प्रश्नावली २) पेन्सिल ३) पेन ४) कोरे कागद

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..............................................................................................................................

**उपक्रमाचे नाव : माझ्या कमाईचे नियोजन** **कृतीचे नाव :** ..........................................

**विद्यार्थ्याचे नाव :** .......................................................................... **इयत्ता :** ..........................

**प्रश्न १ :** उत्पन्नाचा दाखला काढण्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता असते?

**उत्तर :** ..............................................................................................................................

**प्रश्न २ :** उत्पन्नाचा दाखला काढण्यासाठी कोठे जावे लागते?

**उत्तर :** ..............................................................................................................................

**प्रश्न ३ :** उत्पन्नाच्या दाखल्याची वैधता किती वर्ष असते?

**उत्तर :** ..............................................................................................................................

**प्रश्न ४ :** दाखले देणारे संबंधित अधिकारी कोण असतात?

**उत्तर :** ..............................................................................................................................

**प्रश्न ५ :** सर्व दाखले/सेवा उपलब्ध करून घेण्याचा कालावधी किती असतो?

**उत्तर :** ..............................................................................................................................

**प्रश्न ६ :** जर उपलब्ध वेळेत दाखले/सेवा नाही मिळाली तर आपील कोणाकडे करायचे?

**उत्तर :** ..............................................................................................................................

**प्रश्न ७ :** उपलब्ध वेळेत संवा उपलब्ध नाही झाली तर शास्तीची तरतूद काय आहे?

**उत्तर :** ..............................................................................................................................

**प्रश्न ८ :** नागरीकांनी खोटी माहिती पुरवून सेवा उपलब्ध करून घेतली तर कोणत्या शिक्षेची तरतूद आहे?

**उत्तर :** ..............................................................................................................................

**उपक्रम क्रमांक : २**

**उपक्रमाचे नाव : महा–ई सेवा केंद्रास क्षेत्रभेट**

**उद्देश :** विविध कागदपत्रे काढण्यासाठीची कार्यपद्धती माहिती होणे.

**पूर्वनियोजित कृती :**

- शासकीय कार्यालयांच्या कामकाजाच्या दिवशी क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यासाठी शासकीय सुट्ट्यांची माहिती घेतात.
- महा–ई सेवा केंद्रातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना क्षेत्रभेटीची पूर्वसूचना देतात.
- शिक्षक महा–ई सेवा केंद्राविषयी माहिती गोळा करतात.
  - ➢ आधारकार्ड केंद्र
  - ➢ महा–ई सेवा केंद्र
- विद्यार्थ्यांना महा–ई सेवा याविषयी पायाभूत माहिती सांगतात.
- क्षेत्रभेटीच्या दरम्यान विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचे संकलन करतात.
- विद्यार्थ्यांना सुचवलेल्या प्रश्नांची तपासणी करून प्रश्नांचे अंतिमीकरण करतात.

**विकसित होणारी कौशल्ये :** प्रश्ननिर्मिती, संवाद कौशल्य, माहिती संकलन

**आवश्यक साधनसामग्री :** आधारकार्ड, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, नॉन क्रिमेलियर, वाहन लायसन्स काढण्यासाठी आवश्यक कागदपत्राचे नमुने.

**शिक्षक कृती :**

शिक्षक वरील दाखल्यांची माहिती मिळवण्यासाठी जवळच्या महा–ई सेवा केंद्रास भेटीचे नियोजन करतात.

१) विद्यार्थ्यांचे ५ –५ किंवा १० – १० याप्रमाणे गट करतात.

२) महा–ई सेवा केंद्र या ठिकाणी प्रत्यक्ष क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसह आयोजित करतात.

३) विद्यार्थ्यांना माहिती घेत असताना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करतात.

**विद्यार्थी कृती :**

१) क्षेत्रभेटीच्या दरम्यान विचारावयाचे प्रश्न शिक्षकांना तोंडी सांगतात.


जसे –
- वरील दाखले काढण्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता असते?
- वरील दाखले काढण्यासाठी कोठे जावे लागते?
- वरील दाखले किती वर्षासाठी वैध असते?

२) महा–ई सेवा केंद्र या ठिकाणी प्रत्यक्ष क्षेत्रभेटीमध्ये सहभागी होतात.


३) विविध दाखले/प्रमाणपत्रांना अनुसरुन संबंधिताना प्रश्न विचारतात.

४) मिळालेल्या माहितीवर आधारित सहध्यायी व शिक्षक यांच्यासोबत चर्चा करतात.


**संदर्भ साहित्य :** १) प्रश्नावली २) पेन्सिल ३) पेन ४) कोरे कागद





उत्पन्नाचा दाखला नमुना





जातीचा दाखला नमुना




नॉन क्रिमेलियर नमुना




वाहन परवाना नमुना




आधारकार्ड नमुना

## प्रश्नावली

**शाळेचे नाव :** ..........................................................................................................

**उपक्रमाचे नाव : महा ई-सेवा केंद्रास क्षेत्रभेट** **कृतीचे नाव :** ........................................

**विद्यार्थ्याचे नाव :** ...................................................................... **इयत्ता :** ........................

**प्रश्न १ :** दाखले काढण्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता असते?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न २ :** दाखले काढण्यासाठी कोठे जावे लागते?

**उत्तर :** ..........................................................................................................

**प्रश्न ३ :** दाखले किती वर्षासाठी वैध असते?

**उत्तर :** ..........................................................................................................

## २०) जाणून घेऊया आपल्या परिसराचा इतिहास

**उपक्रम क्रमांक : १**

**उपक्रमाचे नाव : परिसरातील प्राचीन बारव, विहीर, तलाव या जलव्यवस्थापनाच्या स्रोतांचा अभ्यास करणे.**

**पूर्वनियोजित कृती :**

- विद्यार्थ्यांना बारव, विहीर, तलाव यांविषयी माहिती देणे.
- परिसरातील बारव, विहीर, तलाव यांचा शोध घेणे.
- ऐतिहासिक माहिती असणाऱ्या ज्येष्ठ व्यक्तींची माहिती घेणे.
- पालक व ज्येष्ठ नागरिक यांच्याशी विचार विनिमय करणे.

**उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) परिसरातील बारव, विहीर, तलाव यांद्वारे केल्या जाणाऱ्या जलव्यवस्थेचा अभ्यास करणे.

२) प्राचीन जलव्यवस्थापन व आजचे जलव्यवस्थापन यांचा तौलनिक अभ्यास करणे.

३) भारताच्या प्राचीन जलसंस्कृतीची माहिती घेणे.

४) जलव्यवस्थापनाच्या स्रोतांना प्रत्यक्ष भेटी देऊन अध्ययन करणे.

**उपक्रमाची कार्यवाही व अंमलबजावणी :**

१) प्रथमतः परिसरातील बारव, विहीर, तलाव याविषयी पालकांशी चर्चा करून माहिती घेणे.

२) बारव, तलाव यांना प्रत्यक्ष भेटीचे नियोजन करणे.

३) गावातील ऐतिहासिक माहिती असणाऱ्या व्यक्तींचा शोध घेणे व त्यांच्या मदतीने प्रत्यक्ष भेट देणे.

४) विद्यार्थ्यांची विविध गटात विभागणी करून त्यांना माहिती जमा करण्यासाठी सांगणे.

५) विद्यार्थ्यांना जमा केलेल्या माहितीच्या आधारे लेखन करण्यासाठी सुलभक म्हणून मार्गदर्शन करणे.

**उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यमापन :**

१) विद्यार्थ्यांची निरीक्षणशक्ती तपासणे.

२) विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता तपासणे.

३) विद्यार्थी मिळालेल्या माहितीचे उपयोजन कसे करतात हे पाहणे.

### उपक्रमाची फलनिष्पत्ती :

१) विद्यार्थ्यांना जलव्यवस्थापन स्रोतांचे महत्त्व समजेल.

२) विद्यार्थ्यांचा प्राचीन संस्कृती, लोकजीवन, जीवनशैली या विषयांचा अभ्यास होईल.

---

३) विद्यार्थ्यांना पाण्याचे महत्त्व समजेल.

४) विद्यार्थ्यांमध्ये शोधकवृत्ती वाढीस लागेल.

### उपक्रम क्रमांक : २

### उपक्रमाचे नाव : **किल्ले व दुर्ग यांना भेटी**

### पूर्वनियोजित कृती :

- विद्यार्थ्यांना भेट देण्यासाठी सहज शक्य होईल अशा परिसरातील किल्ल्यांचा शोध घेणे.
- पालकसभा घेऊन पालकांची या सहलीसाठी मदत घेणे.
- या उपक्रमासाठी आवश्यक साहित्याची यादी करून ते उपलब्ध करून घेणे.
- भेटी द्यावयाचे किल्ले, दुर्ग यांचा नकाशा उपलब्ध करून घेणे.
- परिसरातील दुर्ग, किल्ले, गड यांची माहिती असणारी व्यक्ती मार्गदर्शनासाठी सोबत घेणे.

### उपक्रमाची उद्दिष्टे :

१) परिसरातील किल्ले, दुर्ग, यांची माहिती करून देणे.

२) अध्ययन–अध्यापन मनोरंजक व आनंददायी करणे.

३) किल्ल्यावर असणाऱ्या घटकांचे बुरुज, तटबंदी, माची, प्रवेशद्वार, खंदक, तोफखाना, धान्यकोठार, किल्ला बांधण्याची कला यांविषयी विद्यार्थ्यांना अवगत करणे.

४) भारताचा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी विद्यार्थ्यांना सजग करणे.

### उपक्रमाची कार्यवाही व अंमलबजावणी :

१) शिक्षक पालकसभा घेऊन परिसरातील किल्ले, दुर्ग, गड यांची माहिती घेतील.

२) शिक्षक परिसरातील जवळचे किल्ले, दुर्ग, गड यांची निवड करतील.

३) शिक्षक किल्ल्याची माहिती असणारे पालक व परिसरातील व्यक्ती यांना सोबत घेतील.

४) विद्यार्थी व शिक्षक आवश्यक साहित्य घेऊन किल्ला व दुर्ग यांना भेटी देतील.

५) शिक्षक विद्यार्थ्यांना किल्ल्याकडे जात असतानाच्या मार्गावरील वनस्पती, प्राणी, पक्षी यांचे निरीक्षण करण्यासाठी सांगतील व त्यांची माहिती देतील.

६) शिक्षक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष किल्ल्यावर, गडावर पोहोचल्यावर तेथील प्रवेशद्वार, बुरुज, त्यांना असणारी नावे, खंदक, तोफा, धान्याची कोठारे, तलाव त्यांची नावे, भुयार, चोरवाटा, राजमहाल, मंदिर इत्यादी बाबींची माहिती करून देतील.

७) शिक्षक विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वास्तू जतन करण्याचे महत्त्व सांगतील.

८) विद्यार्थी या भेटीदरम्यान मिळालेली सर्व माहिती वहीमध्ये लिहितील व शिक्षकांच्या मदतीने अंतिम करतील.

**उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यमापन :**

१) क्षेत्रभेटीदरम्यानचे विद्यार्थ्यांचे वर्तन, त्यांची तयारी, माहिती मिळवण्याचे कौशल्य याचे शिक्षक निरीक्षण करतील.

२) शिक्षक विद्यार्थ्यांचे संवादकौशल्य सुद्धा पाहतील.

३) शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये असणारे प्रश्नकौशल्य, माहिती जाणून घेण्याची जिज्ञासा याचेही निरीक्षण करतील.

४) शिक्षक विद्यार्थ्यांनी माहितीची मांडणी व संकलन कसे केले आहे हे तपासतील.

**उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) विद्यार्थी परिसरातील गड, किल्ले, दुर्ग यांची माहिती मिळवतील.

२) विद्यार्थी जिल्ह्यात लगतच्या परिसरात असणाऱ्या गड, किल्ले, दुर्ग यांची यादी करतील.

३) विद्यार्थी ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्यास शिकतील.

४) विद्यार्थी इतिहास लेखनाची प्राथमिक माहिती मिळवतील.

---

**उपक्रम क्रमांक :** ३

**उपक्रमाचे नाव :** **राहुटी**

**पूर्वनियोजित कृती :**

१) विद्यार्थ्यांना उपक्रमाची पार्श्वभूमी समजावून देणे.

२) केंद्र स्तरावर शाळा निवड व ठिकाण निश्चित करणे.

३) विद्यार्थ्यांना घटकानुसार राज्य विभागून देणे.

४) राज्याचा पेहराव, संस्कृती, पिके, खाद्यपदार्थ यांच्या माहितीचा संग्रह करणे.

५) उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या राहुटी पथकास विजेते घोषित करून पारितोषिक वितरण करणे.

६) या उपक्रमासाठी लागणारे विविध संदर्भ, पुस्तके, इंटरनेट विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे.

**उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) राहुट्या यांच्या माध्यमातून भौगोलिक ठिकाणे जाणून घेणे.

२) विद्यार्थ्यांना इतिहास लेखनासाठी विविध संदर्भ साहित्याचा उपयोग करण्यासाठी सक्षम करणे.

३) अन्य राज्यांची माहिती जाणून घेणे.

४) विद्यार्थ्यांमध्ये सहाध्यायी अध्ययनाद्वारे अध्ययनाचे कौशल्य विकसित करणे.

**उपक्रमाची कार्यवाही व अंमलबजावणी :**

१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांना राहुटी ही संकल्पना समजावून देतील.

२) शिक्षक विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्ग/गट यांनी एक एक राज्य घेऊन तेथील पिके, संस्कृती, मानवी जीवन, खाद्यपदार्थ, पेहराव, यांची माहिती जमा करण्यासाठी सांगतील. त्यासाठी आवश्यक ते संदर्भ साहित्य, पुस्तके, इंटरनेट आदी उपलब्ध करून देतील.

**उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यमापन :**

१) शिक्षक विद्यार्थी एकटा असताना व समूहात असतांना कसे वागतो यांचे निरीक्षण करणे.

२) समाजमिती तंत्राच्या आधारे विद्यार्थ्यांचे समूहाची असलेले संबंध यांचे शिक्षक निरीक्षण करतील.

३) शिक्षक विद्यार्थी संदर्भसाहित्य कसे हाताळतात याचे अवलोकन करतील.

४) विद्यार्थी माहितीचे संकलन व माहितीचे व्यवस्थापन कसे करतात हे शिक्षक तपासतील.

**उपक्रमाची फलनिष्पत्ती :**

१) विद्यार्थ्यांमध्ये इतिहास व भूगोल या विषयांचा समन्वय साधून विषयांची आवड निर्माण होईल.

२) विद्यार्थ्यांना विविध राज्यांतील सण-उत्सव यांची माहिती होईल.

३) विद्यार्थ्यांमध्ये कृतीतून शिक्षण, सहाध्यायी अध्ययन ही संकल्पना विकसित होईल.

४) विद्यार्थी इतिहास लेखनाची प्राथमिक माहिती मिळवतील.

५) विद्यार्थी माहिती मिळवण्याचे कौशल्य व माहितीवर प्रक्रिया करण्याचे कौशल्य शिकतील.

# निर्मिती विशेष साहाय्य

| अ.क्र. | अधिकारी नाव | पद | उपविभागाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | श्री. राजेंद्र वाकडे | वरिष्ठ अधिव्याख्याता | अभ्यासक्रम विकसन विभाग |
| २) | डॉ. योगेश सोनवणे | वरिष्ठ अधिव्याख्याता | माहिती तंत्रज्ञान |
| ३) | श्री. सचिन चव्हाण | वरिष्ठ अधिव्याख्याता | सामाजिक शास्त्र |
| ४) | डॉ. अरुण सांगोलकर | वरिष्ठ अधिव्याख्याता | उर्दू व इंग्रजी |
| ५) | डॉ. दत्तात्रय थिटे | वरिष्ठ अधिव्याख्याता | संशोधन |
| ६) | श्रीम. मनिषा यादव | वरिष्ठ अधिव्याख्याता | गणित |
| ७) | श्रीम. तेजस्विनी आळवेकर | वरिष्ठ अधिव्याख्याता | विज्ञान |
| ८) | श्रीम. वर्षाराणी भोपळे | वरिष्ठ अधिव्याख्याता | समता |
| ९) | डॉ. गितांजली बोरुडे | वरिष्ठ अधिव्याख्याता | बालशिक्षण |
| १०) | श्री. भारत बोरनारे | वरिष्ठ अधिव्याख्याता | मराठी |
| ११) | डॉ. संदीप मुळे | अधिव्याख्याता | माहिती तंत्रज्ञान |
| १२) | श्रीम. वृषाली गायकवाड | अधिव्याख्याता | गणित |
| १३) | डॉ. निता जाधव | अधिव्याख्याता | मराठी |
| १४) | डॉ. बालमणी नंदाला | अधिव्याख्याता | उर्दू |
| १५) | डॉ. मनिषा ताठे | अधिव्याख्याता | विज्ञान |
| १६) | श्रीम. सुजाता सावंत | अधिव्याख्याता | समता |
| १७) | श्रीम. विद्या बोरसे | अधिव्याख्याता | संशोधन |
| १८) | डॉ. अजय फुंदे | अधिव्याख्याता | इंग्रजी |
| १९) | श्रीम. ज्योती राजपूत | अधिव्याख्याता | सामाजिक शास्त्र |

# श्रेयनामावली

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी नाव | पद | उपविभाग | शाळा/कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १) | डॉ. नागनाथ येवले | पदवीधर शिक्षक | मराठी | जि. प. प्राथ. शा. गावडेवाडी, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर. |
| २) | डॉ. नीता सोनवणे | विस्तार अधिकारी | मराठी | पंचायत समिती शिरपूर, जि. धुळे. |
| ३) | प्रभाकर हिप्परगे | केंद्रप्रमुख | संशोधन | समूह साधन केंद्र कांबळगा, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर. |
| ४) | शोभा माने | सहशिक्षक | संशोधन | जि. प. प्राथ. शा. वानवडा, ता. औसा, जि. लातूर. |
| ५) | श्रीशैल मठपती | मुख्याध्यापक | विज्ञान | देशभक्त रत्नाप्पा कुंभार हायस्कूल, राजापूर, जि. कोल्हापूर. |
| ६) | पल्लवी शिरोडे | प्राथमिक शिक्षक | विज्ञान | जि. प. प्राथ. शा. कोंढवे धावडे, ता. हवेली, जि. पुणे. |
| ७) | डॉ. स्मिता मामीलवाड | पदवीधर शिक्षक | समता | जि. प. प्रा. शा. माणूसमारवाडी, ता. रेणापूर, जि. लातूर. |
| ८) | अनिता खडके | माध्यमिक शिक्षक | समता | जि. प. प्रशाला भादा, ता. औसा, जि. लातूर. |
| ९) | वैशाली गाढवे | सहशिक्षक | गणित | जि. प. प्रा. शा. लांडेवाडी, पुणे. |
| १०) | तरुबेन पोपट | निवृत्त शिक्षक | गणित | पुणे. |
| ११) | ज्ञानेश्वरी परदेशी | शिक्षक | उर्दू | जि. प. प्राथ. शा. पवार वस्ती, लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे. |
| १२) | सुनिल पुरी | शिक्षक | उर्दू | जि. प. प्राथ. शा. बाबर नगर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर. |
| १३) | नीता आरसुळे | सहशिक्षक | आयटी | जि. प. प्राथ. शा. कोठाला, ता. अंबड, जि. जालना. |
| १४) | डॉ. अतुल इंगळे | उपशिक्षक | आयटी | स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, जि. जळगाव. |
| १५) | कुंदा जयवंत बच्छाव | सहायक शिक्षिका | आयटी | मनपा शाळा क्र. १८, आनंदवल्ली, नाशिक |
| १६) | श्रीधर नागरगोजे | सहशिक्षक | इंग्रजी | जि. प. हायस्कूल राडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड. |

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी नाव | पद | उपविभाग | शाळा/कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १७) | तृप्ती राऊत | सहशिक्षक | इंग्रजी | श्री. एच. बी. गिरमे ज्युनि. कॉलेज वानवडी, पुणे. |
| १८) | भारती भगत | माध्यमिक शिक्षक | सामाजिक शास्त्र | ........ हायस्कूल, पाषाण रोड, पुणे |
| १९) | डॉ. सुनील राठोड | उच्च माध्यमिक शिक्षक | सामाजिक शास्त्र | उदेशवर माध्य. व उच्च माध्य. विद्या. सावरगाव, ता. देवणी, जि. लातूर. |
| २०) | निलेश जोशी | प्राथमिक पदवीधर | सामाजिक शास्त्र | जि. प. प्राथ. शा. आवलगाव बु., ता. घनसावंगी, जि. जालना. |
| २१) | विजयकुमार भवारी | माध्यमिक शिक्षक | कला | एस.एन.डी.टी. कनिष्ठ महिला महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे. |
| २२) | गीता पाटील | माध्यमिक शिक्षक | कला | श्री शिवाजी मराठा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे. |
| २३) | तान्हाजी गवळी | प्राथमिक शिक्षक | क्रीडा | जि. प. प्राथ. शाळा पिंपळमळा, ता. संगमनेर, जि. अहमदनगर. |
| २४) | नीता जाधव | सहशिक्षक | क्रीडा | पंतनगर मनपा इंग्रजी शाळा, घाटकोपर (पू.), मुंबई. |
| २५) | प्रकाश पारखे | कलाशिक्षक | बालशिक्षण | सिद्धार्थ विद्यालय संगमनेर, जि. अहमदनगर. |
| २६) | कुसुम कच्छवे | विषय साधनव्यक्ती | बालशिक्षण | गटसाधन केंद्र मानवत, ता. मानवत, जि. परभणी. |
| २७) | सुवर्णा पवार | पदवीधर शिक्षक | अभ्यासक्रम विकसन | जि. प. प्राथ. शा. आर्वी, ता. हवेली, जि. पुणे. |
| २८) | वैशाली शेवाळे | विषय साधनव्यक्ती | अभ्यासक्रम विकसन | समग्र शिक्षा, पुणे मनपा औंध. |
| २९) | सतिश सरडे | माध्यमिक शिक्षक | व्हीजीपीजी | जिजामाता माध्य. विद्यालय, भोसरी, पुणे. |
| ३०) | चंद्रशेखर मिसाळ | माध्यमिक शिक्षक | व्हीजीपीजी | PDEAs श्रीराम विद्यालय पाडवी, ता. दौंड, जि. पुणे. |
| ३१) | नामदेव गवळी | विषय साधनव्यक्ती | व्हीजीपीजी | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे. |
| ३२) | मंजू मते | विषय साधनव्यक्ती | व्हीजीपीजी | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे. |